# श्री शारदादेवी
## यांचे
# चरित्र

म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. १२१४
१९६४



गोदामासुत

REFBK-0013846

नागपूर प्रकाशन

श्री सद्‌गुरु रामकृष्ण परमहंस यांच्या सहचरी

# सद्‌गुरुरूप श्रीशारदादेवी यांचें चरित्र

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 13846

लेखक
गोदामासुत

REFBK-0013846

प्रथमावृत्ति
१९६४

किमत
रुपये ४-३०

नागपूर प्रकाशन

प्रकाशक—
दि. मा. धुमाळ
नागपूर प्रकाशन
सीताबर्डी, नागपूर—१

नागपूर प्रकाशन क्रमांक ८५
२४ डिसेंबर १९६४

सर्व हक्क
प्रकाशकाधीन

मुद्रक —
ल. म. पटले
रामेश्वर प्रिंटिंग प्रेस
सीताबर्डी, नागपूर—१

३७८७० चरित्र
१२१८ 3.3.६४

# निवेदन

सन १९४९ चे ऑक्टोबरमधे सद्गुरु मजकडे येऊन त्यांनी अडीच एक महिने वास्तव्य केले. आल्याबरोबर दोन-चार दिवसात मला आज्ञा झाली की आम्हाला श्रीशारदादेवींचे चरित्र ऐकवा. शक्य तितकी चौकशी करता मराठीत असे पुस्तक नाही असे कळल्यावरून तसे कानी घातले, तो तुम्हीच लिहा व जसजसे लिहून होईल तसे वाचून दाखवा अशी आज्ञा झाली. या कामाची किंचितही माहिती व अनुभव नसता केवळ श्रद्धेने काम हाती घेणे भाग होते. तेव्हा सद्गुरुस्वरूप रामकृष्णांचे बाबतीत तसेच सद्गुरुरूप शारदादेवींचे बाबत मराठी व इंग्रजी भाषेत जे काय प्रसिद्ध झालेले येथे मिळाले ते लगेच जमा करून, त्याची टिपणे करून, चरित्राचा आराखडा आखून लिहावयास व जसजसे होत गेले तसतसे आठवड्यातून दोनदा वाचून दाखवावयास सुरवात केली. त्यांच्या कृपेने हे काम २४ डिसेंबर १९४९ रोजी संपले. एकदोन दिवसात हस्तलिखित बांधवून समोर केले तर लगेच पेन्सिल घेऊन पहिल्या पानावर भराभर त्यांनी एक आकृति रेखाटली; पुढे कळले की हे सूर्ययंत्र होय. यात कांहीतरी गूढार्थ असावा असे वाटल्यावरून यदाकदाचित् पुस्तक प्रसिद्ध होण्याचा प्रसंग आला तर ही आकृति त्यावर घातलीच पाहिजे असे ठरवून टाकले.

यानंतर अनेकांनी हे हस्तलिखित वाचले, कित्येकांनी याची प्रत करून घेतली, तर सर्वांनी प्रसिद्ध करण्याबद्दल गळ घातली. योगायोगानेच गोष्टी होतात असे माझे मत असल्याने मी स्वस्थ राहिलो. गतवर्षाचे शेवटी सुप्रसिद्ध साहित्यिक कवि वेदांत-प्राज्ञ श्रीयुत पु. य. देशपांडे यांनी वाचून ते प्रसिद्ध करण्याकरता प्रकाशन कार्यातील येथील प्रसिद्ध मुरब्बी

श्रीयुत घुमाळ यास सुचविले. पुढे केव्हां तरी त्यांनीं विचारल्यावरून मी हस्तलिखित त्यांचे स्वाधीन केले ते हे आज त्यांचेमुळे जनताजनार्दना-समोर या वेषात येत आहे.

साहित्य व लेखन यांचा संपर्क नसता लिहिण्याचा प्रसंग; त्यात निरनिराळ्या संस्था व साहित्यिक यांच्यातील शुद्धलेखनाबद्दलची हमरी-तुमरी; तेव्हां असे ठरवले की मनात येईल तसे लिहित जावे व अर्थांतर होणार असेल तितकेच अनुस्वार द्यावे, व तसेच केले आहे. शिवाय संतांची चरित्रे भावभक्तियुक्त अंतःकरणाने वाचावयाची पुस्तके होत, तेव्हा फारसे व्याकरणाकडे पहाण्याचे आपल्यास कारण नाही असेही वाटले. असो.

संतांची चरित्रे ही मार्गदर्शन व नामस्मरण या जोड उद्देशाने लिहिली जावी असे मला वाटत असल्याने त्या दृष्टीने हे चरित्र झाले आहे का नाही हे प्रत्येक वाचकाने आपल्या मनाशी ठरविणे योग्य होय असे वाटते.

प्रकृति अस्वास्थ्यामुळे याची प्रुफेसुद्धा मी नजरे खालून घालू शकलो नाही व त्यामुळे ज्या कांही त्रुटि नजरेस येतील त्याबद्दल वाचकांनी क्षमा करावी.

नागपूर,
२४ डिसेंबर १९६४

—गोदामासुत



श्री शारदादेवी



श्रीरामकृष्ण परमहंस

# अनुक्रमणिका


| | | पान |
|---|---|---|
| प्रकरण १ लें | मातापितर, जन्म व बालपण .. .. | १ |
| प्रकरण २ रें | विवाह .. .. .. | ८ |
| प्रकरण ३ रें | दक्षिणेश्वराला पहिली भेट .. .. | १२ |
| प्रकरण ४ थें | माताजी व रामकृष्ण यांची अंतिम ध्येयप्राप्ति | १८ |
| प्रकरण ५ वें | रामकृष्णांची सेवा .. .. .. | २४ |
| प्रकरण ६ वें | दक्षिणेश्वर व जयरामवाटी .. .. | ४० |
| प्रकरण ७ वें | रामकृष्णांची महासमाधि व नंतर .. .. | ४७ |
| प्रकरण ८ वें | वृंदावनची यात्रा .. .. .. | ५२ |
| प्रकरण ९ वें | कामारपुकुरी वास .. .. .. | ५७ |
| प्रकरण १० वें | माहेरचा व्याप .. .. .. | ६४ |
| प्रकरण ११ वें | गुरुपदावरील कामगिरी .. .. .. | ७४ |
| प्रकरण १२ वें | स्वभाव .. .. .. .. | ९२ |
| प्रकरण १३ वें | आणखी तीर्थयात्रा .. .. .. | १०९ |
| प्रकरण १४ वें | उत्तर चरित .. .. .. .. | ११४ |
| प्रकरण १५ वें | उपदेशसार .. .. .. .. | १२१ |
| प्रकरण १६ वें | अवसान .. .. .. .. | १२५ |


## माताजींच्या आठवणी


| | |
|---|---|
| भाग १ ला .. .. .. .. | १३२ |
| भाग २ रा .. .. .. .. | १५४ |
| भाग ३ रा .. .. .. .. | १८२ |
| परिशिष्ट .. .. .. .. | २०४ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३७९८७० वि: चारि ग.
क्रमांक १२१२ नों दि: ३।३।६५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. 13-446

# श्री सद्गुरु रामकृष्ण परमहंस यांच्या सहचरी सद्गुरुरूप श्री शारदा देवी यांचें चरित्र

## प्रकरण पहिलें

### मातापितर, जन्म व बालपण

कलकत्त्यापासून साठ मैलावर बंकुरा जिल्ह्यांत जयरामवाटी नावाचें एक लहानसे खेडें असून, त्याच्या उत्तरेस सतत वाहणारा असा आमोदर नांवाचा एक ओढा आहे. आजच्या कालांत रस्ते व वाहनांच्या सुलभतेमुळे कलकत्त्याहून या गांवाला जाणें फार सोपें असलें, तरी ज्या काळची गोष्ट आम्ही सांगत आहों त्या काळीं वाहनांच्या व रस्त्यांच्या अभावामुळे या खेडेगांवीं पोहोचण्यास कष्टाने दोन दिवस पुरत असत. शंभर झोपड्यांचें हें खेडेगांव अर्थातच लहान होतें. येथील लोक फार उद्योगी असल्याने व जमीन फार सुपीक असल्याने येथे तांदूळ, बटाटे व भाजीपाल्याचें मोठें उत्पन्न होत असे; बाकीच्या वस्तूकरिता येथील लोकांना अर्थातच जवळची मोठी खेडीं व गांवें, विशेषतः सहा मैलावर असलेलीं सिहोर, काटलपूर. कोयापट व कामारपुकुर यांवर अवलंबावें लागे. येथील लोक मलेरियाचा प्रादुर्भाव होण्यापूर्वी शरिराने सुदृढ व आनंदी होते. दुर्गापूजा कालीपूजा वगैरे उत्सव या खेडेगांवात जमावाने व उत्साहाने पार पाडले जात असत. या गांवांत सिंहवाहिनीचे देऊळ प्रसिद्ध असून जवळच्या सिहोर गांवी शिवाचे देऊळ तसेच प्रसिद्ध होते व सांघिक उत्सव या देवळामधेच होत असत.

आमच्या परमपूज्य चरित्रनायिकेच्या जन्मस्थानचा मान या भाग्यवान् खेडयास मिळाला होता.

या खेडेगांवात दोनच काय ती ब्राम्हणाची घरें होतीं—एक बॅनर्जींचे व एक मुकर्जींचे. मुकर्जी घराण्यांत आमच्या चरित्रनायिकेचा जन्म झाला. माताजींच्या वडिलांचे नाव रामचंद्र असून, त्यांना तीन भाऊ होते. या तीन भावांपैकी एकाचे नाव त्रैलोक्यनाथ असून हे प्रसिद्ध पण्डित होते; अल्पवयीच ते निर्वतले. दुसऱ्या व तिसऱ्या भावांची नांवें अनुक्रमे ईश्वरचंद्र व नीलमाधव; हे दोघेही आजन्म ब्रह्मचारी होते हे सर्व भाऊ एके ठिकाणीच रहात असत.

माताजींचे वडील रामचंद्रजी हे जरी पैशाने अगदी गरीब असले तरी फार सात्त्विक, सालस, श्रद्धावान् व ब्राम्हण धर्माचे एक प्रतीकच होते. माताजी म्हणत असत की माझे वडील फार चांगले होते. ते रामभक्त असून फार श्रद्धाळू व धार्मिक होते. कधीही परिग्रह घेत नसत. त्यांना धूम्रपानाचा फार शोक होता; रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्याला सुद्धा ते म्हणत की या भाऊ, घ्या चिलीम.

१८६४ सालच्या बंगालमधील दारुण दुष्काळात त्यांच्या औदार्याचा नमुना पुष्कळांना पहावयास मिळाला. त्यांची शेती भाती ती काय ? व जवळ पैसाही नव्हता. जानवी वळून व भिक्षुकीवर काय चार पैसे मिळतील तेच. जे काय धान्याचे कोठार होते ते त्यांनी या दुष्काळात मुक्तहस्ताने वाटले. या प्रसंगाबाबत माताजी सांगत की जयरामवाटीवर सुद्धा दारुण दुष्काळाने झडप घातली. एकामागून एक अशी माणसांची रीघ आमच्या वरी लागली. जे काय भात होते त्याची खिचडी बनवून आम्ही प्रत्येकास खायला घालीत होतो. घरांतील सर्व मंडळीसुद्धा खिचडीच खात असत. माझ्याकरिता मात्र माझे वडील चांगल्या तांदुळाचा भात करीत. कांही

वेळ इतकी मंडळी येत असे की शिजवलेली खिचडी व घरातील भांडी अपुरी पडत. मग लगबगीने भांडी घासून खिचडी बनवून आम्ही गरम गरम खिचडी लोकांना वाढीत असू. गरम खिचडी लौकर थंडी व्हावी एवढ्याकरिता मी पंख्याने वारा करीत असे. एकदा एक अतिशूद्र जातीची बाई आली; तिचे केस पिंजारलेले व डोळे वेड्याप्रमाणे चढलेले होते. लोकांच्या पानात खाऊन उरलेली खिचडी आम्ही गुरापुढे ठेवीत असू; ती बाई आली ती सरळ गुरापुढची खिचडी खाऊ लागली. आम्ही तिला सांगितले की आत चल, पानावर बैस, खिचडी तयार आहे; पण तिला धीर निघत नव्हता. बाबांनो, भुकेच्या यातना सहन करणे इतकी सहज गोष्ट आहे काय ?

माताजींच्या मातोश्रीचें नांव श्यामसुंदरी देवी असे होते. सिहोरच्या हरिप्रसाद मुजुमदारांचे घरी त्यांचे माहेर होते. सौ. श्यामसुंदरादेवी अंगाने सुदृढ, महाउद्योगी, घर कृत्यांत अत्यंत दक्ष, पतिव्रता व नवऱ्याच्या पावलावर पाऊल टाकणाऱ्या होत्या. रामभक्ति त्यांच्या हृदयात जाज्वल्य वसत होती. दुसऱ्याचे चांगले पाहाणे व करणे, आणि लोकांना जेवायला घालणे यात त्यांना फार आनंद वाटत असे पुढे जेव्हा माताजींचा शिष्य-संग्रह त्यांचे घरी येऊ लागला तेव्हा त्या आनंदाने सर्व भक्तमंडळीची सेवा करण्याची पराकाष्ठा करीत. ही सर्व भक्तमंडळी तिला आपल्या अगदी जवळच्या नातेवाइकासारखीच वाटत असत. त्यांतल्यात्यांत ही मंडळी वयाने थोडीशी लहान असली तर ती जणु नातवंडेच होत अशा तऱ्हेने ती त्यांच्याशी वागत असे. माताजी म्हणत असत की माझी आई ही साधेभोळेपणाची पुतळीच होती. ती फार दयाळू अंतःकरणाची असून, दुसऱ्याच्या दुःखाने तिचे हृदय अगदी पिळवटून निघत असे.

अशा मातापितरांच्या पोटीच आमच्या चरित्रनायिकेचा जन्म झाला. असल्या विभूति गर्भात असतांना गर्भिणी स्त्रीला कांही विचित्र अनुभव व

दृश्ये दिसतात असा साधारणतः अनुभव आहे. श्यामसुंदरी देवींच्या अशा प्रकारच्या अनुभवाची माहिती उपलब्ध नसली तरी आपल्या चरित्रनायिका त्यांच्या पोटी वाढत असते वेळेची एक आख्यायिका ऐकण्यांत आहे.

श्यामसुंदरीदेवी कांही उत्सवानिमित्त सिहोर गांवी गेल्या होत्या. विश्रांति घेण्याच्या हेतूने देवळानजीक एका झाडाखाली बसल्या असतांना एकाएकी त्यांचे अंगात वारे भरून सर्वांग जड झाल्यासारखे त्यांना वाटू लागले. इतक्यात लाल रेशमी साडी नेसलेली एक पाचसहा वर्षाची मुलगी झाडावरून खाली येतांना त्यांनी पाहिली. जवळ आल्यावर त्या लहान मुलीने त्यांच्या गळ्याला मिठी मारून म्हटले की आई मी तुझ्या घरी येते. असे म्हणत असतांनाच ती लहान मुलगी त्यांच्या शरिरात गुप्त झाली व त्या बेशुद्ध पडल्या.

आमच्या चरित्रनायिका श्री शारदा देवी यांचा जन्म २२ डिसेंबर १८५३ रोजी झाला. *

माताजीच्या बाल लीलांची माहिती नाही. चरित्र या दृष्टीने ही एक मोठी त्रुटि वाटते, पण त्यास उपाय काय ?

त्या काळच्या परिस्थितीप्रमाणे विशेषतः खेड्यात राहणाऱ्या मुलींचा लहानपणचा जीवनक्रम जसा जात असे तसाच माताजींचा जीवनक्रम होता. लहानपणापासून आईस मदत करणे व पुढे अडीअडचणीला आईचे सर्वकाम करणे हेच स्वभावतः मुलींच्या वाट्याला येत असे, तसेच ते माताजींच्या वाट्यास आले. माताजी या कामाबद्दल सांगत असत की मी स्वयंपाक करीत असे, व माझे वडील मोठाली भांडी चुलीवर चढविण्याचे

* माताजींची कुण्डली व त्यावेळी जोतिषाने वर्तविलेले भविष्य परिशिष्टात दिलेले आहे.

व उतरविण्याचे काम करीत असत. कित्येक वेळी शेतामध्ये गळाभर पाण्यात राहून गाईकरिता गवत तोडण्याचा प्रसंग माझ्यावर येत असे. शेतांत काम करणाऱ्यांचेकरिता खायला घेऊन जाण्याचे काम पुष्कळ वेळी मला करावे लागत असे. जेव्हा अवर्षणामुळे किंवा अतिवृष्टीमुळे किंवा पशुपक्षादिकाकडून शेतेच्या शेते उध्वस्त होत, अशावेळी शेतात जाऊन धान्याचे कणकण जमविण्याचे काम मी करीत असे.

लहानपणीसुद्धा माताजी शांतचित्त व गंभीर असत. मुलांच्या खेळात त्यांचे लक्ष नसे. त्यांची लहानपणची मैत्रीण देवी अघोरमणी एकदा सांगत होती की लहानपणी माताजी फार साध्या होत्या. खेळतांना त्या कोणाशी भांडत नसत. दुसऱ्याची भांडणे सोडवून शांतता प्रस्थापित करणे यात त्यांचा हातखंडा असे. खेळातील मुख्य पार्टीचे काम त्या नेहमी स्वत:-कडे घेत असत. बाहुलीचे खेळ खेळण्याऐवजी त्या देवप्रतिमांची पूजा करीत असत एकदा अशीच जगद्धात्रीची पूजा करतांना त्या त्या पूजेत इतक्या तन्मय होऊन गेल्या होत्या की तशा स्थितीत या छोट्याशा मुलीला पाहून हलदारपूरच्या श्रीमती रामहृदयी घोसळ यांना त्यांच्याबद्दल अत्यंत सादर भीति व आश्चर्य वाटू लागले.

लहानपणी त्यांचा सर्व वेळ बहुतेक आपल्या लहान भावंडांना संभाळण्यात जाई; माताजीच सर्वात वडील असल्याने हे काम त्यांचेकडे ओघानेच आले होते. आपल्या भावंडाबरोबर एखादेवेळी त्या शाळेत जात; परंतु त्या काळी मुलींना शिक्षण देण्याची प्रथा नसल्याने माताजींच्या नियमित शाळेत जाण्याकडे अर्थातच लक्ष पुरवले गेले नाही. माताजींची शिक्षणाची आवड अशा परिस्थितीत अर्थातच तशीच राहिली. पुढे त्या स्वत: वाचावयास शिकल्या. आपल्या प्रौढ वयातील अभ्यासाबद्दल त्या सांगत असत की श्रीरामकृष्णांची पुतणी लक्ष्मी व मी एकदा बंगाली पहिले पुस्तक वाचीत होतो. श्रीरामकृष्णांचा पुतण्या हृदयराम ह्याने ते

पाहिल्यावर, त्याने माझे हातून पुस्तक ओढून घेऊन तो म्हणाला की बायकांना लिहावाचायला शिकून काय नाटक–कादंबऱ्या वाचायच्या आहेत काय ? पण हृदयरामने लक्ष्मीच्या हातातले पुस्तक तसेच राहूं दिले; लक्ष्मी माहेरवाशीण होती ना ! लक्ष्मी त्या खेडेगावातल्या शाळेत सुद्धा नियमित जात असे. त्यावेळी श्रीरामकृष्ण श्यामपुकुरमध्ये होते व मी एकटीच आपल्या खेडेगावी होते. पुढे दक्षिणेश्वरी असतांना भाव–मुकर्जी-च्या घराण्यातील एक मुलगी गंगास्नानास जाता येता माझ्याकडे थांबत असे. तिने मला वाचायला शिकविले. मला कितपत बरोबर येते याची चाचणीसुद्धा ती घेत असे; या तिच्या शिकवण्याबद्दल मी तिला मोबदला म्हणून बागेतून येणाऱ्या भाजीपैकी थोडीशी भाजी देत असे.

अशा तऱ्हेने माताजी वाचायला शिकल्या, तरी त्यांना लिहिता येत नसे. एकदा एका स्त्रीभक्ताने त्यांची सही घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी तिच्या वहीवर त्यांनी पुष्कळ रेघा ओढून सही करण्याचा प्रयत्न केला, पण तो साधला नाही.

शिक्षण व सुसंस्कृतता या दोन गोष्टी अगदी निराळ्याच आहेत. चांगल्या शिक्षणाने असलेली सुसंस्कृतता संघटित होऊन वाढते इतकेच. आजकाल शिक्षणाने सुसंस्कृतता येते असे समजले जाते व हे तत्त्व आजचे शिक्षण पाहिले की खरे नव्हे असे सहजच ध्यानांत येते. आपल्याकडे पूर्व-कालापासून शिक्षण व सुसंस्कृतता निराळ्याच मानण्यात येत आहेत. शिक्षण या दृष्टीने माताजींना कांही येत नसले तरी त्या अभिजात सुसंस्कृत होत्या. घरातील धार्मिक वागणूक व त्यागाचे शिक्षण, परसेवेचा विडा, सांघिक पूजोत्सव, महाभारत, रामायणादि पुराणांचे व कथाकीर्तनांचे श्रवण भक्तिरसात्मक कथा व गाणी, पौराणिक नाटके पहाणे इत्यादिमुळे त्या बहुश्रुत व सुसंस्कृत झाल्या होत्या. त्याचबरोबर एकटे रहावयाच्या

प्रसंगाने विचार करण्यास पुष्कळ वाव मिळून, चांगले व वाईट याबद्दलचा निर्णय घेण्याची त्यांची बुद्धि पुष्कळच पुढारली होती. विचार व आचार बनण्याच्या वयात त्या एकट्या असल्याने शिक्षित लोकांत सांपडणारा बुद्धीचा व ध्येयाचा गोंधळ व ते मिळविण्याच्या मार्गात बुद्धीस असंख्य फाटे फुटल्याने येणारी अनिश्चितता, यांच्यापासून त्या सुदैवाने अलिप्त होत्या. त्यांच्या बुद्धीची सुसंस्कृतता, स्थैर्य, विशालता व संयम इत्यादि अमौलिक गुण पराकोटीस पोहोचविणारा महत्त्वाचा दुवा म्हणजे अल्पवयातच विवाहामुळे आलेला श्रीरामकृष्ण परमहंसांचा संबंध होय.

• • •

# प्रकरण दुसरे

## विवाह

कोणत्याही बाबतीत अनुभवाने तत्त्व ठरवून त्याचप्रमाणे समाज वागू लागतो. कांही काळानंतर याबरोबर रूढी वाढत जाऊन त्याचे एक मोठे तंत्रच बनते. पुढे तत्त्व विसरले जाऊन वरील जमलेल्या तंत्रावरच भर दिला जातो. शेवटी तंत्रामधे सुद्धा विकृति उत्पन्न होते. असा हा काल महिमा आहे.

आपल्या या भारतात एकेकाळी स्त्रियांना पूर्ण शिक्षण दिले जात असे; त्यांचे उपनयन होत असे; त्यांना वेदाधिकार असून त्या सर्व वैदिक कर्मे करीत असत. गुरुगृही शिक्षण समाप्त झाल्यावर त्यांचे लग्न होत असे. पुढे त्यांची मुंज होईनाशी झाली; त्यांचा वेदाधिकार गेला; त्यांचे शिक्षणाकडे लक्ष कमी झाले. मुलांचे आचार विचार ज्या वयात बनत असतात अशा वेळी मुलगा मुलगी एकत्र आली असता एकमेकांच्या स्वभावाचा परिपोष होऊन, तरुणपणी गृहस्थाश्रमाची घडी नवराबायको· मध्ये असलेल्या व जुळलेल्या एकीमुळे उत्तम बसून समाज सुधारतो अशा अनुभवामुळे लौकर लग्न करण्याची प्रथा पडली. कालांतराने याचे विकृत स्वरूप म्हणजे पाळण्यांत सुद्धा लग्ने लावण्यात येऊ लागली. असा हा कालमहिमा आहे. या कालगतिप्रमाणेच माताजींचे लग्न अगदी अल्पवयात झाले.

इकडे जयरामवाटीस ही लहानशी अकाली प्रौढासारखी वागत असलेली मुलगी वाढत होती, तर तिकडे ज्यांच्याशी त्यांचा विवाह व्हावयाचा होता ते गृहस्थ श्रीयुत गदाधर ( श्रीरामकृष्ण परमहंसांचे

पूर्वाश्रमांतील नांव) १८३६ साली कामारपुकुरच्या चॅतर्जी घराण्यात तिसरे चिरंजीव म्हणून जन्म घेऊन, १८५५ साली कलकत्त्यास दक्षिणेश्वरी कालीचे पूजारीपण पत्करून, आपल्या आत्मोन्नतीच्या आघाडीवर पूर्ण एकाग्रतेने अग्रेसर झाले होते. गदाधराचा स्वभाव लहानपणापासून अकाली प्रौढासारखा व गूढ असा असून त्याला देवादिकाबद्दल अनुपम प्रेम वाटत असे. कालीचे पुजारीपण पत्करल्यावर मग त्याला देवीच्या सगुणदर्शनाच्या प्राप्ति पलीकडे कांहीही दिसेनासे झाले, व तदनुसारच त्याचे सर्व वर्तन असे. त्याचा सर्व वेळ ध्यानधारणेत जाऊ लागला. भुकेची सुद्धा त्याला आठवण नाहीशी झाली. झोपेने त्याच्याशी फारकत केली. शेवटी जगदृष्टीने त्याची वागणूक उन्मत्तासारखी दिसू लागली; तो वेडयासारखे करू लागला. गदाधरला भ्रम झाला आहे, वेड लागले आहे असा बोभाटा सर्वत्र होऊ लागला. ही बातमी कामारपुकुरास त्याची आई श्री. चंद्रादेवी यांच्या कानावर गेल्यावर, तिने त्यास तावडतोब कामारपुकुरास आणवून घेतले. त्याला औषधोपचार सुरू केले. त्या काळच्या समजुतीप्रमाणे नवस सायास झाले, गंडे दोरे मंत्र तंत्र वगैरे सर्व करण्यात आले; पण उतार असा वाटेना. परंतु थोडक्याच दिवसात पुढे गदाधर एकाएकी शांत झाल्याने त्याला निदान 'बाधा झाली नाही' असे त्याच्या आईस वाटू लागले. कदाचित् यावेळी गदाधरला कांही दर्शन झाले असल्याचा संभव आहे. कारण तो पुष्कळच शांत होऊन साधारण माणसाप्रमाणे वागू लागला. तरी सुद्धा त्याचे घरात लक्ष नसणे, स्मशानात बसून जपजाप्य करणे वगैरे चालूच होते.

आपल्या मुलाची अशी स्थिति फिरून होऊ नये या करता काय करावे असा विचार त्या माउलीचा सुरू झाला. तिच्या मनाने असे घेतले की या मुलाचे लग्न करून संसाराची बेडी त्याच्या पायात अडकविल्यास त्यास जबाबदारी वाटून, तो सुधारेल. मग काय मुली पहावयास सुरवात

झाली. आधीच त्यांच्या समाजात मुलीकरता वरणी देण्याची चाल व त्यांत हे निर्धन लोक; शिवाय भ्रमिष्ट म्हणून प्रसिद्ध झालेला मुलगा; मग मुलाला मुलगी देणार कोण व लग्न होणार कसे ? कोठेही जमेना. या विषयाबावत गदाधरशी बोलायचे कसे ? तो एकदम नाही म्हणेल ही भीति. अशा स्थितीत दिवस जात असतां एक दिवस रामकृष्ण सहज म्हणाले की इकडे तिकडे मुली पहाण्यांत काय अर्थ आहे; जयरामवाटीच्या रामचंद्र मुकर्जींच्या मुलीशी माझे लग्न जमेल. हे ऐकून सर्वांना आश्चर्य वाटले, कोणाचा ह्यावर विश्वास वसेना, तरीपण बुडत्यास काडीचा आधार या नात्याने हे स्थळ पाहावयाचे ठरले.

अशी एक आख्यायिका आहे की श्री शारदा देवी दोन वर्षाच्या असतांना सिहोरला कांही उत्सवानिमित्त त्यांना त्यांच्या आईबरोबर नेण्यात आले होते. त्याचवेळी रामकृष्ण पण तेथे आलेले होते. त्या काळात मुलेमुली एकत्र खेळत असता वडीलधारी माणसे गंमत म्हणून मुलींना विचारीत की पोरी या मुलापैकी तुला कोणता नवरा आवडतो ? असे त्या लहानग्या शारदास विचारले तेव्हा तिने त्यावेळी रामकृष्णांचे कडे बोट दाखविले.

रामचंद्र मुकर्जींची मुलगी–श्रीशारदादेवी—पांच वर्षाची व गदाधर (रामकृष्ण) हा तेवीस वर्षाचा मुलगा; तेव्हा कसे लग्न जमवावे व जमेल की नाही असा प्रश्न दोन्ही कुटुंबाच्या समोर होता; तरीपण शेवटी लग्न जमलेच. रामचंद्र मुकर्जींना ३०० रुपये वरणी देण्यांत आली. सन १८५९ च्या मे महिन्यांत हे लग्न पार पडले. देणे घेणे व समारंभ असा फारसा कांहीच नव्हता, कारण दोन्ही पक्ष निर्धन होते. वरातीच्या दिवशी लाहा कुटुंबाकडून उसनवार मागून आणलेले दागिने मुलीच्या अंगावर घातले होते. कामारपुकुरास परत आल्यावर कांही दिवसांनी हे दागिने परत करण्याचा प्रसंग आला. त्यावेळी मुलीच्या अंगावरून दागिने कसे काढायचे

हा अतिनाजुक व कठीण प्रश्न चंद्रादेवींच्या समोर उभा राहिला. श्रीरामकृष्णानी मोठ्या युक्तीने या प्रसंगास तोंड दिले. मुलगी रात्री निजल्यावर तिच्या अंगावरील दागिने त्यांनी हळूच काढून घेऊन परत केले. सकाळी मुलगी जागी झाल्यावर पहाते तो अंगावर दागिने नाहीत. याचा बोभाटा होणारच होता व झालाही. चंद्रादेवींनी त्यावेळी मुलीला पोटाशी घेऊन समजाविले व सांगितले की आता गदाधर तुला पुष्कळ दागिने करून घालील. मुलगी बिचारी काय बोलणार ! पण मुलीबरोबर आलेला मुलीचा चुलता हे सर्व पाहून संतापला व त्याने मुलीला घेऊन जयरामवाटीची वाट धरली. यामुळे सर्वत्र वातावरण खेदयुक्त होते; परंतु रामकृष्ण मात्र शांत होते. ते म्हणाले देखील की मुलगी परत नेली म्हणून काय झाले; जाणार कुठे आहे ती; येईलच परत. लग्न तर लागले ना नीट !

यावेळी रामकृष्ण कामारपुकुरास जवळ जवळ वर्षभर होते. मध्यंतरी एकदा ते आपल्या सासरी जयरामवाटीस गेले होते; त्यावेळी पायावर कमळे वाहून शारदादेवींनी त्यांची पूजा केली होती लौकरच ते कलकत्त्यास परतून आपल्या कामावर रुजू झाले; शारदादेवी जयरामवाटीस माहेरीच राहिल्या.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वल्पतं.
अनुक्रम ....३५८८०.... दि: ..........
.... १२९४.......... नों दि ....३।३।६५

# प्रकरण तिसरे

## दक्षिणेश्वरला पहिली भेट

लग्न झाल्यानंतर बरीच वर्षे निघून गेली दक्षिणेश्वरी रामकृष्ण आपल्या आत्मोन्नतीच्या मार्गात गर्क होते; आपले लग्न झाले आहे याची जाणीव सुद्धा त्यांना नसावी असे दिसत असे. जेथे स्वतःच्या देहाची शुद्ध गेली होती तेथे सांसारिक नाती लक्षात आलीच नाहीत तर त्यात नवल कसले ?

शारदादेवींना चौदावे वर्ष लागले. याच वेळी रामकृष्ण आपल्या घरी कामारपुकुरास आले असल्यामुळे त्या तेथे गेल्या. श्रीरामकृष्णांचा प्रत्यक्ष संबंध येण्याचा हा पहिलाच प्रसंग शारदादेवींचा. इतर लोकांना रामकृष्ण भ्रमिष्ट व वेडे वाटत असले तरी या वेळी त्यांना पाहिल्यावर शारदादेवींना तसे वाटले नाही. एवढे मात्र त्यांना समजून चुकले की आपला नवरा हा कांही निराळाच मनुष्य आहे; आपला नवरा दयाळू, शांतचित्त, स्वार्थत्यागी व परमेश्वराच्या दर्शनाकरिता अत्यंत तळमळत असलेला मनुष्य आहे. यावेळी माताजी ज्या कांही थोडे दिवस तेथे राहिल्या तेवढ्यात त्यांना रामकृष्णांनी स्वतः नानाप्रकारचे, शिक्षण दिले. बारीक सारीक गोष्टीत सुद्धा घरात कसे लक्ष ठेवावे, घरातील निर-निराळ्या माणसांचे स्वभाव जाणून त्यांच्याशी कसे वागावे वगैरे गोष्टी रामकृष्णांनी माताजींना शिकवल्या अशा स्थितीत त्यांना ते भ्रमिष्ट किंवा वेडे वाटणे संभवनीयच नव्हते. त्यावेळाबाबत माताजी सांगत की त्यांच्या सान्निध्याने माझे हृदय आनंदाने भरून उचंबळून जात आहे असे मला वाटत असे, ह्या आनंदाची कल्पना मी कशी कोणाला समजावून देऊ शकेन बरे; अनुभवाविना नुसती कल्पना सांगून उपयोग काय ?

रामकृष्णांकडून माताजींना मिळणाऱ्या शिक्षणाचा एखादा नमूना येथे देणे अप्रस्तुत होणार नाही. एकदा रामकृष्ण कामारपुकुरास असतांना त्यांना पोटदुखीचा त्रास होत होता. त्यावेळी ते पहाटे उठून स्वत:करिता कोणते पदार्थ कसे तयार करावेत हे सांगत, व त्याप्रमाणे माताजी पदार्थ तयार करीत. एक दिवस एक विविक्षित भाजीचा मसाला संपला होता, तेव्हा ती भाजी कशी करावी या विवंचनेत त्या होत्या. यावर माझ्या मेहुणीने मला मसाल्याशिवायच भाजी करायला सांगितले. रामकृष्णांनी हे ऐकल्याबरोबर ते म्हणाले की असे कसे चालेल ; असे करणे अयोग्य होईल. कोणतीही अयोग्य गोष्ट कधीही करू नये. दक्षिणेश्वरी मिळणारे सर्व पदार्थ सोडून येथे आलो तो काय अशा तऱ्हेची बिनमसाल्याची भाजी खायला आलो का ? माताजी म्हणत की अशा क्षुल्लक गोष्टीवरून सुद्धा किती मोठाले धडे रामकृष्ण शिकवीत.

यानंतर बरीच वर्षे निघून गेली. यावेळी मनात येणाऱ्या विचाराबद्दल माताजी सांगत की रामकृष्ण दक्षिणेश्वरीच होते व मी एकटीच माहेरी होते. पुष्कळ वर्षे निघून गेल्यामुळे माझ्या मनांत उलटसुलट विचार येऊ लागले. एकदा वाटे की आता त्यांचे जवळ राहून त्यांची सेवा करावी; मग वाटे की माझी आठवण तरी त्यांना आहे का, नाहीतर त्यांनी मला एव्हाने दक्षिणेश्वरी नेले असते; असे मनात आले की वाईट वाटे. लगेच दुसरे मन म्हणे की अरे ज्याने तुला इतके शिकविले, प्रेमाने वागविले व आत्मोन्नतीच्या मार्गावर अधिष्ठित केले तो तुला विसरणे शक्यच नाही. परंतु ह्याबाबत कोणाशीही बोलणे शक्य नव्हते. इतकेच काय पण या काळी घराच्या बाहेर पडणे कठीण वाटे. कारण मला पाहून, मजकडे बोट दाखवून, गावातल्या बायका म्हणत की ही चालली वेड्याची बायको अशा बोलण्याचा सुरवातीस माझ्यावर परिणाम होत नसे; परंतु पुढे वारंवार असे शब्द कानावर पडू लागल्यामुळे माझ्या मनाची स्थिति मोठी

चमत्कारिक होऊ लागली होती. मनात येई की खरेच त्यांना वेड लागले असले तर काय करावे ? आपला नवरा आजारी असतांना आपण माहेरी राहाणे कितपत योग्य आहे ? त्यांची सेवा करणे माझे कर्तव्य नाही का ? अशा या विचारांनी दिवसेंदिवस माझे मन अगदी बेचैन होऊ लागले होते. शेवटी मनाने घेतले की एकदा स्वतः दक्षिणेश्वरी जाऊन स्वतः डोळ्यांने सर्व पहावे व मग काय करावे याचा निर्णय घ्यावा.

असा मनाचा निश्चय झाला त्याच वेळी अशी कांही घटना झाली की मला दक्षिणेश्वरी जाण्याचा योग आला. आमच्या गावातून श्रीचैतन्य-प्रभूंच्या जन्मतिथीनिमित्त कांही लोक कलकत्त्यास गंगा स्नानाकरिता जात होते. मी त्या लोकांना बरोबर घेऊन जाण्याकरिता विनविले. त्या लोकांनी माझ्या वडीलांना ही माझी विनंती कळविली. माझ्या वडलांच्या मनांत यातील मर्म येऊन त्यांनी स्वतःच मला कलकत्त्यास घेऊन जायचे ठरविले.

मुहूर्त वगैरे पाहून सन १८७२ च्या मार्च महिन्यात शेवटी शेवटी ही सर्व मंडळी कलकत्त्यास जावयास निघाली. त्या काळी कलकत्त्यास जाणे पायी किंवा पालखीने करावे लागत असे. या निर्धनांच्या समोर पालखीचा प्रश्नच येत नव्हता; सर्वजण अर्थात पायीच प्रवासास निघाले. शेतातून जाताजाता थकल्यावर किंवा सायंकाळ झाली की झाडाखाली विश्राम करीत. पहिले दोन दिवस ठीक गेले. पण तिसऱ्या दिवशी माताजींना तापाने गाठले; कदाचित् प्रवासाचा पहिलाच प्रसंग असल्याने फार थकण्यामुळे हा ताप आला असावा, असे त्यांच्या वडिलांच्या मनांत आले; परंतु एवढ्या तापात प्रवास चालू ठेवणे शक्य नव्हते. अशा स्थितीत जवळच असलेल्या एका धर्मशाळेत ताप उतरेपर्यंत रहावे असे त्यांनी ठरवून, त्याप्रमाणे त्या दोघांची व्यवस्था करून, बाकीचे लोक पुढे झाले. त्या रात्री तो ताप म्हणजे केवढे दुश्चिन्ह माताजींना वाटले, व

त्या आणखी बेचैन झाल्या. पहाटे पहाटे केव्हातरी अर्धवट जागृतीत त्यांना एक विलक्षण दृश्य दिसले, व त्याचा परिणाम म्हणजे त्यांना एकदम आराम वाटू लागला. त्या दृश्यांत त्यांना एक अत्यंत काळीकुट्ट पण तेज व सौंदर्य हे जणू काय तिच्या अंगातून गळत आहे अशी एक बाई दिसली. ती बाई त्यांच्याजवळ येऊन बसली व तिने त्यांच्या डोक्यावरून हळू हळू हात फिरवायला सुरवात केली; त्याबरोबर त्यांना एकदम शांत वाटू लागले. त्यांनी त्या बाईला विचारले की बाई तुम्ही कोठून आला ? तिने चटकन् प्रेमळपणाने उत्तर दिले की दक्षिणेश्वरहून. हे ऐकून माताजींना जणू आश्चर्याचा धक्काच बसला व त्या म्हणाल्या की बाई मी पण आपल्या नवऱ्याची सेवा करण्याकरिता म्हणून तेथेच जाण्याकरिता निघाले, पण या तापाने पहा माझी कशी अवस्था मध्येच करून टाकली; असे म्हणतांना माताजी रडू लागल्या. त्या बाईने प्रेमाणे कुरवाळून माताजींना सांगितले की रडू नको, घाबरू नको, एवढ्याकरताच तर मी तुझ्या नवऱ्याला दक्षिणेश्वरी अडकवून ठेवले आहे. माताजींना याने फारच आश्चर्य वाटून त्यांनी विचारले की बाई तुम्ही कोण आहा माझ्या ? त्या बाईने लगेच उत्तर दिले की वहीण. या उत्तरानंतर ते दृश्य नाहीसे झाले; माताजींचा ताप उतरून त्यांना एकदम आराम वाटू लागला. ही बाई दुसरी कोणी नसून श्रीरामकृष्णांचे साध्य असलेली दक्षिणेश्वरची त्रिगुणमयी साक्षात् महामायाच होती. असे हे दैवी दृश्य पहाणे माताजींना नवीन नव्हते. साधारणत: असले अनुभव कोणी सांगत नाही. ओघाओघाने माताजींनी स्वत: सांगितलेले एक दोन असले अनुभव येथे ग्रथित करणे अप्रस्तुत होणार नाही.

माताजी अगदी लहान असल्यापासून त्यांना असे दिसे की त्यांच्याच वयाची एक लहान मुलगी त्यांच्या बरोबर सारखी हिंडत असे, व त्यांना

सर्व कामात मदत करीत असे, त्यांच्याबरोबर खेळत असे. वयाच्या अकराव्या वर्षापर्यंत हा अनुभव त्यांना येत होता.

पुढे तेराव्या वर्षी कामारपुकुरास सासरी गेल्या असतांना, पहाटे अंधारांत तळयावर स्नानाला जावयाची त्यांना भीति वाटत असे; त्या घरातून अशा बाहेर पडल्या की कोठून तरी एकदम आठ जणी येत. पुढे चार जणी, मागे चार जणी व मधे माताजी या थाटाने त्या स्नानास जात. सर्व जणी माताजीबरोबर तळयात स्नान करून तशाच थाटाने माताजींच्या घरच्या दरवाजापर्यंत येऊन, माताजींना पोहोचवून एकदम अदृश्य होत. कामारपुकुरास असतांना त्यांचा हा रोजचा अनुभव असे. असो.

त्या धर्मशाळेतील त्या विलक्षण दृश्यानंतर माताजींना झोप लागून त्या जाग्या झाल्यावर पहातात तो त्यांचा ताप उतरून गेलेला होता. अशा स्थितीत अनोळखी व एका बाजूस असलेल्या जागेत रहाण्यापेक्षा प्रवास बरा असे वाटून त्यांनी पुढील प्रवासांस सुरवात केली. थोडयाच वेळात त्यांना एक पालखी मिळाली व माताजींना पालखीत बसवून प्रवास सुरू झाला. तिसऱ्या रात्री माताजींना फिरून ताप आला, पण त्याबद्दल त्या कोणाजवळ बोलल्या नाहीत. दरकूच दरमजल करीत एके दिवशी रात्री ९ वाजता माताजींचे दक्षिणेश्वरी आगमन झाले.

या दक्षिणेश्वरच्या आगमनाबद्दल माताजी सांगत असत की मी जी उतरले ती सरळ रामकृष्णांचे खोलीत जाऊन त्यांचे समोर उभी राहिले; बाकीची बरोबरची मंडळी सासुबाईकडे नौवतखान्याकडे गेली. रामकृष्ण मला पाहून म्हणाले की आलीस तू, ठीक झाले. मग म्हणाले की काय करणार आता, माझा मथुर जिवंत नाहीं, तो गेल्याने माझा जणू उजवा हातच गळून गेला आहे. अक्षय सुद्धा (रामकृष्णांचा पुतण्या) गेला. मथुर

जिवंत असता तर तुला नौबतखान्यात रहाण्याचा प्रसंगच येता ना; त्याने तुझ्याकरिता स्वतंत्र महाल बांधला असता. नंतर मी नौबतखान्याकडे जायला निघालेली पाहून ते म्हणाले की तिकडे नको जाऊ, येथेच रहा; तू आजारी आहेस व नौबतखान्यात डॉक्टर येण्याला त्रास पडेल. रामकृष्णांचा भाचा हृदयराम याने लगेच माझी तेथे रहाण्याची व्यवस्था करून माझ्या तैनातीस एक बाई पण मुक्रर केली. दुसऱ्या दिवशी डॉक्टरने येऊन, तपासून मला औषध सुरू केले. थोड्याच दिवसांत मला आराम वाटल्यावर मी नौबतखान्यात सासूबाईचेकडे रहावयास गेले.

औषधोपचाराने शारीरिक व्याधि दुरुस्त झालीच, पण त्यापेक्षा सुद्धा रामकृष्णांना पाहून, त्यांच्या वागणुकीवरून माताजींचे मन एकदम शांत झाले. लोकांच्या बोलण्यावरून उत्पन्न झालेले रामकृष्णांचे संबंधीचे विचार एकदम नाहीसे झाले. त्याच बरोबर त्यांची सेवा करण्याची कर्तव्य-बुद्धि जागृत झाली व दक्षिणेश्वर न सोडण्याचा निश्चय माताजींनी केला.

माताजींच्या वडलांना पण हे सर्व पाहून आनंद झाला; त्यांच्या मनांतील विक्षेप नाहीसे होऊन, शांत व आनंदित चित्ताने ते एकटेच जयरामवाटीस परतले.

• • •

# प्रकरण चौथे

## माताजी व रामकृष्ण यांची अंतिम ध्येय प्राप्ति

सर्व बाजूंनी आपत्तींचे आघात होऊ लागले असतांना मनुष्य कशा रीतीने त्यांना तोंड देतो यावरच मनुष्याचा मोठेपणा अवलंबून असतो. आजन्म संन्यास व्रत घेतलेल्यासमोर त्याच्यावर हक्क सांगणारी तरुण बायको येऊन उभी राहिली तर, एक तर तिला सोडून पळून जाणे, किंवा तिच्या तावडीत सापडून ध्येयच्युत होणे असे हे दोन मार्गच साधारणत: अवलंबिलेले दिसतात. श्रीरामकृष्णांच्या समोर त्यांच्यावर हक्क सांगणारी त्यांची तरुण बायको जेव्हा येऊन उभी राहिली तेव्हा वर निर्दिष्ट केलेल्या दोन मार्गांपैकी कोणता मार्ग रामकृष्ण पत्करतात याकडे सर्वांचे डोळे लागले; रामकृष्णांनी वरील दोन्ही मार्ग सोडून देऊन आपला एक निराळाच मार्ग पत्करला. रामकृष्ण हे साधारण माणसासारखे नव्हते; त्यांनी अशा स्थितींत आपल्या ध्येय प्राप्तीचे मार्गात स्वस्त्रीचा उपयोग करून घेतला.

आपली बायको आल्याचा त्यांना फार आनंद झाला. आपली स्वत:ची कसोटी पहाण्याची सोय झाली म्हणून तसेच आत्मोन्नतीच्या मार्गात स्वस्त्रीला मार्गदर्शन करण्याचे कर्तव्य पार पाडता येईल म्हणून, अशा दुहेरी हेतूने त्यांना आनंद झाला. यातील त्यांच्या पहिल्या हेतूची माहिती करून घेऊ.

रामकृष्णांचे लग्न झाले आहे हे माहीत असून सुद्धा श्रीमत् तोतापुरींनी त्यांना संन्यासदीक्षा दिली होती. उपदेश देतांना ते म्हणाले होते की अरे लग्न झाले म्हणून काय झाले ? ज्याने आत्मानुभव घेतला त्याला

स्त्री पुरुष हा भेद वाटेलच कसा ? अरे ज्याला असा भेद वाटतो तो आत्मानुभवी नव्हे, तो मुमुक्षुच होय. आत्मानुभवाने सर्वत्र समताच वाटते. आपणच सर्व आहो असा अनुभव आल्यावर स्त्री समोर आली तर "स्त्री" म्हणून वाटतच नाही. तेव्हा लग्न झाले असले म्हणून भिण्याचे कारण काय ? अशा या उपदेशानुरुप स्वतःची परीक्षा पहाण्याची सोय स्वस्त्री आल्याने झालीच आहे असे वाटून त्याचा उपयोग करून घेण्याचे त्यांनी ठरविले. ह्या हेतूनेच त्यांनी स्वतःची सर्व प्रकारची सेवा करण्याची परवानगी माताजींना दिली, एवढेच नव्हे तर रात्रौ बिछान्यावर स्वतः-जवळ निजण्याची सुद्धा परवानगी दिली. असे एक दोन दिवस नव्हे तर सतत सहा महिने करून ते सुयशस्वी असे या दिव्यातून बाहेर पडले.

याबावत रामकृष्णांचे चरित्रकार लिहितात की एक दिवस स्वस्त्री जवळ निजली असता श्रीरामकृष्ण उठून बसले व स्वतःच्या मनाला उद्देशून म्हणाले की हे मना, ह्या शेजारी निजलेल्या आकारास स्त्रीशरीर म्हणतात. मनुष्य नेहमी या स्त्रीदेहभोगप्राप्त्यर्थ धडपडत असतो. स्त्री प्राप्त झाली की त्यातच तो अडकतो; असे झाल्याने परमेश्वराची आठवण सुद्धा होत नाही, मग तत्प्राप्त्यर्थ प्रयत्न कोठून होणार ? मना, आता नीट विचार कर; स्वतःला फसवू नको. तुला स्त्री शरीराची इच्छा वाटत असेल तर ते हे येथे पडलेले आहे त्याचा स्वीकार कर; मी तुला अडवीत नाही. असे म्हणून स्वस्त्रीच्या अंगाला लावण्यासाठी त्यांनी हात उचलला मात्र तो त्यांना एकदम इतकी गाढ समाधि लागली की सूर्योदयापर्यंत ते त्याच स्थितीत होते ! सकाळी मोठ्या मुष्किलीने त्यांची समाधी उतरवली गेली. स्त्री पुरुषसंबंध त्यांनी कसा ठेवला असेल ते ह्यावरून ध्यानांत येते

तसेच एक दिवस त्यांची पत्नी त्यांचे पाय चेपीत होती. एकाएकी माताजींनी त्यांना विचारले की मी तुम्हाला कोण वाटते ? तुमचे पाय

कोण चेपत आहे असे तुम्हाला वाटते ? श्रीरामकृष्णांनी एकदम उत्तर दिले की जी माता त्या देवळात स्थापित आहे, जिने या देहाला जन्म दिला असून जी सध्या नौबतखान्यात राहाते, तीच आता येथे माझे पाय चेपीत बसली आहे. असे हे शब्द तुमच्या आमच्या सारख्यांच्या मुखांतून आकस्मिक बाहेर पडणे अशक्यप्राय आहे हे सांगण्याची जरूरच नाही. अशा ह्या शब्दावरून श्रीरामकृष्णांच्या पावित्र्याची व सदैव उच्च भूमिकेवर राहण्याची कल्पना येते.

अशा या स्थितीत श्रीशारदादेवींना मुले होणे अशक्य आहे हे पाहून पुष्कळ लोकांना वाईट वाटे व तसे ते आपआपसात कुजबुजत; याचे कारण म्हणजे ते शारदादेवींना आपल्याप्रमाणेच एक साधारण स्त्री समजत रामकृष्णांच्या कानावर ही गोष्ट केव्हाच आली होती; पण एक दिवस जयरामवाटीस असतांना, खुद्द त्यांच्या सासूच्या तोंडून त्यांनी ऐकले की माझी मुलगी वेड्याला दिली गेली, ती काय संसार करणार, तिला काय मुलेबाळे होणार; तेव्हा लगेच ते म्हणाले की सासूबाई, तुम्ही काळजी करूं नका; तुमच्या मुलीला इतकी मुले मिळतील की तिला रात्रंदिवस " आई, आई " अशी हाक मारलेली ऐकू येईल व त्यांना नुसते होकार देता देता तिच्या नाकी दम येईल.

खुद्द श्रीशारदादेवींच्या मनात मात्र संसाराचा किंवा मुलाबाळांचा प्रश्न कधीच येत नसे; श्रीरामकृष्णांच्या सान्निध्यांत आंतरिक उत्कट प्रेम व आनंद या शिवाय त्यांच्या मनांत दुसरा विचारच येत नसे. त्या म्हणत की रामकृष्णांच्याबरोबर रहात असतांना अनुभवास येणाऱ्या आनंदाचे वर्णन करणे अशक्य आहे. ते सारखे कधी रडत व कधी हसत अखंड समाधि स्थितीत असत. मला त्यावेळी समाधि म्हणजे काय हे समजत नसे. रात्ररात्र ते त्या स्थितीत असत. मला भीति वाटत असे. शेवटी मी हृदयला बोलावीत असे; मग तो त्या त्या स्थितीस अनुसरून

विवक्षित मंत्र वगैरे त्यांच्या कानांत बराच वेळ म्हणे व मग त्यांची समाधि उतरत असे. असे पुष्कळ दिवस गेल्यावर मला होणारा त्रास त्यांच्या ध्यानांत आला व मग त्यांनी मला कोणत्या स्थितीत कोणते नाव उच्चारावे, काय करावे याची माहिती करून दिली. मी तसे करूं लागल्यावर त्यांची समाधि लौकर उतरू लागली मला मात्र अशा स्थितीत रात्रीच्या रात्री जागरणे पडत ते केव्हां समाधि स्थितीत जातील याचा नेम नसे. पुष्कळ दिवसांनी त्यांच्या हे ध्यानांत आले व शेवटी त्यांनी मला नौबतखान्यात सासूबाईबरोबर रहावयास धाडले.

माताजी सांगत की एकदा रामकृष्णांनी मला विचारले की तूं मला मायेंत गुंतविणार आहेस काय ? त्यावर मी लगेच म्हणाले की मी तुमच्या आड कशी येईन ? मी तर अध्यात्ममार्गांत तुम्हाला मदत करायला येथे आले आहे. अशा तऱ्हेचे स्वाभाविकपणे व सहजरीत्या उत्तर केवळ शारदादेवीसारख्याच स्त्रिया देऊं शकतात

खरे पाहू गेले असता रामकृष्णांच्यावर शारदादेवींच्या मुळे झालेला परिणाम जगासमोर आलाच नाही, किंवा त्याचे महत्त्व रामकृष्णांच्या चरित्रकारांच्या ध्यानांत सुद्धा आले नाही असे म्हणणे भाग पडते थोडक्यांत असे म्हणता येईल की शारदादेवींना रामकृष्णांची जितकी मदत झाली तितकीच शारदादेवींची मदत रामकृष्णांना पण झाली. श्रीरामकृष्ण स्वतः म्हणत असत की अरे, ती जर इतकी शुद्ध व पवित्र नसती तर कोणास माहित, माझा स्वतःवरील ताबा सुटून कदाचित् मी बेताल सुद्धा झालो असतो. लग्नानंतर मी आईची (श्रीरामकृष्ण श्रीकालीला आई म्हणत असत) प्रार्थना केली होती की आई तिच्यामधील कामवासना अजिबात काढून टाक. ती माझे जवळ रहात असतेवेळी आम्हा दोघांच्याही मनास स्त्री-पुरुषभेद कधी शिवलासुद्धा नाही; यावरून आईने माझी प्रार्थना ऐकली असे माझ्या ध्यानांत आले. हे रामकृष्णांचे शब्दच त्यांना

शारदादेवींच्या झालेल्या मदतीची साक्ष देतात. सरते शेवटी त्यांनी शारदादेवींची महात्रिपुरासुंदरी स्वरूप मानून पूजा करून आत्मनिवेदन केले व आपली जपाची माला त्यांच्या चरणी वाहिली. हा प्रसंग शारदादेवींच्या मदतीचा भरपूर पुरावाच होय. आता या अभूतपूर्व प्रसंगाकडे वळू

सन १८७३ च्या मे महिन्यांची २५ तारीख; फलहारिणी कालिकेच्या पूजेचा दिवस. कालीमंदिर सुंदर सजविलेले होते जिकडे तिकडे उत्सवपूर्ण उत्सुक वातावरण होते. रामकृष्णांच्या आवारात मात्र शांतता होती. रामकृष्णांची प्रसिद्धी अजून फारशी झालेली नव्हती. त्यांच्या खोलीत सुद्धा पूजेची तयारी होत होती. शारदादेवींना रात्री ९ वाजता खोलीवर हजर-राहण्याचा हुकूम झाला होता.

वेळेबरहुकूम सर्व तयारी रामकृष्णांच्या खोलीत झाली; शारदा-देवी आल्या, रामकृष्णांनी खोलीचे दार बंद करून घेतले व पूजेस सुरवात झाली. रामकृष्ण पूर्वाभिमुख बसले होते. शुद्धीकरणादि सर्व पूर्वविधि आटोपल्यावर, देवीकरिता मांडलेल्या समोरील चौरंगावर येऊन बसण्याची खूण रामकृष्णांनी शारदादेवींना केली. नुसती अशी खूण केल्यावरोबर शारदादेवींची देहबुद्धि एकाएकी नाहीशी होऊन, भारल्याप्रमाणे होऊन त्या चौरंगावर रामकृष्णांचे बाजूस तोंड करून बसल्या व पूजा सुरू झाली. शारदादेवींच्या अंगावर प्रक्षालन करून रामकृष्णांनी ध्यान केले. ते म्हणाले की हे शाश्वत कुमारिके, हे त्रिपुरासुंदरी, सर्व जगातील सामर्थ्य व सौंदर्य यांचा केवळ साठा तू आहेस; आई, परमानंदाचे द्वार माझेकरता उघड; या समोरील स्त्रीशरिरात प्रवेशून, दर्शन देऊन मला कृतकृत्य कर. नंतर आवाहन आसन इत्यादि करून माताजींच्या अंगावर त्यांनी अंगन्यास केले मग पूजा करून प्रथम नैवेद्य व नंतर तांबूल त्यांनी त्यांना खायला घातला. नंतर जप करण्यास सुरवात केली तोच त्यांचेही देहभान नाहीसे झाले.

रात्रीच्या दुसऱ्या प्रहरी शेवटी शेवटी ते थोडेसे देहभानावर येऊन त्यांनी देवीस आत्मनिवेदन करून, आपली जपाची माळ देवीच्या पायावर वाहून प्रार्थना केली की हे परमेश्वरी, शिवे, त्रिनयने, स्वर्णरूपे, सर्वांत-भूते, आश्रयदाते, सर्वांतकारी, शुद्धे शुभे, तुझ्या चरणी मी वारंवार नमस्कार करतो; असे म्हणून त्यांनी साष्टांग नमस्कार घातला व फिरून त्यांचे देहभान, तसेच पडले असता, नाहीसे झाले; कितीतरी वेळ ते असेच पडून होते.

पूजा संपली. चौरंगावर बसायला जाण्यापासून शेवटपर्यंत शारदादेवी देहभानावर नव्हत्या. शेवटी देहभानावर आल्यावर त्यांनी रामकृष्णांना नमस्कार केला व त्या नौबतखान्यांत निघून गेल्या.

ह्या पूजनास षोडशीचे अंतिम पूजन म्हणतात. तंत्रमार्गांत ही शेवटची पायरी असून, ह्यानंतर साधक स्वभावतःच निष्क्रिय व निर्विकार बनतो. हेच मनुष्याचे अंतिम ध्येय असून ते या पूजनाने रामकृष्णांनी आपल्या पत्नीच्या सहाय्याने पूर्णतया गाठले.

रामकृष्णांच्या सान्निध्याने शारदादेवींमधे जो अंतस्थ फरक होत होता, तो ह्या पूजनानंतर पूर्ण झाला. ह्या पूजनामुळे रामकृष्णांला सारखी मेहेनत न करताच त्या पूर्णतेस पोहोचल्या. या पूजनाने रामकृष्णांच्या अध्यात्मिक मार्गातील सहचारिणीच काय पण सहभागिनी त्या झाल्या. या पूजनाने शिवशक्तिचे ऐक्य होते; मग रामकृष्ण व शारदादेवी यांच्यात फरक कसा राहणार ? या पूजनाने ते दोघेही एकरूप व एकरस झाले.

यापुढे शारदादेवींनी पुष्कळ साधना केली. ती एकतर आत्मानुभव स्थिर करण्याकरिता असून शिवाय पुढे जमणाऱ्या शिष्यशाखेस उदाहरण म्हणून होती. ह्यापुढचे त्यांचे चरित्र म्हणजे रामकृष्णांची सेवा, व त्यांच्या देहत्यागानंतर त्यांच्या सर्व शिष्यांना तसेच स्वतःकडे येणाऱ्या सर्वांना मार्ग-दर्शन करून, रामकृष्णांनी सुरू केलेले कार्य तडीस नेणे हे होय.

# प्रकरण पांचवे

## रामकृष्णांची सेवा

श्री शारदादेवींच्या साधनेचे मुख्य अंग म्हणजे शिवरूप पतीची पूर्ण सेवा होय. तनमनधनाने, वासनारहित होऊन, निरीच्छपणाने नुसती सेवा केल्याने आत्मोन्नति फार झपाटयाने होते असे शास्त्रे सांगतात. अशा तऱ्हेची सेवा शारदादेवी करीत असतांना, रामकृष्णांनी त्यांचेकडून नानातऱ्हेची जपतपादि साधनेसुद्धा करवून घेतली. लहान लहान चुटके सांगून रामकृष्ण त्यांच्या मनावर मोठमोठी तत्त्वे ठसवीत असत. उदाहरणार्थ एकदा रामकृष्णांनी सांगितले की आकाशात दिसणारा चंद्र हा सगळयांचाच मामा असतो, तसाच परमेश्वर हा पण सगळयांचाच आहे, त्याला जो हाक मारील त्याला तो भेटतो; त्याच्याकडे जितके लक्ष पुरवावें तितका तो लौकर भेटतो. नुसत्या सेवेनेसुद्धा देहभान नाहीसे होते व माताजींचे तसे नाहीसे झाले होते याबद्दल एक गोष्ट सांगण्यात येते. एका रात्री रामकृष्णांचे जेवण घेऊन, एका स्त्रीभक्तास बरोबर घेऊन माताजी त्यांच्या खोलीत गेल्या. त्या देशात पडद्याची चाल असल्याने रामकृष्णांचे समोर गोषा करून, ताट ठेऊन माताजी उभ्या राहिल्या. रामकृष्ण त्यावेळी फार उच्च भूमिकेवर होते. माताजी आल्याबरोबर रामकृष्णांची बोलायची लहर लागली व त्यांनी बोलावयाला सुरवात केली. रामकृष्ण गोष्टी सांगण्यांत इतके गढून गेले व माताजी त्या ऐकण्यात इतक्या गर्क झाल्या की त्यांचे देहभान नाहीसे होऊन त्यांचा गोषा निघून गेला व तशाच त्या रामकृष्णां-कडे बघत उभ्या राहिल्या. अशा स्थितीत सकाळ झाली, सूर्य उगवला तेव्हा कोठे रामकृष्ण शुद्धीवर आले. ते बोलायचे थांबले तशा माताजी पण शुद्धीवर आल्या; जेवण अर्थात् तसेच राहिले.

कोणत्याही सत्पुरुषाचा साधनेतिहास उपलब्ध नाही. तत्संबंधी एखाद दुसरी गोष्ट लहरीत येऊन आपण होऊन त्यांनी सांगितली तरच काय ती माहिती मिळायची. या अनुरोधाने एकदा रोजचा सकाळपासूनचा आराखडा त्यांनी सांगायला सुरवात केली त्या म्हणाल्या की मी पहाटे ३ वाजता उठून ध्यानास बसत असे. असे ध्यान करू लागल्यावर कित्येक वेळा मला भोवतालचे भान रहात नसे. एकदा अशीच चांदण्या-रात्री बसले होते त्यावेळी रामकृष्ण माझ्या अंगावरून गेलेले सुद्धा मला समजले नाही; नाहीतर त्यांच्या पावलांच्या आवाजावरून कितीही लांबून ते आलेले मला समजत असे; त्यावेळी मी दागिने वापरीत असे व लाल किनारीचे एक लुगडेच काय ते नेसत असे; ते माझ्या अंगावरून गेले तेव्हा माझ्या अंगावरून लुगडे घसरून गेले आहे हे सुद्धा मला समजले नाही.

अशा तऱ्हेच्या शारदादेवींच्या अनुभवाबद्दल योगिन् मा (श्रीराम-कृष्णांची एक शिष्या) एक गोष्ट सांगत असत. माताजींना स्वतःला समाधीचा अनुभव नाही असे वाटत असे; रामकृष्णांच्या समाधीबद्दल त्यांना भीति वाटत असे. त्यावेळी माताजी मला सांगत की तुम्ही त्यांना (रामकृष्णांना) मला समाधीचा अनुभव देण्याबद्दल विनंती करा. त्या म्हणाल्या की त्यांच्याभोवती शिष्य व भक्त मंडळींचा मोठा घोळका नेहमी असतो, त्यामुळे त्यांचेकडे जायला मिळणेसुद्धा दिवसेंदिवस कठीण, मग त्यांना स्वतः विनंती कशी करणार ? म्हणून तुम्हीच माझ्याकरिता त्यांना विनंती करा एक दिवस वेळ साधून मी ही गोष्ट रामकृष्णांचेसमोर काढली. यावर त्यांनी उत्तर तर दिलेच नाही, पण ते एकदम खूप गंभीर झाले. अशा स्थितीत ते असतांना त्यांच्याशी बोलायची कोणालाही हिंमत होत नसे. म्हणून मी तशीच नौबतखान्यात परतले. माताजी पूजेत गुंतलेल्या दिसल्या म्हणून थोडी पुढे झाले व पहाते तो माताजींना भोवतालचे भान

नसून त्या सारख्या हसत होत्या व रडत होत्या; डोळ्यातून सारखा अश्रुपात चालला होता. मी दार उघडले, आत आले, त्यांच्या शेजारी किती वेळ उभे राहिले याची त्यांना दादच नव्हती; थोडक्यात त्या समाधीत होत्या. शेवटी हलकेच बाहेर येऊन मी दार लावून घेतले. बराच वेळ बाहेर थांबून मी परत आत गेले तो माताजी मला म्हणतात की तुम्ही किती वेळ त्यांचेकडे होता ? आता का तुम्ही तिकडून परत येता आहा ? त्यावर मी सर्व झालेले सांगून मी म्हटले की तुम्ही म्हणत होता की तुम्हाला समाधीचा अनुभव नाही म्हणून नाही का ? मग मी पाहिले ते काय होते ? असे म्हटल्यावर त्या लाजल्या व हसल्या.

योगिन् मा सांगत होत्या की त्यावेळी मी कधी कधी दक्षिणेश्वरीच रहात असे. मी तेथे राही त्यावेळी माताजी मला स्वतःजवळच निजवून घेत; निराळे निजू देत नसत. एका रात्री आम्ही बिछान्यावर पडलो असता कोठून तरी अलगुजाचा स्वर कानी आला. तो आवाज ऐकल्या बरोबर माताजी एकदम गंभीर झाल्या व पहाता पहाता त्यांना समाधि लागली. मी तशीच बिछान्याच्या कोपरावर अगदी अंग चोरून बसून राहिले; मला वाटले की मी यःकश्चित् सांसारिकबाई, या माताजीजवळ कशी बसू ? कितीतरी वेळाने त्या देहभानावर आल्या.

योगिन् मा सांगत होत्या की रामकृष्णांनी देह सोडल्यानंतर कित्येक दिवसपर्यंत माताजी अशा स्थितीत वारंवार जात व ती त्यांची स्थिति कितीक वेळ तशीच रहात असे.

अशा या माताजींच्या स्थितीबद्दल कोणी त्यांना काय होते म्हणून विचारले तर ते हसून म्हणत की आत्मानुभवाने आत्मानुभवापलीकडे माणसाला आणखी काय मिळणार रे ? त्याला काय शिंग थोडीच फुटायची असतात; अरे, त्यावेळी मन तद्रूप होते व तोच आत्मानुभव होय.

असे हे आध्यात्मिक शिक्षण त्यांना रामकृष्णाकडून मिळत असे; व्यावहारिक शिक्षण पण तितक्याच आस्थेने रामकृष्ण त्यांना देत. घरात भांडी कशी लावावी, ठेवावी, निरनिराळे पदार्थ कसे साठवावे व ठेवावे, जागच्या जागी कसकशा वस्तू का व कशा ठेवाव्या, दिवे कसे साफ करावे, वाती कशा नीट कराव्या, भाज्या कशा चिराव्या व कराव्या अशा सर्व गोष्टी रामकृष्ण माताजींना सोदाहरण शिकवीत. बोटीवर कसे चढावे व उतरावे, लोकांशी कशी मैत्री ठेवावी, लोकांचे स्वभाव ओळखून त्यांच्याशी कसे वागावे, कोणाला जवळ करावे व कोणापासून लांब रहावे, कोणाला आपल्या अंतरंगात घ्यावे तर कोणाशी संबंधच ठेवू नये अशा सर्व गोष्टी रामकृष्ण त्यांना समजावून देत. असे हे सर्व प्रकारचे बारकाईने शिक्षण देण्याचे कारण म्हणजे माताजींना रामकृष्णांचे मागून असंख्य भक्तांना मार्गदर्शन करावयाचे होते. हे होय.

माताजी जवळ जवळ एकंदर तेरा वर्षे दक्षिणेश्वरी होत्या. मधून मधून त्या थोडे दिवसाकरिता माहेरी जयरामवाटीस जात असत. दक्षिणेश्वरी असतांना त्या बहुतेक नौबतखान्यातच रहात असत. नौबतखाना म्हणजे रहाण्याच्या दृष्टीने अगदी गैरसोयीची अशी एक दुमजली इमारत होती; त्यातसुद्धा तळमजल्यावरची लहानशी खोली माताजींच्या वाट्यास आली होती. या खोलीच्या बाजूच्या व्हरांड्याला कामटयांची जाळी बसविली होती व त्यावर तट्टया लावलेला होत्या; याचे कारण माताजींना गोषा पाळावा लागे; ह्यामुळे खोलीत ऊन म्हणून कधीच येत नसे. शिवाय या खोलीत त्यांना स्वयंपाक करावा लागे; साठवणाची खोली पण हीच होती. यामुळे माताजी रात्री या खोलीत निजल्या की त्यांच्या एका बाजूस धान्य, दुसरे बाजूस साठवणीचे सामान, एका बाजूस भाज्या तर दुसरे बाजूस चूल व ओटा आणि डोक्यावर शिंकी असा थाट असे. खोलीत जायचे दार तर इतके लहान होते की सुरवाती सुरवातीस वाकून न

चालण्याच्या सवयीमुळे रोज त्यांचे डोक्याला लागे. कलकत्त्याच्या श्रीमंत व सुखवस्तू बाया येथे माताजींना भेटायला येत त्या दाराच्या बाहेरच उभ्या रहात. ह्या बाया म्हणत असत की माताजींची व्यवस्था वनवासातल्या सीतेसारखी आहे. ह्यावर माताजी म्हणत की पहा बरे मी कशी रहाते या खोलीत ती, तुम्हाला अशा जागेत एक क्षणभर रहाता येणार नाही. रामकृष्णांना सुद्धा अशा या माताजींच्या रहाण्याच्या व्यवस्थेबद्दल वाईट वाटत असे; पण ते कांही करू शकत नव्हते. मथुरबाबूंच्या मागे त्यांचीच व्यवस्था करायला त्यांच्या सलगीचे कोणी नव्हते. शिवाय सोईची अशी दुसरी जागा त्या देवळात कोठेच नव्हती. या सगळयात मोठी अडचण म्हणजे माताजींना तेथील पद्धतिप्रमाणे गोषा पाळावा लागत असे. माताजी पहाटे तीन वाजता उठून गंगास्नान करून येऊन आपल्या खोलीत शिरत, त्यामुळे त्या कोणाच्याही दृष्टीस पडत नसत. एकदा कोणी त्यांची चौकशी देवळाच्या व्यवस्थापकाकडे केली, त्यावेळी तो म्हणाला की आम्ही ऐकतो की माताजी येथे राहतात पण आम्ही त्यांना कधीच पाहिलेले नाही.

अशा माताजीच्या अलिप्तपणाच्या वागणुकीमुळे रामकृष्णांना बरे वाटत असे. त्या जेव्हा प्रथम कलकत्त्यास आल्या त्यावेळी रामकृष्णांना त्याच्याबद्दल मोठी काळजी पडली होती की अशा या शहरात खेडयांत जन्म गेलेल्या आपल्या ह्या पत्नीचे कसे होणार ? लोक तिच्यावर टीका करतील, व तिला वाईट वाटेल, तिचे मन दुखावेल. माताजी सांगत होत्या की ही रामकृष्णांना पडलेली काळजी जाणून मी देवीला प्रार्थना करीत असे की आई माझी लाज राख.

अशा या जागेत माताजींना परिस्थितीस अनुसरून रहाणे भाग होते. परंतु निदान कांहीतरी त्यांना मोकळेपणा मिळावा याची रामकृष्ण काळजी घेत. दुपारी कोणी नाही असे पाहून रामकृष्ण त्यांना पंचवटींत (रामकृ-

ष्णांची तपोसाधनाची देवळाच्या आवारातील जागा) बसायला सांगत. कित्येक वेळा दुपारी देवळाच्या मागील दाराने त्या दुपारी बाहेर पडून शेजारच्या घरातील बायांच्याकडे जाऊन बसत व रात्र झाल्यावर परत येत.

माताजींच्या रहाण्याची ही अडचण पाहून भक्त मंडळींनी देवळाला लागून असलेल्या आवारांत सन १८७४ मध्ये एक लहानशी जागा घेऊन एक अलग झोपडी त्यांचेकरिता बांधली. या झोपडीत त्या जवळ जवळ वर्षभर राहिल्या. या दिवसात रामकृष्ण रोज दुपारी एकदा त्या झोपडीत येऊन माताजींना भेटून जात. एकदा असे ते तेथे गेले असता पाऊस पडू लागला; रात्र पडली तरी पाऊस थांबेना. शेवटी त्या रात्री रामकृष्ण तेथेच राहिले. या रहाण्याबद्दल ते सांगत की देवळातील पुजारी जसे काम आटोपून रात्री आपल्या घरी जातात तसाच जणू काय मी रात्री तेथे रहावयाला गेलो. पुढे रामकृष्ण एकदा आजारी पडल्याने त्यांच्या शुश्रुषेकरिता माताजी परत नौबतखान्यात रहावयास गेल्या, त्या तेथेच राहिल्या; परत झोपडीत रहावयास आल्या नाहीत. याचे कारण मात्र कोणालाच उमगले नाही.

दक्षिणेश्वरी त्यांचे मुख्य काम म्हणजे रामकृष्णांचे जेवण असे. त्यांचें करिता विविक्षित पदार्थ विविक्षित पद्धतीने शिजविणे माताजींचे शिवाय इतरांना साधत नसे. त्या बाहेर गांवी गेल्या की लगेच थोड्याच दिवसात तब्बेत बिघडली आहे या सबबीवर त्यांना परत बोलावून घेण्यांत येत असे.

सुरवातीस रामकृष्ण व त्यांच्या मातोश्री चंद्रादेवी या दोघांचे जेवण त्यांना करावे लागे. सासूबाई वयस्क असल्याने माताजी त्यांची सेवा फार काळजीने करीत. योगिन मा सांगत की चंद्रादेवींची हाक पुरी व्हावयाच्या आत माताजी त्यांचे समोर जाऊन उभ्या रहात असत. इतक्या गर्दीने

जाण्यामुळे कित्येक वेळी दाराची चौकट ठेंगणी आहे हे ध्यानांत न राहून त्यांचे डोके फुटत असे. याबद्दल योगिन मा एक दिवस त्यांना बोलल्या, त्यावर माताजी म्हणाल्या की डोके फुटले तरी हरकत नाही, सासूबाई जणू माझी आई तर आहेतच पण त्या माझ्या गुरु पण आहेत; त्या वृद्ध झाल्या आहेत व त्यांच्या हाकेला मी तातडीने गेले नाही तर वयपरत्वे त्यांना त्रास सहन करावा लागेल ना.

पुढे पुढे रामकृष्णांचे शिष्य वाढू लागले व त्यांचे जवळ कांही कांही जण राहू लागले, त्यावेळी त्यांचेकरिताही पण माताजींनाच स्वयंपाक करावा लागे. माताजी सांगत असत की त्यांच्यापैकी कांहीजण कणीक तिंबून देत, कांहीजण बाजार करीत व कांहीजण खर्च चालवीत असत. ते सर्वजण लहान लहान मुलाप्रमाणे असत, कांहीजण लांबूनच ओरडत की आई, मला भूक लागली, किंवा आई, मी आज जेवणार आहे. मातांजी पण प्रत्येकाच्या आवडी निवडीप्रमाणे प्रत्येकाला खायला करून घालीत. एकदा माताजी सांगत होत्या की नरेंद्र (स्वामी विवेकानंद) एकदा जेवायला राहिला. त्याचे जेवण झाल्यावर रामकृष्णांनी त्याला विचारले की जेवणाचे ठीक होते ना? त्याने सांगितले की पथ्याचे जेवण जेवलो हे ऐकून रामकृष्ण माझ्यावर रागावले व असा असा स्वयंपाक करून त्याला वाढ असे सांगितले. लगेच मी फिरून त्याप्रमाणे स्वयंपाक करून त्याला वाढले. रामकृष्णांना आपल्या शिष्यांच्या सर्व आवडीनिवडी माहीत असत. माताजींना स्वयंपाकास मदत करणाऱ्या मुलांना रामकृष्ण सांगत की अरे, ध्यान ध्यान काय करीत बसला आहांत? जा तिकडे नौबतखान्यात; जगन्माता स्वयंपाक करीत बसली आहे तिला मदत करा.

कित्येक वेळा अवेळी रामकृष्णांचे दर्शनाकरिता कलकत्त्याहून लोक येत व त्यांच्याकरिता अशा अवेळी स्वयंपाक करण्याचा प्रसंग माताजींचेवर

येत असे. माताजी सांगत की अशा वेळी माझी मोठी पंचाईत होत असे; घरांत भाजीसुद्धा नसायची; मग कांही तरी करून मी वेळ मारून नेत असे. अशा वेळी रामकृष्णांची गोलपमा नावाची एक स्त्री भक्त त्यांना युक्त्या सुचवीत असे, व त्याप्रमाणे स्वयंपाक करून माताजी म्हणत की आता हा पदार्थ चांगला झाला तर तुम्हाला धन्यवाद देईन; पण जर वाईट झाला तर तुम्हाला नांवे ठेवीन हे ध्यानात ठेवा.

माताजींचा रोजचा कार्यक्रम म्हणजे पहाटे ३ वाजता उठून गंगास्नान करून येऊन ध्यान वगैरे करणे; नंतर पूजा व पुढे स्वयंपाक. त्यानंतर रामकृष्णांना जेऊ घालणे. जोपर्यंत चंद्रादेवी होत्या तोपर्यंत रामकृष्ण नौबतखान्यात जेवावयास येत पुढे त्यांचे जेवण त्यांच्या खोलीत न्यावे लागे. रामकृष्णांना जेऊ घालणे हे मोठे कठीण काम असे त्यांचे लक्ष बोलण्यांत गुंतवावे लागे; नाहीतर पानावर बसल्यावर जेवल्यासारखे करून ते उठत. बोलण्यांत गुंतवणे पण कठीण होते; कारण एखादेवेळी साध्या साध्या बोलण्याने त्यांना समाधि लागत असे हे कठिण कांम माताजींनाच साधलेले होते. जेवणानंतर दुसऱ्याजवळ रामकृष्ण तक्रार करीत असत की पहा बरे मला गोडगोड बोलण्यांत गुंतवून, किती तरी तिने जेवायला घातले. याचा एक चुटका मोठा मजेदार आहे. माताजी रामकृष्णांना दूध देत म्हणजे शेराचे पावशेर अटवून देत रामकृष्णांनी विचारले की किती दूध मला दिले ? तर माताजी लगेच सांगत की पावशेर जेव्हा ते नुसते दुधावरच रहात त्यावेळी सहा शेराचे १॥–२ शेर आटवून माताजी त्यांना देत; व विचारल्यावर सांगत की शेरभरच काय ते दिले. एकदा असे हे दूध देण्याचा प्रसंग एका भक्तावर आला. तिने सहा शेर दूध आटवून दिले. रामकृष्णांनी विचारल्यावर तिने सहा शेर सांगितले. एवढे त्यांनी ऐकल्याबरोबर त्यांना अपचन सुरू झाले. अशी ही गंमत नेहमी होत असे. वाढतांनासुद्धा त्यांची नजर चुकवून त्यांना वाढावे लागे. एकदम वाढलेले

त्यांनी पाहिले की त्यांना अपचन होत असे दुधाचे बिंग बाहेर पडल्यावर रामकृष्णांनी माताजींना एक दिवस खूप छेडले; त्यावर माताजी म्हणाल्या की मला हे छटाक, पावशेर वगैरे कांही समजत नाही, आपणास जेवढे पचेल असे मला वाटते तेवढेच मी वाढते. मी पडले बिन शिकलेली, खेड्यातली; मला ही माप बिप कशी समजणार ? अशा या उत्तरावर रामकृष्ण एकदम चूप बसत. असो.

रामकृष्णांचे जेवण झाल्यावर, स्वतः जेवून त्या विडे लावायला बसत. नंतर थोडा वेळ आराम करून दुपारी तीन वाजता त्या उन्हात केस वाळवायला बसत. मग दिवाबत्ती तयार करून रात्रीच्या स्वयंपाकास सुरवात करीत. सायंकाळी उदबूप जाळून त्या ध्यानास बसत. मग रामकृष्णांचे व नंतर आपले जेवण उरकून रात्री अकराचे सुमारास त्या निजत. अशी ही सूत्रबद्ध कामे चालली असतांना इतर पुष्कळशी कामें रामकृष्ण त्यांचे अंगावर आणून टाकीत दोऱ्या वळण्याचे काम, काथ्याच्या गाद्या करण्याचे काम अशी ही उपरी कामे असत.

इतकी ही कामे यंत्रासारखी रात्री ११ वाजेपर्यंत केल्याने त्या थकून जात. पहाटे ३ वाजता ध्यानाकरिता त्यांना अशाहि स्थितीत उठावेच लागे; रामकृष्णांचा याबाबत मोठा कटाक्ष असे. एखादेवेळी थकल्याने उठायला उशीर होत आहे असे दिसले तर रामकृष्ण अंगावर गार पाणी ओतून जात.

इतकी सर्व कामे वेळापत्रकाप्रमाणे करून सुद्धा आपण कांही विशेष किंवा फार करतो आहो असे त्यांना वाटत नसे. याचे कारण म्हणून माताजी सांगत की रामकृष्णांचे सान्निध्यानेच याबद्दल कांही वाटत नसे. रामकृष्णांचे सान्निध्य दोन्ही जेवणाचे वेळीच काय ते माताजींना मिळत असे. पुढे पुढे भक्त मंडळी रामकृष्णांचे जेवण घेऊन जाऊ

लागल्यावर माताजींना रामकृष्णांचे दर्शन होणे मुष्कील झाले. दिवसा-मागून दिवस निघून जात; रामकृष्णाचे दर्शन त्यांना होत नसे. अशा वेळी त्यांना वाईट वाटे; पण त्या आपल्या मनाला समजावीत की बा मना, तुझे एवढे भाग्य नाही की त्यांचे दर्शन तुला रोज व्हावे.

अगदी प्रथम माताजी कलकत्त्यास आल्या त्यावेळची एक गंमत नमूद करण्यासारखी असे. कलकत्त्याला आल्यावर प्रथमच त्यांनी पाण्याचा नळ पाहिला. दुसऱ्या दिवशी पहाटे उठून नळ सोडण्यास त्या गेल्या तेव्हा पाण्याऐवजी "हिस्" असा आवाज त्यांना नळांतून ऐकू येऊ लागला; तेव्हां त्या तशाच धावत आल्या व सांगू लागल्या की नळांत साप आहे. एकजण लगेच तेथे गेला व तो आवाज ऐकल्यावर त्याने बाहेर येऊन सगळ्यांना सांगितले, व सर्वजण खूप हासले; माताजी पण तितक्याच मोकळेपणाने त्यांच्या बरोबर हसल्या.

रामकृष्णांची खोली नौवतखान्यातून दिसत असे. त्या खोलीत काय चालले आहे ते सर्व माताजींना दिसावे म्हणून रामकृष्ण आपल्या खोलीचा दरवाजा सताड उघडा टाकीत. गोषामुळे असा दरवाजा उघडा असल्याने माताजींची फार कुचंबणा होई; व्हरांड्यास लावलेल्या तट्ट्यातील भोका-मधून त्यांना पहावे लागे. हळूहळू दिसायला त्रास होऊं नये म्हणून तट्ट्याची भोकें त्यांनी मोठी केली. ही मोठाली भोकें बनलेली पाहून रामकृष्ण मोठ्या गमतीने आपला पुतण्या रामलाल यास म्हणत की पहा रे बोवा तुझ्या चुलतीचा तट्ट्यांतील बुरखा वाढत चालला आहे रे बुवा; पुढे काकू गोषा करीत नाही असे म्हणू लागशील. यावर रामलाल सांगत असे की म्हणूनच मी उत्तरेकडील दरवाजा अर्धवट बंद करून ठेवीत असतो, व आपण मात्र तो दर वेळेस सताड उघडा टाकीत असता.

रामकृष्ण सर्व बाबतीत निर्विकार व निष्काळजी असले, तरीपण शारदादेवींची मात्र ते फार काळजी करीत. शारदादेवींना ते जणू काय भीत असत; त्यांना त्रास देणाऱ्यावर ते रागावत.

जेवणाच्या वेळी कित्येक दिवस रामकृष्णांची एक भक्त गोलपमा त्यांचेबरोबर बोलत बसे; ह्यामुळे गोलपमाचे ताट वाढून माताजींना जेवणाकरिता ताटकळून बसावे लागे. एक दिवस कंटाळून जाऊन माताजी आपल्याशीच बोलल्या की किती वेळ मी ही अशी राखण करीत बसू; खाऊ द्या अन्न मांजराने नाहीतर कुत्र्याने. इकडे माताजी असे स्वगत म्हणताहेत तो रामकृष्ण गोलपमाला तिकडे म्हणाले की जा जा लौकर; माझ्याशी जेवायचे वेळी गप्पा मारीत बसतेस व तिकडे तिला किती तरी वेळ ताटकळत बसून रहावे लागते; यापुढे वेळच्यावेळी जेवायला जात जा.

गौरीमा नावाची एक रामकृष्णांची भक्त सांगत असे की रामकृष्ण व शारदादेवी पांच पन्नास हात अंतरावर रहात असत; एकमेकांचे एकमेकास दर्शनसुद्धा कित्येक दिवस होत नसे; तरीसुद्धा शारदादेवींचे डोके नौबतखान्यात दुखू लागले की रामकृष्ण आपल्या खोलीत अगदी बेचैन होऊन जात, व लगेच आपला पुतण्या रामलाल यास बोलावून सांगत की अरे, तुझ्या काकूचे डोके दुखते आहे; कांही औषधपाण्याची तावडतोब व्यवस्था कर; तिचे डोके थांबल्याशिवाय मला चैन नाही पडायची; जा.

माताजी एकदा म्हणाल्या की रामकृष्णांनी हृदयराम (रामकृष्णांचा भाचा—हा त्यांच्या साधनावस्थेत त्यांची सर्व सेवा करीत असे) यास बोलावून सांगितले की हृदू, तुझी मामी शारदा म्हणजे साक्षात् सरस्वती आहे, तर तिच्या अंगावर कांही तरी दागिने असलेच पाहिजेत, तर तिला दागिने करून दे. त्यावेळी तीनशे रुपये खर्चून माझेकरिता दागिने तयार

केले. माताजी हे सर्व दागिने कांही दिवस रोज अंगावर घालीत असत, पुढे एका भक्ताने म्हणतांना त्यांनी ऐकले की रामकृष्ण संन्याशी आहेत. पण त्यांच्या बायकोला मात्र दागिन्यांनी मढायला पाहिजे; हे ऐकल्यापासून बांगड्याखेरीज सर्व दागिने त्यांनी वापरणे सोडून दिले.

एकदा एका भक्ताची व रामकृष्णांची कोण जास्त गोरे आहे याबद्दल चढाओढ लागली; मी जास्त गोरा आहे असे दोघेही म्हणू लागले. याचा निर्णय करायचा म्हणजे कोणीतरी लवाद पाहिजे. थोडासा विचार करून रामकृष्णांनी माताजींनाच लवाद नेमले. माताजींनी दोघांनाही कांही अंतरावरून आपल्याकडे चालत येण्यास सांगितले; दोघाकडे सारखे पहात राहून शेवटी निर्णय दिला की भक्तच जास्त गोरा आहे.

एकदा एक फिरती नाटक मंडळी आली होती. ह्या मंडळीचा खेळ पहावयाचे माताजींच्या मनांत आले, पण रामकृष्णांनी तसे करण्याची परवानगी नाकारली; यामुळे माताजी व त्यांच्या बरोबर असलेल्या सर्वजणी खट्टू झाल्या. हे पाहून रामकृष्णांना फार वाईट वाटले, व आता काय करावे असा विचार ते करू लागले; शेवटी लहानपणी स्वत: केलेले कांही खेळ त्यांच्या ध्यानात आले व त्यांनी सर्वांना बोलावून त्या खेळातील निरनिराळे प्रवेश, त्यांतील गाणी वगैरे सर्व समयोचित हावभाव करून म्हणून दाखवून सर्वांची खूप करमणूक केली.

माताजी नुकत्याच कोठे स्वयंपाक करू लागल्या होत्या; त्यातच रामकृष्ण आल्यामुळे त्यांना कामारपुकुरास जावे लागले रामकृष्णांची लक्ष्मी म्हणून एक भाची होती. तिची आई तेथे त्यांना स्वयंपाकास मदत करू लागे. माताजींना स्वयंपाकाचा अनुभव नसल्याने त्यांनी केलेले पदार्थ इतके सुग्रास बनत नसत. यावर रामकृष्ण एक दिवस जेवतांना हृदूला म्हणाले की हृदू, हे दीदीनी (लक्ष्मीची आई) केलेले पदार्थ रामदास वैद्यासारखे

असून तुझ्या मामीने केलेले पदार्थ श्रीनाथसेन वैद्याप्रमाणे आहेत. रामदास हा अनुभवी व प्रसिद्ध वैद्य होता तर श्रीनाथसेन हा नुसता खलबत्ता घोटून बनलेला वैद्य होता. यावर हृदू म्हणाला की आपले म्हणणे खरे आहे; पण रामदास वैद्य वाटेल तेव्हा मिळत नसून त्याला पैसे पण फार द्यावे लागतात; श्रीनाथवैद्य हलका झाला तरी वाटेल तेव्हा मिळू शकतो व पैसे पण कमी खर्च होतात ना. लगेच रामकृष्ण म्हणाले की अगदी बरोबर आहे तुझे म्हणणे.

अशा तऱ्हेने नेहमी विनोदपूर्ण रीतीने रामकृष्ण माताजीबरोबर वागत असत.

माताजी सांगत असत की दक्षिणेश्वरी असतांना रामकृष्णांनी निरनिराळे मंत्र व दीक्षा मला दिलेल्या होत्या यापैकी कोणताही एक मंत्र माणसास पूर्णत्व मिळवून देण्यास समर्थ आहे. रामकृष्णांचा अंत:काल समीप आला असता एक दिवस ते माताजींना म्हणाले की मीच आता सगळे करीत राहूं का ? तूही कांही कर की. याचा अर्थ असा की येणाऱ्यापैकी कांहींना मार्गदर्शन तू कर. यावर माताजी म्हणाल्या की मी काय करणार ? मी पडले बाई. यावर रामकृष्ण म्हणाले की तुला कितीतरी करावयाचे आहे.

एकदा कांही कारणावरून हृदय आपल्या मामीला–माताजींना टाकून बोलला. हृदयचे नुकसान होऊ नये असे रामकृष्णांना वाटत असल्याने त्यांनी त्याला लगेच बोलावून सांगितले की हृदू एक वेळ तू मला असे बोललास तरी चालेल; तुला त्यांतून कोणीतरी सांभाळील. पण ध्यानात ठेव की तिला असे बोललास तर त्यापासून तुझा सांभाळ कोणीही करू शकणार नाही. तिला जर राग आला तर ब्रम्हा, विष्णु व महेश मिळूनसुद्धा तुला सांभाळू शकणार नाहीत.

श्रीरामकृष्ण शारदादेवींना कधीही दुखवीत नसत. भक्तमंडळी व्यवहारास धरून नानातऱ्हेचे पदार्थ अर्पण करीत. माताजी यापैकी कांही भाग रामकृष्णांकरिता ठेवून बाकी सर्व वाटून टाकीत. यावर रामकृष्ण एकदा माताजींना सहज म्हणाले की असे सर्व देऊन टाकून कसे चालेल बरे; आपला खर्च कसा भागेल ? हे ऐकल्याबरोबर माताजी खट्टू होऊन तेथून एकदम निघून गेल्या. हे पाहून रामकृष्णांनी आपला पुतण्या रामलाल यास बोलावून सांगितले की जारे बाबा, तुझ्या काकूला वाईट वाटलेसे दिसते; कांहीही कर, पण तिचे सांत्वन करून ये.

एकदा एक अगदी वाईट चालीची बाई येऊन माताजींकडे जाऊन तेथे बराच वेळ बसून राहूं लागली माताजींना आई म्हणून ती संबोधी व माताजी पण प्रेमाने तिच्याशी वागत. रामकृष्णांना हे आवडत नसे; पण हें सर्व पाहून ते गप्पच रहात.

असेच एकदा एक बाई आली; ती वेड्यासारखी दिसे ती मधुरभाव साधक होती, परमेश्वरास पति मानून वागणे हा भाव या साधनेत प्रमुख असतो. तिने अशा प्रकारचा संबंध ठेवण्याची आपली इच्छा रामकृष्णांना सांगितली. रामकृष्ण यावर फार रागावले व तावातावाने तिला बोलूं लागले माताजींना हे सर्व ऐकून फार लाजल्यासारखे झाले, व त्यांनी गोलपमाला बोलावून सांगितले की ह्या बाईची वागणूक जरी अयोग्य असली तरी तिच्यावर त्यांनी इतके रागवावयाचे कारण नव्हते, तिला त्यांनी माझ्याकडे धाडून द्यायला हवे होते. तुम्ही तेथे जा, व तिला माझ्याकडे घेऊन या. ती बाई आल्यावर तिला त्या म्हणाल्या की बाई ते एवढे तुझ्यावर रागावल्याबरोबर तू मजकडे लगेच का नाही बरे निघून आलीस ?

साधनकाली फार आहार घातुक असतो म्हणून रामकृष्ण आपल्या शिष्यांच्या जेवणावर मोठे लक्ष ठेवीत. एक दिवस त्यांनी प्रत्येकाला किती पोळ्या खाल्ल्या म्हणून विचारले; प्रत्येकाने किती किती खाल्ल्या ते सांगितले ते ऐकून ते तावातावाने माताजींकडे जाऊन त्यांनी त्यांचेकडे तक्रार केली की या पोरांना तू फार खायला घालतेस. यावर माताजी लगेच उसळून म्हणाल्या की या पोरांनी दोन पोळ्या या वयात जास्त खाल्ल्या तर त्यात बिघडले कुठे ? त्याची काळजी मी करीन, तुम्हाला काळजी करण्याचे कारण नाही. खाण्याबाबत या पोरांना फिरून बोलू नका. हे ऐकून रामकृष्ण एकदम गुपचुप माघारे फिरले, आपल्या खोलीत येऊन बसले व मग खूप मोठ्याने हंसू लागले.

एकदा जेवण घेऊन माताजी रामकृष्णांकडे गेल्या. रामकृष्ण पाठमोरे असल्याने कोणी जेवण आणले हे त्यांना दिसले नाही; त्यांनी "ये आंत" असे नुसते म्हटले मागून पहातात तो खुद्द माताजी होत्या. लगेच त्यांनी एकेरी बोलल्याबद्दल माताजींची माफी मागितली माताजी सहजच म्हणाल्या की यात काय चुकले आपले ? "ये" म्हणायला हरकत कसली ? असे म्हणून, जेवण ठेऊन त्या परत गेल्या. रामकृष्णांच्या मनाला फार रुखरुख लागली. शेवटी सकाळी नौबतखान्यात जाऊन त्यांनी माताजींची फिरून क्षमा मागितली. माताजी सांगत की माझे अशा माणसाशी लग्न लागले होते की ज्याने मला एकेरी नावाने कधीच हाक मारले नाही, ज्याने मला फुलानेसुद्धां कधी मारले नाही.

रामकृष्ण व माताजी एकरूप बनले होते, याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे एकदा एक मारवाडी येऊन त्याने रामकृष्णांचे नांवावर दहाहजार रुपये ठेवायची परवानगी मागितली, त्याने जणू धरणेच धरले. रामकृष्ण त्याच्यावर खूपच संतापले. आपली येथे डाळ शिजत नाहीसे पाहून तो

तसाच माताजींकडे त्याकरिता आला; माताजींनी पण त्याला वाटाण्याच्या अक्षता लावल्या.

माताजींची रामकृष्णांच्याबद्दलची भावना तितकीच उच्च होती. रामकृष्णांच्यानंतर एकदा एक भक्त त्यांना सहज म्हणाला की रामकृष्णांनी केवढे कार्य केले ? सर्व धर्मांची एकवाक्यता केली. यावर माताजी लगेच म्हणाल्या की बाळ, एकवाक्यता या दृष्टीने तुझे म्हणणे ठीक आहे; पण त्यांनी आपण होऊन कांहीच केले नाही असे मला वाटते. रात्रंदिवस ते परमेश्वरी आनंदात रंगलेले असत व तो आनंद त्यांनी निरनिराळ्या पद्धतींनी–हिंदु, मुसलमान व ख्रिश्चन इत्यादि पद्धतींनी अनुभवला. परंतु माझ्या मते त्यांच्या जीवनांतील मुख्य तत्त्व म्हणजे शुद्ध त्याग होता. अखंड स्वाभाविक त्याग हा त्यांचा सर्वोत्तम दागिना होता; किंबहुना अखंड स्वाभाविक त्यागाचे मूर्तिमंत रूप म्हणजेच रामकृष्ण होत.

माताजींची भाची एकदा अशाच कशावरून त्यांना म्हणाली की तुम्हाला तुमच्या नवऱ्याची किंमत कळलीच नाही. तिच्या या म्हणण्याचा अर्थ अर्थातच निराळा होता; पण यावर माताजी हसून म्हणाल्या की बरोबर आहे तुझे म्हणणे; पण मला मात्र अभिमानच वाटतो की माझा नवरा नंगा फकीर होता.

थोडक्यात असे म्हणता येईल की रामकृष्ण व शारदादेवी हे जोडपे अनुपमेय होते त्यांनी एकमेकांच्या गुणांचा परिपोष व विकास केला. त्यांनी एकमेकाकरिता अनुपमेय त्याग केला. त्यांनी एकमेकांच्या मदतीने परमतत्त्व अनुभवून ते दोघे अखंड स्थिर झाले. ते दोघे साक्षात् शिवशक्ति स्वरूपच होते व झाले.

• • •

# प्रकरण सहावे

## दक्षिणेश्वर व जयरामवाटी

दक्षिणेश्वरी माताजींनी एकंदर तेरा वर्षे काढली; कारणाकारणाने त्या मधून मधून माहेरी जयरामवाटीस जात असत. १८७४ साली दिवाळीच्या सुमारास वडिलांच्या आजारीपणामुळे त्या जयरामवाटीस गेल्या. या दुखण्यांतून त्यांचे वडील उठले नाहीत. घरातील एकमेव कर्तापुरुष या नात्याने त्यांच्या निधनामुळे यांच्या कुटुंबाची एकदम हलाखीची स्थिति झाली. शेताच्या उत्पन्नाला जोड म्हणून रामचंद्रजींचे भिक्षुकीचे उत्पन्न मिळून ते कुटुंब कसे तरी दिवस कंठीत असे. शेताचे उत्पन्न दिवसेंदिवस कमी होत असलेले, आणि त्यांतच रामचंद्रजींचे देहावसान झाल्याने श्री श्यामसुंदरीदेवींच्या अंगावर आता हा सर्व असह्य भार पडला. त्यांच्या चार मुलापैकी मोठ्याचे भिक्षुकीचे शिक्षणसुद्धा अर्धवट झालेले होते; बाकीची मुले तर लहानच होती. अशा स्थितीत स्वतःला होणारा शोक व दुःख बाजूस ठेवून, चार ठिकाणची भांडी घासणे, कांडणे वगैरे हलकीसलकी कामें पत्करून श्यामसुंदरीदेवींनी परिस्थितीस तोंड द्यायला सुरवात केली. आपल्या लहान मुलांना शिक्षणासाठी निरनिराळ्या नातेवाईकाकडे ठेवले. थोड्याच दिवसांनी त्यांचा थोरला मुलगा प्रसन्नकुमार हा कलकत्त्यास भिक्षुकी करून थोडेफार पैसे घरी धाडू लागल्याने त्या माउलीस मदत होऊ लागली. लौकरच मधल्या दोन मुलांनी घरची शेतीभाती करायला सुरवात केली, त्यामुळे त्यांच्यावरील पुष्कळच भार उतरला. अगदी लहान मुलगा हा हुषार निघाल्याने त्यास चार लोकांच्या मदतीने पुढील शिक्षण देण्याची व्यवस्था केली. तो डॉक्टर झाला, परंतु अल्पकाळातच

त्याला काळाने ओढून नेले. त्याला राधा नावाची एक मुलगी होती. माताजी आपल्या सर्व भावावर प्रेम करीत, आणि म्हणूनच वडिलांच्या निधनानंतर या कुटुंबाचा भार माताजींवर पडू लागला.

काकतालीय न्यायाने म्हणा किंवा कसेही म्हणा त्यांच्या घरी जगद्धात्रीची पूजा सुरू झाल्यावर त्यांची घरची स्थिति सुधारली. दरवर्षी नवमुकर्जींच्या घरी होणाऱ्या काली पूजनाचे वेळी यांचेकडून शिधा जात असे. ह्या वर्षी कांही बोलाचाल झाल्यावरून त्याने हा शिरस्त्याचा शिधा घेण्याचे नाकारले. यामुळे श्यामसुंदरीदेवी अगदी बेचैन झाल्या. त्यारात्री जगद्धात्रीदेवीने त्यांना दृष्टांत दिला की कालीपूजनांत शिधा द्यावयाच्या-ऐवजी त्याच्या सहाय्याने तू आपल्या घरीच माझी पूजा कर. या दृष्टांताने त्यांना समाधान वाटून त्यांनी मोठ्या उत्साहाने त्यावर्षी आपल्या घरी जगद्धात्रीचा उत्सव केला. ह्यापुढे दरवर्षी हा उत्सव करायचे त्यांनी ठरविले. दुसऱ्यावर्षी यावेळी माताजी तेथे होत्या. या उत्सवाबद्दल त्यांच्या आईने त्यांना विचारल्यावरून त्या म्हणाल्या की कशाला हवा हा एवढा खटाटोप आपल्याला ? कांही जरूर नाही. त्याच रात्री माताजींच्या स्वप्नात तीन देवता आल्या व त्यांपैकी मुख्य देवतेने त्यांना विचारले कीं मग मी येथून जाऊ का ? माताजींनी विचारले की तुम्ही कोण. तेव्हा त्यांनी सांगितले की मी जगद्धात्री असून ही जया व ही विजया आहे. त्यावर माताजी म्हणाल्या की जायला काय झाले ? रहा की. अर्थातच दुसऱ्या दिवशी जगद्धात्रीची पूजा झाली. त्यानंतर या उत्सवाचे वेळी माताजी दरवर्षी येत असत. पुढे स्वामी योगानंदांनी त्यात लक्ष घालून, जवळपास थोडीशी जमीन खरेदी करून देवीच्या वार्षिक उत्सवाची व्यवस्था केली. हल्ली तेथे असलेली रामकृष्ण मिशनची शाखा हा उत्सव प्रतिवर्षी करीत असून त्याचा खर्च त्या कुटुंबाकडून होतो.

ज्यावर्षी माताजींचे वडील निवर्तले त्याच वर्षी रामकृष्ण व माताजी हे दोघेही कलकत्त्यास अतिसाराच्या विकाराने आजारी पडले. रामकृष्ण लौकरच बरे झाले; पण माताजींची सुधारणा लौकर होईना. पुष्कळसे बरे वाटल्यावर हवापालट म्हणून माताजी जयरामवाटीस गेल्या; तेथे पोहोचल्यावर त्यांच्या दुखण्याने उलट खाल्ली. शेवटी आता काय होते अशी स्थिति झाली. हे ऐकून रामकृष्ण म्हणाले की म्हणजे, ती काय जाणार की काय आता ? मानव देहात मिळविण्याचे अंतिम ध्येय तिलः साधणार नाही काय ? अशा ह्या हताश स्थितीत माताजींनी असे ठरविले की आता किती त्रास दुसऱ्यांना द्यावयाचा ? त्याऐवजी सिंहवाहिनी समोर बसून (त्या गांवातील देवीचे स्थान) प्रायोपवेशन करावे. सर्वांगांवर सूज आलेली, नाक डोळयांना सारखी गळ लागलेली, अतिसाराचा विकार, डोळयांनी जवळ जवळ दिसेनासे झालेले, अशा स्थितींत सगळयांचा डोळा चुकवून, एका मैत्रिणीस बरोबर घेऊन त्या देवळांत सिंहवाहिनीसमोर जाऊन बसल्या. माताजी सांगत की अशा स्थितीत मी बसले असतांना देवीने येऊन मला दोन औषधे सांगितली— एक डोळयाकरिता व एक अतिसारावर. ही औषधे मी लगेच घ्यायला सुरवात केली. डोळयांनी दुसऱ्याच दिवसापासून मला दिसू लागले व थोडयाच दिवसात अतिसार पण थांबून मला खूप आराम वाटला. यामुळे सिंहवाहिनीचे देऊळ गांवात मोठे प्रसिद्ध झाले. यानंतर लौकरच माताजी कलकत्त्यास परतल्या.

याच्या पुढच्या वर्षी कलकत्त्यास त्या तापाने फार आजारी पडल्या आणि हवापालट म्हणून त्या फिरून जयरामवाटीस गेल्या. कशानेही बरे वाटेना. शेवटी प्लीहेवर एक मोठा डाग द्यावयाचे ठरले. शंकराचे नावाने देवळात एक वैद्य हा डाग देत असे. माताजींना त्याने हा डाग दिला. या डागाने माताजींना कितपत फायदा झाला हे सांगणे कठीण

आहे; परंतु हा डाग मात्र माताजींनी शांतपणे किंचित् हालचाल न करता स्वस्थपणे लावून घेतला; देहाहून आपण निराळे आहोत याची जणू स्वपरीक्षा त्यांनी केली! ह्यानंतर लवकरच त्या दक्षिणेश्वरी परत आल्या. हा प्रसंग सन १८७७ मधे घडला.

जयरामवाटीस त्या तापाने आजारी होत्या त्यावेळी इकडे दक्षिणेश्वरी चंद्रादेवींचे देहावसान झाले. रामकृष्णांच्या वर हृदयराम अधिकार गाजवू लागला होता. रामकृष्णांच्या दर्शनार्थ येणाऱ्यांना प्रथम हृदयरामची संभावना करावी लागे; पुढे पुढे तो लोकाजवळून एवढ्याकरिता पैसेसुद्धा घेऊ लागला होता. लोकांच्या देखत तो त्यांचा उपमर्द करू लागला होता. तो त्यांना म्हणू लागला की बच्चंजी, मी येथे तुमचे केले नसते तर हे बुवापण तुम्हांला आले नसते; माझ्यामुळेच तुम्हाला हे पद प्राप्त झाले आहे. अशा तऱ्हेने तो रामकृष्णांना सारखा घालून पाडून बोलू लागला एखादे वेळी कोणी त्यांना हृदयरामच्या या वागणुकीबद्दल विचारले तर ते म्हणत की खरोखरीच त्याने माझी फार सेवा केली आहे, मग तो थोडासा असे बोलला तर काय झाले? एकांतात रडून रामकृष्ण आपल्या "आईला" म्हणत की आई हृदू लहान आहे; आपण काय बोलतो हे त्याला समजत नाही; तर तू त्याच्यावर रागावू नको.

अशा या दक्षिणेश्वरच्या परिस्थितींत माताजी जयरामवाटीहून परत तेथे आल्या. त्याप्रसंगाबाबत माताजी सांगत असत की मी एवढ्या-तापातून उठून बरोबर कांही बाया घेऊन दक्षिणेश्वरी आले; पण आम्हांला पाहिल्याबरोबर हृदयराम आमचे अंगावर ओरडून म्हणाला की कशाला आलात तुम्ही येथे? काय तुमचे काम आहे येथे? यावेळी आमचे बरोबर खुद्द हृदयरामची आई होती. हृदयरामचे हे शब्द ऐकल्याबरोबर त्या माउलीला साहाजिकच राग आला, व ती आम्हा सर्वांना बरोबर घेऊन

सरळ श्रीरामकृष्णांचे समोर जाऊन त्यांना म्हणाली की, ऐकता आहा ना तुम्ही, आम्हाला हृदयराम काय म्हणतो आहे ते ? आतां या मुलीला (शारदादेवी) मी कोठें ठेवू व काय करू सांगा. यावर रामकृष्णांनी एक शब्द सुद्धा उत्तर दिले नाही; ते अगदी निर्विकार व स्वस्थ असे बसले होते. शेवटी हृदयच्या आईने त्याच पावली परत जावयाचे ठरवले व लगेच आम्ही सर्वजणांनी जयरामवाटीचा रस्ता धरला. माताजी म्हणत की त्यावेळी मी आईला प्रार्थना केली की आई, तुझ्या मनांत येईल तेव्हा तू मला परत आण.

थोडयाच दिवसात हृदयरामचा त्रास इतका होऊ लागला की एक दिवस देवळाच्या व्यवस्थापकाने त्याला हात धरून बाहेर काढले. हृदयराम बाहेर निघाल्यामुळे रामकृष्णांच्या सेवेचे काम त्यांचा पुतण्या रामलाल याजवर पडले; पण तो याबाबत अगदी बेपर्वाईने वागत असे, व त्यामुळे रामकृष्णांचे अतोनात हाल होऊं लागले. शेवटीं जाणाऱ्या येणाऱ्याबरोबर परत येण्याबद्दल माताजींना रामकृष्णांनी निरोप धाडल्यावर माताजी जयरामवाटीहून परत दक्षिणेश्वरी आल्या.

जयरामवाटीहून कलकत्त्यास येतांना वाटेत १०-१२ मैल अरण्यांतून प्रवास करावा लागे. या आडरानांत दरोडेखोरांचा फार उपद्रव असे. प्रवासी लोक या अरण्यांत अशा बेताने शिरत की संध्याकाळच्या आत ते ओलांडून पुढच्या गावाला ते मुक्कामाला येत. एकदा माताजी अशा प्रकारे येत असता त्यांना इतरांच्या बरोबर त्या रानातून चालवेना; यामुळे बाकीचे लोक कुरकुरू लागले ते म्हणाले की अशाने संध्याकाळच्या आत पुढील मुक्काम कसा गाठूं शकू ? आपण आयतेच दरोडेखोरांच्या तावडीत सापडू. यावर माताजी म्हणाल्या

की बाबांनो तुमचे म्हणणे बरोबर आहे; पण माझ्याने भरभर चालवत नाही त्याला काय करू? तुम्ही पुढे चालू लागा; मी हळूहळू येईन व मुक्कामावर तुम्हाला गाठीन. माझे मधे जे व्हायचे असेल ते होईल. यावर पुढील मुक्काम तारकेश्वर गावी अमुक ठिकाणी करायचा ठरवून बाकी सर्व लोक आपल्या चालीने पुढे झाले व माताजी आपल्या चालीने मार्ग कंठू लागल्या. संध्याकाळ झाली, अंधार पडला; माताजींचा जेमतेम अर्धा मार्ग त्या रानातला संपला होता. त्यांना भीति वाटू लागली व काय करावे हे समजेना. अशा या स्थितीत हातात दण्डा घेतलेला व त्यांचे बाजूस येत असलेला एक काळकभिन्न माणूस त्यांना दिसला; त्याच्याच मागे आणखी एक व्यक्ति पण येत असलेली त्यांना दिसली. त्या पहिल्या माणसाने थोडेसे जवळ येऊन दरडावून "कोण आहे ते" असे माताजींना विचारले. माताजी मोठ्या समयोचित होत्या. हे ऐकल्याबरोबर, धैर्य धरून, घाबरून न जाता, त्या माणसास मोठ्या काकुळतीने त्या म्हणाल्या की बरे झाले तुम्ही मला अगदी वडिलासारखे भेटलात. माझ्या बरोबरीची मंडळी पुढच्या मुक्कामी मला सोडून गेली मला चालता येईना म्हणून मी अशी रेंगाळत मार्ग चालते आहे. मला या अंधारात आता रस्ता पण दिसत नाही मला कृपा करून तारकेश्वरी माझ्या मंडळीत पोहाचवून द्या. तुमचा जावई दक्षिणेश्वरी राणी रासमणीच्या काली मंदिरात राहातो; त्याच्याकडे मला जावयाचे आहे. तुम्ही तेथपर्यंत मला पोहोचवून द्याल तर मोठे उपकार होतील इतके बोलणे होत आहे तो ती दुसरी व्यक्ति तेथे येऊन पोहोचली व माताजी पहातात तो ती स्त्री होती. हे पाहून तर माताजींना एकदम खूपच धीर आला त्या बाईला पाहून माताजी म्हणाल्या की आई, ही मी तुझी मुलगी शारदा. पहा बरे मी किती अडचणीत सापडले आहे. मला ह्यावेळी तुम्ही आईबापासारखे भेटलात म्हणून बरे झाले.

माताजींच्या या अशा बोलण्याचा परिणाम त्या दोघांच्या मनावर इतका झाला की ते दोघेही अगदी विरघळून गेले. त्यांनी माताजींना धीर दिला. माताजींना ते शेजारच्या खेड्यावर घेऊन गेले; त्यांना खायला घालून, निजवून, त्यांच्यावर रात्रभर पहारा केला व सकाळी पुढच्या मुक्कामावर माताजीबरोबर असलेल्या माणसामधे त्यांना त्यांनी सुरक्षित नेऊन पोहोचविले. इतरांना या दोघांची ओळख आईबाप या नात्यानेच माताजींनी करून दिली.

\या प्रसंगाबाबत पुढे माताजी सांगत असत की त्या एका रात्री त्यांच्या वागणुकीमुळे मला त्यांच्याबद्दल प्रेम वाटू लागले. ते जेव्हा माझ्याबरोबरच्या माणसात सोडून परतू लागले तेव्हा मला अगदी रडू आवरेना. मला ते कितीतरी दूरवर पोहोचवावयास आले होते. मध्यंतरी अरण्यांतून जात असतांना रानातील पावटे जमवून ते माझ्या पदरात बांधून त्यांनी सांगितले की बाळ सायंकाळी भाताबरोबर हेही शिजव बरे. मी निरोप देतांना त्यांना वारंवार दक्षिणेश्वरी यावयास सांगितले. त्यानंतर पुढे ते कितीकवेळा दक्षिणेश्वरी आले. अगदी प्रथम जेव्हा ते तेथे आले त्यावेळी त्यांची ओळख आईबाप या नात्यानेच मी रामकृष्णांशी करून दिली व रामकृष्ण पण त्यांच्याशी जावयाप्रमाणेच वागले. माझी खात्री आहे की तेव्हापासून त्यांनी आपला दरोडेखोरीचा वाईट व्यवसाय सोडून ते आता सन्मार्गाला लागले असतील.

• • •

# प्रकरण सातवे

## रामकृष्णांची महासमाधि व नंतर

माताजीचे दक्षिणेश्वरी रहाण्याचे दिवस संपत आले. सन १८८५ मध्ये रामकृष्ण आजारी झाले व त्यावर्षी सप्टेंबर महिन्यांत कलकत्त्यातील श्यामपुकुर विभागात त्यांना दक्षिणेश्वरहून हलविण्यांत आलें; माताजी दक्षिणेश्वरलाच राहिल्या. याच वेळी त्या वाचावयास शिकल्या. अशा या स्थितीत गोलपमा केवळ थट्टेने एक दिवस सहज माताजींना म्हणाल्या की तुमच्या त्रासामुळेच रामकृष्ण दक्षिणेश्वर सोडून कलकत्त्यास गेले. परंतु या वाक्याचा परिणाम माताजींचे वर विलक्षण झाला हे वाक्य ऐकल्या_ बरोबर त्या सरळ दक्षिणेश्वरहून निघून रामकृष्णांचे समोर जाऊन उभ्या राहिल्या व त्यांना या संबंधी विचारले. रामकृष्णांनी लगेच सांगितले की हे धादांत खोटे आहे; मग माताजींची पुष्कळ प्रकारे समजूत करून त्यानी त्यांना दक्षिणेश्वरी परतविले. लगेच त्यांनी गोपमाला आपले पुढे बोलावून घेऊन तिची खूपच खरडपट्टी काढली व तिला तावडतोब माताजींची क्षमा मागण्यास सांगितले बिचारी गोलपमा ! काटयाचा नायटा झालेला पाहून तिला फार वाईट वाटले व तिने तत्क्षणी माताजीकडे येऊन त्यांची क्षमा मागितली. माताजी पण खूप मोठयाने हंसल्या व गोलपमाचे सांत्वन त्यांनी मोठ्या प्रेमाने केले

श्यामपुकुरात रामकृष्णांना भक्तांनी नेले हे खरे; पण व्हावी तशी त्यांची सेवा व खाणेपिणे याची व्यवस्था या पुरुष भक्तांकडून होईना. माताजींना तेथे नेल्याशिवाय हे जमणार नाही हे त्यांनाही समजे, पण तेथे माताजींना रहाण्याजोगती एकही स्वतंत्र अशी खोली नव्हती. अगदीवर,

गच्चीवर एक लहानशी रहाण्यास अयोग्य अशी एक खोली स्वतंत्र अशी होती अशा परिस्थितीत सर्वजण एक दिवस माताजींसमोर येऊन उभे राहिले व त्यांनी सर्व परिस्थिति अगदी मोकळेपणाने माताजी समोर मांडली. माताजींनी ते सर्व ऐकल्यावर तशाच त्या पावली त्यांच्याबरोबर निघाल्या व त्या गच्चीवरील सकुचित व अडचणीच्या जागेत आपले ठाणे ठेविले. तेथेसुद्धा पहाटे तीन वाजता उठून, आपले स्नान वगैरे आटपून त्या आपल्या खोलीत जात; रात्री ११ चे पुढे खाली शांत झाल्यावर त्या निजायला येत; कारण त्या खोलीत निजण्यापुरती सुद्धा जागा नव्हती. केवढा हा संयम, केवढा त्याग व केवढी असीम सेवावृत्ति ! अशा तऱ्हेने रामकृष्णांच्या खाण्यापिण्याची सोय माताजी तेथे आल्याबरोबर सुरळीत झाली.

श्यामपुकुरातील घर फार अडचणीचे होते; शिवाय डॉक्टर लोकांनी रामकृष्णांना गावाबाहेर ठेवण्याचा सल्ला दिलेला. भक्तमंडळी अशा घराच्या शोधात रात्रंदिवस होती. कांही दिवसांनी कासीपूर विभागांत पाहिजे तसे, भोवताली बाग बगीचा असलेले एक घर मिळाले. लगेच रामकृष्णांना तेथे हालविण्यात आले. माताजी पण अर्थातच त्यांचेबरोबर या नवीन घरात गेल्या.

रामकृष्ण इतके आजारी होते पण आपल्या भक्तावरील संकट टाळण्याकरिता ते आपले आजारीपण बाजूस ठेवीत. घराभोवतालच्या बागेत एके बाजूस खजुराची झाडें होती. कांहीजण खजूर तोडण्याकरिता निघाले. त्या झाडाच्या बुंघापाशी एक मोठा नाग आहे असे रामकृष्णांच्या ध्यानात आल्याने ते तसेच उठले, तेथे गेले, त्या नागास तेथून हुसकावून लावून कोणासही न दिसता आपल्या बिछान्यावर परत येऊन बसले. भक्त मंडळींना रामकृष्ण दिसले नाहीत; परंतु माताजींना ते दिसले. म्हणून

परत जागेवर येतात तो माताजी समोर येऊन उभ्या राहिल्या, व वाऱ्यात का बाहेर पडलांत म्हणून विचारूं लागल्या. रामकृष्णांनी प्रथम तर गोष्ट उडवूनच दिली, ते म्हणाले की मी येथेच बसलो आहे; मी बाहेर गेलोच कशाला आहे. तुम्ही वरती गरमीत सारखे काम करता म्हणून तसे कांही तरी तुम्हाला उष्णतेमुळे वाटते आहे असे दिसते. माताजी असे उत्तर ऐकण्यास तयार होईनात. त्या म्हणाल्या की अशी उडवाउडवी मला नको; मला खरे काय ते कारण पाहिजे; मी स्वतःच तुम्हाला जातायेतांना पाहिले आहे. शेवटी रामकृष्णांनी सर्व हकीकत माताजींना सांगितली.

कमालीची सेवा शुश्रुषा करून सुद्धा रामकृष्णांना आराम पडेना हे पाहून, आता देवाचाच ठाव घेतला पाहिजे असे ठरवून माताजी कोणासही न सांगता, गुपचुप, तारकेश्वरी शंकरासमोर जाऊन, प्रायोपवेशन करायचे ठरवून बसल्या. दुसऱ्या दिवशी मध्यरात्री त्यांना तेथे विचित्र अनुभव येऊ लागले. त्यांचे रामकृष्णांवरील प्रेम एकाएकी नाहीसे झाले. त्या स्वतः एकदा सांगत होत्या की त्या रात्री मला हंड्यांची चळतच्या चळत काठीने फोडून टाकल्याचे आवाज ऐकू येऊ लागले व माझ्या मनात एकदम प्रकाश पडला की शरीर हे असे आहे; शरीराची कसली नाती ? कोण बायको, कुठला नवरा ? जगांत आहेच कोण माझे ? मी एकटीच तर आहे. मग हे प्रायोपवेशन कां म्हणून ? देहत्याग कशाकरिता ? असे विचार मनांत येऊन मी एकदम शांत झाले. सकाळी काशीपूरचा रस्ता पकडून मी आपल्याजागेवर परत आले. रामकृष्णांचे समोर गेल्यावर त्यांनी मला हंसून एकदम विचारले की का कांही मिळाले का ? आहे ना सर्व नाशवंत व अनित्य ? समजले ना हे आता ? आला ना पक्का अनुभव ?

याच वेळी रामकृष्णांना एक स्वप्न पडले की एक हत्ती सोंडेने जमीन खोदून जमीनीतून रामकृष्णांकरिता औषध शोधून काढण्याचा प्रयत्न

करीत आहे. हे स्वप्न माताजींना सांगून त्यांनी त्यांना विचारले की तुम्हाला झाला का कांही असा दृष्टांत ? यावर माताजींनी सांगितले की मला दक्षिणेश्वरी आई एका बाजूला मान कलती करून उभी आहे असे दिसले. मी तिला त्याचे कारण विचारल्यावरून तिने सांगितले ; मला इकडे या बाजूला गळ्याला कॅन्सर नावाचा रोग झाला असल्यामुळे मी अशी ही वाकडी मान करून उभी आहे.

असल्या ह्या दृश्यामुळे माताजींना भवितव्य कळून चुकले होते व त्यांचे मन पुढील येणाऱ्या अटळ स्थितीकरिता तयार झालेले होते. १६ ऑगस्ट सन १८८६ रोजी त्रिवार ॐ काराचा उच्चार करून रामकृष्णांनी देह सोडला.

त्या देहाचे उत्तरोपचार केले गेले. त्यानंतर माताजींनी सौभाग्य-चिन्हे काढून टाकायला लागता क्षणीच रामकृष्ण समोर उभे राहून म्हणाले की काय करते आहेस तू ? मी तर कांही कोठे गेलो नाही; मी फक्त एका खोलीतून दुसऱ्या खोलीत गेलो आहे.

अशा स्थितीत व्यवहारास अनुसरून बाबुराम नावाच्या भक्ताने बिनकाठाचे एक लुगडे माताजींना देण्याकरिता गोलपमांचे जवळ दिले. गोलपमांना कितीतरी वेळ काय करावे हे समजेना. शेवटी एकदा हिय्या करून त्या ते विधवेचे वस्त्र घेऊन माताजीसमोर जाऊन पहातात तो माताजींनी नेसल्या लुगड्याचे काठ केव्हाच फाडून टाकले होते. पुढे माताजी नेहेमी बारीक किनारीच्या काठाचे लुगडे नेसत असत.

रामकृष्ण गेल्यावर कॉसीपूरमधील एवढे मोठे भाड्याचे घर ठेवण्याचे प्रयोजन संपले होते. परंतु माताजींची कांही तरी व्यवस्था ठरल्या-शिवाय ते घर सोडणे संन्याशी भक्तांना पटेना. आता कसे व काय करावे

अशा विचारात सर्व भक्तमंडळी होती. संन्याशी भक्त मंडळींनी तर ठरवले की भिक्षेचा प्रसंग आला तरी हरकत नाही पण माताजींची व्यवस्था ही केलीच पाहिजे. पुढे थोडयाच दिवसात लक्ष्मी दिदी व माताजी यांना बलराम बोस यांच्या घरी हलवण्यात आले. तोपर्यंत रामकृष्णांच्या अस्थि एके ठिकाणी होत्या. यानंतर अस्थि कोठे ठेवाव्या याबद्दल संसारी व संन्यासी भक्तामधे मतभेद होऊन तो वर्दळीवर जाण्याची चिन्हे दिसू लागली. शेवटी रामचंद्र दत्तांच्या बागेत अस्थि ठेवायचे ठरले; परंतु मध्यंतरी संन्याशी भक्तांनी त्यातील बराचसा भाग उचलून घेतला होता. ह्या चाललेला झगडा माताजींना समजल्यावर त्याबद्दल गोलपमाजवळ त्या म्हणाल्या की पहा एवढी विभूति गेली त्याचे यांना काहीच वाटत नाही; राहिलेल्या राखाडीकरिता कोण ही भांडणे !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९२.(६.५.
संद. शाखा (...प्रत)

# प्रकरण आठवे

## वृंदावनची यात्रा

रामकृष्णांनी देह सोडण्यापूर्वी माताजींना एक दिवस सांगितले होते की ज्या ज्या तीर्थाचे ठिकाणी मला जाणे शक्य नव्हते त्या सर्वांना तू भेट दे. चमत्कारिक घटना अशी की रामकृष्णांच्या देहावसानानंतर पंधरा एक दिवसातच माताजी तीर्थयात्रेस निघाल्या. व्यावहारिक दृष्टीने झालेल्या अपरिमित दुःखाचा विसर पडण्यास हा एक उत्तम उपाय होता. त्यावेळची माताजींची मनःस्थिति अगदी विरक्त असून, विरक्तस्थितीतच तीर्थयात्रे-पासून फायदा होत असतो असे शास्त्रे सांगतात.

सन १८८६ मधे ३० ऑगस्ट रोजी स्वामी योगानंद, अभेदानंद, अद्भुतानंद, लक्ष्मीदिदी, गोलपमा व सहकुटुंब मास्टर महाशय यांच्यासह माताजी तीर्थयात्रेस निघाल्या. वृंदावनला जायचे ठरले. देवगड, बनारस, अयोध्या इत्यादि मार्गाने वृंदावनला जायचा बेत पक्का झाला.

बनारसमधे असतांना एका संध्याकाळी विश्वेश्वराच्या पूजनसमयी माताजींना समाधि लागली. येथे असतांना विद्वद्रत्न परमहंस भास्करानंदांचे दर्शनास त्या गेल्या होत्या. माताजी सांगत की ते नग्न असत. आम्ही गेलो व पाहिले तो त्यांच्यात कसलाच विकार दिसत नव्हता. आम्हाला पाहून ते म्हणाले की या ग या सर्वजणी; लाजू नका; निरनिराळ्या रूपात नटलेली जगन्माताच तुमच्यामधे मला दिसत आहे. काय त्यांचा अधिकार ? ते योगी होते; त्यांना शीतोष्ण सम असे.

वृंदावनच्या वाटेवर असताना त्यांना रामकृष्णांचे दर्शन झाले. त्याची हकीकत अशी की गाडीत माताजींना झोप लागली होती. स्वतः वापरीत

असलेले सोन्याचे कवच आजारीपणामधे रामकृष्णांनी माताजींना दिले होते. ते त्यांच्या हातात त्यावेळी होते. सोन्याचे असल्याने ते चोरीला जाण्याचा संभव. अशा स्थितीत दर्शन देऊन रामकृष्णांनी कवच संभाळण्याबद्दल सूचना दिली. माताजींनी लगेच उठून, हातातील कवच काढून, पेटीत ठेवून दिले. हे कवच पुढे त्यांनी बेलूर मठात ठेवायला दिले होते.

रामकृष्ण प्रेमाचे अत्यंत पूज्य व पवित्र असे स्थान म्हणजेच वृंदावन. खऱ्या साधकांना त्या भागात पाऊल पडल्याबरोबर अनुभव येऊ लागतात, अशी ती प्रभावी जागा आहे. तेथे नुसते पोहोचल्याबरोबर माताजींचे मन एकदम उच्च भूमिकेवर आरूढ होणे सहाजिकच होते. माताजी तेथे पोहोचण्यापूर्वी योगिनमा तेथे आधी जाऊन व्यवस्था करून माताजींची वाट पहात होत्या. तेथे पोहोचल्याबरोबर माताजींनी योगिनमाला मिठी मारून त्या लहानमुलाप्रमाणे कितीतरी वेळ रडल्या. या वेळेपासून आलटून पालटून हसणे व रडणे त्यांचे वारंवार सुरू झाले. जवळजवळ चार–सहा महिने त्यांचे असे सारखे चालले होते. श्रीमती राधेच्या कृष्ण–विरहाचा अनुभव त्या येथे घेत होत्या. त्यांची ती तळमळ, तो बेफिकीरपणा, तो शरीराबाबतचा निष्काळजीपणा, "रामकृष्णा केव्हा भेटशील रे" असा त्यांचा टाहो व त्याबरोबरचा सतत होणारा अश्रुपात, त्यांचे ते बेजबाबदारप्रमाणे इतस्ततः भटकणे इत्यादि भाव इतक्या झपाट्याने दिवसानुदिवस वाढतच जात होते. शेवटी एक दिवस त्यांना रामकृष्णदर्शन झाले व त्यांनी त्यांचे मोठ्या प्रेमाने सांत्वन केले; ते म्हणाले की अग, इथेच तर मी आहे; का इतका शोक करतेस ? मी गेलोच आहे कोठे मुळी ? इथेच एका खोलीतून मी दुसऱ्या खोलीत काय तो गेलो आहे; बाकी मी आहे तसाच आहे.

या दर्शनानंतर माताजी एकदम शांत व गंभीर झाल्या, व त्यांची वागणूक अगदी लहान मुलीसारखी होऊ लागली. या संबंधी योगिनमा

एक गमतीदार गोष्ट सांगत. एकदा एक प्रेत घाटावर नेत असतांना माताजींनी पाहिले. ते पाहून माताजी म्हणाल्या की केवढे भाग्य या माणसाचे की त्याला वृंदावनात देह ठेवायला मिळावा. मी सुद्धा येथे देह ठेवण्याच्या उद्देशाने आले; पण गंमत अशी की येथे आल्यापासून किंचित्सा तापसुद्धा मला एकही दिवस आला नाही. पहा बरे माझे किती-तरी वय झाले ! (माताजींचे वय यावेळी केवळ तेहेतीस वर्षाचे होते) या माझ्या वयात मी कितीतरी वयस्क माणसे पाहिली; रामकृष्णांचे वडीलबंधू मी पाहिले, माझ्या वडिलांनासुद्धा मी पाहिले हे ऐकल्यावर मी खूप हसू लागले व माताजींना विचारले की कोणते मूल आपल्या बापाला पहात नाही. मग माताजी पण माझेबरोबर हसू लागल्या.

वृंदावनात असताना माताजींचा सर्व वेळ ध्यान–धारणा, जप–जाप्य यातच बहुतेक खर्च होत असे. सायंकाळी निरनिराळ्या देवळात देवदर्श-नार्थ त्या जात. त्या देवाला प्रार्थना करीत की देवा दुसऱ्याचे दोषाकडे पहाण्याची माझी दृष्टि काढून टाक; माझ्याकडून दुसऱ्याचे दोष पाहिलेच जाऊ नयेत. माताजी सांगत की खरोखरच ही माझी प्रार्थना देवाने ऐकली असली पाहिजे. योगिनमा सांगत की माताजींनी कोणाचाही दोष त्यास सांगताना आम्ही पाहिले नाही. माताजी सांगत की प्रथम प्रथम दुसऱ्या माणसाचे दोष पहावयाची मला सवय होती. तेव्हा मी रामकृष्णांना प्रार्थना केली व माझी ही वाइट संवय नाहीशी झाली. माताजी म्हणत की नेहमी दुसऱ्याचे गुण पाहून तेच त्याचे गुण वाढविण्याचा प्रयत्न करावा. दोष दाखविण्याने माणूस आपल्या विरुद्ध जातो. मनुष्य हा चुकायचाच; पण वारंवार त्याच्या चुका घोटण्याने आपणच पुढे त्या चुका करू लागतो. म्हणून मी म्हणते की योगिनमा तू व मी दुसऱ्याचे दोष पाहून आपली दृष्टि अपवित्र करता कामा नये.

वृंदावनात असतांना सबंध वृंदावनची पायी प्रदक्षिणा त्यांनी किती तरी वेळा केली होती. वास्तवीक त्यांचे सांधे आखडलेले असून त्यांना थोडेसे चालणे सुद्धा जमत नसे. पण वृंदावनच्या प्रदक्षिणेस त्या निघाल्या की त्यांचे पाय अगदी मोकळे होत असत; हे पाहून आम्हा सर्वांना मोठे आश्चर्य वाटत असे. प्रदक्षिणेच्या वाटेवर असताना त्या मधेच थांबून एकदम गंभीर होत व एकदम हसायला व रडायला लागत; हे असे केंव्हा होईल त्याचा नियम नसे. चालतांना रस्त्याच्या चोहोबाजूस त्या न्याहाळून चालत, जणू काय त्या कांही शोधीत आहेत किंवा त्यांना कांही दिसत आहे; पण अशा स्थितीत त्यांना जर कोणी टोकले तर लगेच त्या भराभर चालू लागत व म्हणत की चला चला जलदी, उशीर होत आहे. त्यांना काय अनुभव येत असेल हे त्यांचे त्यांनाच माहीत.

यावेळी त्यांना निरनिराळे पारमार्थिक अनुभव येत होते. याबाबत त्या कधी कोणाशी बोलत नसत; आपली स्थिति त्या सर्वांपासून लपवून ठेवीत. पण अशी वेळ एखादे प्रसंगी येई की त्यांचे हे बिंग बाहेर पडे. एकदा कलाबाबूंच्या घरी त्यांना इतकी गाढ समाधि लागली की ती कांही केल्या उतरेना. शेवटी योगिनमा आल्या व त्यांनी पुष्कळच प्रयत्न केल्यावर त्या अर्धवट शुद्धीवर आल्या व म्हणाल्या की आम्हाला भूक लागली; योगिनमानी लगेच त्यांचे पुढे खायला ठेवले. त्यावेळचे त्यांचे ते पदार्थ मागणे, उचलणे, तोंडात टाकणे, चावणे, पाहाणे, शरीराचे हावभाव, जेवणानंतर पान खाण्याची लकब वगैरे सर्व अगदी हुबेहुब रामकृष्णांचे प्रमाणे होती; जणू काय तेथे माताजी नाहीतच, रामकृष्णच बसले आहेत. ही समाधि पुरी उतरल्यावर योगिनमानी टोकून विचारल्यावर माताजींनी कबूल केले की त्यांच्या अंगात रामकृष्णांचा आवेश होता.

वृंदावनी असतांनाच त्यांचे लोकोपदेशकार्य सुरु झाले. अगदी पहिल्यांदा उपदेश देण्याबाबत माताजी सांगत की एक दिवस रामकृष्णांनी मला आदेश दिला की योगेनला (पुढे योगानंद म्हणून प्रसिद्धीस आलेले

रामकृष्णांचे शिष्य) तू अमुक अमुक मंत्राची दीक्षा दे. मला तर फारच लाज वाटली व भीति पण वाटली. माझ्या मनात आले की लोक काय म्हणतील व मी याबाबत गप्प बसले. फिरून रामकृष्णांनी येऊन तेच सांगितले व म्हणाले की मी त्याला उपदेश दिलेला नाही तर आता तू दे. तसेच योगेन्‌ला सुद्धा स्वप्नात रामकृष्णांनी मजकडून मंत्रदीक्षा घ्यायला सांगितली. शेवटी एक दिवस मी हे योगिन्‌माला सांगितले. योगिनमांनी योगेन्‌जवळ ही गोष्ट काढताच त्याने पण आपले स्वप्न योगिन्‌माना सांगितले. शेवटी दोघांनाही रामकृष्णांनी सांगितलेले मी पाहिले तेव्हा त्याला उपदेश द्यायचे मी ठरविले.

एक दिवस या उपदेशार्थ मुक्रर करून माताजींनी त्या दिवशी योगेन्‌ला आपल्या जवळ बसायला सांगितले. रामकृष्णांची तसबीर व त्यांच्याच सामानाची एक लहानशी पेटी माताजींचे समोर होती. माताजींनी रामकृष्णांचे पूजन करायला सुरवात केली तोच त्यांना समाधि लागली. त्याच स्थितीत असतांना त्यांनी योगेन्‌ला मंत्र सांगितला तो इतक्या मोठ्याने सांगितला की शेजारच्या खोलीत बसलेल्या योगिन्‌माला तो स्पष्टपणे ऐकू आला. उपदेश देण्याचा हा त्यांचा पहिलाच प्रसंग.

वृंदावनला माताजी जवळ जवळ वर्षभर होत्या. तेथून पुढे हरिद्वारला जाऊन रामकृष्णांच्या देहरक्षेपैकी कांही भाग त्यांनी तेथे ब्रह्मकुंडात प्रविष्ट केला. नंतर जयपूर, पुष्करतीर्थ वगैरे करून त्या अलाहाबादेस आल्या. येथे संगमावर त्यांनी रामकृष्णांचे केस तीर्थात प्रविष्ट केले. या प्रसंगाबावत माताजी सांगत की मी पाण्यात केस विलीन करणार होते; पाणी अगदी शांत होते. आता मी केस टाकणार तोच एकाएकी तेथे एक मोठी लाट उत्पन्न होऊन तिने माझ्या हातातले केस उचलून घेतले व ती एकदम विलीन झाली; जणू काय त्या परमपावन जलाने आणखी पावन होण्याकरिता आपण होऊन रामकृष्णांचे केस ग्रहण केले.

अशा तऱ्हेने तीर्थयात्रा करून माताजी कलकत्त्यास ऑगस्ट १८८७ मधे परत आल्या.

# प्रकरण नववे

## कामारपुकुरी वास

यात्रेहून कलकत्त्यास आल्यावर लौकरच त्या कामारपुकुरी रहावयाकरिता जायला निघाल्या. येथून पुढील वर्ष दीडवर्ष व्यावहारिक दृष्टीने माताजींना चरितार्थाचे कांहीच साधन नव्हते. रामकृष्णांचे वेळी देवळातून सात रुपये महिना त्यांना मिळे. रामकृष्णाचे नंतर कांही महिने ही रक्कम त्यांना देवळातून मिळाली; परंतु पुढे एकाएकी व्यवस्थापकांनी त्यांना हेही पैसे धाडून देण्याचे नाकारले. याचे मुख्य कारण म्हणजे माताजींचे नातेवाईक होत; त्यांनी व्यवस्थापकांच्या मनांत माताजींच्या विरुद्ध बोलून कांहीतरी उलटे सुलटे भरवून दिले व त्यांनी पैसे धाडण्याचे थांबविले. विवेकानंद वगैरे मंडळींनी ही मदत चालू ठेवण्याबद्दल व्यवस्थापकांचे जवळ जाऊन खूप रदबदली केली, पण त्याचा उपयोग कांहीच झाला नाही. ही वृत्ति अशा तऱ्हेने बंद झाल्यामुळे माताजींची स्थिति एकदम अनाथ अशी झाली.

माताजी कामारपुकुरला जायला निघाल्या तेव्हा त्यांना पोहोचविण्यास त्यांचेबरोबर गोलपमा व योगानंद पण गेले. पैशाच्या अभावामुळे त्यांना हा सर्व प्रवास पायीच करावा लागला. प्रवासात कांही तरी करून गोलपमा थोडीशी खिचडी शिजवीत. माताजी म्हणत की गोलपमांची खिचडी अमृताप्रमाणे गोड लागत असे. तेथे पोहोचल्यावर योगानंद लगेच परतले, व गोलपमा महिनाभर राहून परतल्या. रामकृष्णांनी जायच्या आधी माताजींना सांगितले होते की मी गेल्यावर देवाचे नाव घेत कामार-

पुकुरास रहा; मग तेथे खावयास नुसता भात किंवा पाला मिळाला तरी हरकत नाही. रामकृष्णांचे हे शब्द पुढे शब्दशः खरेच ठरायचे होते.

माताजींचा या वेळचा वेष म्हणजे हातात बांगड्या व बारीक लाल किनारीचे लुगडे; बंगाल प्रांतात या गोष्टी विधवेने वापरायच्या नसतात. अशा या वेषांत माताजींनी गावात पाय टाकल्याबरोबर सर्वत्र खळबळ उडाली व थोडक्याच वेळात लोक वाटेल तसे यांच्या विरुद्ध त्यांच्या तोंडावर उघडपणे बोलू लागले. अशा स्थितीत अगदी सुरवातीस गोलप-मांचा आधार त्यांना होता. पुढे मग लाहा घराण्यातील प्रसन्नमयी त्यांच्या मदतीस आल्या. रामकृष्णांच्या लहानपणापासून त्यांच्यावर (त्यावेळच्या गदाधरावर–गदाईवर; प्रसन्नमयी रामकृष्णांना प्रेमाने गदाई म्हणत असे) या प्रसन्नमयींचे अत्यंत प्रेम असे. कृष्ण समजून रामकृष्णांची पूजा त्या काळी प्रसन्नमयी करीत असत, त्यांचे लाड पुरवीत असत. माताजींची बाजू घेऊन प्रसन्नमयी म्हणत की तुम्ही या मुलीला काय सामान्य माणूस समजता काय ? अरे ही माझ्या गदाईची बायको आहे; ही साक्षात् महा-माया आहे.

लोकांचा कल पाहून माताजींनी एकदा बांगड्या हातातून काढून टाकायचे ठरवून त्यांना हात घातला मात्र तो रामकृष्ण समोर उभे; ते म्हणाले की काय करते आहेस तू ? मी असतांना सौभाग्यचिन्हे काढून कसे चालेल ? अर्थातच माताजींनी आपला बेत रहित केला.

गंगास्नानाची आवड असल्याने व गंगा घरापासून लांब असल्याने रस्त्याने जाता येता त्यांना लोकांच्या टीका स्वकानाने ऐकण्याचा प्रसंग रोज येत असे; परंतु अशाही स्थितीत त्या गंगास्नान चुकवीत नसत. गंगेवर त्यांचे विलक्षण प्रेम होते—निष्ठा होती. अशाच एक दिवस पहाटे

गंगास्नानास जात असतांना त्यांनी समोरून रामकृष्ण, विवेकानंद वगैरेंना येतांना पाहिले. रामकृष्णांचेवर नजर लावताच त्यांच्या चरणकमलापासून पाण्याचा प्रवाह वाहू लागलेला त्यांनी पाहिला. तत्क्षणी माताजी समजून गेल्या की रामकृष्ण सांगत आहेत की गंगा पण मीच आहे; सर्व मीच आहे. त्या क्षणी जवळ असलेल्या रघुवीराच्या देवळाच्या बाजूस असलेल्या फुलझाडांची फुले खुडून माताजींनी विचारले की तुला वैष्णवतंत्रे माहीत नाहीत का ? माताजींनी नाही म्हटल्यावरून रामकृष्ण म्हणाले की बरे तर; दुपारी गौरीमा येईल व ती तुला सर्व समजावून सांगेन. त्याच दुपारी गौरीमा कामारपुकुरला आल्या व त्यांच्यापासून माताजी शिकल्या की स्त्रीला आपला नवरा केवळ चिन्मय असाच असतो व वाटला पाहिजे.

माताजी कामारपुकुरास आल्याचे समजल्यावर त्यांच्या मातोश्री श्यामसुंदरी देवी यांनी त्यांना जयरामवाटीस येण्याबद्दल निरोप धाडले; तेव्हा एक दिवस माताजी जयरामवाटीस गेल्या. एखाद्या भिकारिणीसारखा माताजींचा वेष पाहून त्यांच्या आईला अत्यंत वाईट वाटले. अशा स्थितीत जयरामवाटीस माताजींनीं रहावे असा आग्रह त्यांनी केला; परंतु रामकृष्णांच्या सांगण्याप्रमाणे वागायचे हे ठरले असल्याने माताजी दोनचार दिवस जयरामवाटीस राहून परत कामारपुकुरला रहावयाला आल्या.

जवळ नाही दिडकी आणि सगळा गाव विरुद्ध; अशा स्थितीत दिवस काढणे अत्यंत कठीण होते. आल्याबरोबर फावड कुदळ हातात घेऊन, घराभोवतालच्या जमिनीची मशागत करून माताजींनी तेथे भाजीपाला लावला. हा भाजीपाला येईपर्यंत भात कुटून, तांदूळ बनवून त्यांना जेवावे लागे. या भाताबरोबर दुसरे कांहीच नसे; मीठसुद्धा नव्हते. मग अन्नशुद्धीची गोष्टच कुठली. शिवाय आपल्या स्थितीबद्दल कोणाजवळही अवाक्षर न काढण्याच्या निश्चयामुळे त्यांना फारच त्रास भोगावा लागला.

मधून मधून एखादेवेळी त्यांच्या मनांत येई की आता आपले पुढे कसे होणार ? मूलबाळ तर नाहीच, पण आपले असे म्हणण्याजोगतेसुद्धा जगात आपले कोणी नाही; तेव्हा कसे होणार पुढे ? अशा ह्या विचारावरून रामकृष्णांनी एक दिवस दर्शन देऊन सांगितले की तूं कशाला इतकी काळजी करते आहेस ? घाबरतेस कशाला ? मी तुला इतकी मुले दिली आहेत की हळूहळू ती जेव्हा जमू लागतील, तेव्हा त्यांना नुसते होकार देता देता तुला नकोसे होईल. अशा या दारुणस्थितीत शांतपणे स्वस्थचित्त बसण्यापलीकडे त्या काय करू शकत होत्या ? त्यांची अशी ही स्थिती बाहेर कळण्यास जवळ जवळ कांही मार्ग नव्हता. त्यांचेकडे कोणाचेच जाणे येणे नसे. मधून मधून प्रसन्नमयीदेवी यांची चौकशी करण्याकरिता एक म्हातारी मोलकरीण वाडीत असत. ही म्हातारी हाच काय तो दुवा माताजी व बाहेरील जग यामधे होता. पंधरा वीस दिवसांनी एखादवेळ ती येई. आधीच बावळट व त्यांत म्हातारपणामुळे दिसणे कमी व विसराळूपणा यांची जोड. अशा स्थितीत तिच्या तोंडून काय एखादा शब्द बाहेर पडेल तेवढीच माताजींची माहिती कळायची. अशा स्थितीचे अर्धवट चित्र या म्हातारीमुळे देवी प्रसन्नमयी व मातोश्री श्यामसुंदरीदेवी यांच्या समोर उभे राहिले. या दोघींना पुढे जेव्हा जमले तेव्हा त्यांनी ही हकीकत कलकत्त्यास रामकृष्णांचा पुतण्या रामलाल याच्यापर्यंत पोहोचवली. त्याने पुढे ती रामकृष्णांचे शिष्यांना कळविली; तेव्हा गोलपमा, विवेकानंद, मास्टर महाशय वगैरे सर्वजण एके ठिकाणी जमले व माताजींची कशी काय व्यवस्था करावी याबद्दल विवेचन सुरू झाले. कांही दिवस अशा तऱ्हेने सर्व बाजूंनी आपआपसांत विचार करता असे ठरले की माताजींना कलकत्त्यास रहावयास येण्याविषयी विनंती करावी व तशी निरोपवजा विनंति माताजींना करण्यांत आली. या विनंतीने माताजी आणखी बुचकळचात पडल्या, व काय करावे याबद्दलचा त्यांचा निश्चय होईना.

आपण विधवा असून सौभाग्यचिन्हे वापरतो यामुळे सर्व गाव आधीच विरुद्ध; त्यांत कलकत्त्यास रहावयास विनंती करणारामधे नात्याचे कोणीच नाही; मग कलकत्त्यास जावयाचे कसे ? लोक काय म्हणतील ? बरेच दिवस मनांत हा विषय घोळल्यावर एक दिवस माताजींनी हा विषय प्रसन्नमयीदेवींच्यापुढे मांडला; त्यांनी लगेच निर्णय दिला की कलकत्त्यास जायला कांही हरकत नाही. त्या म्हणाल्या की या गावात रामकृष्णांची किंमत लोकांना नाही तेव्हा मग तू कोण ? रामकृष्णांचे भक्त म्हणजे तुझी मुलेच आहेत तीं. आईने मुलांचेकडे रहावयाचे नाही तर कोठे रहायाचे. लोकांना काय समजते. तू निशंकपणे कलकत्त्यास जा व आपल्या कार्याला लाग. या सल्ल्याने माताजींना बराच धीर आला. कांही दिवसांनी त्यांनी जयरामवाटीस जाऊन आपल्या आईपुढे हा विषय मांडला. प्रथम आईला बरे वाटेना; पण पुष्कळ विचार केल्यावर तिलाही पण हरकत दिसेना व कलकत्त्यास एकदा जाऊन पहावे असे तिने आपले मत शेवटी दिले. कामारपुकुरास परत येऊन, एक दिवस मनाचा पक्का निश्चय करून, वर्षभर कामारपुकुरास काढल्यावर माताजी एक दिवस कलकत्त्यास आल्या.

भक्त मंडळींना माताजींच्या येण्यामुळे आपल्या आत्मोन्नतीच्या मार्गात एक विलक्षण आधार वाटू लागला. परंतु सर्व भक्त सारखे कसे असणार ? कांहीजण माताजींना आपल्यासारखेच समजत; ते म्हणत की आम्हाला रामकृष्णांची गुरु म्हणून ओळख पटली, तरी त्यांच्या पत्नीबद्दल तितकेच किंवा तेच प्रेम आम्हास कसे वाटेल ? आम्ही जसे रामकृष्णांचे भक्त तशाच माताजी. परंतु जसजसे दिवस जाऊ लागले, गोलपमा, योगिनमा वगैरे भक्तमंडळी माताजींच्या उच्च भूमिकेचे वर्णन करू लागली. माताजींचा वाढता प्रभाव त्यांचे नजरेस येऊ लागला तसतसे माताजी म्हणजेच रामकृष्ण हे समीकरण हळूहळू त्यांना पटू लागले, व

थोड्याच दिवसांत सुरवातीस कांहींच्या मनांत आलेला विकल्प नाहींसा होऊन, सर्वजण एक दिलाने आत्मोन्नतीकरिता माताजींकडे मार्गदर्शक या नजरेने पाहू लागले; माताजींना सर्वजण गुरुस्थानी मानू लागले. सुरवातीस माताजींची व्यवस्था करण्याचे काम गोलपमा, योगिनमा वगैरे थोड्यांच्या शिरावर होते; लौकरच माताजींची कायमची ठीक व्यवस्था करण्याचा चंग सर्वांनी बांधला. माताजींची कायमची व्यवस्था करण्याचे मुख्य श्रेय शारदानंदाना मिळाले; त्यांनी तसा आटोकाट प्रयत्नच केला होता.

१८८८ ते १९०९ सालपर्यंत माताजी कधी भाड्याच्या घरात तर कधी बलराम बोस किंवा मास्टर महाशय यांच्या घरी अशा रहात असत. १९०९ साली बागबझारमधे उद्बोधन मासिकाचे कार्यालय बांधण्यात आले, तेव्हा तेथेच माताजींचे करता निराळा भाग पण बांधण्यात येऊन माताजी तेथे कायमच्या रहावयास गेल्या.

सन १८९३ मधे बलराम बसूंचेकडे माताजी असतांना, त्यांनी पंचाग्निसाधन केले. माताजी सांगत की एक १०-११ वर्षाची मुलगी माझ्या भोंवती सारखी हिंडताना दिसे; 'त्याचप्रमाणे मधून मधून एक दाढीवाला संन्याशी त्यांना दिसे. ते दोघेही मला पंचाग्निसाधन करायला सांगत. शेवटी याबाबत योगिनमाबरोबर विचारविनिमय' करून मी ते करायचे ठरविले. चार बाजूस चार झगरी पेटवून, त्यांचेमधे बसून, वरून सूर्याचा ताप अशा तऱ्हेने सात दिवस माताजींनी पंचाग्निसाधन केले. तेव्हापासून ती मुलगी व तो संन्याशी मला दिसेनासे झाले.

माताजींचा प्रभाव हळू हळू योगिनमा वगैरे जवळच्या मंडळींना दिसू लागला. माताजी एकाएकी अबोल झाल्या, त्यांच्या नजरेत शांतता दिसू लागली, चेहऱ्यावर एक विलक्षण तेज झळकू लागले. योगिनमा सांगत होत्या की बळराम बसूंच्या घरी, वर गच्चीवर बसल्या असतांना

माताजींना समाधि लागली होती. त्यावेळी त्यांच्यातून जणू तेजाचा झोत बाहेर पडत होता; त्यावेळचे त्यांचे सौंदर्य, तेज व भाव अनिर्वचनीय होते; कित्येक तासानंतर त्यांची ती समाधि उतरली. योगिन्माने या समाधि बाबत विचारल्यावरून माताजी म्हणाल्या की मीं एका फार दूरवर असलेल्या प्रदेशात होते; रामकृष्ण पण तेथे होते. माझे तेथील सौंदर्य अनुपमेय असून सर्व तेथील लोक इतक्या प्रेमाने व आदराने माझ्याशी वागत होते. मी आनंदसागरात जणू काय पोहत होते. तेथून येथे परत आल्यावर या सध्याच्या शरिरात प्रवेश करण्याची मला इच्छाच होईना. असल्या या देहात कशाला फिरून शिरावे असे मला वाटत होते. पुष्कळ वेळाने शेवटी या देहात शिरून मी ही आता देहभानावर आले आहे.

आणखी एकदां योगिन्मा सांगत होत्या की अशीच एकदां समाधि उतरल्यावर त्या मला विचारू लागल्या की माझे हातपाय कोठे आहेत ? शेवटी त्यांचे हात पाय दाबून दाबून हे पहा तुमचे हात पाय असे कित्येक-वेळा म्हटल्यावर त्या पूर्ण भानावर आल्या, व आपले हात पाय आपल्या जवळच आहेत, ते कोठे गेले नाहीत वा कोणी नेले नाहीत असे त्यांच्या ध्यानी आले.

एकदां माताजींना असे दिसले की रामकृष्ण गंगाप्रवाहात उभे राहिले असून त्यांची मूर्ति गंगेत हळूहळू विरघळून गेली. हे गंगेचे पाणी हातात घेऊन नरेंद्र (विवेकानंद) असंख्य लोकावर शिंपडून मोठ्याने म्हणत होता की रामकृष्णांचा जय असो. या दृश्यानंतर कित्येक दिवस गंगेत पाऊल घालण्याचे माताजींचे जिवावर येत असे. हे दृश्य माताजींना दिसले त्याच वेळेपासून विवेकानंदानी इंग्लंड अमेरिका वगैरे देशात जाऊन रामकृष्णांचा संदेश जगभर पसरविला; अनेक जातीचे व देशाचे लोक रामकृष्णांचे भक्त बनले.

• • •

# प्रकरण दहावे

## माहेरचा व्याप

ह्यापुढील पारिमार्थिक चरित्राचे धागे एकत्र करण्यापूर्वी माताजींचे माहेर व त्यामुळे करावा लागलेला व्याप याचा आढावा घेऊ.

कामारपुकुराहून कलकत्त्यास गेल्यानंतर त्या फिरून कामारपुकुरला जवळ जवळ गेल्याच नाहीत. कलकत्त्याहून त्या जात त्या जयरामवाटीसच जात. कामारपुकुरला कोणीच नव्हते. जयरामवाटीस त्यांची आई, भाऊ व भावांचा परिवार होता. कामारपुकुरबद्दल त्यांना स्वाभाविक आदर असे व कोणासही आपले गांव सांगण्याचा प्रसंग आला तर मी कामार-पुकुरची असेच त्या सांगत. कामारपुकुरला रामकृष्णांचे देऊळ बांधायचे वेळचा त्यांचा उत्साह अपूर्व होता. रामकृष्णांनी एकदा त्यांना सांगितले होते की कितीही कठिण प्रसंग आला तर उदरचरितार्थ भिक्षा मागावी, पण स्वत:चे घर सोडू नये; पुढे भक्त मंडळींनी तुला कितीही आदराने आपआपल्या घरी नेऊन ठेंविले तरी आपली स्वत:ची कामारपुकुरची झोपडी सोडू नको. कामारपुकुरास होणारा सर्व खर्च माताजींनी शेवट-पर्यंत चालविला.

जयरामवाटीस त्यांच्या माहेरच्या लोकापासून होणारा अमानुष त्रास त्यांचे पारमार्थिक चरित्र जास्त उज्वलतेने दाखविण्यास पार्श्वभूमी-सारखा उपयोगी पडतो. श्यामसुंदरीदेवी या मातोश्री व प्रसन्नकुमार, वरदप्रसाद, कालीकुमार व अभयचरण हे चार भाऊ. पारमार्थिक दृष्टया हे सर्व भाऊ काहीच नव्हते; ते संसारी असले तरी सांसारिक वैभव सुद्धा त्यांच्या नशिबाने त्यांना दुर्लभ होते. इतरांना परमपूज्य असलेल्या आपल्या

वहिणीची किंमत तिजकडून मिळणाऱ्या पैशाच्या हिशोबातच त्यांना वाटत असे. आई म्हातारी झालेली व भावांच्या बायका लहान असल्यामुळे सांसारिक जबाबदारी अंगावर घेण्यास अयोग्य. अशा स्थितींत त्या सर्व कुटुंबाची दळण्याकांडण्यापासूनची काळजी माताजींना पत्करावी लागली. सर्व भावांच्या लहान मुलांचे संगोपन माताजींनाच करावे लागे. गिरीश घोष (रामकृष्णांचा एक परम भक्त) म्हणत असे की हे माताजींचे भाऊ व त्यांची मुले यांचे केवढे मोठे पूर्वसंचित असले पाहिजे की माताजींनी त्यांची अशा तऱ्हेने सेवा करावी !

सन १९०६ मधे श्यामसुंदरीदेवी निवर्तल्या. ह्यानंतर भावाभावामधे फारच झगडे सुरू झाले. शेवटी माताजींनी शारदानंदांच्या मदतीने ही भांडणे थांबावी या उद्देशाने भावाभावांची वाटणी करून दिली. वाटणी-नंतर माताजींनी कलकत्त्यास कायमचे रहावे असे शारदानंदजींनी सुचविले. यावर माताजी म्हणाल्या की रामकृष्ण सांगत असत की उंदीर बिळे खोदतात व राहण्याची व्यवस्था सापाची होते; तेव्हा मधून मधून मी प्रत्येकांकडे थोडे थोडे दिवस रहात जाईन. १९१५ साली जयरामवाटीस माताजींचे करिता निराळी कुटी तयार करण्यांत आली, तोपर्यंत माताजी बहुतेक प्रसन्नकुमारकडेच जास्त रहात असत; याचे कारण म्हणजे त्याला नलिनी व माकू अशा दोन लहान मुली होत्या व यांचे संगोपन त्यांच्या आईकडून बरोबर होत नसे. वाटण्या झाल्यानंतर सुद्धा सर्व बंधू एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढण्यांत गर्क असत. प्रत्येकजण माताजीकडून किती पैसा उकळता येईल ते पहात असे. हे सर्व बंधू माताजीबरोबर कसे वागत असत हे एक दोन उदाहरणावरून जास्त ध्यानांत येईल.

एकदा माताजी कांही भक्तमंडळी बरोबर घेऊन जयरामवाटीस आल्या. जयरामवाटीस त्यांना न्यावयास एकही भाऊ आला नव्हता. हे

पाहून एकजण म्हणाला की पहा हे सर्व भाऊ माताजींना कसे वागवतात. वास्तविक माताजींना आणण्याकरिता कोणीतरी यावयास पाहिजे होते. हे ऐकून तेथे पोहोचल्यावर माताजींनी एका भावास त्यासंबंधी विचारले. त्या भावाने जबाब दिला की माझ्या मनात येण्याचे फार होते; पण काली तुला न्यायला येणार होता. त्याच्या ऐवजी मी न्यावयाला आलो असतो तर तो माझ्याशी भांडला असता. त्याच्या भीतिमुळे मी आलो नाही. नाहीतर तुला आणावयाला येऊ नये असे कसे बरे वाटेल मला ? माझे तुजवर इतके प्रेम आहे की मी नेहेमी देवाची प्रार्थना करीत असतो की तूच माझी बहीण जन्मोजन्मी असावीस. हे ऐकून माताजी म्हणाल्या की तुला असे वाटते का मी तुम्हाबरोबर फिरून जन्म घेईन ? पुष्कळ झाला आता तुमचा संबंध माझे वडील अनुपमेय रामभक्त होते व माझी माता पतिव्रता होती म्हणूनच या कुटुंबात मला जन्म घ्यावा लागला. एक दिवस माताजी चिडून जाऊन म्हणाल्या की हे सर्व माझे भाऊ पैशाखेरीज दुसरे कांही मजजवळ मागत नाहीत, यांच्यापैकी एकाच्याही मनात अजाणता सुद्धा कधी आली नाही की आपल्या बहिणीजवळ आपण ज्ञान व भक्ति मागावी.

एकदा सकाळी दहाचे सुमारास माताजी बाहेर व्हरांड्यात बसल्या होत्या इतक्यात काली व वरद हे दोन भाऊ त्यांचेकडे आले व बोलता बोलता भांडू लागले, व प्रकरण शेवटी मारामारीपर्यंत आले. माताजींनी दोघांना पुष्कळ समजविण्याचा प्रयत्न केला पण उपयोग झाला नाही. शेवटी कांहीं भक्त मंडळी मधे पडली व त्यांनी दोघांना बाजूस केले. दोघेही आपल्या घरोघरी निघून गेले व माताजी घरात गेल्या. आत जाऊन आपल्या जागेवर बसून माताजी खूप हसू लागल्या व म्हणाल्या की पहा, महामायेने केवढे हे मायाजाल उत्पन्न केले आहे ? या अफाट जगात वास्तविक कोण कोणाचा ? आपले म्हणून ज्यांना आपण समजतो त्यांना येथेच सोडून

आपणास जावे लागते हे साधेसुधे सत्य लोकांच्या ध्यानी येत नाही अं ! असे म्हणून त्या पुष्कळ वेळ हसत राहिल्या.

त्या सर्व भावंडामध्ये धाकटा अभय हुषार होता. तो डॉक्टर झाला पण लगेच तो निवर्तला. त्यावेळी त्याची वायको सुरबाला गर्भार होती. मरतेवेळी अभयने तिला माताजींच्या पदरात टाकले. ही जबाबदारी माताजींना घ्यावीच लागली. या आघाताने सुरबाला वेडी बनली. व त्या वेडामधेच एक दिवस ती बाळंत होऊन तिला मुलगी झाली (फेब्रुवारी १९००). तिचे नाव राधाराणी ठेवण्यांत आले. घरामधे तिला नेहमी राधू किंवा राधी म्हणत. जन्मापासून या मुलीचे संगोपन माताजींनाच करावे लागले, कारण सुरबाला शेवटपर्यंत वेडीच राहिली. वेडाच्या भरात राधूची आई काय करील याचा नेम नसे माताजी सांगत होत्या की कलकत्त्यास असतांना पूजेचे वेळी मला एकाएकी दिसले की राधूला केंव्हातरी थोडासा भात देण्यात येतो व तोही त्यावेळी ती अंगणात बसून मातीत कालवून खात होती. तिची आई वेडी. बाकींच्या मुलांचेकडे पहावयास त्यांच्या आया होत्या व त्या आपल्याच मुलांचे पहात; राधू आहे हे सुद्धा त्यांच्या ध्यानांत येत नसे. अशा स्थितीत राधूचे संगोपन मला जातीने करावे लागले. माताजी म्हणत की महामायेने मला मोहात फसवून या राधूची माया माझ्यामागे लावली. शेवटी शेवटी एक दिवस त्यांनी हा मायापाश आपण होऊन तोडून टाकला.

राधू व राधूची आई यांनी माताजींना फारच छळले परमार्थदृष्ट्या ही छळणूक एक शिक्षणच होते. कलकत्त्यास पूजेचे वेळी जे दृश्य त्यांना दिसले ते पाहिल्याबरोबर त्या तडक जयरामवाटीस आल्या व त्यांनी राधूचे संगोपन आपल्या अंगावर घेतले. थोड्याच दिवसात माताजींनाच राधू आपली आई समजू लागली व स्वतःच्या आईला ती नेरी-मा म्हणून

संबोधू लागली. याचा परिणाम असा झाला की वेड्या सुरबालेला माताजींचा मत्सर वाटू लागला. ती कोणाही समोर माताजींना घालून पाडून बोलू लागली, शिव्या देऊ लागली; माताजी हे सर्व शांतपणे ऐकून घेत. राधू आजारी असतांना तिला औषध देऊ लागले तर तिला वाटे की आपल्या मुलीला विष घालीत आहेत. एक दिवस अशाच कांही कारणा-वरून वेडाच्या लहरीत तिने चुलीतील जळके लाकूड हातात घेऊन ती माताजींना मारायला धावली. कांहीजणांनी हे पाहून तिला पकडून तिच्या हातातील लाकूड ओढून घेतले म्हणून बरे झाले;- नाहीतर त्या दिवशी माताजी भाजून निघाल्या असत्या. एकदा तिच्या मनाने घेतले की आपल्या नवऱ्याला या लोकांनी बुडवून मारले व तिने इतका गोंधळ केला की कांही बोलायची सोय नाही. एकदां तिने अंगावरील सर्व दागदागिने एका लोभी नातेवाईकाला दिले; माताजींनी मधे पडून मोठ्या मुष्किलीने ते परत आणवले. अशा ह्या त्रासाने माताजी जेव्हां अगदी त्रस्त होऊन जात त्यावेळी एखादे वेळेस म्हणत की पूर्वजन्मी केव्हांतरी पूजा करतांना शंकराला काट्यासह बिल्वदले वाहिली असली पाहिजेत; म्हणूनच तर या जन्मी हे काटे मला सारखे बोचत आहेत.

ही वेडी सुरबाला एका बाबतीत मात्र मोठी खूष असे; तिला वाटत असे की माताजींच्या मागून माताजींची सर्व इस्टेट आपल्या मुलीला मिळेल. कलकत्याला उब्दोधन ऑफिसची इमारत पाहिल्यावर तिला कोण आनंद झाला. माताजी दुसऱ्याला कांहीही देऊ लागल्या तर तिला फार राग येई; कारण राधूला तितकेच कमी मिळेल असे तिला वाटे. एकदा अशा या देण्याबद्दल ती माताजींना खूपच बोलली. यावर माताजी शांतपणे म्हणाल्या की हे पहा, माझा स्वभाव लहान मुलासारखा आहे. मला देण्याबद्दलचा हिशोब समजत नाही. जो माझ्याजवळ मागतो त्याला मी देते.

सुरबाला ह्या कांही एकच माताजींना बोचणारा कांटा नव्हता. तिची मुलगी राधू ही फारच मोठा असा काटा होता. राधू जशी मोठी होत गेली तशी ती मनाने व शरिराने अगदी अशक्त अशी वाढत गेली; ती स्वभावाने दुष्ट, चिडखोर, रागीट, तर्कट व अत्यंत हट्टी बनली. कितीही प्रेमाने तिच्याशी वागले तरी तिच्या स्वभावांत फरक म्हणून पडत नसे. माताजी एक दिवस चिडून म्हणाल्या की पहा मी कशी या राधूच्या पाशात फसले. या मुलीला चांगले बनवावयाचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले. गौरीदासीने पहा आपली मुलगी कशी सुंदर बनवली; नाहीतर हे पहा माझ्याकडून बनवले गेलेले माकड.

सन १९११ मधे माताजींनी राधूचे लग्न करून दिले. कित्येक महिने ती आपल्या सासरीच जाईना. ह्यामुळे तिचा नवरासुद्धा रहावयास माताजीकडेच असे. राधूसुद्धा गर्भारपणी वेडी झाली होती. त्यांत आणखी ती आजारी पडली. शेवटी कशीबशी बाळंतपणातून एकदांची ती निभावली. या प्रसंगी खर्च करता करता माताजींच्या नाकी दम आला. या आजारीपणांत राधूला आणखी अफूची संवय लागली, व हट्टीपणा मनस्वी वाढला. यामुळे खर्च अवाच्या सवा होऊ लागला. शेवटी माताजी एक दिवस राधूला म्हणाल्या की राधू आता तरी तुला थोडेसे समजायला पाहिजे; इतका हा तुझा वाढता खर्च मी कसा बरे चालवू शकेन ? यावर राधू इतकी रागावली की तिने भाजीच्या टोपलीतून सुरणासारखा एक जाड कंद घेऊन माताजींना फेकून मारला. माताजींना टेंगूळ आले व दुःखाने त्या कळवळल्या. तरीपण तशाच त्या रामकृष्णांचे फोटोसमोर उभ्या राहून हात जोडून म्हणाल्या की राधूच्या या मूर्खपणाच्या वागणुकीबद्दल तिच्यावर रागावू नका; तिला समजत नाही, ती वेडी आहे; तिला क्षमा करा. नंतर आपल्या पायाखालची धूळ उचलून त्यांनी राधूच्या कपाळाला लावली व म्हणाल्या की रामकृष्णांनी स्वशरीराला होणाऱ्या त्रासाबद्दल

एक शब्द सुद्धा उच्चारला नाही, आणि त्यांच्या या शरिराला तू इतका त्रास देतेस ? मी काय आहे हे तुला कसे समजणार ? मी तुमच्यामधे राहते म्हणून माझी किमत तुम्हाला समजत नाही.

राधूच्या आजारीपणामुळे अवास्तव वाढलेला खर्च व त्याची तोंडमिळवणी करणे शारदानंदांना फार जड जात असे; माताजींना याची पूर्ण जाणीव होती. दूरदूरचे भक्त माताजींना सांगत की कांहीही अडचण आली तर त्यांना जरूर कळवावे; ते ताबडतोब पैसे धाडण्याची व्यवस्था करतील. माताजींनी मात्र कधीच कोणाला कळविले नाही; कारण माताजींना कोणापुढेही हात पसरावयाचा नव्हता. शारदानंदजी तरतूद करीत तेवढ्यावरच त्या सर्व भागवत. एवढे लोक पैसे धाडायला तयार असतांना, त्यांच्याकडून पैसे का नाही मागवत असे एकदां राधूने विचारल्यावरून त्या म्हणाल्या की रामकृष्ण मला सांगून गेले आहेत की पैशाकरिता कधीही कोणापुढे हात पसरू नको; तुला कपडालत्ता व अन्नपाणी याबाबत कधीही कमतरता पडणार नाही; परंतु तू दुसऱ्याजवळ जर एक पैसा मागितलास व घेतलास तर त्या देणाऱ्याला स्वतःला विकून घेतली जाशील हे ध्यानात ठेव.

अशा तऱ्हेने राधू व राधूची आई यांचे संगोपन माताजी करीत होत्या. प्रसन्नकुमारच्या मुलींची जबाबदारी माताजींचे अंगावर पडली होती; थोरली मुलगी नलिनी हिचा नवरा ठीक नव्हता व धाकटी मुलगी माकू ही अत्यंत गरिब ठिकाणी पडली होती. या शिवाय अधून मधून बाकीच्या भावांचा लकडा माताजींचे मागे होताच. एकीकडे ही अशी खासगी स्थिति तर दुसरे बाजूस रामकृष्णांच्या सर्व भक्तांची पारमार्थिक जबाबदारी, त्याचप्रमाणे रामकृष्णांचा संदेश जगभर पसरावयाची जबाबदारी माताजीं-वर होती. अशा या दोन अत्यंत विरुद्ध परिस्थितीत अत्यंत प्रेमाने,

आनंदाने, निःस्पृहतेने व शांतपणे सर्वांशी वागणे हेच माताजींच्या चरित्राचे वैशिष्टच होय; रामकृष्ण भक्तांशी जितक्या प्रेमाने वागत तितक्याच प्रेमाने त्या राधू व राधूच्या आईशी वागत. ही वागणुकीतील समता हाच आपल्या तत्त्वज्ञानाचा गाभा होय, व माताजींच्या वागणुकीत प्रतिक्षणी ही समता दिसे—अर्थातच असे पहाणाऱ्यालाच ती दिसे व असे पहाणारे माताजींचे भक्त बनून स्वतःची उन्नति करून घेत, व अशांना माताजी मुक्तहस्ताने मदत करीत यांत नवल कसले ?

या परिस्थितीबाबत माताजी एकदा म्हणाल्या की पहा या राधूमधे मला रामकृष्णांनी कसे गुंतवून टाकले आहे. त्यांच्यामागे जीव कंठणे मला अगदी जिवावर आले होते; मी बेफिकिर बनून गेले होते. ध्यानधारणे-पलीकडे मला कांहीच करायचे नव्हते. आता ह्या देहाची काय जरूरी आहे असे मला वाटू लागले होते. अशा या स्थितीत एक दिवस मला १०–११ वर्षाची एक मुलगी दिसली व रामकृष्णांनी तिच्याकडे बोट दाखवून मला सांगितले की सध्या हिला धरून ठेव, पुढे पुष्कळ भक्त येतील; असे म्हणून ते अदृश्य झाले, ती मुलगी पण दिसेनाशी झाली. त्यावेळी मी स्वस्थ बसले होते, राधूची आई चिंध्या फाडीत होती, राधू तिच्यामागे रडत रडत जात होती. हे दृश्य पाहून मला वाईट वाटले व माझ्या मनात आले की आता या लहान मुलीला आधार कोणाचा ? आपणच आता या मुलीचा भार उचलला पाहिजे असे माझ्या मनात आले व मी राधूला उचलून घेतले तोच रामकृष्ण फिरून समोर आले व म्हणाले की चिकटून रहा या पोरीला; ती अदृश्य शक्तिमान् योगमाया आहे.

या राधूवरील व भावंडावरील प्रेमाबावत एकदा एका भक्ताने त्यांना विचारले तर त्या म्हणाल्या की बाबारे मी स्त्री आहे, व मुलावर प्रेम करणे आमचा धर्म आहे—स्वभाव आहे. या उत्तराने त्या भक्ताचे

समाधान झाले नाही. त्याने वेळ पाहून फिरून एकदा याबद्दल माताजींना छेडल्यावरून त्या अंगात आल्याप्रमाणे एकदम म्हणाल्या की माझ्यासारखी कोण सापडणार आहे दुसरी तुम्हाला ? परमेश्वराचे शुद्ध मनाने ध्यान-धारणा करणाऱ्या लोकांचे मन फार शुद्ध व खोल होते; ते त्याच विचारात सदैव गढून गेलेले असते. दुसऱ्यांना बाह्यतः हे लोक मायापाशात गुंतल्यासारखे दिसतात. जेव्हां वीज चमकते तेव्हां तिचे प्रतिबिंब काचेत प्रतीत होते, लाकडात नाही.

एकदा तर योगिन्मांचे मनात शंका आली की रामकृष्ण इतके निःस्पृह होते, निरिच्छ होते; जगात कशाहीबद्दल त्यांना आसक्ति म्हणून नव्हती. पण माताजी पहाव्यात तो संसारात गढून गेलेल्या दिसतात; हे कोडे उलगडत नाही. कांही दिवस हे विचार त्यांचे मनात गोंधळ घालीत होते. एक दिवस गंगाकाठी बसल्या असतांना त्यांच्यासमोर रामकृष्ण येऊन उभे राहिले व म्हणाले की पहा गंगेकडे, तुला कांही दिसते आहे काय ? त्यावेळी आपल्याच आतड्यात गुरफटलेले एक मेलेले मूल तरंगतांना दिसले. ते पाहिल्यावर रामकृष्ण त्यांना म्हणाले की गंगा कोणी अपवित्र करू शकेल काय ? माताजींना गंगेप्रमाणेच समज; याबद्दल मनात शंका आणू नको. नंतर आपल्या छातीवर हात ठेवून म्हणाले की हे व ती एकच हे पक्के ध्यानात ठेव, शंका धरू नको.

माताजी जितक्या आसक्त दिसत तितक्याच असक्त होत्या हे फार थोड्याजणांच्या ध्यानात येत असे. खालील एकदोन प्रसंगावरून हे ध्यानात येण्याजोगे आहे. राधूच्या प्रकृतिकरिता जयरामवाटीपासून सहा मैलावर असलेल्या कौलापारा आश्रमात माताजी रहात होत्या. इकडे जयरामवाटीस माकूचा मुलगा अत्यवस्थ होता व त्याच्या प्रकृतिची बातमी त्यांना रोज कळविण्यात येत असे. त्याच्याकरिता सर्व व्यवस्था माताजींनी जयराम-

वाटीस केलेली होती. शेवटी जे व्हायचे ते झालेच; एक दिवस दुपारी तो मुलगा गेल्याची बातमी येऊन पोहोचली. माताजी खूपच शोकग्रस्त झाल्या; संसारी मनुष्य काय शोक करील इतका शोक त्यांना झाला. आश्रमभर शोकपूर्ण वातावरण पसरले व कामाचा विसर सगळ्यांना पडला. सायंकाळ झाली, पण आरती करायची लोक विसरले. अशा स्थितीत माताजींनी एका क्षणात सर्व शोक बाजूस ठेवून, तयारी करून, पूजा व आरती इतक्या व्यवस्थितपणे केली की त्यांना दुःख झाले होते की नव्हते अशी प्रत्येकास शंका आली.

मधूनच एखादेवेळी माताजी सांगत की राधूला इतकी चिकटलेली मी तुम्हाला दिसते खरी; पण हे चिकटणे मी आपल्या मनाला स्वेच्छेने जबरदस्तीने लावून घेतलेले आहे. मी रामकृष्णांना प्रार्थना करीत असे की माझे मन थोडेसे राधूकडे लागू द्या, नाहीतर तिची काळजी कोण करील ? माझ्या मनात आले तर माझे मन केव्हाही मी काढून घेईन; शेवटी तसेच झाले. माताजी जायच्या आधी त्यांनी राधूला आपल्यापासून एकदम दूर केले; कोणी नातेवाईक त्यांचे जवळ आल्यास त्याला त्या आपल्याजवळून निघून जायला सांगत.

• • •

# प्रकरण अकरावे

## गुरुपदावरून कामगिरी

आता माताजींच्या पारमार्थिक कार्याकडे वळू. संसारांत अगदी गुंतून गेलेल्या माणसाप्रमाणे माताजींच्या वागण्यामुळे कित्येक वेळा योगिन्मासारखी मंडळी गोंधळून जात. एकदा अशाच काही बोलण्यावरून माताजी म्हणाल्या की परमेश्वराचे दर्शन ही माझ्या हातातली गोष्ट आहे; वाटेल त्या क्षणी ते मला घेता येते. माझ्या सदैव ध्यानात असते की हे संसारिक जंजाळ केवळ महामायेचा खेळ आहे. एखादे वेळी त्या निक्षून सांगत की तुम्ही मला नातेवाईक म्हणून समजू नका; वाटेल त्या क्षणाला मी या देहापासून एकदम अलग होऊन जाईन. माझा खरा स्वभाव व स्वरूप कोणालाही समजणे शक्य नाही.

आता त्या गुरुपदावर अधिष्ठित झाल्या होत्या. गुरु या शब्दामधे सर्वस्व भरलेले आहे. गुरु होणे हे अत्यंत त्रासाचे व कठीण आहे. शिष्यांच्या सर्व कर्मांची फळे गुरुवर येऊन पडतात. एकदा त्यांनी एखाद्याला पत्करले, दीक्षा दिली की त्याचे सर्व पाप गुरुला घ्यावे लागते. माताजी सांगत की गुरुची शक्ति मंत्राबरोबर शिष्यात उतरते व शिष्याची सर्व पापे गुरुकडे येतात; याच्यामुळेच गुरूला नानातऱ्हेचा शारीरिक त्रास होतो. शिष्य चांगला असला तर गुरुला सोपे जाते, मदत होते. कांही जणांची प्रगति झपाट्याने होते तर कांहींची फार हळू होते; प्रगति ही ज्याच्या त्याच्या मनाची ठेवण, स्थिति व पूर्वतयारी यावर अवलंबून असते. असे हे सर्व माहित असल्यामुळे स्वामी ब्रह्मानंद (श्रीयुत राखाल) दुसऱ्यास दीक्षा देण्यास कचरत असत. याबाबत माताजी

म्हणत की तो मला एकदा म्हणाला की दीक्षा देताच मनस्वी शारीरिक त्रास होतो; मंत्रोच्चार करताच मला कापरे भरते. ह्यामुळे तो कोणासही दीक्षा घेण्याकरिता मजकडे धाडीत असे. स्वामी प्रेमानंद सांगत की जे आम्हाला पचवता येत नाही ते सर्व आम्ही माताजींचेकडे धाडतो; माताजी सर्वांना आश्रय देतात, सर्वांची पापे आपल्याकडे काढून घेऊन, पचवून मोकळ्या होतात. तरीसुद्धा असे पहाण्यात येई की कांही जण पायावर डोके ठेवण्याकरिता समोर आले की माताजींचे पाय आपोआप न कळत मागे सरत. एकदा बेलूर मठात असतांना १९१६ साली दुर्गापूजोत्सवाचे वेळी असंख्य लोकांनी त्यांचे पायावर डोके ठेवले. कांही वेळाने माताजी गंगेवर जाऊन पाण्यात पाय सोडून बसल्या व सारख्या पाय धूत राहिल्या. त्यांचे बरोबर त्यावेळी योगिन्मा होत्या. किती वेळ माताजी पाय सोडून धुवत बसल्या होत्या. शेवटी योगिन्मा म्हणाल्या की माताजी कितीवेळ असे थंड पाण्यात पाय सोडून बसणार ? थंडी होईल ना ? त्यावर माताजी उत्तरल्या की योगिन् कसे सांगू तुला मी काय करते आहे ते ! अग कांही जण माझ्या पाया पडले की मला उत्साह वाटतो; पण कांही जणांच्या पाया पडण्याने माझे पाय जळू लागतात, भयंकर आग होते, जणू काय मला इंगळ्याच डसल्या आहेत. मग या गंगामाईच्या पाण्यात पाय सोडून बसल्याने मला थोडे बरे वाटते.

जयरामवाटीस असतांना एकदा बाहेर व्हरांड्यात माताजी बसल्या होत्या. इतक्यात त्यांना एक मनुष्य येताना दिसला, तो त्या लगेच उठून आत गेल्या. तो गृहस्थ विचार न करिता तसाच आत गेला व जबरदस्ती माताजींच्या पाया पडला. तो पाया पडल्याबरोबर माताजींचे पोट दुखू लागले, त्यांना मरणांतिक त्रास होऊ लागला. गंगेवर जाऊन त्या कितीतरी वेळ पाय धुवत बसल्या;

पण ती आग नाहीशी झाली नाही. माताजी म्हणत होत्या की तुमच्यापैकी कोणी त्यावेळी तेथे असते तर त्याला तुम्हाला सांगता आले असते की तू माताजींना दुरूनच नमस्कार कर.

कलकत्त्यास असतांना पर्वणीच्या दिवशी इतके लोक पाया पडण्यास येत की माताजींना त्यामुळे अत्यंत त्रास होत असे. एखादे वेळी या त्रासा-बद्दल माताजी तक्रार करीत, पण लगेच म्हणत की माझ्या त्रासाबद्दल शरदला (शारदानंद स्वामी) सांगू नका बरे, नाही तर तो लोकांचे येणेच बंद करील. माताजी म्हणत की बिचारे लोक तरी कोठे जातील ? माताजींना पाया पडण्याने त्रास होतो असे जाणणारा एक मनुष्य दर्शनास आला व पाया पडण्यास कचरू लागला; हे पाहून माताजी लगेच म्हणाल्या की बेटा कचरतोस का ? का घाबरतोस ? आम्ही एवढ्याकरिताच जन्म घेतला आहे. आम्ही जर पाप पचवणार नाही तर कोण पचवील ? पापी लोकांचा उद्धार कसा होईल ? शेवटच्या आजारात माताजी असतांना भक्त मंडळींनी ठरविले की या दुखण्यातून माताजी उठल्या की कोणासही त्यांच्या पाया म्हणून पडून द्यायचे नाही. आपली पापे पाया पडण्याने माताजींकडे जातात व त्यांना त्रास होतो व त्या अशा आजारी पडतात या अशा आपसांत ठरविलेल्या ठरावावर माताजी त्यांना हसून म्हणाल्या की बाळांनो, अरे असे काय ठरवता आहा तुम्ही; तुम्ही आणून दिलेले रसगुल्लेच खाण्याकरिता रामकृष्णांनी जन्म घेतला काय ?

एकदा जयरामवाटीस माताजी आजारी होत्या. शारदानंद बहुतेक त्यांचे बरोबर असत; त्यांनी ठरविले की माताजी बऱ्या होईपर्यंत त्यांच्या दर्शनाससुद्धा कोणास जाऊ द्यावयाचे नाही. मग पाया पडण्याची गोष्ट कशाला ? अशा स्थितींत फार दूरवरून एकजण दर्शनाकरिता

आला, व फार गयावया करून परवानगी मागू लागला, पण शारदानंद कांही केल्या ऐकेनात. हे सर्व ऐकून, इतक्या आजारी असतांनासुद्धा माताजी एकदम उसळून म्हणाल्या की माझ्याकडे येणारास शरद कोण अडवणार ? जा त्या माणसाला सांगा की तू आता जेवून आराम कर, मी उद्या त्याला दीक्षा देईन; तो गृहस्थ दीक्षा मिळाल्याशिवाय जेवायचे नाही असे ठरवून आला होता.

एकदा कलकत्त्यास आजारी असतांना एक पारशी तरुण आला व दर्शनानंतर त्याने आशिर्वाद मागितला. माताजी शेजारी असलेल्या एका भक्तास म्हणाल्या की देऊ का याला उपदेश ? त्याने उत्तर दिले की या आपल्या शारीरिक स्थितीत हे बरे नव्हे; शिवाय शारदानंद काय म्हणतील हे ऐकून माताजी त्या तरुणास म्हणाल्या की जा शारदानंदाना भेट. तो त्यांना भेटला व त्याने सर्व हकीकत सांगितली. त्यावर शारदानंद म्हणाले की बाबारे मी काय सांगू तुला ? माताजींच्या मनात एखादा पारशी शिष्य करायचे असले तर त्या करतील तसे. माताजींच्या इच्छेविरुद्ध त्यांना कांहीही सांगण्याचा उपयोग नाही. हे उत्तर ऐकून तो बिचारा परत माताजींचेकडे गेला व पहातो तो तेथे दीक्षा देण्यांची सर्व तयारी झालेली. या पारशी तरुणाच्या पारमार्थिक भवितव्यते-बद्दल माताजी मोठ्या उत्सुक दिसल्या.

एकदा माताजी एका शिष्यास म्हणाल्या की बाबारे इथे इतके जण येतात त्यापैकी कांहीजण अत्यंत दुष्ट व पापाची मूर्तीच असतात; अशा लोकांनी कोणते पाप करायचे सोडले आहे जगामधे ? पण ते सुद्धा मला आई संबोधून व समजून माझ्या पायावर डोके ठेवतात ना ! त्यांच्या योग्यतेपेक्षा कितीतरी जास्त मला त्यांना द्यावे लागते.

मातृभावामुळे त्यांनीं उपदेशिलेले कितीतरी लोक होते; त्यापैकी आत्मोन्नती करून घेणारे कितीसे असणार ? बाकीच्यांच्या पापांचे भागीदार फक्त माताजी होत असत. या लोकांचेविषयी एकदा योगिन् मा गमतीने म्हणाल्या की रामकृष्णांचा प्रत्येक शिष्य म्हणजे एक एक विभूति आहे; नाहीतर पहा माताजींची शिष्यशाखा. यावर माताजी लगेच म्हणाल्या की रामकृष्ण माणसे निवडून निवडून त्यांची परीक्षा करून मग त्यांना जवळ करीत; बाकी राहिलेला गाळ त्यांनी माझेकडे ढकलून दिला आहे; मग माझे व त्यांचे शिष्यामधे फरक न राहिला तरच नवल ! एकदा एका भक्तास त्या म्हणाल्या की बावारे उपदेशाबरोबरच मी तुला जे काय द्यायचे ते देऊन टाकले आहे. त्याचे दृश्य फळ याच देही तुला पहावयाचे असेल तर तुला स्वतःला मेहेनतच केली पाहिजे; नाहीतर अंतकाळी तुला काय ते कळेलच.

कांही जणांना वाटे की माताजींनी इतक्यांना दीक्षा देऊ नये; अशा मतवाल्यापैकी एकाने एक दिवस माताजींना म्हटले की आपण इतक्या लोकावर अनुग्रह करता की हे सर्वजण आपल्या ध्यानात तरी राहतात की नाही कुणास ठाऊक ! गुरूने प्रत्येक शिष्याच्या पारमार्थिक उन्नतीकडे लक्ष द्यायला पाहिजे, मग जितक्या थोडयांना उपदेश देता येईल तितका बरा नाही का ? यावर माताजी म्हणाल्या की बाळ, रामकृष्णांनी असे मला सांगितले नाही. त्यांनी मला आजपर्यंत नानातऱ्हेच्या सूचना दिल्या त्या या विषयी पण दिल्या असत्या. अरे, उपदेश दिल्यावर त्या शिष्याची सर्व जबाबदारी मी रामकृष्णांचेवर टाकते. मी त्यांना रोज प्रार्थना करते मी अमक्या अमक्यांना आज उपदेश दिला आहे, ते यापुढे कोठेही असले तरी त्यांना सांभाळा. अरे बाळ, मी जे जे मंत्र देते ते ते सर्व रामकृष्णांनीच मला दिले आहेत; यापैकी प्रत्येक मंत्र पूर्णत्व देणारा आहे.

आपल्यावर कसली याची जबाबदारी, रामकृष्ण आपले पाहून घेतील, अशा प्रकारची भाषा जरी त्या बोलत असल्या तरी त्यांची दृष्टि आपल्या सर्व शिष्यांच्या हिताकडे असे. रोज त्या पुष्कळ वेळ जप करीत असत. शेवटच्या आजारात सुद्धा, ज्यावेळी त्या बसू शकत नव्हत्या त्यावेळी त्या स्थितीतसुद्धा त्यांचा जप करणे चालूच असे. रात्री अपरात्री केव्हाही उठून पाहिले तरी माताजी जप करतांना दिसत. त्या जवळ जवळ झोप घेतच नसत. याविषयी एकदा माताजींना एकाने विचारले की आपण विश्रांति, झोप का नाही घेत? यावर माताजी म्हणाल्या की बाळ, झोप येणार कशी मला? इतक्यांना उपदेश देण्याचा प्रसंग येतो, इतकेजण दीक्षा घेऊन जातात, पण नियमाने थोडे फार कांही तरी करणारे किती असतात त्यांच्यामधे? कांही जण तर दीक्षा मिळाल्यावर कांही सुद्धा करीत नाहीत. पण मजवर जबाबदारी आली आहे ना? त्यांच्याऐवजी मलाच कांहीतरी करावे लागते. मी रामकृष्णांना प्रार्थना करीत असते की हे सर्वेशा, या सर्वांना आतून जागृति द्या, त्यांना मोक्षमार्गावर लावा; या जगात जवळ जवळ सगळेच दु:खाने पिडलेले आहेत; त्यांना पुन्हा संसारात पडण्याचा प्रसंग न यावा.

एकदा दुर्गापूजोत्सवाचे वेळी एकाने सुंदर गुलाबी कमळ आणून त्यांच्या पायावर वाहिले. त्यांनी त्याला विचारले की अरे, असली कमळे आणखी नाही का मिळत? त्याने हो उत्तर दिल्यावर त्या म्हणाल्या की जा तर लवकर, व असली पुष्कळशी कमळे घेऊन ये, व राखाल, तारक, शरद, योगिन् गोलप वगैरे प्रत्येकाचे नावाने एक एक कमळ लौकर वाहा. तसे त्याने केल्यावर त्या रामकृष्णांचेकडे (त्यांचे फोटोकडे) पुष्कळ वेळ तटस्थ होऊन पहात राहिल्या, व बऱ्याच वेळाने हात जोडून म्हणाल्या की इथून ह्यापुढे या सर्वांचे कल्याण होवो.

या सर्वांचा अर्थ असा नव्हे की त्या जो येईल त्याला दीक्षा देत; कित्येक असे होते की त्यांना दीक्षा माताजीकडून मिळाली नाही. एकदा जयरामवाटीस माताजी आजारी असतांना त्यांचेकडे एकजण उपदेश घेण्याच्या हेतूने आला. माताजी आजारी असल्याने त्याला तसेच परतावे लागले. पुढें आपल्या गावी परत गेल्यावर त्याने माताजींना पत्र लिहिले की मी इतका खर्च करून उपदेश घेण्याकरिता आपल्याकडे आलों; पण मला तसेच परतावे लागले. तरी आपण मला केव्हा दीक्षा देणार आहा ते कळवावे म्हणजे मीं परत येईन; नाहीतर प्रत्येकवेळी इतका खर्च करणे मला परवडत नाही. दीक्षा मात्र आपण मला दिलीच पाहिजे; मला नाकारू नये. हे पत्र ऐकून माताजी म्हणाल्या की मी आजारी असते तेव्हा लोकांना परतच जावे लागेल. मी बरे झाल्यावर लोकांना आमंत्रण द्यायला बसलेले नाही. दीक्षा मिळणे न मिळणे हे ज्याच्या त्याच्या पूर्वकर्मांवर अवलंबून आहे. इतका खर्च व त्रास घेऊन येतो, पण माझी गाठ पडत नाही, हे त्याचे दुर्दैव; मी त्याला काय करणार ? तुम्ही लोक म्हणाल की गरिबांना इतका खर्च कसा परवडेल ? अरे, ज्याची श्रद्धा असेल तो भीक मागत मागत येईल; दहा वेळा परतवला तरी फिरून येईल. तत्त्व हे असे आहे की ज्याला संसारबंधने तोडण्याची उत्कट इच्छा असते तो तीं तोडणारच; त्याला कोणीही थांबवू शकत नाही. खर्चाची सबब, वेळाची सबब, त्रासाची सबब या नुसत्या सबबी आहेत; अशा सबबी सांगणाऱ्याला खरोखरीच इच्छाच नसते.

आपण सर्वांची आई आहो ही त्यांची वृत्ति त्यांच्या रोमरोमात भिनलेली होती. कित्येकांना आपल्या जन्मदात्या आईचे दर्शन त्यांच्यामधें होत असे. आपल्या जन्मदात्या आईपेक्षा जास्त प्रेम असलेल्याचा अनुभव माताजींचे कडून पुष्कळांना मिळत असे. आई जशी मुलगा केव्हाही

आला तरी त्याला खायला प्यायला घालते, त्याच्याकरिता वाट पहाते, त्याचे कपडे धुते, त्याची काळजी घेते, त्यापेक्षा कितीतरी जास्त काळजी माताजी स्वत: प्रत्येकाची घेत. स्वत:चे काम माताजींना करतांना पाहाणे कांहीना आवडत नसे, व ते स्वत: कांही तरी करण्याचा प्रयत्न करीत; माताजी झटकन् त्याला विचारीत की का, मी तुझी आई नाही का ? आईचे हे काम नाही का ? कलकत्त्यास असतांना बैठकीत एखाद्याच्या मुलाने घाण केली तर माताजी ती जागा स्वत: साफ करीत, मग त्या मुलाची आई कांहीही म्हणो.

जयरामवाटीस असतांना कांही वेळी मोठी विचित्र परिस्थिती होई. एखाद्याला सकाळी चहा प्यावयाची सवय असली तर चहा करता दूध मिळविण्याकरिता माताजी भांडे घेऊन घरोघरी दूध मागण्याकरिता जात. अमुक एकजण अमक्या दिवशी येणार आहे असे कळले तर त्याच्या आवडीचे पदार्थ त्या तयार ठेवीत. रात्री अपरात्री केव्हांही कोणी त्यांचेकडे जावो, त्याला त्या खायला घालत. कलकत्त्यास स्वयंपाकघराचा चार्ज गोलपमाकडे असे, व अवेळी येणाऱ्या लोकांचा त्यांना राग येत असे; त्या माताजींना म्हणत की तुम्हाकडे आई आई म्हणत कोणी आले की त्याला खायला घालायच्या भानगडीत किंचित विचार न करता तुम्ही पडता ! जयरामवाटीस असतांना कोणी मिठाई वगैरे पदार्थ धाडले तर प्रथम त्यापैकी कांही भाग प्रत्येक देवळात पोहोचवून बाकीचा भाग सर्व मंडळीत वाटून देत ; स्वत: त्यांतील किंचित् सुद्धा भाग घेत नसत. आई या नात्याने वाटून देणे हेच काय ते त्यांना जणू समजत असे.

एकदा एक भक्त शेजारच्या खेड्यावर कामाकरिता सकाळी उठून गेला ; दुपारी ऊन खाली झाल्यावर तो परत आला व पहातो

तो माताजी वाट पहात बसलेल्या. त्यावर तो म्हणाला की माताजी आपण जेऊन घ्यायला पाहिजे होते. त्यावर माताजी म्हणाल्या की पण तू येणार होतास ना; मग तू जेवल्याशिवाय मी कशी जेवू ? जन्मदात्री माता सुद्धा क्वचितच अशा तऱ्हेने वागतांना दिसते.

जो कोणी जयरामवाटीस येईल त्यास त्या दोन तीन दिवस ठेवून घेत. कित्येकवेळी दहा बाराजण एका वेळी येत. या सर्वांचा परामर्श घेणे त्यांच्या त्या परिस्थितीत किती कठीण जात असेल याची कल्पनाच करावी. असल्या या खेडेगावांत मसालेदार पदार्थ व मिठाई या आपल्या मुलांना खायला घालता येत नाही याबद्दल माताजींना वाईट वाटत असे; तरीसुद्धा निरनिराळे साठवणीचे पुष्कळ पदार्थ त्या जवळ बाळगून असत. हे लोक परत जायला निघत त्यावेळी त्यांना निरोप देताना माताजींना अगदी भरून येत असे; जणू काय स्वत:चे मूलच आपल्याला सोडून जात आहे; दारात उभे राहून, पाऊस पडत असला तरी सुद्धा, लोक दिसेनासे होईपर्यंत त्या पहात असत कलकत्त्यालासुद्धा हाच त्यांचा क्रम असे. अशा या वागणुकीने प्रत्येकाला त्या आपली आईच आहे असे वाटत असे.

कलकत्त्यास तर कित्येक वेळा दर्शनाकरिता रीघ लागलेली असे; त्याला कंटाळून त्या जयरामवाटीस जात तेथेही अशीच स्थिति होत असे. थोडक्यात त्यांना विश्रांति म्हणून मिळत नसे. पुष्कळजण व्यावहारिक अडचणी त्यांचेपुढे मांडत असत. कोणी पैसा मागे, कोणी मुलेबाळे मागत; त्यांच्या त्यांच्या मानाने त्यांना त्यांना माताजी आशिर्वाद देत व त्यांचे काम बनून जाई. परंतु कांहीजण अगदी त्रासदायक, व्यवहारशून्य असे असत व माताजींना त्यामुळे फार त्रास होत असे. एकदा एकजण आला; त्याला पाहाताच माताजी अंग लपेटून घेऊन आपल्या पलंगावर बसल्या. हेतू हा की त्याने हे पाहून परत जावे; परंतु

तो आला तो त्याने बरोबर आणलेली फुले त्यांच्या पायावर वाहिली व त्यांच्यासमोर आसनमांडी घालून बसला. व श्वास निरोधाचे निरनिराळे प्रकार करू लागला. थोड्या वेळातच गोलपमा तेथे आल्या; त्यांच्या ध्यानांत ती परिस्थिती चटकन् आली व त्या त्या गृहस्थावर रागावून म्हणाल्या की तू काय लाकडाच्या मूर्तिसमोर बसला आहेस ? तुझ्या या प्राणायामाने त्या मूर्तीस चेतना आणण्याचा प्रयत्न करीत आहेस का काय ? तुला समजत नाही का की माताजींना किती उष्मा होत आहे ? असे गोलपमाने म्हटल्यावर त्या गृहस्थाच्या लक्षात चूक येऊन तो तेथून उठून गेला.

एकदा एकाने येऊन त्यांच्या पायावर इतक्या जोराने डोके आपटले की माताजी कळवळल्या व त्यांनी किंकाळी फोडली. शेजारच्या माणसाने याचे कारण विचारले असता तो म्हणाला की अशाने माझी पक्की आठवण माताजींना राहील.

गुरुपदावर असतांना माता म्हणून त्या कशा वागत हे आपण पाहिले; आता त्यांची उपदेशपद्धति व भक्तांचे मार्गदर्शनाकडे वळू

कोणासही उपदेश देतांना प्रथम माताजी त्यांच्या कुलांतील देवांची माहिती, नंतर त्याच्या स्वतःची वृत्ति कोणत्या देवाकडे ओढ घेते हे पहात. नंतर त्याचे शिक्षण व विचार कसकसे होत गेले, त्या काळपर्यंत त्याने काय काय व कसकसे केले वगैरे सर्व माहिती विचारीत. पूर्वी कोठून जप वगैरे मिळाला होता काय ? असला तर कोणाकडून, कोणत्या स्थितीत, देणारा कोण व कसा काय होता, देणाऱ्यावर त्यांची श्रद्धा कितपत होती व आहे वगैरे पहात. मग स्वतः विचार करीत. पुढे त्याचे पूर्व व उत्तर चरित्र डोळ्यासमोर आणीत; त्याची कितपत तयारी आहे हे पहात. मग रामकृष्णांना प्रार्थना करून विचारीत की यास कशाची दीक्षा द्यावी.

माताजी सांगत की येणारा शुद्ध मनाचा असला तर अमुक एक मंत्र त्यास द्यावा असे त्यांना स्फुरे, नाहीतर बराच वेळ ध्यान केल्यावर त्यांना मंत्राचे स्फुरण होत असे. असे अंत:स्फुरण झाल्याशिवाय त्या कधीही उपदेश देत नसत. इतका हा विचार केल्याशिवाय त्या दीक्षा देत नसत हे निरनिराळ्या लोकांचे अनुभव पाहिल्यावरच समजून येई. याची कांही उदाहरणे नमूद करणे अप्रस्तुत होणार नाही.

एकदा एकाला दीक्षा दिली. प्रचलित पद्धतीप्रमाणे त्याने त्यानंतर माताजींचे पुढे कांही फुले, फळे व गुरुदक्षिणा म्हणून एक रुपया ठेवला. तो रुपया परत त्याला देऊन त्या म्हणाल्या की संन्याशाजवळून दक्षिणा घेत नसतात. तो म्हणाला की मी विद्यार्थी आहे व गृहस्थाश्रमांतच असतो; पण माताजी ऐकेनात. तीन चार वेळा त्याने तसे सांगितले पण त्याचा उपयोग झाला नाही; माताजी एकच उत्तर देत राहिल्या की संन्याशा-जवळून दक्षिणा घेत नसतात. थोड्याच वर्षात हा रामकृष्ण मिशनमध्ये सामील होऊन त्याने संन्यास घेतला.

एकजण एका विविक्षित मंत्राचा जप करीत असे व त्याच्या मनाला शांतता वाटत असे. पुढे तो रामकृष्णमिशनमध्ये आला. नंतर त्याने माताजींना दीक्षेकरिता प्रार्थना केली. माताजींनी त्याला दुसऱ्याच एका मंत्राची दीक्षा दिली. या मंत्राच्या जपाने पहिल्यासारखे त्याच्या मनाला समाधान वाटेना. एक दिवस तो माताजींना याविषयी बोलला. त्यावर माताजींनी त्याला उत्तर दिले की मला माहीत आहे सर्व तुझी स्थिती, परंतु मी दिलेला मंत्र व विधान पहिल्यापेक्षा जास्त चांगले आहे. हे माताजींचे तोंडातून ऐकल्यापासून त्याच्या वृत्तीत एकदम फरक पडला; त्याच्या मनांत येणारा विकल्प नाहीसा झाला. तो पुढे सांगत असे की आपला खरा फायदा कशात आहे ते आपले गुरूच जाणतात; सरळ मार्गाला गुरूच आपल्याला लावतात व त्यानेच लौकर आपणास मन:शांतता मिळते.

याच शिष्याने आपला एक सांगितलेला अनुभव नमूद करण्यासारखा आहे. रामकृष्णांच्या निधनानंतर त्याला फारच विचित्र वाटू लागले; तो एका दूरवरच्या आश्रमात जाऊन राहिला की जेथे लोकांचा संपर्क नव्हता. तेथे तो सतत ध्यानधारणादि करू लागला. वर्ष दीडवर्ष त्याने असे केल्यावर एकाएकी त्याचा उत्साह नाहीसा झाला; त्याच्या ध्यानात कांही येईनासे झाले; त्याला विचित्र असे सर्वत्र शून्यत्व वाटू लागले. त्याने ध्यानधारणा सोडून दिली व तो पारमार्थिक पुस्तकांचा अभ्यास करू लागला; याने त्याला कांहीच फायदा वाटेना. त्याची शारीरिक व मानसिक स्थिती ढासळत चालली. शेवटी तो बेलूर मठात परत आला. तेथे त्याला औषधोपचार सुरू करण्यांत आला. यापासून फायदा तर नाहीच झाला, शारीरिक स्थिती उलट जास्त खालावली. बरेच दिवस असे गेल्यावर त्याचे मनांत येऊ लागले की आपले कोठेतरी चुकते आहे; आपण माताजींना भेटावे व याबद्दल विचारावे. शेवटी एक दिवस तशाच खालवत चाललेल्या स्थितीत तो जयरामवाटीस गेला व त्याने माताजींसमोर सर्व हकिकत सांगितली. ती ऐकून माताजी हदरून गेल्या व म्हणाल्या की बाळ, उच्च अवस्थेत करायच्या गोष्टी अवेळी केल्याने तुझी ही स्थिति झाली आहे. नंतर माताजींनी त्याला ध्यान धारणेच्या सोप्या युक्त्या सांगितल्या व त्याप्रमाणे तो करू लागल्यावर थोडक्याच दिवसात तो पूर्णपणे सुधारला. निरनिराळ्या पारमार्थिक मार्गाची पूर्ण माहिती, त्यातील येणाऱ्या निरनिराळ्या अडचणी तसेच या अडचणीत न सापडण्याच्या युक्त्या व सांपडलेच तर त्यातून सुटण्याच्या सर्व युक्त्या माताजींना पूर्णपणे माहीत होत्या हे या उदाहरणावरून ध्यानात येते. या जगात पारमार्थिक मार्गात जितका मनुष्य उच्च स्थितीत असतो तितकेच त्याची स्थिति साधारण माणसाला समजणे कठीण असते. परमपदावर अधिष्ठित असलेला महाशय एकतर वेड्यासारखे नाहीतर लहानमुलासारखे वागत असल्याने आपल्या

सारख्या साधारण माणसाना त्यांच्या उच्च स्थितीची जाणीव किंचित्सुद्धा उत्पन्न होत नाही.

माताजी कोणावरही श्रीरामकृष्णांचे ध्येय लादीत नसत; परंतु रामकृष्णांना न मानणाऱ्या इसमाला मात्र त्या कधीच कांही सांगत नसत. एकदा एक मनुष्य माताजींकडे आला. रामकृष्ण कोणीतरी साधुपुरुष होऊन गेले; त्यांची बायको जिवंत आहे; तिलाही थोडेफार कांहीतरी समजत असलेच पाहिजे; या समजुतीने तो माताजींकडे आला होता. त्यास पाहून माताजींनी ओळखले की रामकृष्ण हे अवतारी पुरुष होते हे न समजणारा हा मनुष्य आहे हे पाहून त्या योगिन्माला म्हणाल्या की हा गृहस्थ रामकृष्णांना मानत नाही, मग काय करू? यावर त्या माताजींना म्हणाल्या, तो जरी रामकृष्णांना ओळखत नसला तरी दीक्षा द्यायला काय हरकत आहे? तुम्ही दिलेली दीक्षा वाया थोडीच जाणार आहे? त्या माणसाला माताजींनी दीक्षा दिली व लौकरच तो रामकृष्णांचा भक्त बनला.

केवळ इच्छामात्रेकरून माताजी भक्तांच्या वाईट सवयी घालवू शकत असत. एकाचे दारुचे व्यसन त्यांनी असे थांबविले होते. एकदा एक मुलगी त्यांच्या एका भक्तास वाईट मार्गास लावण्याचा प्रयत्न करीत होती, माताजींनी त्या मुलीचे मन एकदम बदलून टाकले. एका भक्ताची बायको त्याच्या अगदी विरुद्ध वागत असे; तिचे मन माताजींनी असेच बदलून टाकून आपल्या भक्ताला त्रासातून वाचविले. अशा गोष्टी अर्थातच त्या फार थोड्या वेळा करीत व थोड्या लोकांनाच त्या समजत असत. माताजींना याबद्दल कोणी विचारले तर त्या सांगत की रामकृष्ण अशा गोष्टी नेहमी करीत असत; पण असे करायची परवानगी मला नाही. माझे काम फार वेळ टिकणारे असे आहे. माताजी सांगत असत की

दुर्जनावर मेहेरबानगी करून त्यांना उच्च स्थिति लौकर मिळवून देण्याच्या श्रमामुळेच रामकृष्णांना लौकर देह सोडावा लागला.

मातार्जींचे चित्रसुद्धा ज्यांनी कधी पाहिले नाही अशा कित्येकांना माताजी स्वप्नात देवीस्वरुपाने दिसत. कित्येकांना स्वप्नामधेच माताजी मंत्रदीक्षा देत व पुढे हेच लोक माताजीकडे आले असता त्याच मंत्राची दीक्षा त्यांना मिळालेली पाहून त्यांना आश्चर्य वाटत असे. कित्येकांना स्वप्नात किंवा जागेपणी दृष्टांत देऊन त्यांना मोठमोठ्या भानगडीतून माताजी सोडवीत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे श्री. गिरीश घोष यांचे आहे. गिरीश हे रामकृष्णांचे परमभक्त होते; परंतु सुरवाती सुरवातीस ते माताजींना मानीत नसत. एकदा इतर मित्रांच्याबरोबर सहज म्हणून जयरामवाटीस माताजींकडे गिरीश आले; माताजींना पहाण्याचा गिरीशांचा हाच पहिला प्रसंग. माताजींना नमस्कार करून त्यांना पाहिल्याबरोबर गिरीशबाबू चमकले व एकदम गंभीर होऊन, अगदी एका बाजूस गुपचुप बसले. बराच वेळ झाल्यावर शेवटी स्वामी निरंजनानंद त्यांचेजवळ गेले व विचारू लागले की तुम्ही असे गंभीर होऊन एकाबाजूस असे इतका वेळ का बसला आहा ? तुम्हाला कांही होते आहे का ? त्यावर गिरीश म्हणाले की माझ्या १९ व्या वर्षी या माताजी माझ्या स्वप्नात आल्या होत्या का याचा विचार करतो आहे. मी वयाच्या १९ व्या वर्षी अत्यवस्थ होतो व माझी आशा डॉक्टर लोकांना नव्हती. त्या रात्री स्वप्नात मला आकाश ज्योतिर्मय झालेले दिसले व त्यातून देवीप्रमाणे रूप असलेली स्त्री मजकडे येतांना मी पाहिली. या काळी मी पक्का निरीश्वरवादी होतो. ती स्त्री म्हणा देवी म्हणा मजजवळ येऊन मला म्हणाली की बाळ, तुला अतित्रास होतो आहे ना ? असे म्हणून तिने माझ्या तोंडामधे कांही तरी घातले व ती दिसेनाशी झाली. त्या क्षणापासून माझ्यात फरक पडू लागला व लौकरच मी ठीक झालो. तेव्हापासून पुष्कळ वेळा माझ्या मनात विचार येतो की ही बाई

कोण ? माझ्या लहानपणी वारलेली माझी आई तर नव्हे ना ही ? परंतु आज या माताजींकडे प्रथमच बघतो तो त्या स्त्रीचा व यांचा चेहरा एकच दिसतो; याच तर नव्हत्या त्यावेळी माझ्या स्वप्नात आल्या ? यावर निरंजनानंद म्हणाले की मी माताजींनाच विचारतो की. असे म्हणून त्यांनी माताजींना सर्व हकीकत सांगून प्रश्न केल्यावर माताजींनी हसून उत्तर दिले की मीच ती. या दिवसापासून गिरीश माताजींचे निस्सीम भक्त झाले हे काय सांगायला पाहिजे ? गिरीश बाबू म्हणत असत की त्या दिवशी स्वामी निरंजनानंदांनी माझी आई मला सापडवून दिली.

अशा या दृश्याविषयी माताजी सांगत असत की बाबांनो परमार्थात पडलेल्याला ही अशी दृश्ये, अनुभवास येत असतात; नाही तर परमार्थात पडल्यावर आणखी काय व्हावयाचे असते माणसाला ? काय शिंग फुटायची थोडीच असतात ? या मार्गात जसजसे मन शुद्ध होत जाते तसतसे त्याला अशी दृश्ये दिसू लागतात, ज्ञान प्राप्त होते व प्रभा दिसू लागते.

माताजी दीक्षा देत तीं वेळ काळ पाहून, सकाळी पूजा आटोपल्यावर, पद्धतशीरपणे देत असत. परंतु हे सर्व त्यांच्या लहरीवर अवलंबून असे. नाही तर वाटेल तेथे त्या उपदेश देत. एकदा एकाला स्टेशनवर गाडीची वाट पहात बसले असता, पाऊस पडत असतांना, छत्रीखाली बसून त्यांनी दीक्षा दिली व छत्रीच्या काडचावरून पडत असलेल्या पाण्याचा तदर्थ त्यांनी उपयोग केला. तसेच एकदा सुतक असतांना त्यांनी दीक्षा दिली; या विषयी कोणी प्रश्न विचारल्यावरून त्या म्हणाल्या की मग त्यात काय झाले ? आत्म्याचा व देहाचा संबंधच कुठे आहे ? शिवाय मरणाने काय होते व व्हायचे असते ?

दीक्षाविधि त्या २-३ मिनिटात संपवीत. याच कामाला शारदानंदांना अर्धा तास लागत असे; असा हा तुम्हाला वेळ का लागतो असे एकाने

त्यांना विचारल्यावरून ते म्हणाले की बाबारे माताजींची गोष्टच निराळी; त्यांनी नुसते मनात आणले की रामकृष्ण सर्व जबाबदारी घेतात; पण मला प्रथम ध्यान वगैरे करून प्रार्थना करावी लागते म्हणजे मग कुठे दीक्षार्थ मला अनुज्ञा मिळते.

रामकृष्णमठात सामील होणाऱ्यास माताजी ब्रम्हचर्य, त्याग व संन्यास याची दीक्षा देत, व मग त्यास शास्त्रीय विधि करवून घेण्याकरिता स्वामी ब्रम्हानंदांकडे धाडून देत. या संन्याशी भक्ताबरोबर माताजी मोठ्या कडकपणाने वागत असत. याच्या उलट संसारी भक्तास त्या प्रेमाने वागवत व त्यांना सांगत की अरे, ह्या भगव्या वस्त्रात काय ठेवले आहे ? तुम्हाला संसारात राहूनच आत्मानुभव येईल. बाबारे, या भगव्या वस्त्रांनी मोठा अभिमान उत्पन्न होतो. शुभ्र वस्त्र अंगावर व आतमधे त्याग, असे वागले की झाले. लग्न झालेले असले म्हणून काय आत्मदर्शन होत नाही काय ? आपल्या मनावर सर्व अवलंबून आहे. मन परमेश्वराकडे लावून व्यवस्थितपणे संसार करण्यांतच भूषण आहे. अरे, रामकृष्णांनी नाही का माझ्याशी लग्न केले ? बाळ, आत राहून बाहेर राहणे यातच खरे पौरुष आहे, यातच खरे यश आहे, यातच खरा आनंद आहे. सर्व सोडून देऊन, संन्यास घेऊन आत्मदर्शन मिळविण्यांत काय मोठेसे तो संन्याशी मिळवितो ? संसाराला भिऊन पळून जाऊन आत्मदर्शन मिळविणे यात फुशारकी मारण्याजोगे काय आहे ?

अशा या उद्गारामुळे संसारी भक्तांना वाटत असे की माताजींना संन्याशी भक्तापेक्षा संसारी भक्तच जास्त आवडतात. यामुळे कांहीवेळा संसारीजण संन्याशांशी जरा तोऱ्यानेच वागत; एखादा तर एखाद्या संन्याशी भक्ताशी भांडत असे. माताजींनी असे जर पाहिले तर त्या संसारी भक्तास एकदम म्हणत की कसा मूर्ख आहेस तू; संन्याशाबरोबर

भांडतोस ? संन्यास घेणे काय थट्टा समजतोस तू ? सर्व त्याग करणे फार कठीण काम आहे. संन्याशाने कोणाहीबद्दल एक शब्द उच्चारला तर त्याचा परिणाम त्याला भोगावा लागतोना. अशा तऱ्हेने संन्याशाविरुद्ध कोणी संसारी बोलल्यास माताजी ताडकन् त्याची खरड काढीत. एकदा नलिनी नावाची माताजींची एक भाची एका खोलीतून दुसऱ्या खोलीत जात असतांना तिच्या पदराचे टोक तेथे बसलेल्या एका संन्याशी भक्ताच्या अंगाला लागलेले माताजींनी पाहिले; त्याबरोबर तिला थांबवून त्या म्हणाल्या की किती अपमान केलास तू याचा; तुझ्या पदराचे टोक त्याच्या अंगाला लागले म्हणजे काय ? पड त्याच्या पाया व त्याच्या पायाची धूळ कपाळाला लाव. एकदा एका स्त्रीभक्ताचे एका संन्याशी भक्ताशी भांडण व बोलचाल झाली; ती इतकी रागावली आणि म्हणाली की एकतर हा येथे राहील नाहीतर मी राहीन; ही स्त्री मोठी काम करणारी होती परंतु हे ऐकताच माताजी म्हणाल्या की संन्याशी भक्ताबरोबर ती भांडून असे म्हणाली काय ? तिला सांगा की संसारी तो संसारी व संन्याशी तो संन्याशी ती एक यःकश्चित् संसारी स्त्री आहे. सर्वसंगपरित्याग करून, संन्याशी बनून हा येथे राहिला तो माझेकरिता; तिला वाटत असल्यास तिने खुशाल येथून निघून जावे. माताजी म्हणत की हे सर्व संगपरित्याग केलेले संन्याशी जर माझे भोवती नसते तर मी कशी जगू शकले असते !

एकदा एक तरुण मनुष्य माताजींकडे आला व संन्यासदीक्षा मागू लागला. माताजीनी त्याला पुष्कळ छेडले, उडवाउडवीची उत्तरे दिली. त्याला संसारात रहाण्यास सांगितले. तो वारंवार माताजींना भेटून तेच तेच माताजींना म्हणू लागला. असा पुष्कळ दिवस त्याचा ध्यास पाहून माताजी खूष होऊन त्याला म्हणाल्या की अरे या संसारात काय ठेवले आहे ? लोकांना संसाराबद्दल इतके प्रेम का वाटते हेच समजत नाही. संसारात मन हजार ठिकाणी वेधावे लागते; अशा माणसाला परमेश्वर-प्राप्ति होणार कशी ? खेडकीण आपली पिल्ले कपारीत ठेवून अन्न

मिळविण्याकरिता बाहेर पडते, पण लगेच परत फिरून, वळून त्या पिल्लाकडे पहाते. असे हे संसारचित्र आहे. या संसारातून पाय बाहेर काढणे फारच कठीण काम आहे. अशा ह्या गोष्टी केल्यानंतर थोडक्या दिवसांनी त्याला संन्यासदीक्षा माताजींनी दिली.

संसार व संन्यास या दोहोबाबत माताजी समतेनेच वागत. दोन्ही मार्गातले दोष त्या त्या भक्तांना दाखवून, त्यावर टीका करून, त्यापासून काळजीने अलिप्त रहाण्याचा उपदेश माताजी देत. दोघांनाही माताजी सांगत की बाबांनो या सर्वांत मुख्य तत्व एकच व ते म्हणजे त्याग होय. त्यागवृत्ति सारखी वाढविली पाहिजे; मग मनुष्याने कसेही रहावयास हरकत नाही. ममता व अहंकार या पासून दूर रहाण्याचा प्रयत्न जो करितो. तो कोणीही असो, संन्यासी असो की संसारी असो, त्याला परमपद प्राप्त झालेच पाहिजे.

पुरुषांनाच काय पण मुलींना, बायकांनासुद्धा त्या असाच उपदेश करीत. अर्थातच जिची जशी तयारी असेल, दिसेल, तसे तितकेच तिला सांगत. कोणास लग्न करून संसार करण्यास सांगत तर कोणास संन्यास मार्गाचा अवलंब करायला सांगत. संसारीभक्तांना सांगत की जगात सर्वत्र प्रत्येक गोष्टीस दोन बाजू असतात. दोन बाजू एकत्रित केल्याविना परमपद कसे प्राप्त होईल ? जसे आपल्याला दोन हात, दोन डोळे तसेच जगात स्त्रीतत्त्व व पुरुषतत्त्व. ही दोन्ही तत्त्वे मिळूनच परमपद बनते. सर्वांत शेवटी त्या निर्वाणीने सांगत की बाबांनो सर्व कांही आपल्या मनावर अवलंबून आहे. लग्न करण्यांत भिण्यासारखे काय आहे ? रामकृष्णांनी नाही का माझ्याशी लग्न केले ?

त्याचबरोबर संसारी भक्तास त्या निक्षून सांगत की बाबांनो संन्याशाबरोबर अति आदराने, अदबीने, भक्तिनेच वागले पाहिजे व त्याप्रमाणे त्या संसारी भक्ताकडून वर्तन करवित. त्या म्हणत की बाबांनो त्यागापुढे मान तुकवलीच पाहिजे.

# प्रकरण बारावे

## स्वभाव

माताजी मध्यम उंचीच्या व सुदृढ बांध्याचा होत्या. मध्यमवयात त्यांचे अंग थोडेसे सुटलेले होते; पण पुढे उतारवयात त्या फिरून अंगाने सडपातळ झाल्या होत्या. यावेळी भक्तमंडळी त्यांचेकडे येऊ लागली असल्याने त्यांच्या तारुण्यांत फारच थोडयांनी त्यांना पाहिले होते. रामकृष्णांनी देह ठेवल्यानंतर कामारपुकुरहून त्या प्रथम जेव्हा कलकत्त्यास आल्या त्यावेळी स्वामी प्रेमानंदांचे आईने त्यांना पाहिले होते. त्यावेळचे माताजींचे लावण्य पाहून त्या थक्क झाल्या होत्या. राधूची आई सुरबाला सांगत असे की राधूच्या जन्मापूर्वी माताजी सदैव आपल्या तंद्रीत असत; त्यावेळी त्यांच्या भोवती प्रभा फाकत असे, त्यांच्या सर्वांगातून तेज ओसंडत असे. पुढे राधूचा लकडा लागल्यावर त्यांचे हे वरचे रूप कमी झाले. पुढे उतारवय व मलेरियाचा ताप यांनी माताजींची तब्बेत उतरून गेली. व ह्याच वयात त्यांचे भोवती भक्तांचा गराडा पडू लागला. ह्यावेळी त्यांचा चेहेरा काळवंडून गेलेला होता; तरीपण त्यांच्या चेहेऱ्यावरचे ते कारुण्य, प्रेम, आनंद, पावित्र्य, सरळपणा, मृदुता, आर्तता, गांभीर्य, शांतता वगैरे सर्व भावांचे संमिश्रणाने उत्पन्न झालेला मोहकपणा व नाजुकपणा मात्र तसाच कायम होता. यावेळपर्यंत त्यांनी आपले बाह्यरूप सर्व आवरून घेतले होते, पचवून टाकले होते; त्यामुळे ही बाई कांही विशेष आहे, निराळी आहे हे नीट पाहिल्याशिवाय चटकन् कधीच समजत नसे. ह्यामुळे कित्येकवेळा मोठे मजेदार प्रसंग उद्भवत.

एकदा तीर्थयात्रेवर असतांना बनारसमध्ये माताजी गोलपमा वगैरे मंडळी दुपारी बसली असतांना एक मारवाडीण बाई दर्शनाकरिता आली.

माताजींचे जवळ गोलपमा बसल्या होत्या; या काळी माताजींपेक्षा गोलपमा जास्त चांगल्या दिसत. ती मारवाडीण आली ती गोलपमांचे पाया पडायला गेली, तेव्हा गोलपमांनी तिला माताजीकडे बोट दाखविले; तशी ती माताजींचे पाया पडायला लागली, तो माताजींनी गोलपमाकडे बोट दाखविले. ती परत गोलपमांकडे वळली तो त्यांनी माताजींकडे परत बोट दाखविले; असे हे चार पांच वेळा झाले तेव्हा गोलपमा चिडल्या व त्या मारवाडीण बाईला म्हणाल्या की बाई, तुला एवढे सुद्धा समजत नाही का ? साधारण माणूस व सत्पुरुष यांच्या चेहेऱ्यातील फरक इतका वेळ पाहूनसुद्धा तुला उमगला नाही का ? या बोलण्याने ती बाई चमकून गेली व ती माताजींकडे बघू लागली व मग तिच्या लक्षात गोलपमांचे म्हणणे येऊन ती माताजींचे पाया पडली. नीट लक्ष देऊन पाहिल्याशिवाय माताजी या कांहीतरी निराळ्या आहेत असे ध्यानांत येत नसे.

माताजींच्या चेहऱ्यावरील मातृभाव इतका स्पष्ट दिसत असे की कोणीही त्यांचेकडे गेले तर त्याला माताजी आपली आईच आहे असे वाटत असे. त्याचबरोबर त्यांच्या चेहऱ्यावर गांभीर्य व शांतता अशी असे की त्यांच्यासमोर पुष्कळसे बोलायचे ठरवून गेलेल्याच्या तोंडातून शब्द फुटत नसे; मग कोणीही जाऊन कांहीतरी वायफळ बोलायचा प्रश्नच कुठला ? एखादा अत्यंत दुष्ट व नीच मनुष्य त्यांचे पुढे गेला तर तो सुद्धा एकदम नमत असे. त्याचप्रमाणे प्रत्येकाला एक विचित्र प्रकारचा मोकळेपणा त्यांचे समोर वाटत असे. एकदा एक अत्यंत दुष्ट मनुष्य माताजींना भेटायला आला; माताजींकडे जायला कोणालाही मज्जाव नसे. तेथील मंडळींनी त्याला ओळखला व त्यांनी माताजींना त्याचे चरित्र वर्णन करून त्यास भेट न देण्यास सुचविले. यावर माताजी म्हणाल्या की मग तो मला भेटला तर त्यात काय बिघडेल ? आपला मुलगा चिखलाने भरलेला असला म्हणून काय आई त्याला टाकून देते ? अर्थातच त्या माणसाला माताजींनी

भेटण्याची परवानगी दिली. एकदा एका मुलीने अगदी वाईट कृत्य केल्यावर तिला पश्चात्ताप वाटून ती माताजींना भेटायला आली व त्यांच्या पाया पडली. माताजींनी तिला लगेच धीर देऊन सांगितले की बाळ, घाबरू नको; जे झाले ते झाले; यापुढे अयोग्य कर्म तुझ्या हातून कधीच व्हावयाचे नाही.

आईला सर्व मुले सारखी असतात या तत्त्वाप्रमाणे माताजींना दुसऱ्याचे दोष दिसतच नसत. त्यांच्यासमोर जर कोणी एखादा अयोग्य कर्म करू लागला तर तिकडे त्यांचे लक्षच जात नसे. कलकत्त्यास असतांना एकदा मोलकरणीने काम बरोबर केले नाही म्हणून गोलपमा तिजवर रागावून तिला बोलत होत्या. हे ऐकून माताजींनी सहज गोलपमांना विचारले की काय झाले ? यावर गोलपमा म्हणाल्या की काय झाले हे तुम्हाला सांगून उपयोग काय ? तुम्हाला कधी कोणी चूक करते असे वाटतच नाही ना. यावर माताजी शांतपणे म्हणाल्या की गोलपमा, दुसऱ्यांचे दोष पहाणाऱ्यांची संख्या या जगात कांही कमी नाही ; मग मी एकटी असे करीत नसले तर त्याने हे जग कांही डुबणार नाही !

जयरामवाटीस भवानीची आई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बाईला कोणीही नव्हते. ती म्हातारी होती व बिचारी अगदी खंगून गेली होती. या बाईची मरेपर्यंत माताजींनी काळजी वाहिली. तसेच तेथील बॅनर्जी कुलातील एका बाईला तोंडाचे कॅन्सर झाले होते; त्याची इतकी घाण येत असे की तिच्याजवळ कोणीही उभे रहात नसे, मग तिची सेवा शुश्रुषा कोण करणार ? तिची व्यवस्था माताजींनी जातीने करून पुढे कौलापारा आश्रमात तिची राहाण्याची व्यवस्था केली. रामकृष्ण मिशनकडून होत असलेली दुष्काळ व पूर आलेल्या ठिकाणांच्या कामामधे माताजी उत्साहाने भाग घेत. दुसऱ्याला होणारे दुःख पाहून त्यांचे हृदय पिळवटून निघत असे.

एकदा एक मोलकरीण भाजीपाला घेऊन रात्री जयरामवाटीस पोहोचली. रात्र पडल्यामुळे तिला माताजींनी ठेवून घेतले. रात्री तिला थंडी वाजून खूप ताप भरला व ओकाऱ्या सुरू झाल्या. खोलीत जिकडे तिकडे घाण झाली. माताजी रात्री मधेच उठून तिच्या खोलीत झालेली घाण पाहून, ती काढून साफसफाई केली; त्यांना वाटले की दुसरे कोणी हे पाहिले तर ते त्या बिचारीवर रागावतील.

एकदा एका भक्ताने माताजींना मध्यरात्री उठून आपला बिस्तरा दुसरीकडे उचलून नेतांना पाहिले. काय झाले असेल हे जरी त्याला समजले नाही, तरी त्याने लगेच पुढे होऊन जेथे माताजींनी बिस्तरा नेला होता तेथे जाऊन, पलंग टाकून, सर्व व्यवस्था करून, तो पहिल्या खोलीत येऊन विचार करू लागला की माताजी येथून मधेच उठून का गेल्या ? मग पाहतो तो त्या खोलीत असंख्य ढेकूण होते व त्यांच्या त्रासामुळे त्या उठून गेल्या. पुढे त्यांनी काय व्यवस्था करायची ती केली हे खरे; पण त्याला आश्चर्य हे वाटले की माताजी याबद्दल कोणाजवळ एक शब्दही बोलल्या नव्हत्या. दुसऱ्याला स्वतःकरिता कसा त्रास द्यावयाचा हा त्यांचा मुद्दा.

जयरामवाटीस कांही मुसलमान रेशमाचे किडे पाळीत. हा त्यांचा धंदा बंद पडल्यामुळे चरितार्थाकरिता शेवटी ते लोक चोऱ्या करू लागले व लोकांना फार त्रास होऊ लागला. ह्या मुसलमानापैकी एकजण एक दिवस माताजींकडे केळी घेऊन आला व ती स्वीकारण्याकरिता त्याने माताजींना प्रार्थना केली. माताजींनी ती मोठ्या आनदाने स्वीकारली. शेजारी असलेली भक्त मंडळी म्हणाली की माताजी हे सर्व चोर लोक असून लोकांना फार त्रास देतात; त्यांच्याकडून तुम्ही केळी कशी स्वीकारलीत ? माताजी शांतपणे म्हणाल्या की चांगले कोण व वाईट कोण

हे मला समजते. या लोकांपैकीच एक अजमद नावाचा मनुष्य माताजीकडे एकदा जेवायला राहिला. बाहेरच्या व्हरांड्यात तो जेवावयास बसला. माताजींची भाची त्याला तेथे वाढीत होती म्हणजे त्याच्या पानांत लांबून पदार्थ फेकत होती, कारण तो मुसलमान होता ना. हे पाहून माताजी म्हणाल्या की तुझ्या पानांत मी असे फेकून पदार्थ वाढले तर चालतील का तुला ? थांब मीच वाढते त्याला. पुढे त्याचे जेवण झाल्यावर त्याचे उष्टे काढून टाकून, त्याची भांडी पण माताजींनी घासली. हे पाहून ती भाची म्हणाली की आत्या काय करते आहेस तू ? हे पाहिले तर लोक तुला वाळीत टाकतीलना ? माताजी यावर तिला दरडावून म्हणाल्या की चुप बैस; जसा माझा शरद तसाच हा अजमद.

एकदा एका दुर्गापूजोत्सवप्रसंगी माताजींनी एका भक्तास आपल्या भाचीकरिता कांही कापड आणावयाला सांगितले. तो स्वदेशीचा भोक्ता असल्याने त्याने जे कापड आणले ते त्या मुलींना सफाईदार नसल्याने पसंत पडले नाही. यावर माताजींनी त्याला बोलावून भाचींना कसे कापड पाहिजे ते सांगितले. ते ऐकून घेतल्यावर तो माताजींना म्हणाला की आपण जे कापड सांगता आहा ते परदेशी आहे, स्वदेशी नाही. यावर माताजी म्हणाल्या की त्यात बिघडले कुठे ? विलायतची माणसे तरी माझीच मुले आहेत ना ? हे कसे तुझ्या ध्यानांत आले नाही ? मी काय अमुक एका जातीच्या लोकांची आई आहे असे तू समजतोस काय ? यानंतर माताजींनी त्या भक्ताला कधीही कापड आणण्यास सांगितले नाही. कोणत्याही चांगल्या तत्त्वास धक्का बसू नये अशी माताजी नेहमी काळजी घेत असत. स्वामी विवेकानंदांनी अमेरिकेत दौरा केला त्यावेळी तेथील कित्येक अमेरिकन लोक विवेकानंदांची प्रवचने ऐकून स्वतःला रामकृष्णांचे शिष्य मानून घेऊ लागले; पुढे या लोकांपैकी सिस्टर निवेदिता, मिसेस ओलवुल, सिस्टर क्रिश्चिन, सिस्टर देवमाता

इत्यादि हिंदुस्थानात आल्या व माताजींच्या पाया पडल्या. माताजी या लोकाबरोबर जेवणखाण करीत असत. माताजींना जातपात, आप परका असा भेद वाटतच नसे; त्या आपल्याकडे येणाऱ्यांच्या मनांतील शुद्ध भावाकडेच पहात असत.

त्यावेळी स्वदेशीची चळवळ फार जोरात उसळली होती व त्यावर सरकारने शस्त्र उगारले होते. एकदा या चळवळीत भाग घेणाऱ्या दोन गर्भार्शी स्त्रिया पोलिसांनी पकडल्या व पोलिस स्टेशनपर्यंत या बायांची पायी वरात त्यांनी काढली; हे ऐकून माताजींना फार चीड आली. त्यावेळी व्हिक्टोरिया राणी राज्य करीत असून तिजबद्दल सर्वत्र अत्त्यादर होता, तसाच माताजींना पण आदर वाटत असे. वरील पोलिसी कारवाई पाहून माताजी म्हणाल्या की व्हिक्टोरिया राणीचे राज्यात असा छळ व्हावा हे बरोबर नाही. सरकार असे वागत असेल तर सरकारला या पापाचे फळ भोगावे लागेल माताजी म्हणाल्या की त्या बायांची अशी वरात काढली त्यावेळी भोवतालची मंडळी काय करीत होती ? पुरुष काय करीत होते ? पुढे जेव्हा त्या बायांना सोडून दिलेले त्यांनी ऐकले तेव्हा त्यांना खूप आनंद झाला. स्वदेशीबद्दल माताजींना मोठे प्रेम वाटत असे. त्या म्हणत की हे चळवळवाले नुसती बडबड करण्याऐवजी स्वतः कपडा बनवून वापरतील व दुसऱ्यास देतील तर कितीतरी बरे होईल. याकाळी स्वतः सूत कातून कपडा विणण्याची तयारी माताजींनी दाखविली.

साहेब लोक होते म्हणून त्यांच्याबरोबरच काय ते खाणेपिणे माताजींनी केले असा आक्षेप माताजींवर कोणालाही घेता येत नसे. कित्येक-वेळा अस्पृश्य लोकांनी शिजविलेल्या अन्नाचा नैवेद्य माताजी दाखवीत. अस्पृश्यांना जेवायला वाढून त्यांचे उष्टे खरकटे माताजी स्वतः करीत,

त्यांना करावे लागे; कारण बाकी घरातील स्त्रीपुरुष जात्यंध होते. एकदा एका अस्पृश्याने घरांतील वस्तूस नुसता हात लावला; त्यावर त्यांची भाची खूप रागावली. हे पाहून माताजी पुढे येऊन त्या बिचाऱ्याची शांतपणे समजूत घालून त्याला म्हणाल्या की वाईट वाटून घेऊ नकोस; तुझे कांही चुकले नाही. असे म्हणून त्यास मिठाई घेण्याकरिता त्यांनी पैसे दिले. त्या काळात ब्राम्हणाच्या बाईने असे वागणे काय असेल याची नुसती कल्पनाच करावी लागेल. आज लोकांच्या दृष्टीत कितीतरी फरक झालेला आहे. त्यावेळी अस्पृश्यांच्या सावलीनेसुद्धा विटाळ होत असे. असो, या सर्वांचा अर्थ असा नव्हे की त्या जातपात पाळीत नसत. एकीकडे कित्येक वेळा अस्पृश्यांना त्या अशा वागवत तर कित्येक वेळी त्या इतक्या कडक सोवळ्याने वागत की कडक सोवळे करणारा सनातनीसुद्धा थक्क होऊन जाई. या सर्व गोष्टी बाबत माताजी भक्तांना सांगत असत की बाबांनो परमेश्वराचा सम असा मातृभाव दाखविण्याचे काम रामकृष्णांनी मजवर सोपविले आहे. एकदा एक संन्याशी भक्त त्यांना म्हणाला की तुम्हाला पाहिल्यावर लोक देवाकडे ढुंकूनसुद्धा पहाणार नाहीत; त्यावर त्या लगेच म्हणाल्या की, का नाही ? सर्व देवता माझीच तर रूपे आहेत.

रामकृष्ण गेल्यानंतर सुद्धा रामकृष्णांचे सतत सान्निध्याचा अनुभव माताजींना होता. (ह्याची कांही उदाहरणे मागे आलीच आहेत.) यामुळे पूजासामुग्रीच्या शुद्धतेबद्दल माताजी फार काळजी घेत. त्या पूजा करू लागल्या म्हणजे रामकृष्णांचे फोटोत सुद्धा पहाणाराला जिवंत भाव वाटत असे नैवेद्य दाखवतांना त्या म्हणत की यायचं आता, जेवायला बसायचं. कित्येक वेळा त्या म्हणत की आता जेवण जरा लौकर आटपायला हवं बरं; मला अमक्या देवाच्या दर्शनाला जायचे आहे ना ! रामकृष्णांनी नैवेद्य ग्रहण केल्याशिवाय त्या जेवीत नसत. त्या सांगत की एकतर रामकृष्ण स्वतः नैवेद्य घेत, नाही तर त्यांच्यातून एक ज्योत निघून ती

अन्नाला शिवून परत त्यांच्यात लुप्त होत असे. भोवतालच्या लोकांना यापैकी अर्थातच कांही दिसत नसे.

याचा एक विचित्र अनुभव कलकत्त्यास असतांना पहावयास मिळाला. एका रामकृष्णांचे भक्ताने त्यांना घरी बोलावले. हा मनुष्य फारच अशुद्ध म्हणून प्रसिद्ध होता. माताजी त्याकडे गेल्या व योग्यवेळी रामकृष्णांना त्यांनी नैवेद्य दाखविला. कितीतरी वेळ गेला पण रामकृष्ण नैवेद्य ग्रहण करीनात. कितीतरी वेळ फिरफिरून काकुळतीने माताजींनी प्रार्थना केल्यावर रामकृष्णांनी नैवेद्यास स्पर्श केला. यामुळे त्या दिवशी माताजी जेवल्या नाहीत. मोठ्या मुष्किलीने पुष्कळ भक्तांनी आग्रह केल्यावर त्या थोडेसे दूध घ्यायला कबूल झाल्या.

एकदा प्रवासात असतांना मडक्यात भात शिजविण्याचा प्रसंग आला. चुलीवरून मडके उतरतांना ते फुटले व सर्व भात जमिनीवर मातीत पडला. सर्वांना काळजी पडली की आता नैवेद्य कसा दाखविणार; पण माताजींनी पुढे होऊन, वरचा वरचा भात चटकन उचलून घेतला व नैवेद्य दाखविला. माताजी त्यावेळी नैवेद्य दाखवितांना म्हणाल्या की आज किनई ह्याच्यातच समाधान मानून घ्यावं, व त्यांच्या सांगण्यावरून रामकृष्णांनी पण नैवेद्य स्वीकारला.

उद्बोधन ऑफिसमधे रामकृष्णांची रोज पूजा होत असे; रामकृष्णांच्या फोटोस रोज हार घालण्यात येई व फुलांची आरास करण्यांत येई. एक दिवस पूजा वगैरे आटोपून माताजी तेथे दुपारी निजल्या असतांना मधेच एकदम चमकून उठल्या. त्यांना दिसले की रामकृष्ण बिछान्यावरून उठून एकदम जमिनीवर येऊन बसले. त्या लगेच रामकृष्णांचे फोटोजवळ गेल्या व पहातात तो फोटोवर आरास केलेल्या फुलांना मुंग्या आल्या होत्या. माताजींच्या लगेच ध्यानांत आले की या मुंग्या चावल्यामुळे रामकृष्ण

उठून जमिनीवर येऊन बसले. त्या दिवशी त्यांनी सक्त हुकूम सोडला की आजपासून ही सर्व आरास बंद करा; रामकृष्णांना मुंग्या चावतात.

कोणीही भक्त म्हणून त्यांचेकडे आला तर माताजी त्याच्याबद्दल रामकृष्णांना सांगत. कोणाच्या हातून चूक झाली तर त्याला क्षमा करण्या-बद्दल त्या रामकृष्णाना विनवीत. थोडक्यात, रामकृष्ण हेच सर्वथैव असून आपण केवळ निमित्तमात्र आहो असा त्यांचा भाव नेहेमी असे; त्यांनी आपले स्वत्व रामकृष्णांच्यामध्ये विरून टाकलेले होते.

याच्या उलट त्या जेव्हा उच्च भूमिकेवर असत त्यावेळी त्यांचा भाव साक्षात् महालक्ष्मीप्रमाणे असे. त्यावेळी भक्तांना अभय देणे, आपत्तीतून सोडविणे वगैरे प्रकारची मदत त्या मुक्तहस्ताने आपल्या भक्तांना देत. मागाहून जर कोणी म्हणाले की आताच आपण असे असे म्हणाला तर त्या लगेच तो विषय बदलीत किंवा म्हणत की छे छे कांही तरीच तुमची समजूत झालेली दिसते, व अशा तऱ्हेने सर्वावर पांघरूण घालीत व आपण कोणी नव्हे असे दाखविण्याचा यत्न करीत. त्यांना कोणी देवी वगैरे म्हटलेले खपत नसे; त्या नेहेमी सांगत की मी एक रामकृष्णांच्या चरणाची दासी आहे. रामकृष्ण आपल्या भक्तांना गमतीने माताजींचे वर्णन करून सांगत की जसे मांजर राखेत लोळून आपले खरे स्वरूप दुसऱ्यास समजू देत नाही तशाच ह्या तुमच्या माताजी बरे; जरा सांभाळूनच रहात जा बरे.

जगदृष्टीने माताजी जरी शिकलेल्या नव्हत्या तरी घरची उपजत संस्कृति, रामकृष्णांची शिकवण व सान्निध्य, प्रवास, वारंवार निरनिराळ्या लोकांशी येणारा संबंध, पारमार्थिक अंतिमपद प्राप्ति, व्यापकत्वाचा अनुभव या सर्वामुळे आधीच तीक्ष्ण व खोल असलेली त्यांची बुद्धि अधिक व्यापक,

93(8.5.1991

खोल व तीक्ष्ण झाली असल्यास नवल कसले ? सिस्टर निवेदिता सारखी बाई माताजींची परधर्माची तत्त्वे एका क्षणात अजमावण्याची हातोटी पाहून थक्क होत असे पौर्वात्य संगीत माताजींना आवडले व समजले तर त्यात विशेष असे नाही; पण पुढे गौरकायांचा संबंध आल्यानंतर पाश्चात्य संगीताची धाटणी, लकब व आवड त्यांना झाली हे खरेच आश्चर्य होय. सर्व बऱ्या वाईट प्रसंगी, संपत्ति विपत्तीत, आरोग्यात, आजारात, मरेपर्यंत आपण एकत्र व एक असेच राहू असे ख्रिस्ती लोकांच्या लग्नविधीत उच्चारले जाणारे वाक्य ऐकून माताजींना किती आनंद वाटला; त्या लगेच म्हणाल्या की केवढे हे धार्मिक सत्य, किती पवित्र शब्द !

माताजींचा चाणाक्षपणा कौतुकायोग्य होता. एकदा लक्ष्मीनारायण नावाचा मारवाडी रामकृष्णांनी पैसे घेण्याचे नाकारल्याबरोबर माताजींकडे येऊन पैसे स्वीकारण्याबद्दल धरणे धरून बसला, त्यास त्यांनी एका क्षणाचा विलंब न लावता वाटेला लावला. एकदा एका महोत्सवप्रसंगी रामकृष्णांचे बरोबर तो उत्सव पहाण्याकरिता जाण्याची इच्छा माताजींनी दर्शविली. रामकृष्णांनी माताजींना निरोप धाडला की तुमच्या मनात यायचे असल्यास हरकत कसली ? यावर माताजींनी न जाण्याचे ठरविले; भोवतालची भक्त मंडळी याने जरा खट्टूच झाली. परंतु ही भक्तमंडळी तेथे जाऊन तेथील वातावरण पाहिल्यावर म्हणू लागली की माताजी आल्या नाहीत हेच बरे झाले.

रामकृष्ण मिशन मार्फत चाललेल्या मोफत दवाखान्यात श्रीमंत लोक येऊन मोफत औषध घेऊन जातात अशी एक तक्रार माताजींकडे करण्यांत आली. यावर माताजी म्हणाल्या की बाबारे, या प्रदेशात सर्व गरीब लोकच तर आहेत; मोफत दवाखाना आहे, गरिबाकरिता आहे असे जाणून सुद्धा जर कोणी मोफत औषध घ्यायला आला व आपल्याला औषध

पुरविणे शक्य असले तर त्यालाही द्यावे; अरे, जो भीक मागतो तो भिकारीच नव्हे काय ?

कौलापारा आश्रमाच्या अध्यक्षाने माताजींकडे एकदा तक्रार केली की आश्रमातील त्यांच्या हाताखाली काम करणारे त्यांचे ऐकेनासे झाले आहेत; आणि त्याचे कारण म्हणजे एक तर ते स्वत: विचार करायला लागले असून शिवाय ते जेव्हा आपल्याकडे किंवा शारदानंदजींकडे येतात तेव्हा त्यांच्या खाण्यापिण्याची थाटात व्यवस्था करण्यांत येते. त्याने मग माताजींना प्रार्थना केली की पुढचे वेळी फिरून ते जेव्हा आपणाकडे येतील तेव्हा त्यांना नीट समज द्यावी. हे ऐकून माताजी त्याला लगेच म्हणाल्या की किती मूर्खासारखे बोलतो आहेस तू ? अरे आपल्या या आश्रमामध्ये मूलतत्त्व प्रेम आहे. प्रेमामुळेच रामकृष्णांचे हे वाढते कुटुंब एकसंधी आहे. शिवाय सर्वांची मी आई आहे ना ? मी त्या लोकांची काळजी घेते, त्यांना खायला घालते ह्याबद्दल माझ्याकडे तू तक्रार करतो आहेस ? अरे या माझ्या मुलांची सुरवातीची स्थिति काय होती; दारोदार भिक्षा मागावी, निवाऱ्याला जागा नाही अशा स्थितीत त्यांनी सर्वसंगपरित्याग करून संन्यास घेतला. मला त्यावेळी इतके वाईट वाटत असे व मी रामकृष्णांना प्रार्थना करीत असे की देवा तुम्ही मानव अवतार घेऊन भक्ताबरोबर राहिला; आता काय आपण देह सोडल्याबरोबर सर्व संपले काय ? मग आपण एवढ्या त्यागमार्गाचे अवलंबन केलेच कशाला ? करतल भिक्षा तरुतलवास असणारे पूर्णत्वास पोहोचलेले असे कितीतरी बनारस सारख्या ठिकाणी पडले आहेत की ? ज्या या माझ्या मुलांनी तुमच्याकरिता सर्वस्वावर पाणी सोडले त्यांना दोन घास अन्नाकरिता वणवण हिंडायला लागावे हे आता माझ्याच्याने पहावत नाही. जगदोद्धाराकरिता ना आपण जन्म घेतला ? या माझ्या मुलांनी एके ठिकाणी राहून आपला संदेश जगभर पसरवून असंख्य लोकांच्या उद्धाराचे काम त्यांचेकडून करवले गेले

पाहिजे ना ? माझ्या या मुलांना भटकतांना पहाणे मला नाही सहन होत. बाबारे, ही माझी प्रार्थना त्यांनी ऐकली व त्याचेच फळ म्हणजे हा रामकृष्णमिशनचा पसारा होय.

मातार्जीचे धैर्य चिकाटी व समयसूचकता वाखाणण्याजोगतीच होती. जयरामवाटीहून येतांना चोरांशी गाठ पडली असतांना त्या कशा वागल्या हे आपण पाहिलेच आहे. एकदा गिरीष घोष माताजींकडे संन्यास घेण्याच्या उद्देशाने आला. माताजींनी त्याला संन्यास नको म्हणून सांगितले. गिरीश हा प्रभावी व लाघवी वक्ता असून, विरुद्ध बाजूच्या माणसावर आपली छाप पाडून त्यास आपल्या बाजूस वळविण्यांत त्याचा हात खंडा होता; आपल्या संभाषण शक्तीची जाणीव त्याला होती. माताजीने नकार दिल्यावर त्याने माताजींना आपल्या बाजूला वळविण्याचा निश्चय करून त्यांच्याशी तो आपल्या लाघवी पद्धतीने बोलू लागला. अर्धा तास त्याने आपली पराकाष्ठा केली. शेवटी हे सर्व ऐकून झाल्यावर माताजी हसून म्हणाल्या की नाही, तू संन्यास घेऊ नको. गिरीशबाबू हतबुद्ध होऊन परतले.

स्वामी विवेकानंद काश्मीरमध्ये प्रचारकार्य करीत होते. एके ठिकाणी एक प्रसिद्ध मुसलमान फकीर आपल्या शिष्यासह रहात असे. हा शिष्य विवेकानंदांची भाषणे ऐकून त्यांचे बाजूस वळला. त्याचा फकीर गुरु यामुळे खूप रागावला व विवेकानंद हे याचे मुख्य कारण जाणून त्याने विवेकानंदांचे वर चेटूक केले व त्याचा परिणाम त्यांना भोगावा लागला. यामुळे विवेकानंदांना फार चीड आली. ते मनाशी म्हणू लागले की रामकृष्णांचे कार्य करीत असतांना रामकृष्णांनी माझा बचाव का नाही केला ? पुढे विवेकानंद काश्मीरहून परत आल्यावर त्यांनी माताजींकडे याबद्दल तक्रार केली व माझा बचाव का नाही केला गेला असा सवाल माताजींना त्यांनी टाकला. त्यावर माताजी शांतपणे हसून म्हणाल्या की बाळ, अरे, शंकरा-

चार्यांना सुद्धा अशा तऱ्हेचे पुष्कळ त्रास सहन करावे लागले ना ? शिवाय कोणतेही कर्म झाले की त्याचे फळ उत्पन्न होणारच व ते भोगावेच लागते. आता या चेटकाचा परिणाम रामकृष्णांच्या शरिरावर झाला काय किंवा तुझ्या शरीरावर झाला काय ते सारखेच नाही काय ? तुझ्या हे ध्यानांत यायला पाहिजे की रामकृष्ण कशाचाही नाश करण्याकरिता आले नव्हते, तर पूर्णता करण्यास आले होते; सर्व प्रकारच्या ज्ञानाबद्दल त्यांना आदर होता; शकुनावर सुद्धा ते विश्वास दाखवीत असत.

जयरामवाटीस असतांना माताजी एकदा शेजारच्या घरी जाऊन आपल्या घरी परत येत होत्या; हरीश नावाचा एक वेडा (बायको मेल्या-नंतर हा वेडा झाला होता.) त्यांच्या मागे होता. माताजी जशा आपल्या आवारात शिरल्या तसा तो वेडा हरीश एकदम माताजींचे मागे धावला. हे पाहून माताजी घाबरल्या व घरात शिरण्याकरिता धावू लागल्या; परंतु हरीश पुढे झाल्याने त्यांना आत शिरता येईना व म्हणून त्या गोठ्याकडे धावल्या. हरीश इतक्या जोराने त्यांचे मागे लागला की त्यांना गोठ्यात सुद्धा शिरायला मिळाले नाही. माताजी पुढे व हरीश मागे असे धावू लागले व त्यात माताजींनी गोठ्यांस पाच सहा प्रदक्षिणा घातल्या. त्या थकून गेल्या व त्यांना धावता येईना. माताजी सांगत होत्या की मी इतकी थकले की मला धावता येईना व काय करावे हे समजेना. एकाएकी माझी मला ओळख आली, मी उलटी फिरले, हरीशच्या मुस्कुटात मारून त्यास खाली पाडले, त्याच्या छातीवर बसले, एका हाताने त्याची जीभ ओढून धरली व दुसऱ्या हाताने फाडफाड त्याच्या थोबाडीत मारू लागले; शेवटी त्याला श्वास घेणे मुश्कील झाले. हे माताजींच्या रौद्ररूपाचे उदाहरण होय.

रामकृष्णांचे बहुतेक सर्व भक्त चांगले शिकलेले, जाणते, कार्यकर्ते असे होते तरीमुद्धा कोणतेही काम सुरू करायच्या आधी ते माताजींना

विचारून, त्यांचा सल्ला व आज्ञा घेऊन मग ते सुरू करीत असत. कित्येक रोजच्या रोज हजारो लोक दर्शनार्थ माताजींची थुंकी झेलावयाला तयार असत. स्वामी विवेकानंदांनी माताजींची परवानगी घेतल्यावरच अमेरिकेचा दौरा काढला होता स्वामी प्रेमानंद माताजींच्या तोंडून निघणारा प्रत्येक शब्द आज्ञा म्हणूनच मानीत असत. स्वामी ब्रह्मानंदांना तर माताजींचे पुढे उभे राहावयाचे म्हणजे कापरे भरत असे.

रामकृष्णांचे भक्त असे वागले तर त्यात नवल नाही वाटणार; परंतु दुसऱ्या पंथाचे लोक माताजींपुढे तसेच वागत असत. उदाहरणार्थ दण्डी प्रकारचे संन्याशी आपल्या गुरुकुलाखेरीज कोठेही न नमणारे असतात; मग एखाद्या स्त्री पुढे ते कसे नमणार ? परंतु एकदा उत्तर हिंदुस्थानातून एक दण्डी संन्याशी माताजींचे दर्शन घेण्याकरिता आला होता; हा संन्याशी मोठा शिकलेला व वेदांती होता. माताजींचे समोर आल्यावर तो आता नमस्कार करील म्हणून माताजींना संकोच वाटला; संन्याशाने नमस्कार करून कसे चालेल ? व तसे माताजींनी त्याला सुचवलेही पण. परंतु ते न ऐकता तो माताजींच्या पाया पडला व सप्तशतीतली स्तुती म्हणून त्याने त्यांचेजवळ आशिर्वाद मागितला. माताजींनी शेजारच्या माणसास आंब्रे आणून संन्याशास देण्यास सांगितले. त्याला इकडे तिकडे मिळून तीन आंबे सापडले व ते त्यांनी संन्याशाला दिले. हे पाहून माताजींनी आणखी आंबे शोधण्यास सांगितले. बरेच शोधल्यानंतर एक सुंदर पिकलेला मोठा आंबा सापडला. माताजींचे सांगण्यावरून तो आंबा पण त्या संन्याशाला देण्यांत आला. चौथा आंबा हातात पडल्याबरोबर त्या संन्याशाला कोण आनंद झाला. त्याचे हृदय भरून आले, त्याच्या डोळ्यात कृतज्ञतेचे अश्रु चमकले. तो म्हणाला की प्रथम मला वाटले की माताजींनी

नुसता त्रिवर्गच मला दिला; नाही, पण चौथा पण त्यांनी मला दिला. त्रिवर्ग म्हणजे धर्मार्थ काम व चौथा वर्ग म्हणजे मोक्ष होय.

एवढा मान, एवढा बडेजाव, एवढा मोठेपणा माताजींना मिळत होता, पण माताजी पहाव्या त्या आपल्या जणु काय एक साधी भोळी खेडवळ बाई! अभिमानाचा वास सुद्धा त्यांच्या वागण्यांत, त्यांच्या बोलण्यात दिसून येत नसे. जसा फुलाचा वास दरवळलेला सर्वांना येतो पण फुलाला त्याचे कांहीच नसते तशीच माताजींची स्थिति होती.

आता माताजींची दिनचर्या पाहून त्यांच्या व्यक्तिचित्राचे वर्णन संपवू. जेथे रामकृष्णांचा फोटो असेल तेथेच त्या रहात व निजत असत. साधारणत: पहाटे तीन वाजता उठून त्या रामकृणांचे दर्शन घेत; नंतर सहा वाजेपर्यंत जप करीत असत. मग काकड आरती करून रामकृष्णांना जागे करीत व त्यांची आज्ञा घेऊन पुढील कामाला लागत. जयरामवाटीस असल्या तर भाजी चिरणे निवडणे वगैरे गृहकर्मे दुसऱ्याशी बोलत करीत. पहिल्यापहिल्यांदा त्या सर्व कामे करीत असत. पुढे थकल्यानंतर त्या फक्त वरवरची कामे करीत. पूजेची तयारी मात्र त्या स्वत: करीत. मग विडे लावून ठेवीत. आठ नऊ वाजता पूजेचे ठिकाणी जात; दहा वाजेपर्यंत पूजा आटोपलीच पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे. मग कोणास कांही सांगणे असल्यास, उपदेश देणे असल्यास देत मग त्या थोडासा फराळ करीत; फराळ म्हणजे काय तर कांही तरी तोंडात टाकून वर सरवत प्यावयाचे. मग स्वयंपाकघरात जायचे; नैवेद्याचे पदार्थ बहुतेक त्या स्वत: करीत. रामकृष्णांच्या आवडीचे पदार्थ बनविण्याकडे त्यांचा कल असे, नाही तर कोणतेही पदार्थ त्यांना चालत. अकराचे सुमारास स्नान मग पूजा, जप वगैरे करून साडे बाराचे सुमारास रामकृष्णांना नैवेद्य दाखवीत. नंतर स्वत:चे जेवण. पहिल्या पहिल्यांदा माताजी सर्वांना

प्रथम वाढीत असत व सगळ्यांचे झाल्यावर मागाहून आपण जेवीत. पुढे पुढे त्यांच्या मागे लागलागून भक्तमंडळी जेवायला बसल्यावर त्या बसू लागल्या. जेवण झाल्यावर मग प्रसाद वाटीत. मग भक्तांशी गप्पागोष्टी करून दोन वाजता रामकृष्णांना दुपारचे निजवून आपण आराम करीत. नंतर तीन वाजता आपण उठून जप करीत बसत. चारचे सुमारास रामकृष्णांना उठवीत व तेथेच बसून रहात. बहुतेक अशावेळी त्या जप करीत बसत. कोणी भेटायला बोलायला आला तर बाहेर व्हरांड्यात येऊन बसत. सायंकाळी आरती आटोपून आपल्या बैठकीवर बसून रहात. रात्री नऊचे सुमारास रामकृष्णांना नैवेद्य दाखवून भक्तमंडळींची जेवणे उरकत. रात्री लुचीचा एखादा तुकडा व वर कढी किंवा दूध त्या घेत असत. मग रामकृष्णांची शेज करून त्यांना निजवून अकराचे सुमारास त्या निजत.

जवळ जवळ असाच कार्यक्रम कलकत्त्यास असतांना माताजींचा असे. पहाटे कोणाला तरी बरोबर घेऊन (बहुतेक गोलपमाबरोबर असत) त्या गंगास्नानास जात. प्रथम त्या थोडीफार स्वयंपाकात मदत करीत, परंतु पुढे पुढे त्या फक्त नैवेद्य दाखवीत; घरातले सर्व काम गोलपमा व योगिन्मा मिळून करीत असत. पूजा भक्तमंडळी करीत असत. रात्रंदिवस भक्तमंडळींची रीघ लागलेली असे. दुपारी थोड्या पडत तो स्त्रीभक्तांचे वेटोळे त्यांच्या भोवती असे; कारण या संसारी बाया जेवणखाण आटोपून येत व चारचे सुमारास परत घरी जात. पाचचे सुमारास पुरुषमंडळींची ये जा सुरु असे; या वेळी जमिनीवर पाय टेकून त्या पलंगावर बसत असत; अंगावर चादर गुंडाळलेली व चेहेऱ्यावर गोषा घेतलेला असे. यावेळी कोणीही त्यांच्याशी बोलू शकत असे. ओळखीचा मनुष्य असल्यास माताजी त्याच्याशी स्वत: बोलत; अनोळखी व नवीन असल्यास त्याला सांगावयाचे ते शेजारच्या माणसास अगदी हळू हळू सांगत व तो ते त्या माणसास सांगत असे. हे काम बहुतेक गोलपमा करीत असे. पर्व दिवशी व सुट्टीच्या दिवशी इतकी मंडळी येत की माताजी अगदी थकून जात.

रात्री अकरा बाराचे सुमारास निजून पहाटे तीन वाजता उठणे हीच काय ती त्यांची झोप. पहाटे तीन पासून रात्री निजेतोपर्यंत सतत काम. दिवसातून तीन वेळा खाणे होई पण ते नावालाच; सकाळ-संध्याकाळचे खाणे शुद्ध नावालाच असे, म्हणजे जवळ जवळ दुपारी एकदाच त्या ठीक असे कांही तरी खात. भाजी व फळे त्यांना फार आवडत असत आंबे म्हटले की माताजी खुष; मग आंबा जरी आंबट-ढाण असला तरी चाले त्यांचे कपडे म्हणजे बारीक किनारीची एक साडी; तीसुद्धा अगदी हलकी, किमतीने व दिसण्यांत हलकी, चोळया वगैरे त्यांनी कधीच वापरल्या नाहीत; कोणी आणून घालण्याचा फार आग्रह केला तर अंगात घालीत व लगेच काढून टाकीत.

थोडक्यात सात्त्विक व मित आहार, मित कपडालत्ता व मित निद्रा हा त्यांचा वागण्याचा शिरस्ता असे. रात्रंदिवस रामकृष्णांचे सान्निध्य व स्वानुसंधान यांत त्या रंगलेल्या असत.

• • •

# प्रकरण तेरावे

## आणखी तीर्थयात्रा

सन १८८६ मधे रामकृष्णांच्या महासमाधीनंतर पंधराच दिवसांनी माताजींनी वृंदावनची यात्रा केली त्याचे वर्णन मागे आलेच आहे. त्यावेळी माताजी तेथे जवळ जवळ वर्षभर होत्या. तत्पूर्वी रामकृष्णांच्या मातोश्री चंद्रादेवी यांच्या निधनानंतर त्यांचे उत्तरकार्य करण्याकरिता रामकृष्णांच्या सांगण्यावरून माताजी गयेस गेल्या होत्या. त्यानंतर सन १८८८ मध्ये फिरून त्या गयेस गेल्या; यावेळी त्यांचेबरोबर स्वामी अद्वैतानंद होते; यावेळी त्या बौद्धगयास पण गेल्या होत्या. बुद्धगयेतील आश्रमीयांची व्यवस्था पाहून त्यांना आनंद वाटला; त्यांची तेथे सर्व प्रकारची सोय असून कोणाच्या तोंडाकडे त्यांना पहावे लागत नसे. हे पाहून माताजी रामकृष्णांच्या समोर उभ्या राहून त्यानी डोळ्यांतून अश्रू झरता झरता प्रार्थना केली की पहा बरे या साधूंची कशी व्यवस्था आहे ? नाहीतर माझ्या मुलांची व्यवस्था पहा. या माझ्या मुलांना डोकें टेकायला जागा नाही, खायला अन्न नाही; दोन घास अन्नाकरिता त्यांना दारोदार हिंडावे लागते. त्यांनी रामकृष्णांना सांगितले की या माझ्या मुलांची आता ठीक व्यवस्था झाली पाहिजे. यापुढे लौकरच बेलूर मठाची स्थापना झाली.

त्याच वर्षी सन १८८८ मध्ये योगिनमानाबरोबर घेऊन माताजी पुरीला गेल्या. पुरीला बलराम बोस यांचे घर होते, तेथे त्या उतरल्या होत्या. बलराम बोस पुरीमधे एक मोठे प्रकरण असल्याने पुरीचा पुजारी श्रीयुत गोविंद सिंगरी आपण होऊन माताजींना भेटला व जगन्नाथाच्या देवळात नेण्याची तयारी त्याने दर्शविली. त्यावर माताजी म्हणाल्या की

गोविंदजी मला पालखी नको; मी तशी येणार नाही. मीही अशी अनाथ गरीब आहे व जगन्नाथजींना भेटायला जायचे आहे; आपण पुढे व्हा व मी आपल्यामागोमाग पायीच येते.

रामकृष्णांनी स्वत: पुरीस जाण्याचे टाळले होते. त्यांनी माताजींना त्यांच्यानंतर पुरीस जाऊन येण्यास सांगितले होते व त्याप्रमाणे त्या आता आल्या होत्या. आपल्या पदराखाली रामकृष्णांचा फोटो घेऊन त्या देवळात गेल्या व रामकृष्णांचा फोटो जगन्नाथजीसमोर त्यांनी केला व अशा तऱ्हेने रामकृष्णांना जगन्नाथजींचे दर्शन करवले. सकाळ संध्याकाळ माताजी लक्ष्मीचे देवळात जाऊन ध्यान मग्न होऊन बसत. जगन्नाथजीबद्दल त्यांना विचारल्यावरून त्या एकदा म्हणाल्या की मला असे दिसले की जगन्नाथजी आपल्या सिंहासनावर बसलेले असून मी त्यांच्या चरणांची सेवा करीत आहे. फिरून एकदा माताजींनी सांगितले की मला स्वप्नात असे दिसले की जगन्नाथजी म्हणजे लक्ष शाळिग्राम शिळांच्या सिंहासनावर आरूढ झालेले महादेव होत. पुरीच्या देवळाचा इतिहास ते शंकराचे देऊळ होते अशी साक्ष देतो.

पुढे सन १८९४ मध्ये त्यांनी फिरून काशी व वृंदावन यांची यात्रा केली बहुतेक याचवर्षी कामारपुकुरजवळ असलेल्या विष्णुपुरी त्या गेल्या. रामकृष्णांनी सांगितले होते की हे विष्णुपुर प्रत्यक्ष वृंदावन आहे; विष्णुपुरची यात्रा म्हणजे वृंदावनची यात्रा समज.

सन १९०९ मधे त्या कोठारला गेल्या; तेथे दोन महिने त्या राहिल्या होत्या. येथे एकाने हिंदुधर्म सोडून ख्रिस्ती धर्म स्वीकारला होता व त्याचा त्याला पश्चाताप होत होता. या गृहस्थाचे शुद्धीकरण माताजींनी केले व तो मूळचा ब्राम्हण असल्याने त्याला फिरून गायत्री मंत्राची दीक्षा देवविली व दुसऱ्या दिवशी त्यांनी स्वत: त्याला उपदेश दिला.

येथून पुढे त्या रामेश्वरला निघाल्या. वाटेवर बऱ्हामपूरच्या रामकृष्णाश्रमात थोडा वेळ त्या थांबल्या होत्या. येथून पुढे मद्रासला आश्रमाच्या शाखेत जाऊन तेथे एक महिना राहिल्या. भाषा निराळी असूनसुद्धा हजारो स्त्रीपुरुष माताजींना भेटायला येत. कित्येक जणांना माताजींनी उपदेश दिला. पुढे मदुरेला कांही वेळ थांबून त्या रामेश्वरास पोहोचल्या. रामनदचा राजा स्वामी विवेकानंदांचा शिष्य असल्याने माताजी तेथे जाऊन पोहोचल्याबरोबर त्यांची सर्व व्यवस्था त्याने आपल्या हातात घेतली. रामेश्वराला लिंगपूजा पुजाऱ्याशिवाय कोणासही करता येत नसे; परंतु राजेसाहेबांनी माताजी व त्यांच्याबरोबर असलेल्या सर्वांना पूजा करायची परवानगी दिली माताजी सांगत होत्या की रामेश्वराला वाहाण्याकरिता एकशे आठ सोन्याची फुले मला स्वामी रामकृष्णानंदांनी करून दिली होती.

रामनदचे राजांनी सर्व राजवाडा व जामदारखाना या सर्व मंडळींना दाखविण्याचा हुकूम दिला होता; शिवाय तेथील कोणतीही वस्तु कोणीही मागितली तर ती देण्याचा हुकूमही पण त्याने दिलेला होता. सर्व मंडळींना सर्व दाखविल्यावर तेथील अधिकाऱ्याने आपणास काय द्यावे असे माताजींना विचारले. त्या म्हणाल्या की माझी सर्व व्यवस्था शशीने (स्वामी रामकृष्णानंद) आधीच केलेली आहे व मला स्वतःला कशाचीहि जरूरी नाही. हे ऐकून त्या अधिकाऱ्यास वाईट वाटल्याचे पाहून मी म्हटले की तरीपण या राधूला कांही पाहिजे असेल तर द्या. मी हे म्हटले मात्र, पण मला लगेच भीति वाटली की आता ही बया काय मागते? लगेच मी रामकृष्णांना प्रार्थना केली की ह्यातून राधूला वाचवा, व रामकृष्णांनी माझी प्रार्थना ऐकली; कारण राधूने बराच वेळ विचार करून सांगितले की मला कांही नको; पण देणारच असला तर माझी शिसपेन्सील हरवली आहे तर एक मला द्या.

रामेश्वराहून परत येतांना बंगलोरच्या शाखेत माताजी गेल्या तेथे असतांना आश्रमाजवळ असलेल्या एका टेकडीवर बसून एक दिवसभर माताजींनी जप केला. माताजी आल्याचे कोणासही कळवले नसतानासुद्धा हजारो स्त्रीपुरुष माताजींच्या दर्शनास लोटले. माताजी म्हणत की काय तो माणसांचा समुदाय ! रस्त्यावर नुसता फुलांचा पाऊस पडला होता. याचा अर्थ एकच की रामकृष्णांचा संदेश जिकडे तिकडे पसरला आहे. पुढे राजमहेंद्रीला एक दिवस थांबून गोदावरीचे स्नान करून माताजी सन १९११ च्या एप्रिलमध्ये परत कलकत्त्यास आल्या.

फिरून पुढे तिसऱ्यांदा सन १९१२ मधे माताजी काशीला गेल्या होत्या. यावेळी त्या तेथे अडीच महिने राहिल्या होत्या. रिवाजाप्रमाणे प्रथम अन्नपूर्णा व विश्वेश्वर यांचे दर्शन त्यांनी घेतले. एक दिवस तेथील रामकृष्णमिशनचा सेवाश्रम त्या पहावयाला गेल्या होत्या. तेथील रोग्यांची व्यवस्था पाहून त्यांना आनंद झाला व त्या म्हणाल्या की येथे रामकृष्णांचे साक्षित्व मला दिसत आहे. मला वाटते की यापुढे आता येथेच वास्तव्य करावे. सेवाश्रम पाहून परतल्यावर त्यांनी या आश्रमाला दहा रुपये भेट म्हणून पाठविली. काशीतील वैद्यनाथ व तिलभाण्डेश्वर यांचेविषयी त्या म्हणत की ती स्वयंभू लिंगे असून, केदारनाथ हा हिमालयातील केदारेश्वरच होय; यांचे दर्शन घेतल्याने केदारेश्वराचे दर्शन घेतल्यासारखे होते.

एक दिवस तेथे जवळ असलेल्या सारनाथला गेल्या असतांना तेथील बुद्धस्तूप व कोरीवलेणी पाहून थक्क होत असलेले साहेब लोक पाहून त्या म्हणाल्या की पूर्वावतारात याच लोकांनी ही लेणी कोरली व आता आपलेच काम पाहून ते किती आश्चर्यचकित होत आहेत पहा !

सारनाथहून परत येतांना ज्या गाडीतून माताजी येणार होत्या ती गाडी स्वतःकरिता ठेवून स्वामी ब्रम्हानंदांनी आपली गाडी माताजींना

दिली. परत येतांना ब्रम्हानंदांच्या गाडीला अपघात झाला. यावर माताजी म्हणाल्या की पहा माझ्यावरचे संकट ब्रम्हानंदांनी आपल्यावर ओढून घेतले; नाहीतर या अपघाताचा परिणाम भयंकर झाला असता.

बनारसमध्ये असतांना नानकपंथी एक साधू व तोतापुरींच्या (रामकृष्णांचे वेदांताचे गुरु) मालिकेतील चमेलीपुरी यांच्या दर्शनास माताजी गेल्या होत्या. गोलपमांनी चमेलीपुरींना विचारले की आपल्या खाण्यापिण्याची व्यवस्था कोण करते ? त्यावर ते म्हणाले की अन्नपूर्णा करते की; नाहीतर दुसरे कोण करणार ? माताजींना या उत्तराने आनंद वाटला. माताजी म्हणत की चमेलीपुरींचा स्वभाव लहान मुलासारखा आहे; या वयोवृद्ध सत्पुरुषाचा चेहरा व स्वभाव मी विसरूं शकत नाही. दुसऱ्या दिवशी माताजींनी चमेलीपुरींना कांही संत्रे भेट म्हणून धाडली. आणखी कोणाच्या दर्शनास आपल्याला जायचे आहे का असे विचारल्यावर, माताजी म्हणाल्या की आणखी कोणा साधु पुरुषाचे दर्शन घ्यायचे आता; चमेलीपुरींचे दर्शन घेतले की मीं; आता आणखी कोणाचे दर्शन घ्यावयाचे ?

सन १९१३ मध्ये मार्च महिन्यांत माताजी कलकत्त्यास परत आल्या.

• • •

# प्रकरण चौदावे

## उत्तर चरित

सन १८८८ पासून माताजी कलकत्त्यास आल्या. सन १८९८ मधे तारीख १३ नोव्हेंबर रोजी पाश्चात्य दौरा करून परत आल्यानंतर स्वामी विवेकानंदांनी उघडलेल्या बेलूर मठांत प्रथम माताजींनी पाऊल टाकले; त्या दिवशी सर्व मठ माताजींनी आपल्या हातांनी धुवून काढला व तेथे रामकृष्णांची पूजा केली.

सन १८९९ मधे त्यांचा धाकटा भाऊ अभयचरण निवर्तला व त्याची बायको सुरबाला माताजींच्या गळचात पडली; पुढे ही वेडी झाली व त्यांतच बाळंत होऊन राधूचा जन्म झाला. याच वर्षी स्वामी योगानंदांनी पण देह ठेवला. रामकृष्णांच्या समाधीपासून येथपर्यंत माताजींची सर्व व्यवस्था व सेवा स्वामी योगानंद करीत असत; त्यांच्या जाण्याने माताजींना फार दुःख तर झालेच, पण त्यांच्या प्रकृतिवर फार परिणाम झाला.

वृंदावनच्या यात्रेत स्वामी योगानंद माताजींचे बरोबर होते. तेथून आल्यावर योगानंद पुष्कळ दिवस काशीस राहिले. तेथे त्यांनी सर्वकाळ तपाचरणात खर्च केला. त्यावेळी योगानंद मोठ्या मुष्किलीने दोन तीन तास झोप घेत. येथेच त्यांनी स्वतः जवळ पैसा ठेवायचा नाही अशी शपथ घेतली; या तपाचरणाने त्यांची प्रकृति ढासळली. शेवटी आजारी पडून ते बेलूरमठात परत आले. अशक्त, रोड असे ते झाले असून त्यांचा चेहरा अगदी काळवंडून गेला होता; अशा स्थितीतसुद्धा ते हसतमुख व विनोदी असत. कलकत्त्यास खाण्यापिण्याच्या सोयीच्या दृष्टीने ते बलराम बोस यांचे कडेच रहात असत. माताजी तेथे आल्या की योगानंद त्यांच्यासेवेस हजर असत. माताजी जेथे राहातील तेथे बाहेरच्या बाजूस असलेल्या

खोलीत योगानंद आपले ठाणे ठेवीत. बाजार हाट, येणाऱ्या जाणाऱ्यांची व्यवस्था, भेटायला येणाऱ्यांना वेळेवर माताजीसमोर नेणे, येणाऱ्या देणग्यांची विल्हेवाट, वगैरे सर्व वरील काम योगानंद करीत असत. पुढे स्वतः अत्यवस्थ झाल्यावरसुद्धा योगानंदांनी हे काम करायचे सोडले नाही. योगानंद गेल्यावर माताजी म्हणाल्या की एक वीट पडली आता; अशाच एकामागून एक विटा पडणार आं ?

योगानंदांचे वर माताजींचे फार प्रेम होते. यासंबंधी एक मजेदार गोष्ट ऐकण्यांत आहे. थंडी निवारणार्थ माताजींना योगानंदांनी एक दुलई दिली होती. वापरून वापरून ती अगदी जुनी होऊन गेली; तेव्हा त्यात फिरून कापूस भरून घ्यायचे माताजींनी सांगितले पण लगेच त्या नको म्हणाल्या; त्या म्हणाल्या की योगानंदांनी दिलेल्या दुलईतील कापूस बदलून कसे चालेल ? आपल्या आवडत्या भक्तांनी दिलेल्या लहान सहान वस्तू माताजींना मोठ्या प्रिय असत व त्या त्या जपून ठेवीत. माताजी सांगत की कोणी योगानंदाला आठ आणे दिले तर तो लगेच ते बाजूला ठेवी; कारण काय तर माताजींना तीर्थयात्रेचे वेळी उपयोगी पडतील.

सन १९०७ पासून गिरीशबाबू असेपर्यंत माताजी दरवर्षी त्यांचे घरी दुर्गापूजोत्सवात जात असत.

सन १९०९ च्या मेच्या तेरा तारखेस शारदानंदांनी बांधलेल्या उद्बोधन ऑफीसच्या आवारात माताजींकरिता बांधलेल्या जागेत माताजींनी प्रथम पाऊल ठेवले. येथून पुढे त्या कलकत्त्यास असतांना येथेच रहात असत. यापूर्वी त्या निरनिराळ्या भाड्याच्या जागेत रहात असत. अशा या त्यांच्या रहाण्याने माताजींना तसाच दर्शनास येणाऱ्या लोकांना फार त्रास होत असे. या नवीन जागेत आल्यापासून सर्वांचाच त्रास बंद झाला.

योगानंदांचे मागून स्वामी शारदानंद माताजींची सर्व व्यवस्था करीत. माताजी जयरामवाटीस असतांनासुद्धा त्यांना दर महिना खर्चाकरिता

शारदानंद पैसे धाडण्याची व्यवस्था करीत. पुढे मिसेस ओलबुल नावाची एक अमेरिकन बाई माताजींना दर महिना पंचवीस रुपये धाडीत असे. माताजी सांगत असत की या पंचवीस रुपयांचा केवढा आधार मला वाटत असे. कलकत्त्यास सर्व खर्च शारदानंद चालवीत. पुढे राधूच्या आजारीपणामुळे खर्च फार वाढला तेव्हा त्यांना तोंड मिळवणी करणे मुष्कील होत असे.

सर्व शिक्षण, सोयरे धायरे वगैरे सर्व संबंध सोडून, संन्यास घेऊन रामकृष्णांची सेवा करण्याचा उद्योग पत्करलेले एकंदर बावीस जण होते; त्यांत विवेकानंद अग्रणी होते.पाश्चात्य देशाचा दौरा आटोपून परत आल्यावर तेथील काम चालविण्याकरिता विवेकानंदांनी शारदानंदांना धाडले होते. पण पुढे येथेच रामकृष्ण मठ व मिशन स्थापन केल्यावर पहिले सेक्रेटरी म्हणून शारदानंदांना ठेवायचे ठरल्याने सन १८९८ मधे शारदानंद परत आले व हे काम त्यांनी अंगावर घेतले; हे त्यांनी अव्याहत व अविरतपणे शेवटपर्यंत चालविले. माताजी कलकत्त्यास असल्या की त्यांची सेवा व व्यवस्था पण शारदानंदच करीत. माताजींचे त्यांच्यावर प्रेमही पण तसेच होते. कलकत्त्यास शारदानंद नसले तर माताजी म्हणत की शरद नाही तेथे मग मी कोणाकडे जाऊ, आणि जात पण नसत. कलकत्त्यास असतांना जर शारदानंदांना कामानिमित्त कलकत्त्याहून बाहेर जायचा प्रसंग आला तर माताजी लगेच सांगत की थांब जरा, मी प्रथम जाते व मग तू जा. माताजी शारदानंदांची वासुकीशी तुलना करीत; त्या म्हणत की तो हजार फणांनी माझे संरक्षण करतो. शेवटी शेवटी माताजी जशा फार थकल्या तशा म्हणत की कंटाळले आता, जाईन म्हणते; शरदला कडेवर घेऊन जाईन म्हणते. शारदानंदांनी हे जेव्हा ऐकले त्यावेळी माताजींच्या त्या प्रेमामुळे ते आनंदाने कितीतरी वेळ रडत होते.

माताजींच्या या अनुपमेय मातृप्रेमामुळे शारदानंदांवर एक मोठा सुपरिणाम झाला; ते सर्व स्त्रियाकडे माता या दृष्टीने पाहू लागले व

प्रत्येक स्त्री माता म्हणूनच त्यांना वाटू लागली. माताजींची उद्बोधन दप्तरच्या आवारातील बंगली ही शारदानंदांची विसाव्याची जागा होती. शेवटपर्यंत या बंगलीच्या पुढच्या खोलीत माताजींचे दरवान म्हणून शारदानंद रहात असत. माताजी गेल्यावर जयरामवाटीस त्यांचे जन्मस्थानी शारदानंदांनी एक सुंदर देवालय बांधले.

माताजींच्या स्त्रीभक्तामध्ये गोलपमा, योगिन्मा, लक्ष्मीदेवी व गौरीमा ह्या मुख्य होत्या. पहिल्या तिघी विधवा होत्या तर चौथी आजन्म कुमारिकाच राहिली. गोलपमा माताजींच्या सहवासात सतत असत. जुन्या वळणाच्या पण उच्च ब्राम्हण कुलांत गोलपमांचा जन्म झाला होता. लौकरच पतिनिधन व श्रीमंत कुळांत दिले गेल्यानंतर त्यांच्या एकुलत्या एक मुलीच्या निधनानंतर त्या रामकृष्णांकडे आल्या व तेव्हापासून त्या माताजींबरोबर असत. रामकृष्णांनी पण माताजींना सांगितले होते की ही ब्राम्हण स्त्री सदैव तुझ्यावरोबर राहील; तिची काळजी घे. माताजी गोलपमांची फार काळजी करीत. माताजींच्या शेवटच्या क्षणापर्यंत गोलपमा त्यांच्याबरोबर होत्या. माताजी कलकत्त्यास असत तेव्हा घर-कामाचा सर्व भार गोलपमांवर असे. त्रासदायक भक्तापासून माताजींची सोडवणूक त्याच करीत. वाहेर कोठेही जावयाचे म्हणजे गोलपमा पुढे व माताजी मागे असा क्रम असे. गोलपमांना घेतल्याशिवाय माताजी कोठेही जात नसत; माताजी सांगत की गोलपबरोबर असली म्हणजे मला जरा धीर येतो. पारमार्थिक मार्गात गोलपमा फार पुढारल्या होत्या; माताजी सांगत की गोलप शुद्ध मनाची असून जपसिद्ध आहे. गोलपमांना मोकळे-पणाने कोणाशीही बोलता येत असे म्हणून माताजी कोणाला कांही सांगा-यचे म्हणजे प्रथम गोलपमांना सांगत व त्या त्या माणसाला सांगत. गोलपमा सडेतोड बोलत असे; ह्यामुळे एखादेवेळी माताजी त्यांना सांगत की "न ब्रूयात् सत्यमप्रियम"! त्यांचा नीटनेटकेपणा, स्वच्छता, वक्तशीरपणा

फार वाखाणण्याजोगा होता. त्यांना घाण खपत नसे. एखाद्या भक्ताच्या मुलाने जर घाण केली तर ती त्या लगेच काढून टाकीत. गोलपमांच्या चरितार्थाकरिता त्यांचा नातू पैसे धाडीत असे; त्यापैकी अर्धे चरितार्था-करिता म्हणून त्या आश्रमात जमा करीत व बाकीचे अर्धे गरीब लोकांना मदत म्हणून वाटून देत. माताजींच्या मागून जवळ जवळ चार वर्षांनी त्या गेल्या.

योगिन्मा (योगेंद्रमोहिनी विश्वास) ह्या खूप श्रीमंत जमीनदाराच्या पत्नी होत्या. सासरच्या कांही भानगडीमुळे त्या माहेरीच रहात असत. वलराम बोस यांच्यामार्फत त्या रामकृष्णांच्याकडे आल्या व अशा तऱ्हेने माताजींचा त्यांचा संबंध आला. रामकृष्ण असतांना योगिन्मा माताजींची वेणी वळत असत; ती केशभूषा माताजींना इतकी आवडत असे की कित्येक वेळा योगिन्मा आल्या नाहीत तर माताजी वेणी तशीच ठेवीत, पण दुसऱ्या कोणासही आपल्या केसांना हात लावू देत नसत; एखादेवेळी आठवडाभर माताजी त्याच वेणीवर रहात. पुढे माताजी कलकत्त्यास असत तेव्हा सकाळी चार तास माताजींचे काम करून योगिन्मा आपल्या घरी जाऊन घरचे कामकाज, खाणेपिणे वगैरे आटोपून दुपारी परत माताजींकडे येत, त्या रात्री निजायला आपल्या घरी जात. माताजींच्या होणाऱ्या खर्चाचा कांही भाग त्या उचलीत. माताजी सांगत असत की गोलपमा व योगिनमा या दोघींना माझ्या स्वभावाची व वाग-णुकीची पूर्ण माहिती आहे. योगिनमांना पाहिल्याबरोबर पाहाणाऱ्यावर त्यांची चटकन् छाप पडत असे. रामकृष्ण म्हणत की योगिन्मा ज्ञानी तर आहेच पण भक्त पण आहे; योगिन् ही सहस्त्रदळ कमळाप्रमाणे आहे. हे कमळ पुढे उमलले म्हणजे तिची योग्यता समजेल. वृंदावनांत माताजींचे बरोबर असतांना योगिन्मांना वारंवार समाधीचा अनुभव येत असे. तेथेच लालाबाबूंच्या देवळात त्यांना एकदा फारच गाढ समाधी लागली व ती फार वेळ राहिली. याबद्दल योगिन्मा सांगत की त्यादिवशी जग नाहीच

हा मला अनुभव आला. अशाच एका समाधीबाबत त्या म्हणाल्या की मला यच्चावत् वस्तूमध्ये माझे दैवत भरून उरलेले मला दिसले. तंत्रमार्गात योगिन्मा पूर्णाभिषिक्त होत्या; वैदिक बिरजा होम पण त्यांनी केलेला होता. हवा कशीही असो पहाटे गंगास्नान व तेथेच तीरावर दोन तास ध्यान व जप त्यांचा कधीही चुकला नाही. घरकाम चटपट आवरून बाकी सर्व वेळ त्या ध्यानधारणा, जपजाप्य, चैतन्यचरित, भागवत इत्यादिकांचे वाचन यात घालवीत. माताजींचे मागून चार वर्षांनी जवळ जवळ गोलपमांचे बरोबरच योगिन्मांनी देह ठेवला.

गौरीमा या शिकलेल्या, हुषार, सभाधीट, सर्व कारभार शांतपणाने, कडक शिस्तीने पण मनमिळाऊपणाने चालवीत असत. त्यांना समजायला लागले तेव्हापासून परमार्थाकडे त्यांचा ओढा होता. घरच्या त्या सुखवस्तू होत्या. लहानपणीच रामकृष्णांचा संबंध आल्यानंतर, लग्न करण्याचे नाकारून, अगदी कोवळ्या वयात हिमालयात जाऊन त्यानी कांही वर्षे तपाचरण केले होते. सन १८८२ मध्ये रामकृष्णांकडे आल्यापासून त्यांचा माताजींशी संबंध आला होता. रामकृष्ण आणि माताजी या दोघांची सेवा त्या करीत असत. स्त्रीसमुदायात धर्माची जाणीव करून देण्याकरिता व तदर्थ व्याख्याने वगैरे देण्याकरिता रामकृष्णांनी गौरीमाची नेमणूक केली होती. रामकृष्णांचे नंतर वृंदावनी त्यांनी कांही वर्षे तपाचरण केले होते. तेथून परत आल्यावर कलकत्त्यास त्यांनी स्त्रिया व मुली यांचेकरिता श्रीशारदादेवी संस्था व शाळा काढली; ह्या संस्था आजही आपले कार्य करीत असून गौरीमांचे ध्येय चालविणाऱ्या कांही स्त्रिया आजही तेथे काम करीत आहेत.

माताजींचे बाबतींत गौरीमा सांगत असत की त्या रामकृष्णांच्या भागीदार तर होत्याच; शिवाय त्यांचे जगन्मातेचे पूजनप्रतीक माताजी होत्या. स्वपत्नीची जगन्माता म्हणून पूजा करण्याचा रामकृष्णांचा प्रयोग इतिहासात अभूतपूर्व असाच होता. त्या म्हणत की माताजी काय आहेत हे

लोकांना अजून समजलेच नाही; ज्या दिवशी जगाला हे समजेल त्या दिवशी जगामधे उदारपणा एकदम वाढेल.

पर्वणीचे व पूजनाचे दिवशी माताजींचे समोर सप्तशती पाठ गौरीमा करीत. शेवटी एकदा त्यांनी असा पाठ करून माताजींच्या चरणावर १०८ कमळे वाहून, पोथी त्यांच्या चरणी अर्पण करून म्हणाल्या की जितके पाठ करायचे मनात आले होते तितके मी साक्षात् चण्डिकेसमोर वाचून पुरे केले; यापुढे नियम म्हणून पाठ करणार नाही; आपली इच्छा असल्यास आपण करून घ्या. अशी ही गौरीमांची माताजींचे बद्दल धारणा होती. उलट माताजी गौरीमांना आपल्या मुलीप्रमाणे समजत; माताजी तिला रामकृष्णांचे प्रमाणेच, गौरीदासी म्हणूनच हाक मारीत. गौरीमा आजारी झाल्या तर माताजी स्वहस्ते गौरीमाची चाकरी करीत. एकदा माताजी म्हणाल्या की जगात अनुपमेय उदारचित्त असे जीव फारच थोडे असतात; गौरीमा त्यापैकी एक आहे.

गौरीमांचे खाजगी किंवा सार्वजनिक काम माताजींच्या परवानगीने व साशिर्वादच सुरू होत असे. माताजी गौरीदासीच्या शाळेला व संस्थेला वारंवार भेट देत असत. गौरीमांच्या संस्थेतील पुष्कळ मुली व बायका उपदेशार्थ माताजींकडे येत असत.

एकीकडे दुसऱ्याशी बोलण्यास लाजणाऱ्या, गोषा पाळणाऱ्या, सदैव ध्यानधारणेत निमग्न, अशिक्षित व खेडवळ अशा माताजी दिसत तर त्याच्या उलट मुलींना सुईणीचे शिक्षण, शिवण्याचे शिक्षण, सांस्कृतिक शिक्षण वगैरे देऊन कार्यक्षम करण्याचा उदारमतवादीपणा त्या दाखवीत. सिस्टर निवेदिता, गौरीमा यांच्या संस्थामधे त्या यामुळेच लक्ष घालीत असत. दुसऱ्याच्या उपयोगी पडणे, दुसऱ्यांचे दुःख निवारण करणे हे स्त्रीधर्माचे एक महत्त्वाचे अंग माताजी समजत असत. अशा या शिक्षणाने व वागण्याने आध्यात्मिक मार्गात मदतच होते असे माताजींचे मत असे.

# प्रकरण पंधरावे

## उपदेशसार

माताजी वेदांताची सर्व तत्त्वें जाणत असून ती आपल्या भक्तांचे मनावर अगदी सोप्या भाषेत व सोपी सोपी रोजच्या व्यवहारातील उदाहरणे देऊन पक्की ठसवीत असत; लांबलचक व्याख्याने व घटपटादि भाषा त्यांनी कधीही वापरली नाही. परमेश्वराकडे लक्ष पुरवा, परमेश्वर आपलासा करा असे जसे त्या सांगत तितक्याच सुलभतेने परमेश्वर काल्पनिक असल्याने अनित्य असून आपणच सर्व कांही आहो असा सर्वातिरिक्त वेदांत पण त्या सांगत असत. त्या सांगत की जे जे कल्पनेत येऊ शकते ते अनित्य व नाशवंत असते, मग परमेश्वर तरी कोठून राहील ? तोही अनित्यच. आपणच मर्व आहो, आणखी निराळा परमेश्वर येईल कोठून ? आध्यात्मिक मार्गात उच्चपदावर पोहोचल्यानंतर असा अनुभव येतो. परमेश्वर नाहीसा होतो म्हणजे परमेश्वरसुद्धा अज्ञानाचाच भाग का ? असे एकाने विचारल्यावरून माताजी म्हणाल्या की नरेनने (स्वामी विवेकानंद) मला एकदा विचारले होते की आई ज्या ज्ञानाने गुरुचरणांचे ज्ञान होते तेही जर अज्ञानच तर मग ह्या ज्ञानाचा उपयोग काय ? त्यावेळी मी त्याला लगेच म्हटले की हे असले तर्कवाद सोडून दे; वेदांतध्येय हा तर्काचा, बुद्धीचा विषय नाही. अरे बुद्धीच्या सहाय्याने कोणी परमेश्वर पाहू शकला आहे काय ? व्यास महामुनि, शुक्राचार्य असले मोठमोठे ज्ञानी हे सुद्धा साखरेच्या अमाप राशींतून एक मोठासा कण उचलणारे मुंगळ्या-प्रमाणेच होत हे ध्यानात ठेव.

माताजी बुद्धीला महत्त्व देत नसत; त्या आंतरिक भावाला महत्त्व देत. म्हणूनच त्या फिरून फिरून सांगत की परमेश्वराला आपलासा करा.

परमेश्वराला आपलासा करण्याचा एकच मार्ग आहे व तो म्हणजे पूर्ण आत्मार्पण होय. पारमार्थिक ध्येयप्राप्ति परमेश्वराच्या कृपेनेच होते. निरनिराळ्या पूजा अर्चा, जपजाप्य, ध्यान धारणा इत्यादि ही ध्येय-प्राप्तीची केवळ साधनें आहेत; या सर्वांचा उपयोग केवळ मन:शुद्धिकरिता होतो. मन शुद्ध बनल्याशिवाय परमेश्वरकृपा होत नाही. पुष्कळ साधना केल्याने परमेश्वर प्राप्त होईलच असे नाही. परमेश्वर लहान मुलासारखा आहे. एखाद्याने लहान मुलाजवळ असलेली वस्तू त्याजवळ वारंवार मागितल्याने ते ती वस्तू देईल असे थोडेच आहे; नाहीतर एखाद्याने न मागतासुद्धा ते ती वस्तू त्याला देऊन टाकील. अगदी अशीच परमेश्वर-कृपेची गोष्ट आहे.

त्या सांगत की बाबारे माणसाने कसून प्रयत्न केला पाहिजे. सर्व गोष्टी परमेश्वराच्या मनात आल्या तरच होतात हे जरी खरे असले, तरी माणसाने तदर्थ कसून प्रयत्न केला पाहिजे हे तितकेच खरे आहे. माणसा-कडून केल्या जाणाऱ्या क्रियेमधूनच परमेश्वराचे अंतरंग समजू लागते. आपल्या पूर्वसंचितावरही पुष्कळसे अवलंबून आहे. या जन्मी पुष्कळसे सत्कर्म करूनच आपण आपले पूर्वसंचित धुवून साफ करू शकतो; असे झाल्यावर मग मन शुद्ध होऊ लागते. नुसत्या जपतपाने परमेश्वर मिळत नाही; त्याच्या प्राप्तीकरिता मन शुद्ध पाहिजे, भाव शुद्ध पाहिजे. अशा तऱ्हेचा भाव प्राप्त करून घेणे फार कठीण असते. वासनांचा किंचित्सा अंश सुद्धा जोपर्यंत मनात असतो तोपर्यंत भाव शुद्ध होणे शक्य नसते; दैवी लोकांचाच भाव इतका शुद्ध असतो. त्या म्हणत की बाबारे परमेश्वर एखादे वेळी कोणासही मोक्ष सहज देऊ शकेल; पण शुद्धज्ञानयुक्त नितांत भक्ति ही फारच दुर्मिळ गोष्ट आहे. म्हणून मन शुद्ध करण्याचा सतत प्रयत्न करा. परमेश्वर दिसत नाही म्हणून प्रयत्न सोडू नका. अरे मासे धरणाऱ्याच्या गळाला मोठा मासा रोजच लागतो काय ? त्याला रोज रोज प्रयत्नच करावा लागतो.

सतत अविश्रांत प्रयत्नाने होणाऱ्या पारमार्थिक अनुभवाबाबत माताजी म्हणत की परमेश्वरकृपेने त्याचे दर्शन केव्हाही घेता येते; परंतु तेच दर्शन योग्य वेळी होणे कांही निराळेच आहे. आंबे झाडांना वर्षातून दोनदा लागतात; परंतु योग्य वेळी येणारा आंबा मधुर असतो तर अवेळी येणारा थोडासा आंबटच राहतो. पारमार्थिक प्रगति हळुहळूच होत असते. एखाद्या जन्मात पुष्कळ जपजाप्य केले तर पुढच्या जन्मी मन:शुद्धिकडे लक्ष जाते; त्याच्या पुढील जन्मात त्याचे मन जवळजवळ शुद्ध होते; अशी ही हळुहळूच प्रगति होते.

निरनिराळ्या साधनामध्ये जप हे अगदी सोपे असे साधन आहे. तोंडाने जप करता करता पुढे आपोआपच मनाने जप होऊ लागतो. मग पुढे कुण्डलिनी शक्ति जागृत होऊ लागते. एखादा पहिलवानसुद्धा एखाद्या मोठ्या बैलाला एकदम उचलू शकत नाही. पण एखादा रोज लहानसे वासरू उचलू लागला तर कालांतराने ते वासरू वाढत वाढत मोठा बैल बनला तरी तो मनुष्य एवढा मोठा बैल सहज उचलू शकतो. अशीच प्रगति जपाने होते.

मनुष्य चोवीस तास एकच काम करू शकत नाही; म्हणून चोवीस तास जप होणे शक्य नाही. करिता होईल तितका जप करून बाकीचा वेळ परमेश्वराप्रीत्यर्थ होणाऱ्या कामात खर्च करावा. नाहीतर कांही वेळ जपाने मन शुद्ध करण्याचा प्रयत्न करावा व बाकीचा वेळ आळसात गेल्याने मनाला फाटे फुटत रहावे म्हणजे बेरीज वजाबाकी सारखी. म्हणून सतत काम करीत रहा; आळसामध्ये एक क्षणसुद्धा वाया न घालविण्याचा सतत प्रयत्न करा. या तत्त्वानुरोधानेच माताजी गौरीमांच्या संस्था, रामकृष्णाश्रम व रामकृष्णमिशन या सर्वांकडे सहानुभूतिपूर्वक लक्ष पुरवीत असत.

माताजी सांगत की पारमार्थिक मार्गात पडलेल्यांना सबुरी असावी लागते; येणाऱ्या अडचणी सोसाव्या लागतात. अडचणी, दु:खे, त्रास ही

परमेश्वराच्याच कृपेची लक्षणें आहेत असे त्या वारंवार सांगत. अशावेळी परमेश्वराची कळवळून प्रार्थना करावी; तळमळून परमेश्वराचे नाव घेत रहावे. देहाबाबत असक्ति असणे ही या मार्गातील मुख्य गोष्ट होय. देह आज आहे, उद्या नाही; मध्यंतरीचे आयुष्य दुःखांने व त्रासाने गजबजलेले; म्हणून त्यागाकडे नजर ठेवा; विषयविन्मुख व्हा; असे झाल्यावरच परमेश्वरी ज्ञान हृदयात उगवू लागेल.

थोडक्यात त्या म्हणत की ज्याने सर्वस्व सोडले तो परमेश्वरच होय; अशाला त्याचे पूर्वसंचितसुद्धा कांही करू शकत नाही. परमेश्वराचा ध्यास ज्याला लागला त्याचे नशीबच नाहीसे होते. त्या नेहमी म्हणत असत की बाबांनो परमेश्वर प्राप्ति होणे म्हणजे आपल्याला कांही शिंगे थोडीच फुटायची असतात ? नाही. तर नित्यानित्यविवेक, आत्मानात्म विचार, यांच्या योगे हृदयात ज्ञानोदय होणे व ज्ञानाने जन्ममरणासारख्या सर्व द्वंद्वामधून अतीत होणे हीच खरी प्राप्ति.

• • •

# प्रकरण सोळावे

## अवसान :

सन १९१९ च्या जानेवारी महिन्यांत राधूचे गर्भारपणी दिवस भरत आल्यामुळे माताजी जयरामवाटीस गेल्या. राधूचे अशक्त शरीर, त्यांत वेडेपणाची लहर, त्यांत फिरून गर्भारपणाचा त्रास, अशा स्थितीत राधूला तर त्रास झालाच पण माताजींनाही फार त्रास झाला. कसे तरी निर्वेदपणे राधूचे बाळंतपण एकदाचें झालें; परंतु राधूची स्थिति दिवसेंदिवस फार खालावत चालली. यामुळे यावेळेस जवळजवळ वर्षभर माताजींना तेथे काढावे लागले. या कालाच्या शेवटच्या दोन तीन महिन्यांत माताजींना मलेरियाने पछाडले. त्या इतक्या आजारी झाल्या की त्यांच्या अंगातील शक्ति जवळजवळ नाहीशी झाली. घराशेजारच्या सिंहवाहिनीच्या देवळांत जाणे त्यांना अशक्य झाले. शारदानंदांना ही स्थिति कळल्याबरोबर त्यांनी माताजींना परत कलकत्त्यास आणले. सन १९२० च्या फेब्रुवारी महिन्यांत एक दिवस माताजी कलकत्त्यास आपल्या घरी येऊन पोहोचल्या. त्या दिवशी प्रथमच जेव्हा माताजींना गोलपमा व योगिन्मा यांनी बघितले त्यावेळेस त्या म्हणाल्या की माताजी येथून गेल्या कोणत्या स्थितीत आणि आल्या कोणत्या स्थितीत; नुसता हाडांचा सापळा परत आलेला दिसतो आहे. आल्याबरोबर औषधोपचार सुरू झाले. माताजींना रोज १०२ डिग्री ताप येत असे. प्रथम वैद्यकीय उपचार सुरू झाले. वैद्यांनी हात टेकल्यावर डॉक्टरी उपचार सुरू झाले. आलटून पालटून असे कितीतरी दिवस नानातऱ्हेचे उपचार झाले; पण १०२ डिग्री ताप मात्र जसाचा तसाच. त्यातच पुढे अंगाचा दाह सुरू झाला. रात्रंदिवस वारा घालून सुद्धा दाह कमी होईना;

हाताघायांना सारखा बर्फ चोळून सुद्धा किंचित्‌ही आराम वाटेना. योगिन्‌मांचे हातात हात धरून ठेवण्यानेच काय तो थोडासा दाह कमी वाटत असे.

डॉक्टरांचे औषध चालू होते; खाण्यापिण्याची व्यवस्था डॉक्टरांच्या हुकूमाप्रमाणे ठेवली गेली होती. एक दिवस एका वैद्याने माताजींना पाहिले व सांगितले की आहार तो काय आहे आता माताजींचा; त्यांना आवडेल ते द्या खायला आता; कितीशा खाणार आहेत त्या. हे ऐकून जेवणाचे वेळी अन्न वाढून ताट माताजींचे समोर आणले गेले, त्यावेळी एक डॉक्टर साहेब माताजींना भेटायला आले. त्यांनी ते पदार्थ पाहिल्याबरोबर त्यांचे माथे भडकले आणि ताट घेऊन येणारणीला ते खूप बोलले, व शेवटी म्हणाले की हे असे नाही चालायचे; मी आतां दोन नर्सेस येथे धाडून देतो; त्या त्यांची व्यवस्था नीट ठेवतील. असे बोलून डॉक्टरसाहेब निघून गेले. त्या बाईला अत्यंत वाईट वाटलेसे पाहून माताजी तिला म्हणाल्या की पोरी, वाईट वाटून घेऊ नको; तुझे कांही चुकलेले नाही. डॉक्टरांचे वागणे अगदी अयोग्य होते. मी कोणत्याही बुटवालीकडून (नर्सेस बूट घालतात यावरून बूटवाल्या बाया असे माताजी म्हणत असत) सेवा शुश्रुषा करून घेणार नाही. या सर्वांचा परिणाम इतकाच झाला की जे कांही थोडेसे खात असत तेही बंद झाले.

या आजारात माताजी अगदी लहान मुलीसारख्या वागू लागल्या. अगदी लहान मुलीप्रमाणे त्या हट्ट करू लागल्या. गंगास्नानाचा त्या फार हट्ट घेत. अशावेळी त्यांची समजूत घालणे फार कठीण होई. शेवटी कोणी तरी कबूल करीत असे की उद्या मी तुम्हाला गंगास्नानाकरिता घेऊन जाईन; व मगच त्या अन्नाला शिवत असत. असेच एकदा रात्री कोणीतरी ताट पुढे आणून ठेवले व माताजींना खायला घालायला सुरवात झाली इतक्यात काय झाले कोणास ठाऊक; माताजी एकदम बिघडल्या व अडून बसल्या व म्हणाल्या की आम्ही नाही खाणार जा. मग काय, भोवतालच्या प्रत्येकाने

माताजींची परोपरीने समजूत घालण्याचा प्रयत्न केला. कितीतरी वेळ गेला पण माताजींची समजूत होईना. त्या म्हणत होत्या की मला नुसते खा खा म्हणून प्रत्येक जण म्हणतो आणि माझ्या खाकेत एक 'नळी लावतो; बस आम्ही नाही खाणार. शेवटी एकाने धाक दाखविला की आता शारदानंदांना सांगू बरं का. शारदानंदांचे नांव काढल्याबरोबर माताजी नेहमी गुपचुप बसत व खाऊ लागत. पण आज त्याचा उपयोग झाला नाही. शारदानंदांना बोलावू का आता, असे ऐकल्याबरोबर माताजी चिडून बोलल्या की जा, जा, बोलवा त्याला; मी नाही खाणार. शेवटी इतक्या रात्री शारदानंदांना बोलावून आणले. नेहमी शारदानंद आले की माताजी गोषा करीत असत; पण आज शारदानंद समोर आल्यावर त्या तशाच बसल्या व त्यांनी शारदानंदांना जवळ बोलावून बसवून घेतले, आणि मोठ्या प्रेमाने त्यांचा चेहरा कुरवाळून, त्यांचे दोन्ही हात आपल्या हातात घेऊन म्हणाल्या की पहा बरं बाळ, मला हे लोक किती त्रास देत आहेत; सारखे सारखे एक नळी माझ्या खाकेत लावतात व सारखे खा खा म्हणतात; या सर्वांना मला त्रास न देण्याबद्दल ताकीद दे. शारदानंदांनी यावर गोड शब्दांनी प्रथम माताजींचे सांत्वन करून मग ते म्हणाले की आई, पण थोडेसे खायला हवे, नाही का बरे ? त्यावर माताजी म्हणाल्या की तूच खायला घाल मला; मी दुसऱ्याच्या हातचे खाणारच नाही; या लोकांना कांही समजत नाही. मग शारदानंदांनी गोड गोड बोलत माताजींना थोडेसे दूध पाजले व माताजी थकल्याचे पाहून म्हणाले की आई, आता अगदी स्वस्थ पडून रहायचं बरं; मग कांही वेळाने आपण आणखी थोडे दूध पिऊ. बस; या शारदानंदांच्या बोलण्याने माताजींची एकदम कळी खुलली; त्या लगेच बाकीच्या लोकांना म्हणाल्या की पहा बरं शरद कसे म्हणतो की आता पहिल्यांदा आपण थोडी विश्रांति घेऊ नी मग फिरून थोडेसे दूध पिऊं. यांच्यापैकी एकाला सुद्धा असे नीट बोलता येत नाही. पहाना माझ्या

बाळाला (म्हणजे शारदानंदांना) इतक्या रात्री विनाकारण उठवून आणून त्रास दिला. पहा बरे माझ्याकरिता बिचारा कितीतरी त्रास सहन करतो तो. मग म्हणाल्या की जा बाळ, तुला या लोकांनी विनाकारण त्रास दिला; जा जाऊन नीज आता. गोलपमा वगैरे जवळच्या मंडळींना किती हसू येत असले पाहिजे हा प्रसंग पाहून ! त्यांच्यापुढे एक मोठा प्रश्न पडला होता या प्रसंगाने की शारदानंद बाळ की माताजी बाळ ! एकीकडे असा हा बालहट्ट चाले तर दुसऱ्याक्षणी माताजींचा मातृभाव जागृत होत असे.

घरांतल्या सर्वांची जेवणे झाल्याशिवाय त्या कधी कांही तोंडात घालीत नसत. कोणीही डॉक्टर किंवा वैद्य आला तर त्याला जातांना खाऊ म्हणून फळे किंवा मिठाई द्यायला विसरत नसत एकदा कांही भक्तांनी दिलेली फळफळावळ घेऊन जयरामवाटीहून एक बाई माताजीं-कडे आली. त्यावेळी अतितापामुळे माताजी शुद्धीत नव्हत्या; दुसऱ्या दिवशी ही हकीकत ऐकून स्वतःला माफी करण्याचा निरोप त्यांनी जयराम-वाटीस धाडला.

जावयाच्या आधी महिनाभर रामकृष्णांचा फोटो त्यांनी आपल्या खोलीतून हलविण्यास सांगितले; याचे कारण म्हणून त्यांनी सांगितले की मला हातपाय धुण्यास बाहेर जाववत नाही, येथेच सर्व करावे लागते, अशा स्थितीत रामकृष्ण या खोलीत कसे राहू शकतील ? याच दिवसा-पासून त्यांनी आपला बिछाना जमिनीवर घालवून घेतला. अशा स्थितीत सुद्धा कांहीही पदार्थ तोंडात टाकायचा म्हणजे रामकृष्णांना दिल्याशिवाय त्या घेत नसत. कोणी विचारले की माताजी, आता केव्हा बऱ्या होणार आपण ! तर सांगत की ते रामकृष्णांना माहिती; त्यांच्या मनावर सर्व अवलंबून असते. एक दिवस दक्षिणेश्वराच्या जुन्या आठवणी काढूनकाढून गौरीमाशी बोलत होत्या. त्यावेळेला गौरीमा म्हणाल्या सुद्धा की माताजी ही राधूची भानगड उत्पन्न होईतोपर्यंत तुमची तब्येत किती चांगली होती.

माताजी जावयाच्या थोडे दिवस आधी त्यांनी राधूला बोलावून तिला तावडतोब जयरामवाटीस निघून जाण्यास सांगितले. पुष्कळ जणांनी या विषयी मध्यस्थी केली पण माताजींनी प्रत्येकास तेच तेच निक्षून सांगितले. याबद्दल त्यांना विचारल्यावरून त्या म्हणाल्या की आता राधूवरून मी आपले मन काढून घेतले आहे; तिला तावडतोब जयरामवाटीस धाडून द्या. हे ऐकून योगिन्मा म्हणाल्या की माताजी आपण राधूवरून आपले मन काढून घेतलेत, तर आता आमचे कसे होईल ? यावर माताजी म्हणाल्या की योगिन् मी राधूवरील आसक्ति आता बाजूस केली आहे; पुरे झाले हे सर्व आता. योगिन्मांनी ही सर्व हकीकत शारदानंदांना सांगितली. हे ऐकून शारदानंद अगदी सुन्नच झाले. शेवटी ते म्हणाले की योगिन्मा याचा अर्थ एकच की माताजी आता रहाणार नाहीत; आपण त्यांना थोपवून धरू शकणार नाही. तरीपण तुम्ही सर्वजण कसून प्रयत्न करा की माताजींचे मन परत राधूकडे वळावे. सर्वांनी कसून नानातऱ्हेचे प्रयत्न केले; शेवटी माताजी म्हणाल्या की बाबांनो जे मन एकदा तेथून निघाले ते तेथे परत कसे जाईल ? ते शक्य नाही. यानंतर एक दोन दिवसांनी राधूचे रांगते मूल रांगत रांगत माताजींचे जवळ येऊन त्यांना हालवू लागले. तो माताजी म्हणाल्या कीं अरे उचला कोणी तरी या पोराला आणि घेऊन जा तिकडे; एकदा सांगितले ना तुम्हाला की यातून मी आपले मन काढून घेतले आहे म्हणून ? आता मला या मुलाची पर्वा नाही; उचला त्याला येथून.

हळूहळू हातापायावर सूज आली. अंथरुणांत सुद्धा माताजींना उठून बसता येईना याच दिवसामधे एके दिवशी अन्नपूर्णा नांवाच्या मुलीची आई त्यांच्या दर्शनार्थ म्हणून आली व खोलीचें दारांत गुपचूप स्वस्थपणे उभी राहिली. कांही वेळाने माताजींनी तिला खूण करून जवळ बोलावले. ती बाई जवळ गेली खरी पण तिला ती स्थिति पाहून भरून आले; ती

हुंदके देऊं लागली व म्हणाली की आई, आता आमचे कसे होणार ? आम्हाला कोण सांभाळणार ? त्यावर माताजी अगदी अस्पष्ट आवाजांत तिला म्हणाल्या की मुली, शांत हो; तुला भीति का वाटते ? घाबरू नको. रामकृष्णांना तू पाहिले आहेस ना ? मग तुला भीति कसली ? माझे एक सांगणे ध्यानांत ठेव; जर तुला मनाची शांतता पाहिजे असेल तर दुसऱ्यांचे दोष पहाणे सोडून दे ; स्वतःचे दोष शोधून शोधून काढ. सर्व जग आपलेच आहे असे समजत जा. पोरी, या जगांत परका असा कोणीच नाही, कांहीच नाही; हे सर्व जग तुझेच तर आहे. हे शब्द म्हणा, उपदेश म्हणा, त्यांचा शेवटचाच ठरला.

शेवटचे तीन दिवस माताजी जवळ जवळ शुद्धीवर नव्हत्या, म्हणजे एक तर त्या अगदीच अशक्त झालेल्या व दुसरे म्हणजे त्या अंतर्मुख झालेल्या होत्या. गौरीमांनी जवळ जाऊन पुष्कळ वेळ माताजी माताजी म्हणून हाक मारल्यावर त्या शुद्धीवर येऊन म्हणाल्या की तुम्ही लोक मला का डिवचता, का त्रास देता. शारदानंदांना त्यांनी जवळ बोलावून सांगितले की शरद मी जाते आहे; योगिन्, गोलप येथेच आहेत; त्यांची काळजी घे. जायच्या आधल्या दिवशी त्यांनी शारदानंदांना जवळ बोलावून घेतले, पण एक दोन शब्दापलीकडे त्या बोलू शकल्या नाहीत.

अगदी शेवटी त्यांना घोर लागला व त्यांचा चेहेरा अगदी काळाकुट्ट झाला. पण आश्चर्य हे की देह सोडल्याबरोबर त्यांचा चेहेरा अगदी भरदार व टवटवीत दिसूं लागला; चेहेऱ्यावर विचित्र सोनेरी तेज दिसूं लागले; गांभीर्य व शांतता यांची जणू मूर्तिच असा तो चेहेरा साक्षात् दुर्गाच येथे निजली आहे असा दिसूं लागला.

तारीख २० जुलै सन १९२० रोजी पहाटे दीड वाजता माताजींनी महासमाधि घेतली.

दुसऱ्या दिवशीं सकाळपासून माताजींच्या शेवटच्या दर्शनार्थ स्त्री-पुरुषांची नुसती रीघ लागलेली होती. त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या देहास गंगास्नान घालून उद्बोधन ऑफीसमधून मिरवणूक बेलूर मठात आली व त्याच मठाचे आवारात गंगाकाठी अंत्यविधि उरकला गेला. आज त्या जागी शारदानंदांनी उभारलेले माताजींचे देवालय आहे. उद्बोधन ऑफीस-च्या जागेंत रामकृष्णांचे समोरच त्यांचे छायाचित्र लावलेले आहे. जयराम-वाटीस त्यांच्या जन्मस्थानी शारदानंदांनी सुंदर देवालय बांधले आहे. या देवालयास लागून रामकृष्णमठांची शाखा असून, या मठांत त्यांचे पूर्ण आकाराचे तैलचित्र लावलेले असून त्यासमोर वसले असता अजूनही माताजी आपल्या समोरच बसल्या असून आपल्याकडेच त्या हास्ययुक्त नजरेने पहात आहेत असा सदैव सारखा भास होतो.

## माताजींच्या आठवणी

माताजींच्या आठवणी म्हणजे माताजींचे उपदेश देणे व मनावर ठसविणे, माताजींचा स्वभाव, माताजींची विविध विषयावरील मतें वगैरेंचे संकलन होय. या आठवणींचे तीन भाग केले आहेत. पहिल्या भागांत एका स्त्रीभक्ताने ठेवलेल्या दैनंदिनीतील वेचे, दुसऱ्या भागांत निरनिराळ्या संसारी भक्तांनी सांगितलेल्या व तिसऱ्या भागांत संन्याशी मंडळींनी सांगितलेल्या हकीकती व वेचे दिले आहेत.

## भाग पहिला

जयरामवाटीस माताजींच्या घरासमोर बाहेरगांवचे कांही मजूर लोक झोपड्यामधून रहात होते. एका मजुराने एक बाई ठेवलेली होती. ही बाई एकदा बरीच आजारी पडली व तिची सेवा शुश्रुषा त्या मजुराने केली. ही सेवाशुश्रुषा पाहून माताजी म्हणत की काय काय सेवा त्या माणसाने त्या बाईची केली; अशी सेवा मी कुठेच पाहिली नाही. आम्ही ठेवलेली बाई म्हणून नाक मुरडून बाजूला झालो असतो; पण माताजींना त्याची अविश्रांत सेवाच काय ती दिसली; व या सेवेचे कौतुक माताजी वारंवार करीत. चांगले काय ते पहायचे, मग ते कुठेही असो, हा एक माताजींचा मोठा गुण होता.

× × ×

गिरीशबाबूंना जाऊन आज चौथा दिवस होता. माताजी यामुळे फार दुःखी होत्या. अशा स्थितीत एक स्त्रीभक्त त्यांना भेटायला आली. तिला माताजी म्हणाल्या की, काय ती गिरीशची रामकृष्णांच्यावरील

श्रद्धा ; तिला तोड नाही. मी एक गिरीशची गोष्ट तुला सांगते. गिरीशच्या मनांत येई की रामकृष्णांनी आपल्या येथे मुलगा म्हणून यावे व एक दिवशी तो रामकृष्णांना तसे म्हणाला देखील. त्यावर रामकृष्ण त्याला म्हणाले की, का म्हणून मी तुझ्या येथे जन्म घ्यावा ? पण कुणास माहीत; रामकृष्ण गेल्यावर गिरीशला एक मुलगा झाला; तो मुकाच होता; खुणावरून त्याचा सर्व कारभार चाले. गिरीशच्या घरी माडीवर माझा फोटो लावलेला होता. एक दिवस तो फोटो त्या पोराने पाहिला व तो पहाण्याकरितां सर्व घर त्याने तेथे जमवले; तो फोटो बापाने पहावा असे त्या पोराला वाटले व तो पोरगा तसे सुचवूं लागला. ते समजून गिरीश म्हणाले की बाळ, त्या फोटोकडेसुद्धा पाहाण्याची माझी पात्रता नाही; मी मोठा पापी आहे. शेवटी त्या पोराने गिरीशला माझ्याकडे यावयाला लावले; पोराला खांद्यावर घेऊन तो त्या दिवशी माझ्याकडे आला व म्हणाला की आई ह्या पोराने आपल्याचरणाजवळ मला आणले. लवकरच पुढे तो मुलगा गेला.

× × ×

एकदा एक स्त्रीभक्त भेटायला आल्यावर माताजींनी तिला स्वतःला वारा घालायला सांगितले. कांही वेळाने एकदम त्या म्हणाल्या की तुम्ही सर्वजण येथे आलांत पण रामकृष्ण कुठे आहेत ? त्यावर त्या बाईने उत्तर दिले की त्यांना आजपर्यंत पाहिलेले नाही; पुढे कोणच्या जन्मी त्यांचे दर्शन होईल कोणास ठाऊक. पण मी फार भाग्यवान् खरी की आपल्या चरणांचे मला दर्शन झाले. यावर माताजी म्हणाल्या की खरे आहे तुझे म्हणणे. असे स्पष्ट कबुली देतांना माताजींना मी कधी ऐकले नव्हते.

× × ×

एकदा एक स्त्रीभक्त सकाळी माताजींना भेटण्यासाठी आली तो माताजी गोलपमाबरोबर गंगास्नानास निघाल्या होत्या; पाऊस झिमझिम

पडत होता. माताजींनी तिला विचारले की येतेस का गंगा स्नानाला. तिने हो म्हटले; पण इतक्यात गोलपमा म्हणाल्या की कशाला या पावसाचे. माताजी म्हणाल्या की बरं तर, नको मग; तू थांब येथेच; आम्ही आता परत येतो. माताजी आपले मत दुसऱ्यावर लादीत नसत. परत आल्यावर माताजी म्हणाल्या की आम्ही बाहेर पडलो व पाऊस थांबला; तू आली असतीस तर तुला गंगास्नान झाले असते. हे ऐकून गोलपमा म्हणाल्या की, नाही गंगास्नान झाले तर बिघडले कुठे ? तुमच्या पायावर डोके ठेवले की सर्व कांही मिळते. यावर मी पण होकारार्थी मान हालविली. लगेच माताजी म्हणाल्या की असे नको म्हणू; गंगास्नान ते गंगास्नान; गंगा-माता आहे ती. आई कधीही एका शब्दाने आपला मोठेपणा, आपले वैभव दाखवीत नसते; इतर दहाजणी सारखेच आपण आहोत असे ती दाखविते. एखादे वेळी एखाद्याच्या नशिवांत असले तरच ती आपले खरे स्वरूप त्याला दाखविते.

× × ×

एकदा दुपारी माताजी बसल्या होत्या व भोवताली रामकृष्णांना पाहिलेल्या व न पाहिलेल्या अशा बाया बसल्या होत्या. त्यामधे एकीने दुसरीला म्हटले की तुम्ही रामकृष्णांना पाहिले आहे तर त्यांच्या कांही गोष्टी सांगा ना. त्यावर ती बाई म्हणाली की मला काय विचारतेस त्यांच्या गोष्टी; माताजींनाच विचार की. म्हणून तिने माताजींना तसेच विचारले. माताजी थोडावेळ डोळे मिटून स्वस्थ बसल्या व मग कांही वेळाने म्हणाल्या की जो परमेश्वराची प्रार्थना करतो त्याला परमेश्वर दर्शन देतो. रामकृष्णांचा तेजचंद्र नांवाचा एक अगदी गरीब भक्त होता. त्याच्याजवळ एकाने एकदा दोनशे रुपये ठेवायला दिले. तो ट्राममधून जात असतांना त्याच्या खिशांतून ते पैसे चोरीस गेले. हे त्याला उमगल्यावर तो बेचैन झाला. आता दोनशे रुपये कोठून आणायचे हा एकच प्रश्न त्या गरिबा-

समोर उभा राहिला. त्याला कांही सुचेना. तो तसाच गंगाकाठी आला व डोळ्यांत आसवे आणून म्हणाला की सद्गुरो काय झाले हे ? त्याबरोबर रामकृष्ण त्याच्यासमोर उभे राहून म्हणाले की बेटा घाबरू नको; अमक्या झाडाखाली विटांच्याखाली पैसे आहेत ते घे. असे म्हणून ते गुप्त झाले. तेजचंद्र खुणेने तेथे गेला व बुंध्याजवळ असलेल्या विटा उचलतो तो त्याला नोटांचे पुडके दिसले; ते त्याने घेतले. त्याने ही गोष्ट शारदानंदांना सांगितली. यावर शारदानंद म्हणाले की तुम्ही मोठे भाग्यवान् लोक आहा की, तुम्हांला आतासुद्धा त्यांचे दर्शन होते; पण आम्हाला--आम्हाला ते दिसत नाहीत. माताजी म्हणाल्या की ह्यांना त्यांनी का दिसावे ? ह्या लोकांनी त्यांना मनमुराद पाहिलेले आहे; यांच्या सर्व मनीषा त्यांनी पुऱ्या केल्या आहेत. ज्यांना त्यांचे दर्शन झाले नाही त्यांना त्यांच्या दर्शनाची किती उत्सुकता वाटते !

× × ×

फुलांच्या हाराची शोभा वाढविण्याकरितां सर्वच ठिकाणी कलाबत्तू वापरतात. असा हार आणला की माताजींना आवडत नसे; कारण त्या अंगात कांही घालत नसल्याने ती कलाबत्तू त्यांचे अंगाला टोचत असे. हे अर्थातच जवळच्या लोकांना माहीत असून ते हार आणणाऱ्यास आधी तसे सांगत. परंतु एकदा एकजण राचीहून माताजींचे दर्शनार्थ असा भारी हार घेऊन आला व तो माताजींना देऊन तो त्यांनी घालावा अशी त्याने हात जोडून प्रार्थना केली. ती प्रार्थना ऐकून माताजींनी तो हार गळ्यात घातला, इतक्यात गोलपमा तेथे आल्या व तो कलाबत्तूचा हार पाहून त्या हार आणणाऱ्या माणसास बोलल्या की माताजींना या तारा टोचतील हे सुद्धा तुम्हा लोकांना समजत नाही काय ? माताजी लगेच गोलपमाला म्हणाल्या की रागावूं नको ग त्याच्यावर; त्या बिचाऱ्याला काय माहिती ?

शिवाय पहा बरं मी तो लुगड्यावरून गळ्यात घातला आहे, तर मग आता त्या तारा मला कशा बोचतील ?

× × ×

एकदा एक बाई आम्हा लोकांना भेटायला आली. तिने आम्हाला विचारले की माताजींचे पति आहेत का अजून ? ही सर्व मुलेबाळे येथे दिसताहेत ती माताजींची नातवंड वगैरे का आहेत ? हे ऐकून एक स्त्रीभक्त त्या बाईस म्हणाली की बाई काय बोलता आहा ? ज्या रामकृष्णांनी कामिनीकांचन सोडून देण्याचा धडा स्वतः आचरून दाखविला, त्यांना मुलेबाळे, लेकी सुना कशा असतील ? त्या दिवशी संध्याकाळी हे संभाषण कोणीतरी माताजींना सांगितले. त्यावर माताजी म्हणाल्या की उत्तर देणारणीचे थोडेसे चुकले; तिने सांगायला पाहिजे होते की जगातील सर्व मोठी माणसे माताजींची मुले असून सर्व लहान मंडळी नातवंड पतवंडच तर आहेत.

× × ×

एकदा एका बाईने विचारले की माताजी मूर्तिपूजेत कांही तथ्य आहे काय ? आम्हाला आमचे गुरु सांगतात की सूर्याची व अग्निची पूजा करावी; ते मूर्तिपूजेच्या फार विरुद्ध आहेत. यावर माताजी म्हणाल्या की मुली आपल्या गुरूने सांगितलेल्या शब्दावर विश्वास ठेवावा. तुझ्या गुरूने सांगायचे ते सांगितल्यावर मला काय फिरून विचारतेस ? ती म्हणाली की माताजी मला तुमचे मत पाहिजे; असे म्हणून तिने माताजींना गळ घातली. शेवटी माताजींना तिने उत्तर द्यावयाला लावले. माताजी म्हणाल्या की बाळ, मला माफ कर बरं, पण तुझा गुरु मला जरा कच्चाच दिसतो. त्याला स्वानुभव असता तर तो असे म्हणता ना. अनंत काळापासून आपणाकडे मूर्तिपूजा चालत आली असून तिच्या योगे हजारो लोक आतापर्यंत पूर्णत्वास पोहोचलेलें आहेत ही गोष्ट तुला माहीत नाही

का ? बाळ, रामकृष्ण असे एकांगी नव्हते. ब्रह्म सर्वत्र भरलेले आहे. मोठमोठी माणसें व अवतार हे मानवांना मार्ग दाखविण्याकरिताच जन्म घेतात. निरनिराळ्या माणसांना त्यांच्या त्यांच्या स्वभावास अनुसरून निरनिराळे मार्ग त्यांनी दाखविले. स्वानुभव प्राप्त्यर्थ हजारो मार्ग आहेत; सर्व मार्ग सरते शेवटी ब्रम्हांत लीन होतात. तोपर्यंत प्रत्येक मार्गाची तेवढ्या तेवढ्या पुरतीच सापेक्ष किंमत असते. एकाच झाडावर असंख्य रंगाचे, जातीचे, आवाजाचे पक्षी बसलेले असतात व ते बोलत असतात; पण आपण जेव्हा लांबून ऐकतो त्यावेळी पक्षांची किलबिल ऐकूं येत आहे असे म्हणतो. ती बाई गेल्यावर माताजी म्हणाल्या त्या बाईने अशी वादावादी करायला नको होती. कित्येक दिग्गजांनी ब्रम्हाबद्दल वाद केले आहेत. ब्रम्ह हे बुद्धीने किंवा वादाने प्राप्त करण्यासारखी गोष्ट थोडीच आहे ?

× × ×

शाळा सुरू व्हावयाच्या वेळी राधूने शाळेत जावे न जावे याबद्दल बोलणे चालले होते. त्यावर गोलपमा म्हणाल्या की झाली राधू आता मोठी; कशाला तिने शाळेत जायला पाहिजे आता ? यावर माताजी म्हणाल्या की नाही; जाऊ दे तिला शाळेत. शिक्षणाचा उपयोग स्वतःला तर होतोच, पण त्यामुळे दुसऱ्याच्या पण उपयोगी पडता येते.

× × ×

एका स्त्रीभक्ताने पारमार्थिक मार्गाबद्दल माताजींना पुष्कळ प्रश्न विचारले व त्यांची त्यांनी उत्तरें दिल्यानंतर त्या शेवटी तिला म्हणाल्या की, मुले मी व रामकृष्ण एकच, आमच्यांत फरक करूं नको. ज्या स्वरूपाचा उपदेश तुला झाला असेल त्या स्वरूपाचे ध्यान करीत जा. ध्यान हे हृदयात सुरू होऊन डोक्यांत संपते. मंत्र व स्तोत्र ही कांही उपयोगाची नाहीत; श्रद्धा व भक्ति यांनीच काय ते साध्य होते. ध्यानांत ठेव की

रामकृष्ण हेच इष्ट दैवत, रामकृष्ण हेच गुरू, रामकृष्ण हेच सर्व, रामकृष्ण हेच सर्वस्व होय.

× × ×

एकदा कांही लोक आले व माताजींना उपदेश द्या म्हणून म्हणू लागले. माताजी म्हणाल्या की मी काय सांगणार तुम्हाला. रामकृष्णांनी एवढे सांगून ठेवले आहे ते पहा. त्याच्यातील थोडेसे आचरणात आणाल तर सर्व कार्य होईल ते लोक गेल्यावर माताजी म्हणाल्या की परमार्थाचा अधिकारी विद्यार्थी आहेच कुठे ? प्रथम माणसाने अधिकार प्राप्त करून घ्यावा; नाहीतर उपदेशाचा उपयोग काय ?

× × ×

एकदा अन्नपूर्णाची आई माताजींना म्हणाली की स्वप्नात आपण मला सांगितलेत की माझा प्रसाद घे म्हणजे तू बरी होशील. मला रामकृष्णांनी सांगितले होते की कोणाकडूनही प्रसाद घेऊ नको; तरीपण आपण मला प्रसाद द्याल तर मला आनंद होईल. माताजी नाही म्हणाल्या, त्यावरून तिने माताजींचा पिच्छा पुरवला; त्यावर माताजी म्हणाल्या की रामकृष्णांनी दिलेली आज्ञा तू मोडणार काय ? त्यावर त्या बाईने उत्तर दिले की मुळीच नाही; रामकृष्ण व आपण जोपर्यंत निराळे असे मला वाटत होते तोपर्यंत मी तुमच्याकडून प्रसाद घेतला असता तर आज्ञाभंग झाला असता पण मला आता उमजून चुकले आहे की आपण व रामकृष्ण एकच; आता आपला प्रसाद घेतला तर आज्ञाभंग होणार नाही. माता-जींना तिला प्रसाद देणे भागच पडले.

× × ×

माताजी दुपारी आपल्या खोलीत बसल्या होत्या. समोर मजूर लोक रहात होते. त्यांच्यामध्ये एकाएकी हल्ला झाला. एकजण आपल्या बायकोला स्वयंपाक वेळेवर न झाल्यामुळे रागावून बोलू लागला व रागाच्या भरात

त्याने तिला लाथ मारली व ती उन्मळून पडली. त्याबरोबर माताजी आपल्या जागेवरून उठून पोर्चमधे आल्या व त्या माणसाला ओरडून म्हणाल्या की मूर्खा, तिला मारून टाकतोस काय ? मेली सुद्धा असेल ती. हे ऐकून तो माणूस एकदम स्तब्ध झाला व रडू लागला. माताजी गोषा पाळत असत; पण यावेळी तो अन्याय पाहून त्या एकदम धावून आल्या.

× × ×

एकदा माताजी म्हणाल्या की नवीन भक्त बनला की त्याला पूजा करायला सांगत जावे. जुने भक्त पूजा करायचा कंटाळा करतात. पूजेची साधनसामुग्री शुद्ध असली पाहिजे. वेळच्या वेळीच पूजा नैवेद्य झाला पाहिजे; पूजा निर्दोष होण्याचा कसून प्रयत्न झाला पाहिजे. मग जर चुका झाल्या तर त्या अज्ञानामुळे होत असल्याने परमेश्वर त्याच्याबद्दल क्षमा करतो.

× × ×

एकदा कांही जणांनी षट्चक्राबद्दल माताजींना विचारले. माताजी म्हणाल्या की रामकृष्णांनी मला हे सर्व समजावून दिले होते व एका कागदावर चित्रे काढून त्यांनी मला तो दिला होता. गेला, झाले; तो कागद आता. मला काय माहिती की तुम्ही इतकेजण मला त्या संबंधाने विचारायला याल; नाहीतर मी तो जतन करून ठेवला असता.

× × ×

असेच एकदा माताजी एका शिष्याला म्हणाल्या की, शिष्याला सुद्धा योग्य काय हे गुरूला सांगण्याचा अधिकार आहे; पण या शिष्याची गुरूवर अचल श्रद्धा पाहिजे. गुरु कसाही असो गुरूवर नितांत श्रद्धा पाहिजे; अशी श्रद्धा ठेवणारास मुक्ति मिळतेच. रामकृष्णांच्या शिष्यांची त्यांच्यावरील श्रद्धा पाहा; या श्रद्धेमुळेच त्यांना रामकृष्णांचा ज्यांच्या ज्यांच्याशी संबंध

आला त्यांच्याबद्दल आदर वाटतो; रामकृष्णांच्या गांवाजवळच्या मांजर व कुत्र्यावर सुद्धा ते प्रेम करितात.

× × ×

एकदा माताजी गच्चीवर केस सुकवीत बसल्या होत्या व एक स्त्री-भक्त त्यांच्याजवळ बसली होती. इतक्यांत गोलपमा तेथे आल्या व म्हणाल्या की नैवेद्य तयार आहे. माताजी तशाच खाली आल्या व पूजेच्या खोलीत नैवेद्य घेऊन गेल्या; तेथे दुसरे कोणी नव्हते. कांही वेळाने गच्ची-वर बसलेली बाई हळूच खाली आली व माताजींचे मागे उभी राहिली; माताजींचे तिकडे लक्षच नव्हते. ती बाई सांगत होती की नवीन लग्न झालेली मुलगी जशी प्रेमाने एकांतात लाजून आपल्या नवऱ्याला विनविते त्याच विनयाने माताजी रामकृष्णांचे फोटोसमोर उभ्या राहून त्यांना विनवीत होत्या की, जेवायचना आता. गोपाळा येना जेवायला. एकाएकी कोणीतरी मागे उभे आहे असा त्यांना भास झाल्यामुळे त्यांनी वळून मला उभी असलेली पाहिले व हासून म्हणाल्या की पहा, मी सगळ्यांना जेवायला बोलावते आहे. ती बाई सांगत होती की त्यांचा तो हावभाव पाहून माझी खात्री झाली की या सर्व मूर्ति जिवंतच असल्या पाहिजेत. या भावनेने कितीतरी वेळ मी वेंधळ्यासारखी त्या फोटोंकडे पहात होते; मग मला सुचले की हे मला कसे दिसणार ?

× × ×

एकदा एक भक्त टोपलीभर फुले घेऊन आला व ती त्याने माताजींना वाहिल्यावर रिकामी टोपली कोठे टाकू असे शेजारच्या संन्याशी भक्तास विचारले. त्याने शेजारच्या गल्लीत फेकून देण्यास सांगितले व त्याने तसे केले. तो गेल्यावर माताजी म्हणाल्या की पहा, या टोपलीची किंमत या संन्याशांना काय समजते ? द्या फेकून म्हणून त्याने सांगितले. आपण असे करून कसे चालेल. असे म्हणून ती टोपली गल्लीतून उचलून आणण्यास

त्यांनी एकाला सांगितले व ती आणल्यावर त्यांनी ती एका बाजूस जपून ठेवली. वस्तू कितीही हलकी असो तिचा उपयोग करून घेण्याचे तत्त्व मातार्जींनी आपल्या स्त्रीभक्तावर बिंबविले.

× × ×

एकदा माताजी म्हणाल्या की प्रत्येकजण दुःखाबद्दल तक्रार करतो; जग दुःखाने भरलेले आहे असे म्हणतो; आम्ही परमेश्वराची इतकी प्रार्थना करतो पण आमचे दुःख किंचित्सुद्धा कमी होत नाही असे म्हणतो. ह्या लोकांना हे समजत नाही की दुःख ही केवळ परमेश्वराची देणगी आहे; दुःख हे परमेश्वरी कृपेचे प्रतीक आहे.

फिरून कांही वेळाने त्या म्हणाल्या की या जगात दुःखाच्या कचाटयातून कोण सुटला आहे ? एकदा एक कृष्णसखी कृष्णाला म्हणाली की, कृष्णा तुला दयाळू कोण म्हणेल ? रामावतारी तूं सीतेला जन्मभर रडवलेस. या तुझ्या अवतारात तुझ्या नावाने राधा सारखी रडतच असते; जन्माचेवेळी आईबापांना तुरुंगवास करायला लावलेस. कृष्ण म्हणाला की, मग माझे नाव कशाला घेतेस ? त्यावर ती म्हणाली की मृत्यूची भीति नाहीशी होण्याकरिता मी तुझे नाव घेते.

× × ×

ज्या दिवशी स्वामी प्रेमानंदांनी (बाबुराम) देह सोडला त्या दिवशी संध्याकाळी एक स्त्रीभक्त मातार्जींकडे आली व पहाते तो माताजी ओक्साबोक्शी रडत होत्या. तिला पाहिल्याबरोबर माताजी म्हणाल्या की पहा बरे माझा बाबुराम गेला. त्यांना रडे आवरेना. बाबुराम माझा लाडका होता. बेलूरमठात दिसणारी भक्ति, श्रद्धा, बुद्धि, धैर्य वगैरे सर्वगुणांचे प्रतीक माझा बाबुराम होता; बेलूरमठाची ज्योत होता तो. नंतर राम-कृष्णांचे समोर उभे राहून म्हणाल्या की देवा माझा बाबुराम नेलात ना ?

किती कारुण्याचे चित्र होते ते ! कांही वेळाने माताजी म्हणाल्या की माझा बाबुराम किती हडकुळा झाला होता ? आणखी पुढे कांही बोलणार तो चंद्रबाबू नावाचा भक्त तेथे आला व म्हणाला की बाबूरामचे और्ध्वदेहिक आटपले. हे ऐकून माताजी म्हणाल्या की कोणीही असो या शरीराच्या उपयोगाकरितां जगात शेवटपर्यंत ज्याला त्याला किमत द्यावी लागते. साधारण पुरुष व सत्पुरुष यांच्यातला फरक इतकाच की साधारण माणसाला मरतांना दु ख होते व सत्पुरुष हसत हसत आनंदाने देहापासून वेगळा होतो.

नंतर म्हणाल्या की बाबुराम अगदी लहान वयांत रामकृष्णांकडे आला. रामकृष्ण नेहमी त्याची खूप थट्टा करीत असत व मग बाबुराम व नरेन् (स्वामी विवेकानंद) पोट धरधरून, जमिनीवर गडबडा लोळून हसत व रामकृष्ण त्यांचे बरोबर हसत. रामकृष्णांचे किती प्रेम होते माझ्या बाबुरामवर ! एकदा रामकृष्ण गळयाच्या रोगाने आजारी असतांना मी पडले व मला चालता येईना. त्यावर रामकृष्ण म्हणाले की गड्या, आता आम्हाला जेवायला कोण घालणार ? मला वाटते की तू व नरेन् मिळून तुमच्या माताजींना टोपलीत घालून येथे आणीत जा म्हणजे आम्हाला जेवण मिळेल ! यावर बाबुराम व नरेन् किती किती हसले ; हसून हसून त्यांची मुरकुंडी वळली. बाबुराम आपल्या आईला म्हणत असे की, तू आई खरी, पण रामकृष्ण जे माझ्यावर प्रेम करतात त्यांच्या शतांश प्रेम तू मजवर करीत नाहीस. तो रामकृष्णांना म्हणत असे की मी लग्न करणार नाही; लग्न केले तर मी मरून जाईन. शेवटच्या आजारात रामकृष्णांना गिळता येत नसे, त्यावर बाबुरामाने विचारल्यावरून ते म्हणाले की, का मी इतक्या तोंडाने रोज खातो आहे की. यावर बाबुराम म्हणाला की त्या तुमच्या हजारों तोंडांनी जेवणाच्या गोष्टी मला नका सांगू; मला ते कांही

समजत नाही व मला त्याची पर्वा नाही; तुम्ही या तोंडाने जेवा व ह्या शरीरातच तुम्ही मला दिसत रहा. बाबुरामचे आपल्या गुरूवरचे केवढे हे प्रेम !!

× × ×

माताजी एकदा सांगत होत्या की मला रक्तातिसार झाला होता व मी अगदी अशक्त व हडकुळी झाले होते. अशा स्थितीत मी तळ्यावर गेले असतांना माझे प्रतिबिंब मी तळ्यात पाहिले व माझ्या मनांत आले की, काय या शरिराचा उपयोग; सोडून द्यावे हे शरीर आता. इतके मनांत आले तोच एकाएकी कुठूनशी एक बाई तेथे येऊन म्हणाली की माताजी, इथे काय करता आहा तुम्ही; चला घरी जाऊ; व मग ती मला घरी घेऊन गेली.

× × ×

एक दिवस रामकृष्णांच्या संन्याशी भक्तांची एक गोष्ट माताजी सांगत होत्या. रामकृष्णांच्या नावाने सर्वस्वावर पाणी सोडलेले अशी ही मंडळी होती. रामकृष्णांच्या नंतर या लोकांनी अत्यंत हाल अपेष्टांत दिवस काढले होते. त्यांचा सर्व वेळ ध्यान धारणेत जात असे. एकदा या सर्वांनी ठरविले की आज खाण्यापिण्याकरिता बाहेर म्हणून जावयाचे नाही; रामकृष्ण आपली काय व्यवस्था करतात ते पाहू या. हे लोक सकाळपासुन ध्यान धारणेस बसले; दिवस संपला, रात्र पडली, शेवटी रात्री दहाचे सुमारास कोणी तरी दार खडखडावले. विवेकानंद उठले व त्यांनी आपल्या-पैकी एकाला उठून कोण आले आहे हे पहाण्यास सांगितले. दार उघडून पहातात तो गंगाकाठच्या गोपाळाच्या देवळातील पुजारी भरपूर प्रसाद घेऊन या लोकांना देण्याकरिता आला होता. रामकृष्ण भक्तांच्या परिक्षेत पास झाले ! रामकृष्णांना नैवेद्य दाखवून त्या लोकांनी प्रसाद ग्रहण केला.

अशा तऱ्हेचा अनुभव विवेकानंदांना दौऱ्यावर असतांना पुष्कळवेळा आला होता.

× × ×

एका दुर्गापूजोत्सवाचे वेळी विवेकानंदांची आई बेलूर मठात आली. मठ पाहून तिला मोठा अभिमान वाटला. ती इकडे तिकडे हिंडू लागली. माझ्या नरेन्‌ची कामगिरी या दृष्टीने ती ते सर्व पहात होती. इतक्यांत नरेन् तेथे आला व आपल्या आईला म्हणाला की तू इकडे तिकडे काय हिंडते आहेस; वर माताजीकडे जा ना. तुला काय ही सर्व नरेन्‌ची कामगिरी वाटते आहे काय; अग ह्या सर्वांत नरेन्‌चे कांही नाही; हे सर्व रामकृष्णांचे आहे हे ध्यानांत ठेव.

× × ×

एकदा दुर्गापूजोत्सवाप्रसंगी सर्व संन्याशी भक्त खूप जोरात तयारी करीत होते. त्यावेळी नरेन् माताजींकडे येऊन म्हणाला की माताजी मला खूप ताप येऊन मी आता आडवा पडायला पाहिजे असे तो म्हणाला मात्र आणि त्याला खूप ताप भरला. माताजी म्हणाल्या की मी अगदी घाबरून गेले; आता कसे होईल अशी मला काळजी पडली. त्यावर नरेन् म्हणाला की, माताजी मी आपण होऊन ताप पत्करला आहे; सर्वजण उत्साहाने काम करीत आहेत; थोडेसे त्यांचे चुकले तर मला राग येईल, मी बोलेन, कदाचित् मारीन सुद्धा, आणि मग त्यांना वाईट वाटेल, त्यांचा उत्साह भंग होईल; म्हणून तर मी अंथरुण पत्करले आहे. उत्सव यथा सांग पार पडल्यावर माताजी नरेन्‌ला म्हणाल्या की ऊठ बाळ आतां; आणि लगेच नरेन्‌चा ताप जाऊन तो उठून बसला.

× × ×

माताजी एकदा एका स्त्रीभक्ताला म्हणाल्या की बाई, हा सर्व महामायेचा खेळ आहे. नवरा, बायको वगैरे नाती, तसेच हे शरीर, हे सर्व

खोटे आहेत ; ही सर्व जीवाची बंधनें आहेत. जोपर्यंत ही बंधनें तोडली नाहीत तोपर्यंत या संसार–सागराच्या पैलतीराला जाणे शक्य नाही. या शरिरावरील सर्व प्रेम नाहीसे झाले पाहिजे. आत्मा म्हणजे शरीर ही कल्पना समूळ उखडून टाकली पाहिजे. शरीर ते काय, दीड शेर राखेचा गोळा. अशा शरीराबद्दल हव्यास कशाला ? शरीर घट्टेकट्टे असो वा अति-सुंदर असो, शेवटी त्याची राख नाही तर मातीच व्हावयाची. हे वारंवार पाहूनसुद्धा माणसाला शरिराचे प्रेम वाटते ! कसा आहे महामायेचा खेळ ?

× × ×

हरणाच्या बेंबीत कस्तुरी असते त्या कस्तुरीच्या वासाने हरीण धुंद होऊन इकडे तिकडे धावते, पण वास कुठून येत आहे हे त्याला समजत नाही. त्याचप्रमाणे परमेश्वर हृदयात असूनसुद्धा माणूस मारे धावाधाव करून त्याला चहूकडे शोधीत असतो. एक परमेश्वर सत्य, बाकी सर्व असत्य.

× × ×

मातार्जींच्या अंगावर खरका व फोड बरेच वर्ष होते. त्यासंबंधी एकदा माताजी म्हणाल्या की पहा आज तीन वर्षे हा त्रास मला होत आहे. कोणाकोणाच्या पातकामुळे हा त्रास मला भोगावा लागत आहे कोणास ठाऊक; नाहीतर मला रोग होण्याचे कारण नाही.

× × ×

एक दिवस दर्शन देऊन थकून जाऊन माताजी स्वस्थ बसल्या होत्या. इतक्यांत एक नटलेली थटलेली बाई मातार्जींकडे आली. तिच्या अंगाला लावलेल्या अत्तराचा घमघमाट सुटला होता. तिने नमस्कार करून रडत रडत सांगितले की माझे पति फार आजारी आहेत, तरी ते लौकर बरे व्हावे. त्यावर माताजी म्हणाल्या की बाई माझ्या हातात काय आहे ? रामकृष्णांचे

मनांत येईल तसे होईल; त्यांना प्रार्थना कर. ती बाई गेल्यावर माताजी म्हणाल्या की या बाईचा नवरा येवढा आजारी आहे पण बाईला मनापासून वाईट वाटले आहे का ? अत्तरांचा घमघमाट, नट्टी पट्टी तर पहा कशी करून आली होती. परमेश्वर अशांना कसा मदत करील; पश्चाताप नाही, भक्ति नाही, भाव नाही. पहा बरे मी इतकी थकून बसले होते तरीसुद्धा तिने येऊन माझे डोके धरले. या पाया पडण्याला व दर्शनाला कंटाळून गेले आहे मी. मी आता उठायचीच नाही जागेवरून. पहा बरे माझे पाय किती दुखत आहेत ते.

× × ×

एकदा एक स्त्रीभक्त आपल्या सुनेविरुद्ध माताजींकडे तक्रार करीत होती. ती गेल्यावर माताजी म्हणाल्या की ही म्हातारी तरुण सुनेवर किती जबरदस्ती करते ? तरुण मुलींच्या वागणुकीवर लक्ष ठेवलेच पाहिजे; त्यांच्या चुका होतील तेथे त्यांना खडकवलेच पाहिजे. पण माणूस म्हटला की त्याला थोडी स्वतंत्रता पाहिजे. आता या तरुण पोरीने पायाला थोडासा आळता लावला तर काय बिघडले; ती नवऱ्याशी दोन शब्द बोलली तर कांही गुन्हा का केला तिने. शिस्त पाहिजे पण शिस्तीतसुद्धा अतिरेक चांगला नव्हे; या अतिरेकाला जाच म्हणतात. कित्येक वेळी अशा जाचाला कंटाळून जर एखादीने जीव दिला तर त्याचा दोष कोणाकडे ?

× × ×

एकदा एका संन्याशी भक्ताने स्वतःच्या मनाविरूद्ध माताजींकडे तक्रार केली माताजींनी त्याचे सांत्वन करून त्यास धीर दिला. पुढे त्याने स्वतःला पडलेले एक स्वप्न सांगितले. तो म्हणाला की मी देवळात बसलो होतो इतक्यात तेथे आपण आला व काय पाहिजे म्हणून विचारले. त्यावर मी म्हटले की दुर्गावतारी सुरथ राजावर जशी आपण कृपा केली तशी या

स्वरूपात आपण मजवर करा; यावर आपण हसून अदृश्य झाला. हे स्वप्न पाहिल्यापासून वाटूं लागले की आपली जर कृपा झाली नाही तर जगून काय करायचे ? यावर माताजी म्हणाल्या की, बाळ एवढा अधीर का झाला आहेस ?-जे मिळाले आहे त्यांत समाधान का नाही मानीत ? अरे दुसरे कांही तुला मिळाले नाही तर निदान तुला आई तर मिळाली आहे ना ? रामकृष्णांचे शब्द ध्यानांत ठेव की ज्याने त्यांचा आश्रय केला आहे त्यांना शेवटी मुक्ति मिळणारच; ते सर्वांना बरोबर घेऊन जातील.

× × ×

एकदा सहज बोलता बोलता एका संन्याशी भक्तास त्या म्हणाल्या की संन्याशाने-(साधूने) डोळ्यात तेल घालून जागरूकपणे, काटेकोर व काळजीनेच राहिले पाहिजे. संन्याशी हा स्वच्छ पांढऱ्या कपड्यासारखा तर संसारी काळ्या कपड्यासारखा असतो. काळ्या कपड्यावर कितीहि डाग पडले तर खपून जातात, दिसत नाहीत; पण पांढऱ्या कपड्यावरील अगदी बारिकसा डागसुद्धा चटकन् डोळ्यात भरतो. जगांत जिकडे तिकडे कामिनीकांचनाचे प्राबल्य दिसते; म्हणून साधूने असक्त राहून सदैव त्याग आचरण्यात आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. म्हणूनच रामकृष्ण सांगत की संन्याशाने जागरूक असले पाहिजे.

× × ×

एकदा एकाने अल्पवयात सर्वसंगपरित्याग करून संन्यास घेतल्याचे पाहून माताजी म्हणाल्या की, या मुलाचे कौतुक करावे तितके थोडेच, रामकृष्णाचे नावाने याने सर्व सोडले आपल्याकडे पहावे तो प्रत्येकाला ही पोरे ! तेच साहेब लोक पहा; मुलांचे पालन पोषण व शिक्षण याबाबत आपली ऐपत पाहून एक दोन मुले झाली की नवराबायको अलग राहून आपआपल्या कामात गर्क होतात.

× × ×

एक दिवस सायंकाळच्या आरतीनंतर असेच बसलो असतांना माताजींची एक तरुण मेहुणी त्यांचेकडे येऊन म्हणाली की आई, मी जीवाला अगदी कंटाळले आहे; एक दिवससुद्धा जगावेसे वाटत नाही; मी आता आपले वुइल करून सर्व धनदौलत आपल्या नावांवर करून देते; माझ्यानंतर या सर्वाचा आपण ताबा घ्यावा. यावर माताजी चटकन् हसून म्हणाल्या की वा, फार उत्तम; पण तू मरणार केव्हा ? असे म्हणून त्या एकदम गंभीर झाल्या; व म्हणाल्या की बाई ग, हा सर्व महामायेचा खेळ आहे. माझेच नातेवाईक पहा ह्या माझ्या भाच्या पहा. त्यांना चांगले शिक्षण देण्याचा व वळण लावण्याचा मी थोडा का प्रयत्न केला; पण पहा कशा वागतात त्या. पहा मी सुद्धा कशी महामायेच्या तडाक्यात सापडले आहे ती हे ऐकून ती बाई खिन्न होऊत निघून गेली. ती निघून गेल्यावर माताजी म्हणाल्या हा अलभ्य असा मनुष्य देह मिळाला असता माणसाने त्याचे सार्थक करावयाला पाहिजे. परमेश्वराची सतत प्रार्थना करायला पाहिजे. रात्रंदिवस कामात गढून राहिले पाहिजे. प्रयत्नाशिवाय जगांत कांहीच साधत नाही. कामात मनुष्य कितीही गढून असला तरी रोज नियमाने माणसाने परमेश्वराप्रीत्यर्थ वेळ काढायला पाहिजे. मी दक्षिणेश्वरी होते तेव्हा मला इतके काम असे की एक क्षणाची फुरसद नसे; तरी सुद्धा मी देवाकरिता निराळा वेळ काढीत असे; पहाटे तीन वाजता उठून मी ध्यानधारणा, जप जाप्य करीत असे. परमेश्वराची प्रार्थना व सेवा नियमाने माणूस करीत असेल तर त्याला चिंता राहीलच कशी. ही पहा माझी मेहुणी. तिला स्वतःला होणाऱ्या त्रासाबद्दल इतके वाईट वाटते; पण त्यासंबंधी तक्रार करण्यापलीकडे ती कांही करीत नाही. रामकृष्ण मला नेहमी सांगत असत की सारखे चोवीस तास माणसाने काम करावे; आळसामधे एक क्षण सुद्धा घालवू नये. आळसामुळेच मनांत नानातऱ्हेचे विचार येतात व त्याच्यापासून त्रास काय तो उत्पन्न होतो. मन हे

पिसाटलेल्या हत्तीप्रमाणे आहे. पिसाटलेला हत्ती जसा वाऱ्याशी सुद्धा स्पर्धा करतो तसे मनाचे आहे. म्हणून मनाला सारासार विचार करायची सवय लावली पाहिजे. रात्रंदिवस परमेश्वरप्राप्तीकरिता अविरत प्रयत्न केला पाहिजे. दक्षिणेश्वरी असतांना माझे मन कसे एकमार्गी बनले होते; नुसता मुरळीचा आवाज कुठून तरी ऐकू आला तर मला एकदम परमेश्वराची आठवण होऊन, विलक्षण तळमळ वाटू लागे; पुढे पुढे तर तेवढ्यानेच मला समाधि लागत असे. रात्रंदिवस मी कामात गर्क असतांना मनामध्ये मी सतत मननात निमग्न असे.

× × ×

एकदा हरिदासी नावाची एक बाई नवद्वीपाच्या यात्रेकरिता आपल्या घरून निघाली व सरळ कामारपुकुरास रामकृष्ण होते तेथे आली. या बाईचे माताजींवर फार प्रेम असे. थोडे दिवस गेल्यावर माताजींनी तिला विचारले की तुम्ही नवद्वीपाला जायला केव्हा निघणार ? त्यावर ती म्हणाली की रामकृष्ण आहेत ना येथे ? अग रामकृष्ण म्हणजेच गौरांग नव्हे काय ? मग आता आणखी कोठल्या नवद्वीपाला जाऊ; जेथे रामकृष्ण तेच नवद्वीप. माताजी नेहमी सांगत की अशी जाज्वल्य श्रद्धा पाहिजे.

× × ×

माताजी सांगत होत्या की मी रामकृष्णांना एकदा गयेला चालण्याबद्दल म्हटले तर ते म्हणाले की गयेचे नांव काढू नको. मी तेथे गेल्यावर तेथून परतू शकेन असे तुला वाटते काय ?

× × ×

एकदा राधू आजारी असतांना एक वैद्य तिला तपासावयाला आला. तो परत निघाला तेव्हा माताजींनी राधूला त्याला नमस्कार करावयास

सांगितले व तिने केला. वैद्यराज निघून गेल्यावर एका स्त्रीभक्ताने माताजींना विचारले की वैद्यराज ब्राम्हण होते का ? माताजींनी विचारले कां ? ती बाई म्हणाली की आपण नमस्कार करायला सांगितला म्हणून. माताजी म्हणाल्या की नाही, वैद्यराज ब्राम्हण नाहीत; पण त्याला नमस्कार करायला काय हरकत आहे. वैद्यराज ज्ञानी असतो म्हणून त्याला ब्राम्हणाची योग्यता असते आणि म्हणूनच मी राधूला त्याला नमस्कार करायला सांगितला.

× × ×

एकदा एक भगवी वस्त्रे नेसलेली बाई माताजींकडे आली, तिने नमस्कार केला व त्यांचे समोर दोन रुपये ठेवले. माताजी म्हणाल्या की हे काय ? ती म्हणाली की मला दीक्षा द्यावी; ही गुरुदक्षिणा आहे. माताजी म्हणाल्या, म्हणजे दीक्षेशिवायच तुम्ही ही वस्त्रे अंगावर घेतलीत ? पारमार्थिक अनुभव नसतांना तुम्ही हे कपडे वापरता ? हे अगदी अयोग्य कर्म आहे. भगवी वस्त्रे किती पवित्र असतात. मी आताच तुमची वस्त्रे पाहून तुम्हाला नमस्कार करणार होते. या वस्त्रामुळे सर्वजण तुमच्या पाया पडतील, हे पचविण्याची शक्ति कमवावी लागते.

× × ×

एक दिवस दुपारच्या पूजेचे थोडेसे आधी बायकापुरुष मिळून तीन माणसे फार दूरवरून माताजींना भेटायला आली ढुंगणास थोडासा कपडा एवढेच काय ते त्यांच्याजवळ होते, भीक मागत मागत, पायी, हाल अपेष्टा काढीत ते कलकत्त्यास येऊन पोहोचले होते. आल्यावरोवर त्यांना माताजींची मुलाखत मिळाली. आलेल्या गृहस्थावरोबर माताजी बोलत होत्या आरतीची वेळ होऊन गेली. शेवटी एक संन्याशी भक्त तेथे जाऊन त्या माणसास दटावून म्हणाला की आता पुरे झाले; जास्त बोलायचे

असल्यास जुन्या संन्यासी भक्ताबरोबर जाऊन बोला. त्यावर माताजी चटकन् जरा दाबूनच म्हणाल्या की बोलू दे त्याला, उशीर झाला तरी हरकत नाही; याचे म्हणणे मला ऐकलेच पाहिजे. माताजी व तो गृहस्थ अगदी हळू हळू बोलत होते; माताजी शांतपणे ऐकून घेत होत्या. नंतर बराच वेळ माताजी हळुहळू त्या गृहस्थास कांही सांगत होत्या. नंतर त्याच्या बायकोला त्यांनी जवळ बोलावून कांहीतरी सांगितले. एक तासानंतर ती मंडळी गेली. ते लोक गेल्यावर माताजी म्हणाल्या की काय करणार बिचारे, किती गरिबी, काय हाल अपेष्टा सोसून ते लोक येथे आले.

गरिबांचा परामर्श नेहमीच माताजी अशा रीतीने घेत.

× × ×

एका दुपारी एक युरोपियन स्त्री माताजींना भेटण्याकरिता आली. माताजी दुपारच्या नुकत्याच पडल्या होत्या. बराच वेळ थांबल्यावर तिला माताजींकडे नेण्यात आले. ह्या बाईला बंगाली येत असे व ती नमस्कार करायला शिकली होती. माताजींसमोर आल्यावर नमस्कार करून ती म्हणाली की मी अवेळी तर नाही ना आले ? माताजींनी तिच्याशी हस्तांदोलन केल्यावर ती म्हणाली की, माताजी मी फार दु:खद स्थितीत सापडले आहे. माझी मुलगी अगदी सालस असून अशी मुलगी आजकाल सापडणे कठीण् आहे ती आजारी असून अत्यवस्थ आहे, म्हणून मी आपल्या आशिर्वादाकरिता आले आहे. तिजकडे आपण कृपादृष्टिने पहाण्याची मेहेरबानगी करावी. ती बरी होईल असे आपण म्हणालात की ती बरी झालीच पाहिजे; यात किंचितसुद्धा शंका नाही. हे ऐकून माताजींनी गोलपमांना पूजेतून एक कमळ आणून देण्यास सांगितले. ते आणल्यावर तिने ते आपल्या ओंजळीत घेतले. माताजींनी सांगितले की या कमळाचा तिच्या डोक्याला स्पर्श कर. मग पुढे या कमळाचे काय करू असे तिने विचारल्यावरून, ते गंगेत शिरवून देण्यास माताजींनी सांगितले. ती

म्हणाली नाही; मी ते एका पिशवींत घालून जतन करून ठेवीन. माताजी म्हणाल्या ठीक. पुढे ती म्हणाली की परमेश्वर आहे ह्याबद्दल मला बिलकुल शंका नाही. एकदा माझे मूल अत्यवस्थ असता मी देवाची प्रार्थना केली की, तू आहेस याची मला प्रचिती दे. मी खूप रडले व डोळे पुसून हातरुमाल टेबलावर ठेवला. बऱ्याच वेळाने पाहिले तो त्या हातरुमालात मला तीन काड्या सापडल्या. मी त्या माझ्या मुलाच्या अंगावर तीन वेळा फिरविल्यावर माझे मूल बरे झाले. हे सांगत असतांना तिच्या डोळ्यातून अश्रुप्रवाह होत होता. मग ती म्हणाली की आपला इतका अमूल्य वेळ घेतल्याबद्दल मला माफी करावी माताजी म्हणाल्या की त्यात काय आहे ? तू परत मगळवारी येऊन मला भेट सांगितल्याप्रमाणे ती आली; तिच्या मुलीला आराम पडला होता. पुढे तिला माताजींनी दीक्षा पण दिली.

× × ×

एका दुपारी माताजी नेहमीप्रमाणे पडल्या असतांना एक स्त्रीभक्त त्यांचे पाय चेपीत होती. तिने माताजींना म्हटले की माझ्या मनातून थोडेसे विचारावयाचे होते. माताजींनी विचार म्हटल्यावर तिने प्रथम स्वतःला आलेले अनुभव सागून म्हटले की असे वारंवार होत नाही. माताजी म्हणल्या की असे अनुभव वारंवार येत नसतात. जगात प्रत्येक गोष्ट सत्यच आहे. असत्य कांहीच नाही. रामकृष्ण हेच सर्वत्र नटलेले आहेत. रामकृष्ण हेच पुरुष; रामकृष्ण हेच प्रगति. त्यांच्या कृपेने तुला सर्व कांही साध्य होईल. त्यानंतर ती म्हणाली की आपण इतक्या गोष्टी करायला सांगितल्यात; पण एखादे वेळी जप करण्यात इतका वेळ निघून जातो; तो समजतच नाही; यामुळे इतर सांगितलेल्या गोष्टी पुऱ्या होत नाहीत; ही चूक तर नाही ना होत माझी ? माताजी म्हणाल्या की यात कांही चूक होत नाही. पुढे ती म्हणाली की मला कोणी सांगितले की मध्यरात्री ध्यान करतांना एक विचित्र आवाज शरिराच्या उजव्याबाजूपासून ऐकू येतो;

परंतु मन त्यावेळी उच्च विचारात गुंतले नसेल तर डाव्याबाजूपासून ऐकू येतो. यावर क्षणभर थांबून माताजी म्हणाल्या की, नाही उजव्याबाजूपासूनच येतो; पण शरिराचे भान त्यावेळी असल्यास डाव्या बाजूपासून येतो. कुण्डलिनी जागृत झाल्यानतरच हे आवाज ऐकू येतात. परंतु उजवीकडून येणारा आवाजच खरा. पुढे मनच गुरु बनते. बाळ देवाचे ध्यान व प्रार्थना एकाग्रतेने दोन मिनिटे करणे, हे तासचे तास नुसते त्यात घालविण्यापेक्षा जास्त फलदायी असते.

आणखी माताजींना त्रास देऊं नये म्हणून ती गप्प बसली. तिला जायचे पण होते; पण नमस्कार केल्याशिवाय जायचे कसे ? माताजी तर आडव्या पडल्या; अशा स्थितीत नमस्कार करूं नये हे तिला माहीत होते. त्यामुळे ती स्वस्थ बसली. थोडया वेळाने हे सर्व जाणून निजल्या निजल्या माताजी म्हणाल्या की पहा हे मी डोके वर उचलले; सांगायचा भावार्थ असा की आता नमस्कार करायला हरकत नाही. त्या मुलीने नमस्कार केला व ती निघून गेली.

× × ×

शेवटच्या शेवटच्या दिवसांत माताजी आजारी असतांना राधू माताजींचेवर इतकी संतापली व म्हणाली की मर आत्या एकदाची तू; तुझी चिता पेटल्यावरच मला बरे वाटेल. भोवतालच्या मंडळींना हे ऐकून धक्काच बसला. माताजी नेहमी अशा या बोलण्यावर उत्तर देत नसत; शांत बसून रहात. यावेळी मात्र माताजी एकदम म्हणाल्या की या सर्वाचे फळ तुला लौकरच भोगावे लागणार आहे मी गेल्यावर तुझी काय स्थिति होईल याची तुला कल्पना नाही. केरसुणीने मार खाण्याचा प्रसंग किती वेळ तुला येईल तो येवो.

• • •

# भाग दुसरा

एकदा फार लांवच्या गावांवरून एक बाई माताजींना भेटायला आली. अगदी ओळखीच्या माणसाप्रमाणे माताजींनी तिची सर्व चौकशी करून, त्या दिवशी आराम करून, दुसऱ्या दिवशी तिला स्वतःला भेटावयास सांगितले. त्या दिवशी दुपारी माताजींना कणीक तिंबतांना तिने पाहिले. तिला पाहून माताजींनी विचारले की काय पाहिजे तुला. ती म्हणाली मला थोडेसे विचारावयाचे आहे. विचार म्हणून सांगितल्यावर ती म्हणाली की, सर्वजण म्हणतात की रामकृष्ण हे परमेश्वर होते; याबद्दल तुमचे काय मत आहे; स्त्रीला नवरा परमेश्वर असतो ह्या अर्थाने मी नाही विचारीत आपणाला. त्यावर माताजी म्हणाल्या की, पति या दृष्टीने तर आहेतच; पण सर्व दृष्टीने ते परमेश्वरच आहेत त्यावर ती म्हणाली की हे सत्य असेल तर तुम्ही एखाद्या साधारण बाईसारख्या स्वयंपाक कशा करता आहा ? का हीच माया ? माताजी म्हणाल्या की, ही माया तर खरीच; नाहीतर मी अशी कामें करीत कशी राहिले असते ? परमेश्वर मनुष्य देह घेऊन लीला करतो; राम दशरथाचा मुलगा झाला, कृष्ण गवळ्याचा पोर होता. यावर ती म्हणाली की तुम्हांला या जंजाळात स्वस्वरूपाची होते का कधी आठवण ? माताजी म्हणाल्या मधून मधून सारखी होतच असते; त्यावेळी एकदम हे मी काय करते आहे असे मनांत येते. मग फिरून हे घर माणसे वगैरेची आठवण होते त्यावेळी माझी आठवण विसरते असे हे होत रहाते.

दुसऱ्या दिवशी ती भेटल्यावर माताजी सहज म्हणाल्या की, ज्यावेळी मला एखाद्याची आठवण येते त्यावेळी एक तर मला तो येऊन भेटतो;

नाहीतर त्याचे पत्र येते. तू येथे आलीस ती तुझ्या मनांत जगन्मातेसंबंधी विचार घोळत असतील म्हणूनच ना ? यावर ती म्हणाली की तुम्ही सर्वांची आई आहा ना ? माताजी म्हणाल्या की हो. त्यावर ती म्हणाली की ही सर्व सृष्टि, पशु, पक्षी इत्यादि सर्वांची आई ना ? माताजी हो म्हणाल्या. मग तिने विचारले की मग या सर्वांना अशी दुःखे का होतात ? माताजी म्हणाल्या की या जन्मी हाच त्यांना अनुभव घ्यायचा असतो म्हणून.

फिरून एकदा तिने विचारले की तुम्ही ज्याना ज्याना दीक्षा देता त्यांची जबाबदारी तुम्हाला घ्यावी लागते ना ? मग रामकृष्णांना सांगेन असे तुम्ही का म्हणाला ? तुम्ही आमची जबाबदारी नाही घेऊ शकत ? माताजी म्हणाल्या की अग तुझी जबाबदारी मीच घेतली आहे. ती म्हणाली की तुम्ही मला आशिर्वाद द्या. खरे सांगते की माझ्या जिवलग मैत्रिणीवर असलेल्या प्रेमाच्या एक दशांशसुद्धा प्रेम माझे रामकृष्णांवर नाही. तुम्ही रामकृष्णांचे पासून निराळच्या आहात का ? माझी मनीषा तुमच्या आशीर्वादाने पुरी होईल. माताजी म्हणाल्या की माझ्या आशीर्वादाने तू पूर्णत्व पावणार असशील तर तुला पूर्ण आशिर्वाद आहे. मदतीशिवाय कोणीहि मनुष्य मायेच्या तडाक्यातून कधी सुटला आहे का ? माणसांना मदत या दृष्टीनेच रामकृष्णांनी एवढे तपाचरण केले. ती बाई म्हणाली की रामकृष्णांना पाहिले नसतांना त्यांच्यावर प्रेम कसे करता येईल ? तेव्हा माताजी म्हणाल्या की खरे आहे तुझे म्हणणे ; अदृश्य माणसाबरोबर मैत्री कशी होईल ? त्या बाईने विचारले की रामकृष्णांचे दर्शन केव्हा होईल ? माताजी म्हणाल्या की तुला खात्रीने योग्यवेळी त्यांचे दर्शन होईल.

× × ×

एक दिवस दुपारी माताजी पडल्या होत्या व एकजण त्यांच्या पायाला कांही औषधी तेल चोळीत होती. त्यावेळी तिला माताजी म्हणाल्या की शरीरापासून आत्मा निराळा असतो, आत्मा सर्व शरीरभर पसरलेला असतो; म्हणून तर गुडघ्यातले दुखणे मला समजते. त्या बाईने मधेच विचारले की गुरूपासूनच मंत्र घेण्याची काय जरूरी ? एखाद्या मंत्राचा जप करायचे ऐवजी नुसते "मा काली" म्हणत राहिले तर भागणार नाही का ? माताजी म्हणाल्या की गुरूकडून मंत्र मिळताच शरीर व मन शुद्ध होते. तुला एक गोष्ट सांगते. एकदा नारद विष्णूला भेटायला गेले. दोघांचे खूप बोलणे चालणे झाल्यावर नारद निघून गेले. विष्णूंनी लगेच लक्ष्मीला ती जागा गाईच्या शेणाने सारवायला सांगितले. लक्ष्मी म्हणाली की का ? नारद तुमचे भक्त ना ? विष्णू म्हणाले की नारदाला अजून दीक्षा मिळाली नाही; दीक्षा मिळेतोपर्यंत शरीर शुद्ध होत नाही. तेव्हा निदान शरीरशुद्धिकरिता गुरुपासून मंत्रदीक्षा घेतली पाहिजे. वैष्णवामध्ये मंत्रदीक्षा दिल्यावर सांगण्यात येते की ह्यापुढे सर्व तुझ्यावर अवलंबून आहे. मानव गुरु कानांत मंत्र सांगतो तर परमेश्वर हृदयात–मनात भाव घालतो. सर्व कांही आपल्या मनावर अवलंबून आहे. एखाद्यावर गुरुची व देवाची कृपा झाली तरी एकाच्या कृपेशिवाय सर्व व्यर्थ आहे; ते एक म्हणजे आपले मन होय. मनाची कृपा व्हावी लागते. माताजी पुढे म्हणाल्या की रामकृष्ण गेल्यावर माझ्या मनांत पण जावेसे आले. पण हा विचार मनांत येतो तोच ते समोर उभे राहून म्हणाले की नाही; तुला राहिले पाहिजे. पुष्कळ गोष्टी करायच्या राहिल्या आहेत. कलकत्त्यातील लोक किड्या-सारखे राहातात, त्यांना मार्ग दाखवायला पाहिजे. पुढे ते म्हणाले की अदृश्य स्थितीत भक्तांच्या हृदयात मी तीनशे वर्षे राहाणार आहे. पुढे माताजी म्हणाल्या की कितीक गोरकाय माझे भक्त व्हावयाचे आहेत.

× × ×

असेच एकदा स्वत:बद्दल माताजी सांगत होत्या की माताजी ह्या तपोवलाची व सहनशक्तिची केवळ मूर्ति आहेत. ज्यांच्या अंत:करणांत दया नाही तो मनुष्य कसला, तो पशूच. माझ्या मनांत दया येते तेव्हा मी स्वत:ला विसरून जाते.

× × ×

एकदा एक स्त्रीभक्त रामकृष्णांच्या चरित्रांतील कांही भाग वाचीत होती, तो असा—रामकृष्णांचे भक्त गिरीशबाबू एकदा त्यांना म्हणाले की केवळ प्रेमासाठी म्हणून परमेश्वराचे प्रेम मला पाहिजे आहे. त्यावर रामकृष्ण म्हणाले की असे प्रेम ईश्वरकोटीतील लोकांनाच प्राप्त होते; साधारण माणसास असे प्रेम प्राप्त होत नाही. हे वाचल्यावर तिने माताजींना विचारले की या सांगण्यात रामकृष्णांना काय सांगावयाचे होते. माताजी म्हणाल्या की ईश्वर कोटीतील माणसे पूर्णकाम असतात; त्यांना यत्किंचितही वासना नसते. जोपर्यंत किंचित्शीसुद्धा वासना असते तोपर्यंत शुद्ध दैवीप्रेम प्राप्त होत नसते. तिच्या मनांत आले की माताजींचे भाऊ असे असतील का व तिने तसे माताजींना विचारले. अत्यंत तुच्छतायुक्त स्वराने माताजी यावर म्हणाल्या की काय ही तुझी तुलना? माझे नुसते भाऊ होऊन काय मिळणार आहे? रामकृष्णांचे परमभक्त असणे ही गोष्ट निराळी.

× × ×

एकदा एकीने माताजींना विचारले की माताजी तुम्ही इतके काम का करता? यावर माताजी म्हणाल्या की माझे चरित्र उदाहरणादाखल रहावे एवढयाकरिता मी कितीतरी जास्त काम करते.

× × ×

एकदा माताजी बाहेरच्या बाजूस बसल्या असता एकीने त्याना विचारले की माताजी भविष्य काळात कितीजण पारमार्थिक साधनाने आपल्याला आळविण्याचा प्रयत्न करतील ? माताजी हसून म्हणाल्या की, अग लोक पुढे म्हणतील की माताजींना संधिवात झालेला असून त्या लंगडत लंगडत चालत असत. ती म्हणाली की चला तुम्ही आपली गंमत करता झाले. माताजी म्हणाल्या की भले ग बाई; अग रामकृष्ण आजारी होते तेव्हा म्हणत असत की ज्यांना भौतिक फायदा त्यांचेकडून पाहिजे होता ते सर्व पळून गेले; ते म्हणत की असे आजारी पडत असले तर रामकृष्ण अवतार कसले; ते म्हणत हीच माया आहे झालं परंतु बाई रामकृष्णांचे जे खरे भक्त होते त्यांना त्यांचे दुःख पाहून अत्यंत यातना होत.

× × ×

एकाने एकदा माताजींना विचाले की बोटे घालून जप कशाला करायला पाहिजे माताजी म्हणाल्या की देवाने दिलेल्या बोटांचा देवा-करिता उपयोग नको का करायला ?

× × ×

एकदा एकाने माताजींना विचारले की जगांत जर परमेश्वर असेल तर जगात एवढा हा त्रास व हे दुःख का म्हणून ? तो जर असेल तर त्याला हे घालवता का नाही येत. माताजी म्हणाल्या की ही सृष्टि सुख व दुःख यांनी भरलेली आहे जर जगांत दुःख नसते तर सुखाचा अनुभव कसा आला असता ? सर्वजण सारखे सदैव कसे सुखी राहू शकतील. एक गोष्ट ऐक ! एकदा सीतामाई प्रभु रामचंद्राला म्हणाली की तुम्ही सर्वांना सुखी करा—राम म्हणाले की सर्वांना एकाच वेळी सुखी करून कसे चालेल ? सीता म्हणाली की नाही ? आपला जामदारखाना उघडा टाका, ज्याला पाहिजे ते त्याला घेऊ द्या म्हणजे सर्व सुखी होतील. राम म्हणाले

की जशी आज्ञा, आणि लक्ष्मणास बोलावून त्यांनी तशी आज्ञा दिली. मग काय ? सर्व लोक चैनीत राहू लागले. थोड्या दिवसांनी सीतामाईच्या राजवाड्यात गळू लागले पण दुरुस्ती करायला कोणी मिळाला नाही. होतेच कुठे कामगार अयोध्येत; सर्वच सुखवस्तु ! हळुहळू प्रजाजन प्रभु रामचंद्राकडे येऊ लागले व तक्रार करू लागले की काम करणारी माणसे नसल्याने सर्व अव्यवस्था व गोंधळ माजून गेला आहे, सर्व कामे अडून गेली आहेत, तरी महाराजांनी कांही तरी व्यवस्था करावी. शेवटी सीतामाई म्हणाल्या की मला काय माहीत की हा असा गोंधळ होईल. सर्व गोंधळ झाला आहे. कामकरीच नाहीत कोठे; माझ्या वाड्यातील गळवी अजून तसेच आहे. सर्वचजण सुखवस्तू झालेले आहेत. तुमची पहिली व्यवस्थाच बरी होती. प्रभु म्हणाले की जशी आज्ञा. जामदारखाना बंद झाला. थोडक्याच दिवसात सुखवस्तूपणा नाहीसा झाला. लोक काम करूं लागले व सर्व सुरळीत चालू लागले. ते पाहून सीता म्हणाली की प्रभु, काय ही तुमची माया; काय ही आपली लीला ! तेव्हा बाई ग, सर्वदा कोणीहि सुखी राहून चालायचे नाही; सर्वदा कोणी तसेच दुःखी राहून पण चालायचे नाही. प्रत्येक कर्माचे बरे किंवा वाईट फळ हे उत्पन्न व्हावयाचेच व त्या त्या प्रमाणे त्याचे फळ सुख किंवा दुःख माणसास भोगावे लागते. यावर ती बाई म्हणाली की ही सर्व सृष्टि कर्माधीन आहे का ? माताजी म्हणाल्या की मग काय तर. भंगी नाही का मैल्याची टोपली उचलत; ते त्याच्या कर्माचे फळ आहे. ती म्हणाली की हे सर्व ठीक आहे. पण आजचे सुखदुःख पूर्व कर्मावर, पूर्व जन्मातील सुखदुःख त्या पूर्वीच्या जन्मातील कर्मावर; असे मागे मागे गेले तर केव्हा तरी पहिली सुरवात आली पाहिजे ना ? त्या जन्मात सुखदुःखाकरिता कर्म कुठले असणार ? ही सुरवात कोठे व कशी ? यावर माताजी म्हणाल्या की बाई परमेश्वराच्या इच्छेशिवाय जगांत कांहीच होत नाही, गवताचे पाते सुद्धा हलत नाही. जेव्हा सुयोग

येतो तेव्हा परमेश्वराकडे लक्ष लागते; अयोग्य काळ आला की पापाकडे प्रवृत्ति होते. मनुष्याच्या हातून होणाऱ्या सर्व क्रिया परमेश्वराच्या इच्छेवर अवलंबून असतात. या क्रियातूनच माणसाला परमेश्वराचे स्वरूप दिसू लागते. नरेन्ने ही एवढी कामगिरी केली ती त्याने थोडीच केली ? रामकृष्णांनी जसे आधी ठरवले तसे त्याच्याकडून होत गेले. परमेश्वरच सर्व करवीत होता म्हणून त्याच्याकडून इतकी कामगिरी यशस्वी अशी होत आली. जो रामकृष्णांना शरण जातो त्याचे सर्व ठीक होते. येईल त्या परिस्थितीस शांतपणे तोंड दिले पाहिजे. कारण ती स्थिति पूर्वकर्मामुळे उत्पन्न झालेली असते. आता ही स्थिति दुसरी क्रिया करून बदलता पण येते. ती म्हणाली की एक क्रिया आता करून दुसरी क्रिया कशी नाहीशी करता येते ? माताजी म्हणाल्या की नाही ? सत्कर्म करून असत्कर्म नाहीसे करता येते. आपले दुष्ट पूर्वकर्म आता जप, तप, ध्यान, धारणा वगैरे करून नाहीसे करता येते.

× × ×

एकदा श्राद्धावरून गोष्टी निघाल्यावरून माताजी म्हणाल्या की प्रत्येक मनुष्याचा जीव निदान एक वर्षभर तरी अदृश्य स्वरुपात राहातो; गयेला श्राद्ध झाल्यावर त्याला सद्‌गति मिळते. त्यावर कोणी तरी म्हणाले की मग हा पारमार्थिक खटाटोप कशाला ? माताजी म्हणाल्या की गयेला श्राद्ध केल्याने तो उच्च लोकांत जातो; पण तेथून कांही दिवसांनी तो परत पूर्व कर्मानुसार या भूतलावर मानव देह घेऊन येतो. मग कोणी आत्मानुभवाचा प्रयत्न करतात, तर कांही फिरून जन्ममरणाच्या फेऱ्यात पडतात. भूतयोनीतून सुद्धा अशाच प्रकारे सुटता येते. हे विश्व चक्राप्रमाणे सारखे फिरत आहे. जेव्हा मनुष्य देह असतांना सर्व वासनांचा त्याग होतो तेव्हाच तो जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटतो. यावर कोणी विचारले की हे अदृश्य जीव वरच्या लोकांत कसे जातात ? माताजी म्हणाल्या की अदृश्य देह

वाऱ्यासारिखा असतो; अशा त्या स्थितीत ते तसेच वरच्या लोकांत जातात. यावर कोणी विचारले की भुते खेते व शिवगण यात फरक असतो का; दोन्ही एकच ? माताजी म्हणाल्या की भुते ही वासनात्मक माणसांची मरणानंतरची रूपे; शिवगण हे महादेवाचे गण; ते एक कसे असतील ? त्यावर कोणी म्हणाले की थोडक्यात काय, सर्व कर्मापासून उत्पन्न होते. माताजी म्हणाल्या की अगदी बरोबर. जसजसे उमजू लागते तसतसे परमेश्वराच्या अस्तित्वाची जाणीव नाहीशी होते. पुढे समजू लागते की देव, देवता ही सर्व माया आहे. प्रत्येक गोष्ट विविक्षित वेळी उत्पन्न होते व विविक्षित वेळी नष्ट होते. ज्ञानोदय झाला की सर्व दृश्यमान नाहीसे होते. सर्व विश्व ही माहामायाच नटलेली आहे असा अनुभव येतो. नंतर सर्वच एक होते व एक केवळ सत्य होय.

× × ×

सेवेसंबंधी एक दिवस माताजी म्हणाल्या की आता तुम्ही इतके जण येता; काय गडबड व काय उत्साह जिकडेतिकडे दिसतो. पण रामकृष्ण आजारी झाल्यावर लोक पळून गेले. आपण स्वत: रामकृष्णांच्या अंतरंगातील आहो असे मानणारा एक भक्त असाच पळून गेला. आजारात होणारा खर्च सर्व अंतरंग भक्त वाटून घेत; त्यामधे त्याच्यावर वीस रुपये हिस्सा बसला; त्याबरोबर तो येईनासा झाला. बाबांनो आता रामकृष्णांची सेवा तो काय ? त्यांना नैवेद्य दाखवून आपणच खावयाचा. त्यांना कसेही ठेवावे, निजवावे; आता ते केवळ चित्ररूप आहेत ना ?

× × ×

एकदा एका भक्ताने विचारले की चित्रामधे खरंच रामकृष्ण असतात का ? माताजी म्हणाल्या की काय हे तुझे विचारणे ? असतात का म्हणजे काय ? असतातच. मनुष्य आणि त्याची छाया एकच

नाही का ? चित्र ही छाया नाही का ? त्यावर ती म्हणाली की प्रत्येक चित्रांत असतात का ? माताजी म्हणाल्या की हो तर. तुम्ही लोक प्रार्थना कराल तर प्रत्येक चित्रांत ते तुम्हाला दिसतील. जेथे त्यांचे चित्र असेल ती जागा पवित्र असते. समोरच्या मैदानात जर उद्या कोणी चित्र ठेवून पूजा करील तर ती जागा पवित्रच होईल. त्यावर कोणी म्हणाले की प्रत्येक जागेसंबंधी कांही बऱ्या वाईट आठवणी असतात ना पण; मग ? त्यावर माताजी म्हणाल्या की तुझे म्हणणे सर्व दृष्टीने बरोबर नाही. ज्या जागेवर त्यांची पूजा होते त्या जागेवर ते विशेष लक्ष देतात.

× × ×

एकदा एका भक्ताने विचारले की आम्ही मागतो तेवढे देऊन देव परत फिरतो की देव अगदी आपलासा होतो ? देव अगदी माझाच असा आहे का ? माताजी म्हणाल्या की देव हा अगदी आपला आपलाच असा आहे. देवाशी हे आपले सनातन असे नाते आहे. एवढेच की ज्या प्रमाणांत आपली भावना असते त्याच प्रमाणांत तो आपल्याला दिसतो. तो म्हणाला की आत्यंतिक निर्भेळ भावना ही स्वप्नासारखी आहे; मनुष्य ज्याचा विचार करतो तेच त्याच्या स्वप्नात दिसते. यावर माताजी म्हणाल्या की सगळेच तर स्वप्न आहे तो म्हणाला की जागेपणा स्वप्न कसे होईल ? स्वप्न असते तर ते नाहीसे झाले असते. माताजी म्हणाल्या की असेलही तसे; पण हे सर्व स्वप्नच आहे; काल जे स्वप्न पडले ते आज नाही.

आश्चर्य हे की या गृहस्थाला आदल्या रात्री स्वप्न पडले होते. त्या स्वप्नांत त्याने पाहिले की ज्याचा मुलगा नुकताच मेला आहे असा एक शेतकरी तो आपल्या स्वप्नात राजा झाला, त्याला आठ मुले झाली; स्वप्नातला शेतकरी आपल्या स्वप्नांतून जागा झाल्यावर आपल्या बायकोला

म्हणाला की आता मी आठ मुले गेल्याचा शोक करू की काल एक मुलगा गेल्याचा शोक करू. हे स्वप्न मातोजींना सांगून तो म्हणाला की तरीपण ह्या विचारांशी मला काय करायचे आहे. मला अगदी आपलेसे वाटेल असे कांही तरी पाहिजे. माताजी म्हणाल्या की अगदी आपलेसे वाटणारे असे एकच तत्त्व आहे व ते परमेश्वर होय. त्यावर तो म्हणाला की जर परमेश्वर अगदी आपलासा असेल तर त्याला पहाण्याकरता प्रार्थना कशाला हवी ? तो अगदी आपलासा असेल तर न बोलावतांना त्याने आपलेकडे नको का यायला ? आईबाप जसे आपली काळजी करतात तशी परमेश्वर आपली काळजी करतो का ? माताजी म्हणाल्या की परमेश्वर आपल्या आईबापासारखाच होतो; तोच आपली काळजी करतो. नाहीतर विचार कर की तू पूर्वी कोठे होतास व आता कुठे आहेस ? आईबापांनी तुला वाढविले व मागाहून त्यांना दिसले की तू त्यांचा नव्हेस. कोकिळेची अण्डी कावळा उबवतो ना ? त्यावर तो म्हणाला की माताजी, मग परमेश्वर अगदी माझा असा होईल ? माताजी म्हणाल्या की खात्रीने होईल. त्यावर तो म्हणाला की माताजी तर मग यापुढे माझा बुद्धिभेद होणार नाही, श्रद्धा कमी होणार नाही असा मला आशिर्वाद द्या. माताजी म्हणाल्या की घाबरतोस कशाला ? तुला असली कांही भीति बाळगण्याचे कारण नाही. अरे हा तुझा मासा मीच तर गळाला लावला आहे की !

× × ×

एकदा एका शिलाँगमध्ये राहणाऱ्या माणसाने निश्चय केला की जर माताजी मला सात वेळा स्वप्नांत दिसतील तर माझा विश्वास पूर्ण बसेल व मी लगेच त्यांच्या दर्शनाला जाईन. आश्चर्य हे की त्याला सातवेळा स्वप्नांत माताजींचे दर्शन झाले. तो तसाच जयरामवाटीस गेला. सकाळी दर्शन घेऊन तो दुपारी परत जायला निघाला. जातांना त्याने माताजींना

विचारले की जायच्या आधी मी कांही करावयाला पाहिजे कां ? माताजी म्हणाल्या की हो, तर; दीक्षा घेऊन मग जा. अर्थातच त्याने तसे केले.

× × ×

एकदा एक थोडासा चक्रं मनुष्य माताजींकडे आला व मला संन्यास द्या म्हणून म्हणाला. माताजींनी त्याची समजूत करून त्यास दीक्षा व एक माळ देऊन परतविले. कांही दिवसांनी तो परत आला व म्हणाला की मला अगदी वेडे करा व रामकृष्णांचे दर्शन द्या. माताजी म्हणाल्या की योग्य वेळी सर्व होईल. तो म्हणाला की ते कांही नाही; मला तुम्ही फसवता आहा; मला आता दर्शन द्या. माताजींनी पुष्कळ समजूत केली, पण त्याची समजूत होईना. तो रागावला व म्हणाला की तुम्ही मला फसवता आहा. ही घ्या तुमची माळ, मला त्याची जरूर नाही; असे म्हणून त्याने माताजींचे अंगावर माळ फेकून दिली. माताजी म्हणाल्या की बरे तर मग लहान मुलासारखा रहा. हे ऐकून तो निघून गेला.

पुढे तो खरेच वेडा झाला. सर्वांना शिव्या देऊं लागला. यावर एकाने माताजींना विचारले की, माताजी या वेड्याने माळ फेकली तसा मंत्र पण परत केला काय ? मंत्र परत करता येतो का ? माताजी म्हणाल्या की वाळ, मंत्र कसा परत करता येईल ? मंत्र ही जिवंत शक्ति आहे. एकदा गुरु म्हणून त्याच्या पायावर डोके ठेवले की तो गुरु मागचा कधी सुटत नाही. आता हा वेडा झाला आहे खरा; पण कांही दिवसांनी हाच आज ज्यांना शिव्या देतो आहे त्यांच्या पाया पडू लागेल. तो म्हणाला की माताजी हे असे का होते ? माताजी म्हणाल्या की अशी उदाहरणे दिसून येतात. गुरु सर्वांना उपदेश देतो; पण सर्वजण सारखे नसतात. ज्याच्या त्याच्या स्वभावा-प्रमाणे ज्याची त्याची प्रगति होत असते. हा एकदा म्हणाला होता की मला वेडे करा. मी त्याला म्हटले की वेडेपणा कशाला पाहिजे तुला ? अरे

पुष्कळ पापकर्म संग्रही असल्याशिवाय वेडेपण येत नाही. तो म्हणाला की माझ्या लहान भावाला उघडया डोळयाने झाले तसे मला झाले पाहिजे. मातानी म्हणाल्या की या चर्मचक्षूंनी दर्शन होणे फार कठीण आहे. डोळे मिटून पुष्कळांना दर्शन होऊं शकते. तू आपली साधना चालू ठेव व त्यांची प्रार्थना कर म्हणजे तुला पण दर्शन होईल. आपल्या मनालाच आपण किती पुढे गेलो आहो हे समजते. परमेश्वरी अनुभव कितपत आला आहे हे ज्याच्या त्याच्या अंतस्थ मनाला समजते. या चर्मचक्षूंनी परमेश्वराचे दर्शन कोणाला झाले आहे ?

हा वेडा झालेला भक्त पुढे स्वामी लोकांनी खरड काढल्यामुळे गंगा-किनारी राहू लागला. एक दिवस मातानींची परवानगी घेऊन त्याला त्यांच्यासमोर नेले. मातानी त्याला म्हणाल्या की बाळ तू माझाच तर आहेस. रामकृष्णांनी निदान अगदी शेवटी तरी दर्शन देण्याचे कबूल केले आहे. मग तुला घाबरायचे कारण काय ? तू असे वेडयासारखे का करतोस? यामुळे रामकृष्णांच्या नांवाला नाही का बट्टा लागत ? लोक म्हणतील की रामकृष्णांच्या मागे लागलेला मनुष्य वेडा होतो. रामकृष्णांच्या नांवाला किंचित्सुद्धा कमीपणा येईल असे वर्तन त्यांच्या माणसांनी ठेवून कसे चालेल ? जा आता आपल्या घरी व सर्वजण जसे राहतात तसा रहा. तुला अंतकाळी दर्शन होणारच आहे.

लौकरच त्याचे वेड जाऊन तो आपल्या गावी गेला.

× × ×

एकदा एकाजवळ मातानींनी एका संन्याशी भक्ताबद्दल चौकशी केली. तो म्हणाला की आज चार महिने झाले, तो आपल्या दर्शनाकरिता तळमळतो. यावर मातानी म्हणाल्या की हे किती चमत्कारिक आहे ? संन्याशाने सर्व संबंध तोडून टाकायचे असतात. सोन्याची झाली तरी

साखळी ती साखळीच. याने रात्रंदिवस आई आई म्हणून का म्हणत रहावे. माझ्या भोवती पुरुषांनी सदा घुटमळत राहिलेले मला आवडत नाही; मी देवासंबंधी कांही म्हणत नाही. आशु (एक नातलग) सुद्धा असाच माझ्या मागे मागे करीत असे; त्याला सुद्धा तसे न करण्याबद्दल मी ताकीद दिली. त्याने विचारले की या संन्याशांना निर्वाण प्राप्त होईल का ? माताजी म्हणाल्या की होईल तर. सर्व बंध तोडता तोडता शेवटी हे संन्याशी निर्वाणाचा अनुभव घेतील. व परमेश्वरात लीन होतील. शरीर हे वासनांमुळे प्राप्त होते. किंचितही वासना नसेल तर शरीर राहाणार नाही; निर्वासनायुक्त झाले की देह सुटलाच.

× × ×

एकदा कशावरून तरी माताजी म्हणाल्या की, येथे इतके लोक येतात, दर्शन घेतात, खातात पितात व जातात. अशा ह्या लोकांच्याबद्दल मला काय वाटायचे आहे ? अशा या लोकाबद्दल रामकृष्ण कधी काळजी करीत नसत; ते आपल्या अंतरंग भक्ताबद्दल काळजी करीत. ह्याचा अर्थ असा नव्हे की त्यांना यांच्याबद्दल आसक्ति होती. त्यांनी एकदा हजाराच्या बोलण्यावरून नरेनवरचे आपले मन काढून घेतले होते; मग त्यांच्या मनाला येथे राहाण्याचे कारण उरले नव्हते. त्यांना गाढ समाधी लागली; ती उतरविण्याला रामलालला किती खटपट करावी लागली. केवळ दयालुत्वामुळे रामकृष्णांनी आपले मन येथे अटकवून ठेविले होते.

× × ×

एकदा कांही बोलण्यावरून माताजी म्हणाल्या की भक्त दोन प्रकारचे असतात; एक परमेश्वराची सेवा करीत राहातात; व दुसरे अहोरात्र वर्षानुवर्षे एखाद्या लाकडाच्या मूर्तिप्रमाणे सदैव ध्यानस्थ राहतात. यावर एकजणाने विचारले की रामकृष्ण सांगत की निर्वाणप्राप्तीनंतरसुद्धा ईश्वरकोटी असतात तेच जगांत राहू शकतात, बाकीचे नाही; याचा अर्थ

काय ? माताजी म्हणाल्या की मनुष्य पराकोटीस पोहोचल्यानंतरसुद्धा आपले मन तेथून खाली ओढून जगांत लीलेने वावरू शकतात. यावर तो म्हणाला की परमेश्वरांत लीन झालेले मन असे कसे परत उतरवता येईल ? भांड्यातले पाणी सरोवरात ओतल्यावर ते निराळे कसे करता येईल ? माताजी म्हणाल्या की बरोबर आहे तुझे म्हणणे; पण हंस जसा दूध व पाणी अलग करून दूधच केवळ घेतो त्याचप्रमाणे परमहंस जो बनलेला असतो तो वर राहून वाटेल तेव्हां खाली उतरू शकतो.

× × ×

एकदा असेच बोलता बोलता माताजी म्हणाल्या की जगांत सर्वजण वासना सोडूं शकले तर जग रहावयाचेच नाही. वासना मुळेच मनुष्य वारंवार जन्म घेतो. यावर एक जण म्हणाला की गंगेत जर एखाद्याने प्राण सोडला तर मग ? माताजी म्हणाल्या की बाबारे जन्म–मरणापासून सुटणे वासना सुटल्यावाचून कधीही शक्य नाही; बाकी कशाचाही उपयोग या फेऱ्यातून बाहेर पडण्यास होत नाही. ज्या जन्मात सर्व वासना सुटतात तो जन्म शेवटचा.

× × ×

एकदा एक भक्त म्हणाला की माताजी मी असे ऐकले आहे की एकदा चैतन्य प्रभूंनी नारायणीला (एक तीन चार वर्षाची मुलगी) आशिर्वाद दिला की तुला कृष्णभक्ति प्राप्त होवो. त्या शब्दांचा जादूसारखा त्या मुलीवर परिणाम झाला. व ती कृष्णा कृष्णा म्हणून ओरडू लागली व जमिनीवर गडबडा लोळू लागली परमेश्वरप्राप्ति झाल्यानंतर नारदांनी एका मुंगीला पाहून, त्यांना दया येऊन, त्यांनी मुंगीला आशिर्वाद दिला की तू मोकळी हो; त्या क्षणीच त्या मुंगीचे शरीराचे परिवर्तन इतक्या झपाट्याने होत गेले की पशु पक्षी वगैरे देह प्राप्त होऊन शेवटी मनुष्य देह मिळून तिला परमेश्वर प्राप्ति झाली; हे सर्व नारदांच्या डोळ्यासमोर पहाता

पहाता झाले. पूर्णत्वास पोहोचलेल्या लोकांच्या कृपेने कोणीही एका क्षणात पूर्णत्व पावतो असा नाही का ह्याचा अर्थ ?

ह्यावर माताजी म्हणाल्या की तुझे म्हणणे अगदी बरोबर आहे.

× × ×

एकदा एकजण माताजींना म्हणाला की जर परमेश्वर अगदी आपलासा असा असेल तर त्याने आपण होऊन, दर्शन देऊन, का कृतार्थ करूं नये ? माताजी म्हणाल्या की बाळ, तुझे म्हणणे अगदी बरोबर आहे. पण परमेश्वर माझाच आहे असा विश्वास किती जणाजवळ असतो ? प्रत्येकजण कांही ना कांही तरी करीत असतो; पण परमेश्वराला भेटण्याची इच्छा किती जणांना असते ?

× × ×

त्यागासंबंधी एकदा माताजी सांगत होत्या की मी दक्षिणेश्वरी असतांना एकदा रामकृष्ण आपला रिकामा बटवा घेऊन नौबतखान्यात आले. मी थोडासा मसाला तेथेच तोंडात टाकण्यास त्यांना दिला व थोडासा एका पुडीत बांधून ती त्यांच्या हातात दिली व ते परत आपल्या खोलीकडे निघाले. ते वळले खरे पण त्यांची पावलें खोलीकडे वळण्याऐवजी गंगेकडे वळली. तोंडाने ते म्हणू लागले की मी बुडी घेऊं का ? आई, मी बुडी घेऊं का ? मी एकदम बेचैन झाले. गंगा तुडुंब भरलेली. मी तरुण होते व त्यामुळे मला बाहेर पडता येईना. इतक्यात देवळातला एक मनुष्य मजकडे येतांना दिसला. त्याला हाका मारून मी सांगितले की धाव हृदूला हाक मार व त्याला सांग की असेल तसा धाव; रामकृष्ण गंगेत बुडतील. हृदू जेवीत होता तो तसाच पानावरून उठून धावला व रामकृष्णांना पकडून त्याने परत आणले. संन्याशाने जवळ कांही बाळगावयाचे नसते. मी ती पुडी हातात दिली व ती घेऊन चालू लागल्याबरोबर त्यांची ही स्थिति

झाली. याला त्याग म्हणतात. एक क्षण उशीर झाला असता तर सर्वनाश झाला असता. बाबांनो, रामकृष्ण साक्षात् त्यागच होते.

× × ×

एका भक्ताने दुसरीस माताजी जयरामवाटीस कधी परत येतील हे समजण्याकरितां पत्र टाकले. तेथील लेखक भक्ताने माताजींना विचारले की जगद्धात्रीच्या पूजेच्या वेळी येतील असे लिहू ना ? माताजी म्हणाल्या की नको, नको ; आपण असे खात्रीपूर्वक लिहून कसे चालेल ? मी त्या वेळेला कोठे असेन, देव मला कोठे ठेवील हे आता कसे सांगता येईल ? देह आज आहे आणि उद्या नाही तो म्हणाली की असे काय म्हणता आपण ? आज आपण आहात म्हणून तर इतके लोक येत आहेत व सन्मार्गाला लागत आहेत. माताजी म्हणाल्या की खरे आहे तुझे म्हणणे. ती म्हणाली की निदान आमच्याकरिता तुम्ही रहा. हे ऐकून माताजी गहिवरून म्हणाल्या की पोरी, तुम्हा सर्वांना मी इतकी आवडते; तुम्ही सर्वजण मला इतके आवडता. पोरी, तुला शांतता व आनंद प्राप्त होईलच असा माझा आशीर्वाद आहे. मुली, जगात शांतता ही एकच गोष्ट मिळवावयाची असते.

× × ×

एकदा एकजण म्हणाली की आई, जगांत दुःख हे अपरिहार्य असून ज्याचे त्याने भोगलेच पाहिजे हे मला समजते. रामकृष्णांनी माझे दुःख कमी करावे असे मी म्हणतच नाही. पण आमच्या या त्रासात, दुःखात जर मधून मधून ते आम्हाला दर्शन देतील तर आम्हाला थोडासा धीर वाटेल नाही का ? माताजी म्हणाल्या की बाळ, तुझे म्हणणे खरे आहे. मी याविषयी रामकृष्णांना पुष्कळ वेळा बोलले. त्यावर ते एकदा म्हणाले की असे लाखो जण आहेत की. माझा बकरा मी मधोमध कापून किंवा त्याची

नुसती शेपटी तोडून त्याला मारून टाकीन; हा माझा प्रश्न आहे. ती म्हणाली की माताजी रामकृष्णांना आमची ही अशी स्थिति दिसत नाही का ? माताजी म्हणाल्या की त्यांच्यासमोर तुमच्यासारखे हजारो लोक आहेत की. रामकृष्ण मला म्हणत की चैतन्यानंदसागरावर हजारो लाटा उत्पन्न होत असतात व विरत असतात; त्यांना अंत नाही. यावर ती म्हणाली की ज्यांना कांही समजत नाही ते किती सुखी ? जे परमेश्वराचे मागे लागले त्यांना किती त्रास सहन करावा लागतो ? माताजी यावर म्हणाल्या की तुझे म्हणणे खरे आहे. यावर ती फिरून म्हणाली की माताजी, निदान तुम्हाला तरी आमचे दुःख पाहून दुःख होत असेल ना ? त्यावर माताजी लगेच म्हणाल्या की मला का म्हणून दुःख व्हावे ? ज्याने तुम्हाला उत्पन्न केले त्याला होईल दुःख पाहिजे तर.

× × ×

एकदा एकजण बोलता बोलता म्हणाला की कांही जणांचे मत असे आहे की साधूंनी, संन्याशांनी सेवाश्रमात, दवाखान्यात इत्यादि ठिकाणी काम करणे योग्य नाही; तसेच विक्री करणे, जमाखर्च करणे इत्यादि कामें करणे पण योग्य नाही. रामकृष्णांनी अशा प्रकारचे कांहीही काम केलेले ऐकिवात नाही. असली कामें संन्याशांवर लादणे योग्य नाही. त्यांना कामच करायचे असेल तर भजन, पूजन, पूजा, अर्चा इत्यादि कामें त्यांनी करावी. या व्यतिरिक्त सर्व कामें वासनामूलक असल्याने त्यांचे देवाकडे लक्ष लागणार नाही. हे ऐकून माताजी म्हणाल्या की अशा बोलण्याकडे लक्ष देऊं नको. काम नसले तर चोवीस तास करायचे काय ? वेळ कसा घालवावयाचा ? ध्यानधारणा, जपजाप्य काय चोवीस तास कोणी करूं शकतो ? रामकृष्णांचे उदाहरण तू देतोस; पण रामकृष्णांची गोष्ट अगदीच निराळी होती. मथुरबाबू त्यांचा रसद्दार होता, म्हणून राम-कृष्णांना खायची कधी अडचण पडली नाही. तू आज कांही तरी काम

करतोस म्हणून तुला खायला मिळते आहे; नाही तर दोन घास अन्ना-करिता तुला दारोदार भिक्षा मागत हिंडावे लागले असते; तुझ्या प्रकृतिवर परिणाम झाला असता. शिवाय आजकालच्या दिवसात भिक्षा कोण घालते ? म्हणून ह्या असल्या बोलण्याकडे लक्ष देऊं नको. रामकृष्णांच्या मनांत असेल तशाच गोष्टी होतात. मठ हा असाच चालविला जाईल. या चौकटीत ज्याला स्वतःला बसवता येत नसेल त्यांनी ताबडतोब मठ सोडून जावे.

× × ×

एकदा एकजण बोलता बोलता म्हणाला की वासनांचे मुळेच विषय उत्पन्न होतात. एखादा श्रीमंत चारमजली वाड्यात रहात असून त्याला इच्छा नसेल तर तो कसा उपभोग घेईल ? उलट एखादा झाडाखाली बसणारा भिकारी वासना नसल्यास आपआपल्यातच मस्त राहील, असेच ना आपले म्हणणे ? यावर माताजी म्हणाल्या की बरोबर आहे तुझे म्हणणे. ज्याला वासना नाही त्याला कसले बंधन असणार ? माझेच पहाना; मी या सर्वांत गुंतलेली दिसते पण या कशातही मला आसक्ति नाही. तो म्हणाला की तुम्हाला कशी आसक्ति असेल ? पण आमच्या मनांत कितीतरी वासना उत्पन्न होतात; या वासनांचे निर्मूलन कसे होईल ? माताजी म्हणाल्या की तुझे स्वतःचे पहा; तुला खरी वासना नाही. ज्या तुला वासना वाटतात त्या खऱ्या नव्हेत; त्या नुसत्या तुझ्या कल्पना आहेत; त्या तुझ्या मनांत येतात व जातात. जितक्या त्या येऊन जातील तितके चांगले. तो म्हणाला की कालच मला असे वाटले की देवाच्या मदतीशिवाय माझ्या मनांतील वासना मी कसा काढू शकेन ? एक वासना येऊन जाते तर दुसरी उभी राहाते. माताजी म्हणाल्या की जोपर्यंत मी पण आहे तोपर्यंत वासना येणारच. परंतु या वासना तुला त्रास देऊं शकत नाही; रामकृष्ण तुझे संरक्षणकर्ते आहेत. ज्याने त्यांच्यापायावर सर्वस्व

वाहिले त्याला ते संभाळणार नाहीत तर त्यांची चूकच होईल. तू त्यांच्यावर श्रद्धा ठेवून वाग. तुझे चांगले व्हावे असे त्यांच्या मनांत असले तर तसे होईल; उलट तुला डुबवावयाचे त्यांच्या मनांत असेल तर तसे होईल. तू मात्र अगदी सरळपणे ते जसे सांगतील तसा वागत जा म्हणजे झाले.

× × ×

बोलता बोलता एकजण माताजींना म्हणाला की मुसलमान लोकांनी कित्येक देव व देवळे फोडून टाकली. उदाहरणार्थ सोमनाथचे मंदिर पहा. सोमनाथास स्नानाकरितां रोज काशीहून गंगा आणवण्याकरितां केवढा खटाटोप व खर्च होतसे; असे हे पवित्र देऊळ फोडले गेले. माताजी म्हणाल्या की दुष्टांना मूर्तीमध्ये देवत्व दिसत नाही. असे लोक समोर आले असतांना मूर्तीमधील देवत्व नाहीसे होते. देवाच्या मनांत येईल तसे तो करतो. हा सुद्धा परमेश्वराचा एक खेळच आहे.

× × ×

एकदा बोलता बोलता माताजी म्हणाल्या की काली माता ही सर्व जगाची माता आहे; बरे व वाईट हे तिनेच उत्पन्न केले आहे, तिच्यापासूनच सर्व उत्पन्न झाले आहे, सर्व विश्व तीच प्रसवते. जगांमधे पूर्णत्व पावलेल्या लोकांचे निरनिराळे वर्ग पडतात; कांही जन्मापासून, कांही जपतप करून, व कांही एकदम गुरुकृपेने पूर्णत्वास पावतात. यावर एकजण म्हणाला की मनुष्य एकदम पूर्णत्व कसे पावू शकेल ? त्यावर माताजी म्हणाल्या की एखाद्याला एकदम श्रीमंती वारसा मिळाल्यावर जसा तो एकदम श्रीमंत होतो तसा गुरुकृपेने मनुष्य एकदम पूर्णत्व पावू शकतो.

× × ×

एकदा त्यांच्या भाचीने शेतखाना साफ केल्यावर ती गंगास्नान करून आली. हे पाहून माताजी म्हणाल्या की येथल्या येथे का नाही स्नान केलेस?

काय फरक पडला असता ? तू कांही मलमा उचलून फेकला नाहीस; आणि जरी फेकला असतास तरी सुद्धा त्यात एवढी अशुद्धता कसली ? रामकृष्णांनी तर स्वत:चा मळ नीट चाखून पाहिला होता; पुढे तोतापुरींचे शिष्यत्व घेतल्यावर तर दुसऱ्याचा पण चाखून पाहिला होता. आपलाच तर मळ, तो आपल्याहून निराळा कसा होईल ? त्यात अशुद्धता कसली ? मी तर मैल्यावरून पुष्कळ वेळा चालत जात असे. देवाचे नांव घेतांना सर्व शुद्ध होते. शुद्ध व अशुद्ध हे आपल्या मनावर अवलंबून असते. आपल्या मनांत दोष उत्पन्न झाल्याशिवाय दुसऱ्याचा दोष आपल्याला दिसत नाही. शिवाय दुसऱ्याचे दोष त्याला दाखवून आपल्याला काय मिळते ? त्या माणसाचे मन मात्र दुखावते. दुसऱ्याचे दोष मला दिसतच नाहीत; मी पहातही नाही. क्षमाशील असणे ही सुद्धा मोठी तपस्या आहे.

× × ×

काशीस मरण आले तर मुक्ति मिळते; किडा, मुंगी, पशु, पक्षी या सर्वांना मुक्ति मिळते; मग मनुष्यास मुक्ति मिळेल यात नवल काय ? मग तो मनुष्य आस्तिक असो वा नास्तिक असो हिंदु असो वा कोणत्याही धर्माचा असो. विश्वेश्वर प्रत्येकास मरणानंतर सद्‌गति देतात या विषयी बोलणे चालले होते. त्यावर एक भक्त म्हणाला की माताजी काशीबद्दल असे हे सर्व तुह्मी ह्मणता हे खरे का ? माताजी ह्मणाल्या की एकदा सांगितले ना ? त्यावर तो भक्त हसून म्हणाला की मग मला काशीस मरण नको यायला; मी काशीस मेलो तर तुम्ही कोठे असाल व मी कोठे असेन ? आणि मग तुमचे दर्शन फिरून नाही झाले तर ? त्यावर माताजी हसत म्हणाल्या की कसा आहेस रे तू ? पहा रे पहा, हा काशीस मरण नको म्हणतो. तो म्हणाला की माताजी " चक्षुर्वै सत्यम् । " पाहिल्या शिवाय विश्वास कसा बसणार ? माताजी ह्मणाल्या की आप्त वाक्यावर विश्वास न ठेवशील तर कसे होईल तुझे ? ऋषिमुनि

व सत्पुरुष यांनी घालून दिलेल्या मार्गाशिवाय दुसरा मार्ग आहे कुठे ? तो म्हणाला की हे मला समजते की पाहाणाऱ्यावर विश्वास ठेवला पाहिजे; ह्मणून तर मी काशीबद्दल तुह्मास विचारले, आणि त्याचे उत्तर मला पाहिजे. माताजी ह्मणाल्या की तू विश्वास ठेवलास काय वा न ठेवलास काय, त्याला काय किंमत आहे ? एवढा मोठा शुक्राचार्य, पण तो सुद्धा परमेश्वरापुढे मुंगळ्यासारखा. परमेश्वर अमाप आहे, अपार आहे; त्याला तू काय ओळखणार ? रामकृष्णांची गोष्ट निराळी. त्यांना सर्व प्रत्यक्ष दिसत असे, त्यांना सर्व माहिती असे; त्यांचे शब्द म्हणजे वेदवाक्य. त्यांच्या शब्दावर विश्वास नाही ठेवलास तर कसे होईल तुझे ? तो ह्मणाला की निरनिराळी शास्त्रे निरनिराळे सांगतात; आह्मी काय घ्यायचे ? ह्मणून तर आपल्याला विचारून मी इतका त्रास देत आहे. तेव्हा माताजी ह्मणाल्या की खरे आहे. पंचांग पाऊस किती व कसा पडेल सांगते; पण ते मिळून पाण्याचा थेंबसुद्धा मिळत नाही. कित्येक निरुपयोगी गोष्टी शास्त्रात सांगितल्या आहेत. शास्त्रातल्याप्रमाणे शब्दशः वागणे जमणे अशक्य आहे. रामकृष्ण ह्मणत की शास्त्रातील भक्तिची वर्णनें वाचून भक्ति समजत नाही. या कलियुगात केवळ सत्याची कास धरणाऱ्याला परमेश्वर प्राप्त होतो.

× × ×

एकदा एका भक्ताने माताजींना विचारले की तपस्येची जरूरी काय ? माताजी म्हणाल्या की तपस्येची फार जरूरी आहे. रामकृष्णांनी सर्व प्रकारच्या तपस्या केल्या. नतर ते म्हणाले की साचा ओतून तयार झालेला आहे; आता ज्याने त्याने आपली मूर्ति घडवून घ्यावी. त्याने विचारले की याचा अर्थ काय ? त्यावर दुसऱ्यानेच उत्तर दिले की आता फक्त रामकृष्णांची सेवा, ध्यान केले म्हणजे झाले. माताजी म्हणाल्या की किती योग्य बोललास तू ? तुला बरोबर समजले. रामकृष्णांचे ध्यान,

त्यांच्या लीला, त्यांचे गुणवर्णन, त्यांचे व त्यांच्याबरोबरचे निरनिराळे प्रसंग हे सारखे ध्यानात आणावयाचे. त्यांचे ध्यान केल्याने सर्व पारमार्थिक अनुभव येतात. रामकृष्ण म्हणत की माझे स्मरण करणाऱ्याला कधीच कांही कमी पडायचे नाही.

× × ×

एकदा रामकृष्णांच्या भक्तासंबंधी माताजी बोलत असता एकजण मधेच म्हणाला की माताजी, कोण हे रामकृष्णांचे भक्त; आम्ही त्यांना जाणीत नाही. यावर माताजी म्हणाल्या की मला तरी काय माहीत ? पण एवढे खरे की रामकृष्णांच्या पूर्वावतारात त्यांचे बरोबर जे भक्त होते तेच या त्यांच्या अवतारात त्यांचे भक्त बनून आले. यावर तो म्हणाला की मला देवाची व त्यांच्या त्या चतुर्हस्तादि रूपे पहाण्याची इच्छाच नाही. त्यावर माताजी म्हणाल्या की गड्या, माझे अगदी अस्सेच आहे. या अमानुष मूर्ति पाहून काय करायचे आपल्याला ? आपल्याला आपले रामकृष्ण बस्स झाले; तेच सर्व आहेत.

× × ×

एकदा एकाने माताजींना खाण्यापिण्याबाबत नियम विचारले, त्यावर माताजी म्हणाल्या की साधकाने श्राद्धान्न कधीच खाऊ नये; त्यापासून हानि होते. देवाला अर्पण केल्याशिवाय कांहीही खाऊं नये. जसे अन्न तसे शरीर व मन. शुद्ध अन्न खाण्याने मन व शरीर शुद्ध होते. शुद्ध मनाला प्रेमभक्ति प्राप्त होते.

× × ×

एकदा एक जण म्हणाला की रामकृष्णांनी किती त्याग केला ! आमच्याच्याने किंचित्हीं त्याग होत नाही. यावर माताजी म्हणाल्या की अरे, हळुहळू सर्व साधेल तुला. प्रत्येक जन्मांत मनुष्याची थोडी थोडी प्रगति

होत असते. प्रगति व्हावयाची, फरक व्हावयाचा तो मनामधे, शरीरामधे; आत्म्यात काय फरक व्हावयाचा असतो.

× × ×

रामकृष्णांच्या शिष्यामधे शूद्र सुद्धा होते व शास्त्राप्रमाणे शूद्राना संन्यासाधिकार नाही; यावर कांही लोक आक्षेप घेत. याबाबत एकदा माताजी म्हणाल्या की रामकृष्णाचे शिष्य हे सर्व ज्ञानी होत, व म्हणून सर्व संन्याशीच खरे. कोणताही ज्ञानी संन्यास घेऊ शकतो. स्त्रीने संन्यास घेतला तर ती सुद्धा पुरुषच होते.

× × ×

एकदा माताजींनी स्वयंपाक केल्यावर एका भक्तास जेवायला वाढले. तो जेवत असतांना माताजींनी त्याला विचारले की काय रे स्वयंपाक कसा झाला आहे, भाजी कशी झाली आहे? तो म्हणाला की पथ्याचे जेवल्यासारखे वाटते. यापेक्षा जेवण सहज चांगलं बनवतां येईल. आमच्या प्रांतातल्या लोकांना हे जेवण बेचव वाटते. माताजी म्हणाल्या की अरे भाजीतला रस तर खाऊन पहा. तेथे माताजींची भाची नलिनी होती, तिने हा संवाद ऐकून ती माताजींना म्हणाली की आत्या, तू जर भाजीत तिखट घातलेच नाहीस तर तिला चव येईलच कशी? त्यावर माताजी त्याला म्हणाल्या की तू तिचे नको ऐकू; तू खाऊन तर पहा भाजी कशी छान आहे ती. तो म्हणाला की तुम्ही बनविलेल्या निरनिराळ्या भाज्या, रस्से मी पुष्कळ वेळा खाऊन पाहिलेच आहे; पण खरे सांगू का, सर्वांची चव एकच लागते. माताजी म्हणाल्या की तू मला एकदा सांग आणि मग पहा. मी पुष्कळ तिखट वापरीन पुढच्या वेळेला. तो म्हणाला की पुष्कळ तिखट घालण्या संबंधाने नाही बोलत. यावर माताजी आपल्या भाचीला म्हणाल्या

की थोडी डाळ आज भिजत घाल. अग मी किती छान स्वयंपाक करीत असे; पण माझी सवय आताशा गेली ना म्हणून हे असे होते.

× × ×

एकदा एक भक्त म्हणाला की पूजेमधे मला एक मोठी शंका येते. एखाद्याला कोणत्याही देवाची पूजा करतांना त्या त्या मंत्राने आपल्या गुरुची पूजा केली तर; त्या देवतेची प्रार्थना करीत ती गुरुलाच केली तर बरोबर होते की काय होते, का चुकते, हे समजत नाही. माझ्या हातून असे होते व मग मनाला शंका व हुरहुर वाटते. यावर माताजी म्हणाल्या की तू तसेच करीत जा. रामकृष्ण जसे महेश्वर आहेत तसेच महेश्वरी पण आहेत. सर्व देवता त्यांच्यात आहेत; तेच सर्व देवता आहेत. सर्व मंत्र त्यांच्यात असून सर्व मंत्र पण तेच आहेत. रामकृष्णांची पूजा केल्याने सर्व देव देवतांची पूजा होते.

× × ×

एकदा एका भक्ताने खाण्यापिण्याच्या नियमाबद्दल विचारल्यावरून माताजी म्हणाल्या की साधकाने श्राद्धान्न खाऊं नये. संसारात नियम पाळणे कठीण असते. आजकालच्या दिवसात काय नियम पाळणार ? तेव्हा एक ध्यानात ठेव की कोणताही पदार्थ तोंडात घालतांना रामकृष्णांचे स्मरण करून त्यांना देऊन, त्यांना सांगून घ्यावा; अरे एवढेच काय, पण पाणी पितांना सुद्धा असेच करावे; याने सर्व दोष नाहीसे होतात. अशा तऱ्हेने अन्नपाणी घेतल्याने हानि पोहोचत नाही.

× × ×

एकदा एक भक्त म्हणाला की आई माझ्या मन:स्थितिचे काय मी वर्णन करू ? आपण सर्व कांही जाणता आहा आज कांही वर्षे झाली, सहन होत नाही आता. आपली कृपा नसती तर एव्हाने नाहीसा झाला

असतो. माताजी म्हणाल्या कीं जगांत त्रास व दु:खें अनंत आहेत; पण करणार काय ? सहनच केले पाहिजे ज्याचे त्याने. माझ्याकडे पहा; कसे माझे जीवन आहे ? या राधूमुळे मला किती त्रास होतो. तो म्हणाला की आपल्याला होत असलेला त्रास पाहून मला माझीच लाज वाटते; मनाला एक तऱ्हेचा धीर येतो. आपण सर्व जाणता म्हणूनच आपल्या कृपेची इच्छा मला होते. यावर माताजी म्हणाल्या की घाबरू नको; अरे, रामकृष्ण आहेत ना आपले ? त्यांची तुझ्यावर आता व यापुढे नेहमी पाखर राहील. नंतर तो म्हणाला की आई, स्वप्ने खरी असतात का ? यावर माताजी म्हणाल्या की रामकृष्णाच्या अनुषंगाने पडणारी सर्व स्वप्ने खरीच असतात. परंतु त्यांनी आपल्या भक्तांना पडणारी स्वप्ने त्यांना स्वत:ला सुद्धा सांगण्याची मनाई केलेली आहे. यावर तो म्हणाला की मी रामकृष्णांना कधीच पाहिलेले नाही; मला रामकृष्ण आपणच आहा.

× × ×

एकदा माताजी अशाच बोलत बसल्या असतांना त्यांची भाची अंगावर कावळ्याने घाण केल्यामुळे स्नान करून परत आलेली पाहून त्या तिला म्हणाल्या की माझे इतके वय झाले पण कावळ्याने माझ्या अंगावर कधी घाण केली नाही. तुझे मन अशुद्ध असल्यामुळे हे असे होते. पापाचरणाने मन अशुद्ध होते. त्या कृष्णाची बहीण अशीच आहे. गंगेत डुबकी मारली तर शेजाऱ्यास विचारीत असे की माझे डोके पुरे डुबले होते का नाही ? हे मन पछाडल्याची खूण आहे. असे मन शुद्ध होणार कसे ? मनाला जितके तर्कट फाटे फोडावे तितके मन अशुद्ध होते. यावर एकजण म्हणाला की स्वामी शिवानंद तर इकडे कुत्र्याला हात लावून तशीच पूजा करतात; कोणी हातावर पाणी शिंपडले तर चार थेंब आपल्या डोक्यावर शिंपून पूजेला लागत. सर्वालाच गंगेचे पाणी ते वापरीत. यावर माताजी म्हणाल्या की त्यांची गोष्ट निराळी; ते स्वत: देवच होते. गंगेकाठी रहाणारे लोक

देवच असतात; त्यांच्या हातून पाप झाले तर गंगामाई धुवून टाकते. त्यावर त्यांची भाची नलिनी म्हणाली की गोलपमांनी एक दिवस सर्व मोऱ्या साफ केल्या व लगेच नैवेद्याची तयारी केली; कपडेसुद्धा बदलले नाहीत. मी त्यांना म्हटले की हे काय गोलपमा; गंगेवरून स्नान करून या की. तेव्हां गोलपमा मला म्हणाल्या की तुला पाहिजे तर तू स्नान करून ये. यावर माताजी म्हणाल्या की गोलपमा शुद्ध मनाची आहे. तिची स्थिति किती उच्च आहे; शुद्धाशुद्धाचा विधिनिषेध तिला त्यामुळे नाही. गोलपमाचा हा शेवटचा जन्म आहे. असे शुद्ध मन असण्याला शरीर पण तसेच शुद्ध लागते. गंगेच्या तटावर आजूबाजूस आठ मैल शुद्ध हवा खेळत असते; ही हवा नारायणस्वरूप असते. तपाचरणाने मन शुद्ध होते. शुद्ध मन झाल्याशिवाय परमेश्वरप्राप्ति होत नाही हे ऐकून एकजणाने विचारले की जे परमेश्वरास सर्वस्व वाहतात पण ज्यांच्या हातून तपाचरण होत नाही त्यांचे कसे? माताजी म्हणाल्या की तो एक मार्ग आहे. पुढे माताजी म्हणाल्या की नरेंद्र एकदा म्हणाला की मला लाखो जन्म घ्यावे लागले तरी मला त्याची भीति वाटत नाही. त्याचे म्हणणे खरे आहे. ज्याला ज्ञान प्राप्त झालेले असते त्याला जन्ममरणाची भीति नसते; भीति अज्ञान्याला असते. गुरफटतो अज्ञानी; असा अज्ञानी हजारो जन्म घेतो तेव्हां कोठे त्याला परमेश्वराची आठवण येते. अरे वासरू हम्मा हम्मा म्हणजे मी आहे मी आहे म्हणून ओरडते; पण त्याच्या कातड्याच्या वाद्या तुंही तुंही म्हणजे तू आहेस तू आहेस म्हणून बोलू लागतात.

× × ×

एक संन्याशी भक्त हृषीकेशला जाऊन राहिला व कांही दिवसांनी त्याने माताजींना पत्र लिहिले की आपण मला रामकृष्णांचे दर्शन होईल असे सांगितले, पण अजून कांही झाले नाही. माताजींनी एकाला त्याला उत्तर लिहायला सांगितले की रामकृष्ण कांही तुझ्याकरितां हृषीकेशला

जायला बसले नाहीत. तू संन्यास घेतला आहेस हे ध्यानांत ठेव. त्यांच्या मनांत येईल तेव्हां ते दर्शन देतील.

× × ×

एकदा एका स्त्रीभक्ताने लिहिले की माझे सासूसासरे फार विरुद्ध आहेत. मला आपल्या दर्शनाची उत्कंठा आहे; तर मी काय करूं ? माताजींनी उत्तर धाडले की काळजी करू नकोस; स्वस्थ रहा. त्यांच्या मनाविरुद्ध वागू नकोस. येथे येण्याची कांही जरूरी नाही. परमेश्वर सर्वत्र भरलेला आहे; तो तुला तेथेही दर्शन देईल.

× × ×

देवावर चिडून एकाने एकदा माताजींना पत्र लिहिले. त्यावर माताजी म्हणाल्या की अरे व्यास, शुक हे परमेश्वरासमोर मुंगळ्या सारखे आहेत असे रामकृष्ण सांगत असत. ही विविध सृष्टी त्याने उत्पन्न केली आहे. त्याची तुम्ही प्रार्थना केली तरी सुद्धा त्याला त्याची काय पर्वा आहे. त्याची आराधना तुम्ही केली नाहीत तर तुमचे दुर्दैव. त्याने आपल्या मायेने सर्वांना भुरळ पाडली आहे. त्यावर एकजण म्हणाला की आई, महंमद, येशुख्रिस्त वगैरेंनी आपल्या भक्तांना संभाळले ना. माताजी यावर म्हणाल्या की रामकृष्ण तसेच आपल्या भक्तांना संभाळतात. इतके लोक येतात माझ्याकडे; हे सर्व कसे माझ्या ध्यानांत राहणार ? म्हणून मी रामकृष्णांना त्या सर्वांवर लक्ष ठेवण्यास प्रार्थना करीत असते. रामकृष्णच सर्व करतात आणि म्हणून तर इतके लोक येथे येतात.

कांही दिवसांनी तो पत्र लिहिणारा भक्त माताजींकडे आला. हाच तो पत्र लिहिणारा असे कोणीतरी माताजींना सांगितले. त्याला पाहून माताजी म्हणाल्या की चांगला दिसतो आहे मुलगा. मग त्याला म्हणाल्या की बाळ पाण्याची नेहमी अधोगति असते; सूर्यकिरणांनी वाफेच्या रूपाने

पाणी वर जाते. तसेच हे मन नेहमी खाली घसरते; परमेश्वराची कृपा झाल्यावर ते वर जाऊं लागते.

× × ×

एकदा माताजी म्हणाल्या की बाबांनो, जप, तप, तीर्थाटन हे सर्व तरुणपणी करायला पाहिजे. त्यावेळी अंगात शक्ति असते. मी सुद्धा माझ्या तारुण्यांत पायी यात्रा केल्या; पण आज आता मला पालखीशिवाय होत नाही. आता दुसऱ्यावर अवलंबून रहावे लागते. वयोमानाने मनाची शक्तिसुद्धा कमी होते. म्हणून बाबांनो, शक्य तितक्या तरुणवयात परमेश्वराचा ध्यास घ्यावा. म्हणून तर रामकृष्णांनी सर्व संन्याशी तरुण मंडळीतून निवडले. बाबांनो, परमेश्वराची उपासना आळस सोडून जोरात सुरू करा. हीच वेळ आहे. एकदा वय वाढले की मग कांही करतां येत नाही.

× × ×

बोलता बोलता एक दिवस माताजी म्हणाल्या की जपाने मन एकाग्र होते. रोज दहा, पंधरा, वीस हजार इतका जप व्हावयाला पाहिजे. मग कोठे मनाला स्थिरता येऊ लागते. बाळांनो, माझा असा अनुभव मी सांगते आहे. प्रथम असे करा व मग तक्रार करा. कांही न करताच सगळेजण तक्रार करतात. मनाचा धर्म भटकण्याचा आहे. हळुहळू ते स्थिर होऊ लागते. मग पुढे ध्यान जमू लागते. मन स्थिर झाल्याशिवाय सर्व व्यर्थ आहे. मनुष्य परमेश्वराला फार लौकर विसरतो. शेवटी परमेश्वर स्वतः जन्म घेऊन विविक्षित मार्ग दाखवितो. यावेळी त्याने अवतार घेऊन त्यागाचा मार्ग दाखविला आहे.

● ● ●

# भाग तिसरा

एकदा एका संन्याशी भक्ताने माताजींना विचारले की साधना करायची ती मठांत का काशीसारख्या पवित्र ठिकाणी वा एकांत जागेत करायला पाहिजे ? माताजी म्हणाल्या की तू कांही वेळ हृषीकेशसारख्या ठिकाणी प्रथम साधना कर; त्याने तुझे मन खंबीर होईल. त्यानंतर तू कोठेही राहून साधना केलीस तर तुझे मन मग बाहेर फिरकणार नाही. बाळ, नवीन रोपटे लावले की त्याच्या बचावाकरितां त्याच्या भोंवती काटेरी कुंपण घालावे लागते; एकदा रोपटे वाढून त्याचे झाड झाले की मग कुंपणाची जरूर नसते. एकांतात साधना करणे महत्त्वाचे आहे. जेव्हां एखादे संकट ओढवते वा अडचण येते तेव्हां परमेश्वराची कळवळून प्रार्थना करावी की मला मार्ग दाखव. परमेश्वर आपल्यातली अशुद्धता प्रथम काढून टाकतो, मन शांत करतो व शेवटी ज्ञानोदय करून देतो.

× × ×

एकदा एका भक्ताने प्रार्थना केली की आई मी आता अशक्त झालो असल्याने हातून साधना होत नाही म्हणून मी आपल्या पायापाशी शरण आलो आहो, तर माझ्या आत्मोन्नतिकरिता योग्य दिसेल ते करावे. माताजी म्हणाल्या की रामकृष्ण तुझी त्यागवृत्ति उचलून धरोत. घाबरण्याचे काम नाही तुला. रामकृष्णांचे काम करीत जा व जमेल तितकी साधना करीत जा. सारखा कामात गढून रहा; आळस सोडून दे; आळसाने मनास फार फाटे फुटतात.

× × ×

एकदा एका भक्ताने विचारले की तब्बेत नीट रहावी म्हणून मी थोडीशी आसने करीत असतो त्याला कांही हरकत आहे का ? माताजी म्हणाल्या की जरा जपूनच रहा; ही आसने, प्राणायास वगैरे सिद्धि देतात

व त्यात अडकल्याने आत्मोन्नती होत नाही. बरे, सवय लागल्यानंतर तू ते करणे सोडलेस तर प्रकृति खराब होते. म्हणून सर्व जपून कर. तो म्हणाला की मी फक्त पाच दहा मिनिटे करतो. माताजी म्हणाल्या की मग ठीक. मी आपली धोक्याची सूचना तुला देऊन ठेवली आहे. फार प्राणायामाने अंगात व मस्तकात उष्णता वाढते व त्यांचा मेंदूवर विकृत परिणाम होतो. शिवाय अन्य सोप्या मार्गाने मनाची स्थिरता प्राप्त होत असेल तर या प्राणायामाची जरूरी काय ?

× × ×

एकदा एका संन्याशी भक्ताने विचारले की या जीविताचे वास्तविक ध्येय काय असले पाहिजे ? माताजी म्हणाल्या की या जीविताचे एकच ध्येय असू शकते व ते म्हणजे परमेश्वर प्राप्ति होय. बाळ, तू तर संन्याशी आहेस; तुला कसली काळजी ? परमेश्वर आतून व बाहेरून तुला सांभाळतोच आहे. बाबा, चोवीस तास ध्यान धारणा, जपजाप्य करणे शक्य नाही; म्हणून कांही वेळ हे करून बाकीचा वेळ स्वत:ला कामात गुंतवून घेत जा. काम करीत असतांना सदैव परमेश्वराचे स्मरण करीत रहावे; नेहमी नित्यानित्य विचार करीत जावा.

× × ×

एकदा एकजण म्हणाला की इतके दिवस गेले, पण मला कांहीच अनुभव आला नाही. माताजी म्हणाल्या की असा उतावीळ होऊ नकोस. अरे आज तुझे संसारावरून मन उडून परमेश्वराच्या चरणाकडे लागले आहे ही काय लहान सहान गोष्ट समजतोस का तू ?

× × ×

एकदा एका स्त्रीभक्ताने विचारले की मी कोणत्या दृष्टीने आपणाकडे पहावे ? माताजी म्हणाल्या की जी देवता तुला आवडत असेल तीच

मला समज. मला राधा समज मला तुझी आई समजून चाललीस तरी तुझे काम होईल. नंतर ती म्हणाली की कित्येकांना कित्येक दृश्ये दिसतात; मला कांहीच दिसत नाही. माताजी म्हणाल्या की बाळ, ह्या दृश्यांना कांही महत्त्व देऊं नको. तुला योग्य वेळी ज्ञान प्राप्ति होईल.

× × ×

एकदा एक स्त्री भक्त म्हणाली की उच्च साधकांचे पतन झालेले पाहून फार भीति वाटते. माताजी म्हणाल्या की रात्रंदिवस विषयांशी संबंध येत असल्याने मन खाली घसरणे संभवनीय आहे. त्यावर ती म्हणाली की पण मनुष्य स्वत: कांहीच करू शकत नाही; परमेश्वर प्रत्येक गोष्ट करतो ना ? माताजी म्हणाल्या की अगदी खरे आहे तुझे म्हणणे. परंतु याची जाणीव माणसाला असते काय ? अहंकारामुळे माणसास आपण स्वतंत्र आहोत असे वाटत असते; परमेश्वराची त्यांना आठवण सुद्धा नसते. परमेश्वरावर जे विसंबून राहातात त्यांचे पालन तो करतो.

× × ×

एका भक्ताने एकदा विचारले की आपण ज्याचे गुरुत्व पत्करले त्याला साधना करण्याची जरूर काय ? माताजी म्हणाल्या की खरे आहे तुझे म्हणणे; पण त्यात मुद्दा असा आहे की घरात सर्व सिद्धता असली तरी सुद्धा दिवसातून दोनदा, निदान एकदा तरी स्वयंपाक केल्याशिवाय खायला कसे मिळेल ? स्वयंपाकाचा जो कंटाळा करील त्याला उपाशीच रहावे लागेल. तो म्हणाला की मला समजले नाही. माताजी म्हणाल्या की जितकी आपण साधना करावी तितकी परमेश्वरप्राप्ति लौकर होते. जन्मभर कांही केले नाही तर शेवटी काय ते होईलच; पण आळसात वेळ घालविण्याने तदर्थ फार वेळ लागेल; या जन्मातच साध्य होणे कठीण. परमेश्वरप्राप्त्यर्थ तू सर्व सोडले आहेस ना ? मग आळसात वेळ घालवून मनाला फाटे फोडून देण्याऐवजी कोणतेही काम रामकृष्णांचे काम समजून

करीत रहा तुला पोटदुखी आहे, त्यामुळे कठीण साधना तुला जमणार नाही. म्हणून काम करीत जा. खाण्यापिण्याची काळजी घेत जा.

× × ×

श्रद्धा, विश्वास याबाबत माताजी म्हणाल्या की रामकृष्ण सांगत असत की नुसती पुस्तके वाचून काय उपयोग. वाचून एकदा समजले की " ब्रम्ह सत्यं जगन्मिथ्या ।"; मग तेच तेच फिरून काय वाचायचे ? तदर्थ प्रयत्न नको का करायला ? समजा, चार वस्तू आणण्याकरिता मी तुला पत्र लिहिले; एकदा दोनदा पत्र वाचून, बाजारात जाऊन तू त्या वस्तू घेऊन मला आणून देशील, नाही का ? नुसते पत्र वाचण्याने काम होईल का ?

× × ×

एकदा एकाशी बोलत असतांना वासराचे हंबरणे माताजींचे कानावर आले. लगेच त्या उठून गोठ्यात गेल्या व त्या वासराजवळ जाऊन म्हणाल्या की तुला मोकळे हिंडायला पाहिजे का ? असे म्हणून दावे सोडून त्यांनी वासराला मोकळे केले. दावे सोडतांना त्यांची ती दृष्टि व त्याला सोडल्यानंतर त्याला थापटण्याची क्रिया व त्याने टुणकन् उडी मारली तेव्हाचे त्यांचे त्याकडे पाहाणे हे सर्व पाहून एका भक्तास अगदी भरून आले व तो आपल्याशीच म्हणाला की ह्यांना असे शरण जाण्याचा अवकाश की मलाही त्या अशाच मोकळ्या करतील.

× × ×

एकदा एक जण बोलता बोलता म्हणाला की कांही जण सांगतात की स्वतःचे कर्म पूर्ण करण्याचा अखंड प्रयत्न करा, मग परमेश्वराच्या मनात येईल तशी तुमची प्रगति होईल, हे खरे धरायचे का ? यावर माताजी म्हणाल्या की हे अगदी खरे आहे. आपले नियत कर्म केलेच

पाहिजे ; याने मन सत्स्थितीत राहाते. त्याचबरोबर साधना करणे जरूर आहे. निदान सकाळ संध्याकाळ साधना झालीच पाहिजे. आपल्या स्वकर्माचे जणू सुकाणूच होय या दृष्टीने साधनेकडे पाहात जा. सायंकाळी आपल्या सर्व कर्मांचा आढावा, कालच्या व आजच्या आपल्या मनःस्थितीत काय फरक झाला ते पहावे. नंतर आपल्या दैवताची मूर्ति पायापासून वर अशी ध्यानांत घ्यावी; सबंध मूर्ति ध्यानांत आणावी. दिवसभर कामे करून सकाळ संध्याकाळ जर साधना केली नाही तर आपण योग्य किंवा अयोग्य कर्म करतो आहो हे कसे ध्यानांत येईल ? यावर तो म्हणाला की कांहीजण असे सांगतात की काम करून चालणार नाही ; साधनाच केली पाहिजे. त्यावर माताजी म्हणाल्या की त्यांना कसे समजले की साधनाच केल्याने साध्य प्राप्त होते ? नुसती साधना करून कुणाला कांही मिळाले आहे काय ? अरे महामायेने मार्ग दाखविल्याशिवाय सर्व व्यर्थ आहे. परवाच येथे एक उत्कट साधना करणारा आलेला होता, त्याला तू पाहिलेस ना ? त्याचे डोके बिघडलेले तुला दिसले ना ? असे हे डोके फिरले तर हा जन्म व्यर्थ नाही का गेला ? अरे आपली बुद्धि ही मोठी घातकी आहे. ती स्क्रूच्या दोऱ्यासारखी आहे. या दोऱ्याचा एक वळसा जरी बिघडला तरी सर्व बिघडते. तसेच बुद्धीचे आहे. उलट तोच स्क्रू नीट पक्का बसला तर सर्व कांही साधते ; माणसाला सुख व शांतता मिळते. परमेश्वराची नेहमी प्रार्थना करावी की देवा, मला, योग्य मार्गाला लाव. सतत जप, ध्यान करू शकतात असे आहे कोण ? कांहीजण कसोशीने प्रयत्न करून असे डोके बिघडवून घेतात, तर कांही जणांना गर्वाची बाधा होते. त्यांना सुद्धा चिंता ग्राशीत असते. यापेक्षा माफक साधना करून काम करीत राहणे किती फायदेशीर होते बरे ? नुसती माफक साधना काय कामाची ? बाकीचा वेळ आळसात फुकट घालवला तर फिरून मनाला फाटे फुटतातच. या सर्व गोष्टींचा सांगोपांग विचार करून माझ्या नरेनने

हा मठ व हे मिशन सुरू केले. येथले काम म्हणजे रामकृष्णांचे काम. हे काम निष्काम असून शिवरूपाने जीवसेवा करण्याचा घडा आहे हा. अशा कामात सतत गुंतवून घेतल्याने सर्व दृष्टीने फायदा होतो. एका जागी बसून, सारखी ध्यान धारणा करून, डोके फिरवून घेण्यांत व जन्म व्यर्थ घालविण्यात काय फायदा ? अरे, जे एवढी साधना करीत रहातात त्यांना चिंता का असावी ? त्यांच्या साधनेने त्यांच्यात ज्ञानोदय नको का व्हावयाला ?

× × ×

एकजण नेहमी मातार्जींच्या बरोबर असून, मातार्जींची सेवा व पूजेची तयारी ही कामे तो करीत असे. पुष्कळ भक्त तपाचरणाकरिता बाहेर जातात हे पाहून एक दिवस हा भक्त मातार्जींना म्हणाला कीं मी नेहमी या सर्व कामात गढून गेलेला असतो हे ठीक नाही; तपाचरण करण्यासाठी मला बाहेर जाण्याची परवानगी असावी. माताजी म्हणाल्या की कारे बाळ, आज तू माझे व रामकृष्णांचे काम करीत असतोस; हीं कामे तपाचरणापेक्षा तुला कमी किंमतीची वाटतात काय ? एखादे वेळी जेव्हा तुला तपाचरणाची फार फार इच्छा उत्पन्न होईल तेव्हा महिना दोन महिने बाहेर जा.

× × ×

एकदा एका संसारी स्त्रीभक्ताने पूजा अर्चा कशी करावी याबद्दल विचारल्यावरून माताजी तिला म्हणाल्या की तू संसारी आहेस, तुला पूजा अर्चा जमणार नाही. मी तुला नाम जप दिला आहे तो सारखा करीत जा. तो जप तुला सर्व कांही देईल.

× × ×

एकदा एका भक्ताने विचारले जर भाव नसेल तर जपाचा उपयोग काय ? माताजी म्हणाल्या की पाण्यात आपण होऊन बुडी मारली काय किंवा दुसऱ्या कोणी ढकलून दिले काय, अंग हे भिजणारच. जोपर्यंत मन अपक्व आहे तोपर्यंत रोज जपतप केलेच पाहिजे; त्याने मन एक मार्गी होते. नेहमी सारासार विचार करीत रहावे. जेव्हा मन एखाद्या गोष्टीकडे धावते तेव्हा त्या गोष्टीच्या अनित्यतेबद्दल विचार करीत जावे म्हणजे मन परत देवाकडे लागेल. एखादा पाण्यात गळ टाकून बसतो, त्याच्या शेजारून वाजत गाजत वरात गेली तरी त्याचे तिकडे लक्ष जात नसते.

× × ×

एकदा एकजण म्हणाला की मी जप करतो पण मन लागत नाही. माताजी म्हणाल्या की रोज अमुक एक जप करायचा ठरवून तो विविक्षित वेळी करू लाग म्हणजे मन हळुहळू लागू लागेल.

× × ×

एकदा एकाने विचारले की अमुक एक संख्या मनात धरून मी जप करूं का ? माताजी म्हणाल्या नको; नाही तर तुझे सर्व लक्ष त्या संख्येकडेच लागेल. संख्येकडे दुर्लक्ष करून जप करीत जा. पुढे तो म्हणाला की जप करतांना मन तल्लीन होत नाही. माताजी म्हणाल्या तल्लीनता हळुहळू येईल मन एकाग्र होवो वा न होवो आपण आपला जप सोडूं नये. पुढे मन आपोआपच स्थिर ज्योति प्रमाणे स्थिरावेल. वाऱ्यामुळे ज्योत हालते तसेच वासनामुळे मन चंचळ होते. मंत्रोच्चार बरोबर होत नसला तर मन एकाग्र व्हावयाला वेळ लागतो. मंत्रोच्चार अगदी स्पष्ट व्हावयाला पाहिजे.

× × ×

एकदा एकाने विचारले की जपापूर्वी शास्त्राप्रमाणे प्रत्येक वेळी शरीरशुद्धि केलीच पाहिजे का ? माताजी म्हणाल्या की घरी असतांना

शास्त्राप्रमाणे शक्य तितकी शरीरशुद्धि करावी. पण रस्त्यावरून जात असतांना मनाने जप करावा. मानसिक जप ॐ कारासहित करावा. मानसिक जपाची किंमत लाखपटीने जास्त आहे. एकाग्र मनाने जप झाला पाहिजे, नाही तर त्या जपाचा उपयोग होत नाही. तो म्हणाला रामकृष्ण सांगत असत की दोन तीन दिवस काय पण एक दिवस जर तळमळीने परमेश्वराची प्रार्थना कराल तर तो तुम्हाला दर्शन देईल. मी आज इतके दिवस तळमळतो आहे, पण मला दर्शन होत नाही. त्यावर माताजी हसून म्हणाल्या की रामकृष्णांचे शब्द वेदवाक्य आहेत; ते खरेच होतात. योग्य वेळी तुला अनुभव येईल. त्यांच्या शब्दावर दृढ विश्वास ठेव म्हणजे झाले. अरे आपल्याला सांभाळायला आईबाप आहेत याची जाणीव असणे कांही लहानसहान गोष्ट नाही.

× × ×

सहज बोलता बोलता एकदा माताजी म्हणाल्या की जप हा नियमित वेळीच करायला पाहिजे. केव्हा तो अनुभवाचा क्षण येईल कोणी सांगावे ? म्हणून विविक्षित वेळी नियमाने जप करावा. आजारीपणात शरिराने कांही होत नाही; पण अशा वेळी सुद्धा त्या त्या वेळी परमेश्वराची आठवण करीत जावी. रात्र व दिवस आणि दिवस आणि रात्र यांचा संधिकाल हा अत्यंत प्रशस्त काल होय. त्यावेळी मन स्वभावतःच शुद्ध असते.

× × ×

एकदा एकाने प्रवासासारख्या अडचणीत काय करावे असे विचारल्यावरून माताजी म्हणाल्या की जप मानसिक करावा. नाहीतरी पुढे हळुहळू बोटे व जीभ थांबूनच जाते व आपोआपच मनाने जप होतो. मनच शेवटी आपला गुरु बनते.

× × ×

एकदा एकाने आपण काय काय केले ते सर्व सांगून अजून देवदर्शन होत नाही अशी तक्रार केली; त्यावर माताजी म्हणाल्या की अशी कशी रे तुमची वृत्ति ? म्हणे आम्ही इतकी साधना केली; केली असेल. परमेश्वर कांही भाजीपाला आहे की तो बाजारात विकत मिळेल ?

अशाच तऱ्हेची तक्रार एका संन्याशी भक्ताने लिहून केली; त्यावर माताजी म्हणाल्या की लिहा त्याला की अमक्याने अमक्या ठिकाणी अमुक इतकी साधना केली की परमेश्वर दिसलाच पाहिजे असा कांही कोठे कायदा नाही. अरे, पूर्वी ऋषि मुनि हजारो वर्षे तप करीत होते; पंचाग्नि साधनासारखी खडतर तपस्या ते करीत असत; तरी सुद्धा त्यांच्यापैकी एखाद्यावरच परमेश्वराची कृपा होत असे.

× × ×

एकदा एकजण म्हणाला की मी आपलेकडे इतके दिवस येत आहे, पण मजवर अजून आपली कृपा झाली नाही; मी जसा होतो तसाच राहिलो आहे. त्यावर माताजी म्हणाल्या की समज तू बिछान्यावर निजला आहेस, आणि अशा स्थितीत तुला हलकेच उचलून दुसरीकडे नेऊन ठेवण्यात आले, आणि मग तू जागा झालास, तर एकदम तुझ्या ध्यानांत येईल का की आपण परके ठिकाणी आहो ? नाही ना ? ज्यावेळी तुझ्या डोळ्यावरची झाप नाहीशी होईल त्याच वेळेला तसे तुझ्या ध्यानांत येईल.

× × ×

एकदा एकाने विचारले की परमेश्वरप्राप्ति जपतपाने होईल की कशाने होईल ? माताजी म्हणाल्या की नुसत्या जपतपध्यानाने त्याची प्राप्ति होत नाही, तर त्याची कृपा व्हावी लागते. परंतु जपतपध्याना-दिकांची फार जरूर आहे; त्यांनी मन शुद्ध होते. जसे चंदन उघाळल्यावर

त्याचा वास येतो तसेच मनाने परमेश्वराचा ध्यास घेतल्यावरच तो 'पावतो. बाळ, याक्षणी तुझ्या सर्व वासना सुटतील तर तुला याक्षणीच आत्मानुभव येईल.

× × ×

एकदा एक भक्त म्हणाला की निरनिराळ्या कामामुळे जप ध्यान करायला वेळच मिळत नाही, अशा स्थितीत काय करावे सांगा? त्यावर माताजी म्हणाल्या की हे सर्व जग तेच आहेत; त्यांनीच निर्माण केले आहे. तेव्हा जगांतील सर्व कर्मे त्यांचीच नाहीत का? कोणतेही काम आपण करीत असो, ते आपले नसून त्यांचेच आहे असा पक्का निश्चय करून, आळस सोडून, ढकलाढकली न करता सतत करीत राहिले की कार्यभाग झालाच.

× × ×

एकदा एक तरुण मनुष्य माताजीकडे येऊन संन्यास दीक्षा मागू लागला. एक दिवस सायंप्रार्थनेचे वेळी तो कालीमातेची स्तोत्रे अशा तऱ्हेने म्हणू लागला की सर्वांचे हृदय अगदी हलून गेले. या तरुणासंबंधी सर्वांचा ग्रह फार उत्तम झाला होता. त्या दिवशी माताजींची मेहुणी म्हणाली की पहा या अशा सर्वगुणसंपन्न पोराला आता या संन्यास देणार! यावर माताजींची भाची म्हणाली की खरे आहे; आत्या हे असेच कांहीतरी करते, या अशा मुलाला संन्यास देते. या मुलांचे आईबाप त्यांना एवढे शिक्षण देतात, वाढवतात; त्यांची सर्व आशा मुलावर एकाग्र झालेली असते. या मुलाबद्दल त्यांना किती आशा वाटत असेल? पण संपल्या सगळ्या आशा. हा मुलगा पुढे काय करणार तर हृषीकेशसारख्या ठिकाणी जाऊन भीक मागणार, नाहीतर इस्पितळात राहून लोकांची हागओक काढणार. पण असे का? लग्न करून संसार करणे धर्मच नव्हे का? मग माताजीकडे वळून म्हणाली की आत्याबाई, तूं अशा मुलांना संन्यास का

म्हणून देतेस ? अशा या तुझ्या करणीने तुझ्यावर महामायेचा कोप मात्र होईल. यांना संन्याशी बनायचे असेल तर त्यांचे त्यांना बनू दे; तूं कशाला संन्यास देतेस ? तूं कशाला निमित्तमात्र होतेस ? यावर माताजी म्हणाल्या की माकू, ही सर्व दैवी मुलें आहेत ही सर्व मुलें कळ्याप्रमाणे सर्वदा अगदी शुद्धच राहातील. आणखी जगांत यापेक्षा काय मिळवावयाचे ? संसारातील दुःखाचा अनुभव तुम्ही सर्वजण घेत 'आहात ना ? माझ्यापासून इतक्या दिवसांत तू काय धडा घेतलास ? या संसाराबद्दल तुला एवढे प्रेम का वाटते ? या जनावरासारख्या जीवनात काय गोडी वाटते तुला ? आता-पर्यंत या संसारात तुला काय सुख मिळाले ? स्वप्न म्हणून सुद्धा शुद्ध जीवन तुमच्या डोळ्यापुढे येत नाही ना ? तुम्ही नवराबायको भाऊ बहिणी सारिखे का नाहीं राहूं शकत ? डुकरासारखी जीवन घालविण्याची तुमची हौस का नाही जात ? या संसारांतील दुःखे पाहून माझी हाडे पिचून गेली आहेत. जपजाप्य, ध्यान धारणा न करता खरा ब्रम्हचारी आत्मानुभव मिळवू शकतो; नाहीतर तुम्ही हातपाय बांधलेले लोक ! तुम्हाला ही बंधने सोडवतांना कोण मुष्कील होत आहे ? तुम्हाला देवाचा विचार शिवेल कसा ?

× × ×

एकदा एकाने माताजींकडून संन्यासदीक्षा घ्यायचे ठरवले. त्याची आई माताजींकडे येऊन म्हणाली की माताजी या मुलाला संसारात लक्ष घालायला सांगा. माताजी तिला म्हणाल्या की बाई ग, संन्याशी होण्या-करितां केवढे भाग्य लागते ? माणसाची क्षुल्लक वस्तूवरील सुद्धा वासना जात नाही, मग सर्वसंगपरित्याग करणे किती कठीण असेल बरे ? तू त्याची आई आहेस; तुला काळजी का वाटावी ? तो संन्याशी झाला तरी तुझी सेवा केल्याशिवाय कसा राहील.

× × ×

एकदा एका शाळा चालविणाऱ्या भक्ताला लग्नाकरिता मागणी घालून आली. तो संयमी होता तरी सुद्धा एखादे वेळी त्याच्या मनांत विकार थैमान घालीत असत. शेवटी माताजी सांगतील तेच करायचे ठरवून, त्यांना भेटून, त्यांनी आपली सर्व हकीकत सविस्तरपणे माताजींना सांगितली. माताजींने सर्व ऐकून घेऊन त्याला म्हणाल्या की बाळ, तुझे म्हणणे अगदी योग्य आहे. संसाराच्या जंजाळात पडायचेच कशाला ? तू इतके उत्तम काम करतो आहेस. तुझ्यामुळे इतक्या विद्यार्थ्यांना फायदा होत आहे तुझे विद्यार्थी उत्तम निपजतील व त्यामुळे तुझाही पण फायदा होईल. त्यावर तो म्हणाला की माताजी मधून मधून एखादे वेळी मन एकदम बेचैन होते व त्याला विषय हवासा वाटतो, आणि मग मला भयंकर भीति वाटते. यावर माताजी म्हणाल्या की बाळ, घाबरू नको. या कलियुगात मनाने केलेले पाप, पाप म्हणून गणलेच जात नाही; तेव्हां तू आपले मन अगदी स्वस्थ ठेव. अगदी घाबरू नको.

एवढ्या आश्वासनावर तो आजन्म ब्रम्हचारी राहिला व पुढे त्याला मनोजय प्राप्त झाला.

× × ×

एकदा एकजण माताजींना म्हणाला की आपल्याला सर्व मुले सारखीच असतात, तर मग आपण एखाद्याने लग्नाबाबत विचारले की लग्न करा म्हणून सांगता व दुसऱ्याला संन्यास घ्यावासा वाटला तर त्याच्यापुढे संसाराचे दुर्धर चित्र ठेवून त्यास संन्यास घ्यायला सांगता, हे कसे ? सर्वांना अत्युत्तम असा सारखा मार्ग अवलंबायला का नाही सांगत ? माताजी म्हणाल्या की बाई ग, एखाद्याला विषयवासना फार असली व त्याला त्यापासून परावृत्त केले तर तो माझे ऐकेल का ? उत्तम पूर्वसंचितामुळे या जन्मी संसारातून मन उडाल्यामुळे जर एखादा त्यातून

बाहेर सुटायला पाहू लागला तर त्याला थोडीशी मदत नको का करायला ? या जगांत दुःखाशिवाय आहे काय ?

× × ×

एकदा एकजण म्हणाली की मताजी, रामकृष्ण सांगत की ज्याने मला गुरु केले तो मुक्त होतो ; उलट स्वामीजी (विवेकानंद) सांगत की संन्यासशिवाय मुक्ति नाही; तर मग खरे काय समजावयाचे ? माताजी म्हणाल्या की बाळ, दोन्हीही खरीच. ससारी लोकांना बाह्यत्यागाची जरूरी नाही; त्यांना आंतरिक त्याग आपोआपच प्राप्त होतो. परंतु कांही लोकांना बाह्यत्यागाची जरूरी असते. बाळ, रामकृष्णांना शरण जा व सदैव ध्यानांत ठेव की ते तुझ्या पाठीशीच उभे आहेत.

× × ×

एकदा एका संन्याशी भक्ताला माताजी म्हणाल्या की बाळ-संन्याशाने वागतांना फार जागरूक राहिले पाहिजे. साधूंचा मार्ग मोठा घसरट असतो; अशा मार्गावरून चलतांना चवडचावर मोठचा काळजीने चालावे लागते. संन्यास घेणे ही कांही थट्टेची गोष्ट नाही. एखाद्याच्या मनांत असले तर त्याला लग्न करून संसारात पडता येते; पण तू संसारात न पडायचे ठरवले आहेस ना ? मग मनाला आता त्या गोष्टीकडे जाऊं देऊ नको. अरे, ओकून पडलेले परत कोणी खाते का ? कुत्र्याच्या गळचा भोंवतालचा पट्टा जसा त्याच्या संरक्षणाचे प्रतीक तसेच संसारापासूनच्या संरक्षणाचे प्रतीक ही भगवी वस्त्रे होत. संन्याशाला सर्व द्वारे मोकळी असतात. बाळ, मन हे अधोमुख आहे म्हणून त्याची पापकर्माकडे प्रवृत्ति होते ; चांगल्या कर्माबद्दल मनाला आळस वाटतो. मी चांदण्या रात्री चंद्राकडे पाहून रामकृष्णांची प्रार्थना करीत असे की प्रभो, या चंद्रावर सुद्धा डाग आहेत, पण माझ्या मनाला डागापासून अलिप्त ठेवा.

× × ×

एकदा एकाने विचारले की जपतपाने सुद्धा प्रारब्धकर्म सुटत नाही ना ? माताजी म्हणाल्या बाळ, प्रारब्धकर्म कोणालाच सुटलेले नाही; परंतु जपतपाने प्रारब्धकर्माचा प्रखरपणा कमी होतो; जर पाय तुटायचा असला तर नुसता काटा बोचण्यावर भागते.

× × ×

एकदा बोलता बोलता माताजी म्हणाल्या की रामकृष्ण हे साक्षात् परमेश्वर होते. लोकांची दुःखें दूर करण्याकरितां त्यांनी मानव देह घेतला होता. राजा जसा गुप्तवेषाने हिंडतो तसाच परमेश्वर या वेषाने अवतरला होता; ज्या क्षणी त्यांना लोकांनी ओळखले त्या क्षणी ते निघून गेले.

× × ×

माताजींच्या जवळ -राहणाऱ्या भक्तापैकी एकीवर एकदा नैवेद्य दाखवावयाचा प्रसंग आला. ती तशीच जरा संकोचाने माताजींकडे गेली व तिने त्यांना विचारले की नैवेद्य कसा दाखवावयाचा ? माताजी म्हणाल्या की अग, एवढे घाबरायला त्यांत काय झाले ? ताट पुढे ठेवावे, हात जोडावे व अगदी हृदयापासून प्रार्थना करावी की यावं, ताट वाढलं आहे, जेवायला बसावं. असे म्हणून ते पाटावर येऊन बसून जेवत आहेत अशी कल्पना करावी. अग आपल्या माणसाला आपण का नैवेद्य दाखवितो? पुढे मग तिला त्यांनी मंत्र वगैरे सांगितले.

× × ×

एकदा एका स्त्रीभक्ताची मुलगी मेल्यावर ती माताजींकडे आली. तिचे दुःख पाहून माताजी म्हणाल्या की मला तरी कुठे काय समजते आहे, बाळ? रामकृष्णांचे समोर उभे राहून ध्यानात ठेवावे की ते समोरच आहेत. आपले दुःख त्यांच्यासमोर ओकावे, त्यांच्या समोर रडावे, त्यांची प्रार्थना करावी की प्रभो, मला आपल्या पायापाशी आसरा द्या; माझ्या मनाला

शांतता द्या. असे वारंवार कळवळून तळमळून त्यांची प्रार्थना करावी. त्यांच्यावर भक्ति ठेवावी व त्यांना सर्व सांगावे.

× × ×

शेवटच शेवटच्या दिवसात माताजींनी एका भक्ताला बोलावणे धाडले व तो आल्यावर त्यांनी त्याची आई वगैरेंची चवकशी त्याच्याजवळ केली व म्हणाल्या की मी आता लौकरच जाणार आहे. त्यावर तो म्हणाला की आपण असे काय म्हणता ? आपण गेलात तर माझे कसे होईल ? माझा सर्व आधार आपण. माताजी चटकन् म्हणाल्या की किती वेळा मी सांगितले आहे की आपला सर्व आधार रामकृष्ण आहेत; हे तू विसरलास तर जंजाळात पडशील. मी तुला मुद्दाम बोलावणे धाडले. तुझे वडील वारले तेव्हा आईची काय व्यवस्था याबद्दल मला काळजी पडली. मग मला कळले की तुझ्या वडिलांनी पैसे ठेवले आहेत; आता तुझ्या आईची काळजी मला नाही. तुझ्यामागे पण तिची काळजी नाही. म्हणजे तुझा मार्ग तुला चालू ठेवता येईल. अशी कांही तुझ्या आईची व्यवस्था नसती तर तुला पैसे मिळवून तिची व्यवस्था करायला सांगणार होते. तुम्ही माझ्याकडे आला आहात व सेवा करीत आहा; म्हणून तुमच्या आयांची काळजी मला करावी लागते. आता मला तुझ्या आईची काळजी नाही. काळजी एवढीच घे की पैसा अवास्तव खर्च होत नाही. पैसे मिळविण्याचा प्रसंग तुजवर आला नाही हे फार चांगले झाले. अगदी शुद्ध मार्गाने पैसा जवळ येत नाही; अशा पैशाचा मनावर परिणाम होतो. पैशाकडे थोडे जरी लक्ष पुरवले तर लालुच सुटते. पैशाचा लोभ सोडलाच पाहिजे. जवळ पैसा असला तर आपल्यामागे त्याचे काय अशी विवंचना मागे लागते. सुईच्या अग्रासारखी विवंचना जरी मागे लागली तर लौकरच तिचे आकाशाएवढे भोक होते. वडिलांच्या पैशाची व्यवस्था व आईच्या चरितार्थाची पक्की व्यवस्था करून शक्य तितका लौकर मोकळा हो; दिरंगाई

करूं नको. पैसा केव्हा मोह उत्पन्न करील याचा नियम नाही. अशा या मोठ्या शहरात पैसा कसा खर्च होतो आणि त्यामुळे पैशाचा मोह सुटतो. जमल्यास तुझ्या आईला काशीसारख्या तीर्थाच्या ठिकाणी ठेव, म्हणजे तिलाही संसारातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करता येईल. तिच्याशी नेहेमी परमेश्वराच्या गोष्टी बोलत जा. ध्यानात ठेव की तुझी आई आहे ती; तिने तुला वाढविले आहे. तुझ्या पारमार्थिक मार्गात ती अडथळा करूं लागली तर गोष्ट निराळी. पहा, जमलं तर एकदा तिला माझ्याकडेच घेऊन ये; मला पाहू दे ती कशी काय आहे; मग मला योग्य वाटेल ते सांगेन मी तिला. पण जागरूक रहा. आईच्या सेवेच्या निमित्ताने संसाराच्या भानगडीत सापडू नको. शेवटी हे ध्यानांत ठेवलेच पाहिजे की किती झाले तरी तुझी आई एक विधवा आहे; तिला काय खर्च लागायचा आहे ? व्यवस्था करतांना थोडेसे नुकसान झाले तरी हरकत नाही, पण झटपट व्यवस्था करून मोकळा हो व लौकर परत ये. ध्यानांत ठेव की रामकृष्ण पैशाला शिवत नसत. त्यांच्या नावावर तुम्ही सर्व कामे करता आहा, त्यांच्या नावाने तुम्ही सर्वस्व सोडले आहे. त्यांचे शब्द ध्यानांत ठेव की पैसा हे सर्व अनर्थांचे मूळ आहे; पैसा केव्हा मोहात पाडील त्याचा नेम नाही; म्हणून अगदी सावध रहा.

× × ×

एकदा एका संसारी भक्तास एका संन्याशी भक्ताशी बेअदबीने बोलतांना मातार्जींनी पाहिले. हे ध्यानांत ठेवून, पुढे कांही कारणावरून त्याला बोलायचा प्रसंग आला तेव्हा त्याला माताजी म्हणाल्या की बाळ, रामकृष्णाची मोठी कृपा आहे तुझ्यावर, आणि म्हणूनच लहानपणापासून तू त्यांच्याकडे ओढला गेलास. परंतु तू तीन गोष्टी ध्यानांत ठेव. एक, नदीचे काठावर असलेल्या घरात राहू नको; केव्हा पूर येऊन घरास धोका पोहोचेल याचा नियम नाही. दुसरे, साप; साप केव्हा कसा उलटेल व

चावेल याचा नेम नसतो तिसरे म्हणजे साधूशी, संन्याशाशी अत्यंत आदराने अदबीने वागत जा ; त्याच्या मनांत थोडासा जरी राग आला तरी त्याचा परिणाम संसारी माणसास भोगावा लागतो हे ध्यानांत ठेव.

× × ×

एका नुकत्याच विधवा झालेल्या एका बालविधवेला माताजी म्हणाल्या की बाळ, अशा स्थितीत, इतक्या लौकर मी कधीच कोणास साधारणतः उपदेश देत नाही; पण तुला मात्र देणार आहे; मला याबद्दल पश्चाताप करावा लागेल असे वागू नको. शिष्याच्या अपराधाकरिता गुरूला दण्ड भोगावा लागतो हे ध्यानांत ठेव. नियमाने जप करीत जा. पुढे ती आपल्या सासरी जायला निघाली तेव्हा माताजी तिला म्हणाल्या की कोणाशीही जास्त संघटन करूं नको. समारंभामधे किंवा चार माणसांच्या बैठकीत भाग घेण्याचे शक्य तितके टाळीत जा. नेहमी मनाला प्रार्थना करावी की हे मना तू स्वतःमध्ये गुंग होऊन रहा. फालतू चौकशा कधीही करूं नको. हळुहळू आपल्या जपतपाचा वेळ वाढव. रामकृष्णांचे बोल नेहमी वाचीत जा. कोणत्याही पुरुषाशी, मग तो बाप का असेना. संबंध ठेवू नको; परमेश्वर जरी पुरुषरूपाने समोर आला तरी त्याच्याशी सुद्धा संबंध ठेवू नये हे ध्यानांत ठेव. येथे रहाशील तेव्हा फारशी मठात जात जाऊ नको; तेथे संन्याशांशी संबंध येईल ; तुझ्या सान्निध्याने त्यांच्या मनांत व त्यांच्यामुळे तुझ्या मनांत अयोग्य विचार येण्याचा संभव आहे हे ध्यानांत ठेवून, संन्याशांना सुद्धा टाळीत जा. तीर्थयात्रा व प्रवास हे दुःखदायकच असतात, व तळमळ असली तर घरात बसून सुद्धा सर्व कार्य भाग साधतो, मनाला नेहमी शिकवावे की तू बेचैन होऊ नकोस ; शांत रहा.

× × ×

एकदा एका स्त्री भक्तास, तिला जिने प्रथम माताजींकडे आणून त्यांच्या चरणावर घातले, तिच्यावर टीका करतांना ऐकल्याबरोबर माताजी

तिला चटकन् म्हणाल्या की असे तिच्याबद्दल बोलू नको; तिच्याबद्दलचा तुझा आदर किंचितही कमी होऊ देऊं नको; तिच्याशी अमर्यादपणाने वागू नको, बोलू नको. सदैव ध्यानांत ठेव की तिने तुला प्रथम माझेकडे आणले आहे.

× × ×

एकदा एका स्त्री भक्तास मांजराला कुरवाळतांना माताजी पहात होत्या; थोडया वेळाने तिला मांजराच्या डोक्यावर पाय देतांना त्यांनी पाहिले. हे पाहिल्याबरोबर माताजी म्हणाल्या की हे ग काय पोरी ? कोणाच्याही डोक्यावर आपला पाय ठेवायचा ? अग सर्व गात्रांत डोके मुख्य आहे ना ? आणि त्या डोक्यावर तू पाय ठेवलास ? कर त्या मांजराला नमस्कार. ती लगेच म्हणाली की माताजी क्षमा करा; मला हे तत्त्व माहीत नव्हते म्हणून असे झाले. असे म्हणून तिने मांजराला नमस्कार केला.

× × ×

एकदा एकीने झाडझूड केल्यावर हातातली केरसुणी फेकून दिलेली पाहून माताजी तिच्यावर रागावून म्हणाल्या की हे काय हे ? केरसुणी फेकून दिलीस ? तिला कांही किंमत नाही का ? तिच्याकडून इतके काम करून घेता आणि मग तिला बेवारशासारखे फेकून देता ? तिला फेकायला जितका वेळ लागतो तितकाच वेळ तिला जाग्यावर उचलून ठेवण्यास लागतो वस्तू कितीही लहान किंवा हलकी असली तरी तिच्याशी बेमुर्वतीने वागू नये; आपण तिचा आदर केला तर ती पण आपला आदर करील. फिरून त्या केरसुणीची जरूर नाही का लागणार ? केरसुणी ही सुद्धा कुटुंबातील एक घटकच नाही कां ? काम कितीही हलके असो, ते आस्थेने व काळजीनेच करायला पाहिजे.

× × ×

एकदा कोणाला तरी अपशब्द व अद्वातद्वा बोलतांना ऐकून माताजी म्हणाल्या की बाबा, दुसऱ्याला लागेल असे कधी बोलू नको. एक तत्त्व ध्यानांत ठेव की " न ब्रूयात् सत्यमप्रियम् ।" आपण वाकडे तिकडे बोलू लागलो तर आपले मन पण वाकडे तिकडे वागू लागते. आपल्या वाचेवर जर आपला ताबा नसेल तर आपला समंजसपणा नाहीसा होतो. रामकृष्ण सांगत असत की पांगळ्या माणसाला तू का व कसा पांगळा झालास हे विचारूं नये.

× × ×

एकदा माताजी म्हणाल्या की बाबांनो, प्रवास करतांना भोवताली पहात जा. जेथे रहाल तेथील रीतिरिवाज, माहिती, घडामोडी वगैरे सर्व नीट लक्षात आणावे. फक्त एक लक्षात ठेवावे—बोलू नये.

× × ×

एकदा एकाला माताजी म्हणाल्या की बाळ, अडचणी येणार नाहीत असा समज करून घेऊं नको. अडचणी येणारच; तशा त्या जाणारही पण हे ध्यानांत ठेव. पुलाखालून जसे पाणी वाहून जाते तशा अडचणी पण येऊन जातात.

× × ×

एकदा रात्री घरातला आचारी माताजींना म्हणाला की मला कुत्रे शिवले आहे तर मी स्नान करून येतो. माताजी म्हणाल्या की आता रात्र झाली आहे तर नको जाऊं; हात पाय धुवून कपडे बदल. तो म्हणाला की असे कसे चालेल ? माताजी म्हणाल्या की मग अंगावर गंगेचे पाणी शिपड. हेही त्याला पटेना. तेव्हा माताजी म्हणाल्या की नाही तर आता मला स्पर्श कर म्हणजे झाले.

× × ×

एकदा एक म्हातारी माताजींना म्हणाली की तुमच्याकडे या तरुण विधवांनी खाऊं नये ते खातात, लेवू नये ते लेतात, यामुळे पुष्कळ लोक विरुद्ध होऊन नाक मुरडतात. यावर माताजी म्हणाल्या की बाई हे सर्व रिवाज आहेत व प्रांतोप्रांती, जागोजागी निरनिराळे रिवाज प्रचलित असतात. आमच्या प्रांतात विधवांना त्या मानाने जरा जास्त मोकळीक आहे. विधवा झाल्या तरी त्यांना खाणे, पिणे, लेणे वगैरेची हौस असणारच. त्यांना मोकळेपणाने थोडे फार तसे करू न दिले तर त्या चोरून तसे करतील. सुरवातीला थोडीशी मोकळीक देऊन, त्यांना हळूहळू कसे वागावे व का वागावे हे नीट समजावून दिले तर त्या आपण होऊन सर्व सोडून देतील. परंतु बाई ग, अशा लहान सहान फालतू गोष्टीत तू आपले मन घालूं नको; तितका वेळ रामकृष्णांचा विसर पडतो ना ! लोक कांहीही म्हणोत, आपल्याला त्यांच्याशी काय करायचे आहे ? रामकृष्णांचे स्मरण करून आपल्याला योग्य वाटेल ते करावे. रामकृष्ण सांगत की लोक म्हणजे पोक (किडे) समजावे; त्यांचेकडे लक्ष देऊ नये. ह्याचा अर्थ इतकाच की दुष्ट आणि पापी लोकांकडे नेहमी दुर्लक्ष करावे.

× × ×

एकदा एका स्त्री भक्तास माताजी म्हणाल्या की मुली, माणसावर प्रेम करण्याने शेवटी दु:खच प्राप्त होते; म्हणून परमेश्वरावर प्रेम कर.

× × ×

एकदा कांही जणी कशाकरिता काय करावे लागते याबद्दल आपआपसात बोलत होत्या. हे बोलणे माताजींनी बराच वेळ ऐकल्यानंतर त्या म्हणाल्या की पुरे झाली तुमची प्रश्नोत्तरे; आता माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या की, परमेश्वरापाशी काय मागावे ? यावर त्यांची भाची म्हणाली की ज्ञानाची, भक्तिची, भावाची इच्छा करावी. यावर माताजी म्हणाल्या की थोडक्यात असे म्हणता येईल की निरिच्छ होण्याची इच्छा प्रदर्शित

करावी. ध्यानात घ्या की इच्छा–वासना हे सर्व दुःखांचे मूळ आहे; जन्म-मरणाच्या फेऱ्यात सापडण्याचे एकच कारण–वासना; आत्मानुभवाच्या मार्गातील एकमेव अडचण–वासना.

× × ×

एकदा एक भक्त बोलता बोलता सहज म्हणाला की आताशे माझ्या मनात विकल्प उत्पन्न होत नाहीत. हे ऐकून माताजी एकदम चमकल्या व म्हणाल्या की पुढे बोलू नको; असे कधीही बोलू नये हे ध्यानांत ठेव.

× × ×

एकदा एका भक्ताने विचारले की एवढ्या मोठमोठ्या सत्पुरुषांच्या सहवासात राहून, त्यांची सेवा करणाऱ्यापैकी कांहीचा अधःपात झालेला नजरेस येतो याचे काय कारण ? माताजी म्हणाल्या की सत्पुरुषांची सेवा करतांना सेवा करणारा चुका करतो म्हणून. त्याचे असे होते कीं त्याला वाटू लागते की एवढ्या मोठ्या सत्पुरुषाची सेवा करण्याचा अधिकार मलाच मिळाला आहे; यामुळे त्याचा अहंकार वाढू लागतो. पुढे तो बाहुलीप्रमाणे सत्पुरुषावर आपला ताबा चालवू लागतो; त्याचे खाणे, पिणे, बसणे, उठणे वगैरे तो आपल्या तंत्राने करू लागतो. ह्यात सेवाभाव अर्थातच नाहीसा होतो; मूळ करायला जे घेतले तेच नाहीसे होते. आपले सत्व विसरून सत्पुरुष सांगेल तसे आपण करायचे हे तत्त्व तो विसरतो; मग त्याचा अधःपात न होईल तर काय होईल ? पुष्कळ सत्पुरुषांचे भोवती वैभव जमू लागते; यामुळे त्यांचे भोवती सेवेकरी पुष्कळ जमू लागतात; हे सेवेकरी वैभवाचा उपभोग घेऊं लागतात व अशा तऱ्हेने आपल्या अधःपाताची तयारी ते करतात. सेवा करायची हे ध्येय सतत डोळ्यापुढे ठेवून कितीजण सेवा करतात सांगा बरे ? सरोवरात चंद्राचे प्रतिबिंब पडलेले पाहून त्यातील लहान माशाना ते प्रतिबिंब आपल्यापैकीच एक असे वाटून, ते आनंदाने खूप नाचू बागडू लागतात. चंद्र मावळला की प्रतिबिंब नाहीसे होते व ते सर्व नाचणारे कुदणारे मासे आपल्या मूळ रूपात जातात. ते काय होते ते त्यांना समजत नाही.

× × ×

एकदा एका भक्ताचे मनात आपल्या आईस काशी यात्रेस न्यायचे आले; पण त्याची आई त्याला म्हणाली की हे दिवस यात्रेला अशुभ आहेत रे; शुभ दिवस येईतो थांबले पाहिजे. हे ऐकून तो माताजींकडे येऊन त्यांना त्याने सर्व हकीगत सांगितली. त्याच्या मनात उत्पन्न झालेला गोंधळ व शंका पाहून माताजी म्हणाल्या की बाबारे, संसारी माणसे सत्कर्मा-करिता सुद्धा शुभ मुहूर्त पाहातात; शुभाशुभ कालमान पाहून सत्कर्म पुढे मागे ढकलतात हे खरे आहे. हे लोक एक महत्वाची गोष्ट विसरतात की काल हा त्यांच्यावर झडप घालण्याकरिता शुभाशुभ वेळ पहात नाही. मृत्यू केव्हा येईल याचा नियम नसल्याने मनात करायचे आलेले सत्कर्म लगेच करून टाकावे, वाट पाहू नये.

× × ×

माताजी जाणार हे समजल्यावर एक भक्त आता आपले कसे होईल असे मनांत येऊन, बिचारा मुक्तकंठाने रडू लागला. माताजींनी हे जाणून, त्याला बोलावून घेऊन, त्याला म्हणाल्या की बाळ, अरे हे शरीर मी सोडले तरी माझ्याकडे आलेल्या प्रत्येकाला: बंधनातून सोडवून जागेवर पाहोचवी-तोपर्यंत मी कशी जाऊ शकेन रे ? अरे, तुम्हा सर्वांची मी जबाबदारी घेतली आहे ना ? ती पार पडल्याशिवाय मी मोकळी कशी होईन ? मला तुमच्याबरोबरच राहिले पाहिजे. तुमच्या सर्व चांगल्या व वाईटाचा भार मी आपल्यावर घेतला आहे ना ? उपदेश देणे म्हणजे काय वायफळ बडबड का समजतोस तू ? यामुळे माझ्यावर कितीतरी जबाबदारी येऊन पडली आहे. आम्हाला किती काळजी करावी लागेल. तुझे वडील वारल्या-वर मला तुझी किती काळजी करावी लागली बरे ! रामकृष्ण अशी ही परीक्षा पहातात व त्यात तुला यश यावे म्हणून मी किती प्रार्थना करीत असे. मी काय म्हणते ते समजते का तुला ? अरे हे तुला समजत असले तर मला सोपे जाईल. रामकृष्ण तुम्हा सर्वांची अशी परीक्षा घेतात व त्याचा भार मला सहन करावा लागतो. ज्याना ज्यांना मी पत्करले आहे त्यांना मला बाजूला सारताच येत नाही.


ॐ तत्सत् ।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 13846
REFBK-0013846

# परिशिष्ट

## माताजींची कुंडली व जन्मावेळी वर्तवलेले भविष्य

शके १७७५ पौष कृष्ण अष्टमी; ता. २२ डिसेंबर १८५३ सायंकाळी ६–५२ वाजता. नक्षत्र उत्तराफाल्गुनी. सूर्य महादशा भोग्य ५–११–१९.




सिंहेचा मंगळ, मकरेचा शुक्र, वृषभेचा शनि तसेच धनेचे रवि व गुरु राजयोग दर्शवितात. सप्तमातील रविगुरु युति ही नवरा संसारी मनुष्य दाखवीत नसून सर्वसंगपरित्याग करणारा दाखवितात; नवऱ्याला परमार्थात मदत करण्याचा योग दाखवितात. गुरुच्या घरात रविगुरु युती व लग्नावर आणि पराक्रमातल्या मंगळावर गुरुची दृष्टि हे अमानुष आत्मसंयमन, शुद्ध स्वभाव व मन, आणि जबरदस्त इच्छाशक्ति दाखवितात. बुधे केतु युती साधेपणा, जपाचरण व ध्यानयोग दाखवितात.

शुभं भवतु ।